म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १

# रशियांती[redacted]द्यामंदिर,

श्री. ग. त्रि. अकोल्कर,
एम. ए. बी. टी.

[redacted]

टिनेन्टल प्रकाशन

REFBK-0006838

१९४७ ]

[ किंमत साडे तीन रुपये

कॉन्टिनेन्टल प्रकाशन ·५५

# रशियांतील विद्यामंदिर

ग. वि. अकोलकर, एम्. ए. बी. टी.



REFBK-0006838

सन १९४७

किंमत साडेतीन रुपये

सोल एजंट
अ. अं. कुलकर्णी,
कॉंटिनेंटल् प्रकाशन,
१९६/२९ सदाशिव,
पुणें २

★

प्रकाशक
गो. रा. पाटणकर,
कॉंटिनेंटल् बुक सर्व्हिस,
शनिवार पेठ,
पुणें २

मुद्रक
स. रा. सरदेसाई,
समर्थ भारत छापखाना,
४१ बुधवार पेठ,
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
कि १

## प्रस्तावना

या पुस्तकांतील प्रत्येक घटना वस्तुस्थितीच्या आधारें रेखाटली आहे. मुळांतलीं नांवें व कालानुक्रम यांत मात्र कांहीं ठिकाणीं फरक केला आहे.

कदाचित् असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, मी ज्या शाळेंत काम केलें ती लहानशी व विशिष्ट तऱ्हेची असल्यानें मॉस्कोंतील शाळांची प्रातिनिधिक समजतां येणार नाहीं. पण तो आक्षेप बरोबर नाहीं. आमच्या शाळेचे कांहीं प्रश्न अगदीं स्वतंत्र असले तरी इतर सर्व बाबतींत सोव्हिएट शाळांच्या पद्धतीवरच ती चालत होती. तींच पाठ्य पुस्तकें, तोच अभ्यासक्रम, त्यांच्या शाळेंत राखण्यांत येणारा तोच दर्जा संपादण्याची आमची धडपड असे. सर्व शाळा एकाच शिक्षण व्यवस्थेखालीं होत्या.

सोव्हिएट प्रदेशांतील शिक्षणपद्धतींची चर्चा करतांना पूर्वग्रहदूषित वृत्ति ठेवणें बरोबर होणार नाहीं. " आम्ही तर याच्याहि पुढें गेलों आहोंत." " आमच्या शाळा चालविण्याच्या कल्पना अशा नाहींत." असें पुष्कळजण मला म्हणाले आहेत; पण या बाबतींत वैय्यक्तिक मतांना फारशी किंमत नाहीं. विशेष जिव्हाळ्याची आणि म्हणून लक्षांत घेण्याजोगी कोणती गोष्ट असेल तर ही कीं शक्य तेवढी उत्कृष्ट अशी सार्वजनिक शिक्षण योजना सोव्हिएट प्रदेशांत सुरू झाली आहे; प्रतिवर्षी तिची वाढ व विकास होत आहे. शिक्षणक्षेत्रांत प्रत्यक्ष कार्य करणारे लोक त्यांच्या अनुभवांच्या व प्रगतीच्या जोरावर अध्यापनाचा

दर्जा वाढवीत आहेत आणि शिक्षणक्षेत्रांत नवीन पद्धति व नवे विचार यांची भर टाकीत आहेत.

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्या समाजव्यवस्थेचा ह्या शाळा एक घटक आहेत, त्या समाजाच्या तात्कालिक गरजा पुरविण्याची कामगिरी या शाळा पार पाडीत आहेत. जसजसा समाजाचा विकास होईल आणि गरजांचें स्वरूप पालटेल, तसतसें त्या शाळांचेंहि स्वरूप पालटत जाईल. कारण समाजाची गरज भागविणें हें या शाळांचें कार्य आहे. समाज-सत्तावादाच्या व विश्व-कुटुंबवादाच्या मार्गानें समाजाचा विकास घडविणारे कार्यक्षम नागरिक तयार करणें हें त्यांचें उद्दिष्ट आहे.

ज्या एक गोष्टीचा मला कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो ती म्हणजे सोव्हिएट प्रदेशांत वावरतांना व कार्य करतांना मिळालेलें स्वातंत्र्य. इतर शिक्षकांप्रमाणेंच अभ्यासक्रम पार पडण्याचीं बंधनें मजवर होतीं हें खरें. पण अध्यापनपद्धतीबाबतींत प्रयोग करण्याचें, अध्यापनाच्या वेळाची स्वतांच्या विचारानुसार आंखणी करण्याचें स्वातंत्र्य मला होतें. आणि इतर शिक्षकां-प्रमाणेंच माझ्याहि कामाचें योग्य तें चीज केलें जात होतें असेंहि माझ्या अनुभवास आलें. चांगल्या कामाची नेहमीं प्रशंसा होई आणि त्यास उत्तेजन मिळे. निकृष्ट कार्याबद्दल नापसंती दर्शविली जाई, आणि ज्यायोगें तो निकृष्ट-पणा लवकर नाहींसा होईल अशा पद्धतीनें त्यावर सदैव टीका होई. निष्णात शिक्षकांच्या शैक्षणिक जगनांत नेहमींच बोलबाला होई आणि त्यास योग्य तो मान मिळे.

सोव्हिएटांत विद्यामंदिर हें जगांतल्या इतर कोणत्याहि देशांतल्यापेक्षां अधिक गतिमान् व प्रभावशाली आहे. जीविताचे प्रश्न सोडविण्यास समर्थ असलेले आणि आपणांस हव्या त्या क्षेत्रांत ज्ञानार्जन चालू ठेवण्यास पात्र बनलेले बहुश्रुत विद्यार्थी त्यांतून बाहेर पडत आहेत.

—डी. लेव्हिन

## प्रवेशद्वारीं :

कोणतेंहि राष्ट्र आपल्या बालकांच्या संगोपन-संवर्धनाकडे किती लक्ष पुरवितें हें पाहिलें म्हणजे त्या राष्ट्राची भावि प्रगति कशी होणार हें अजमावतां येईल असे विचार मनांत घोळत असतांच तीन वर्षांपूर्वी डी. लेव्हिन या इंग्रज शिक्षिकेचें 'चिल्ड्रन ऑफ सोव्हिएट रशिया' (सोव्हिएट रशियाचीं बालकें) हें पुस्तक हातीं पडलें. सारें पुस्तक एखाद्या कादंबरीसारखें वाचून झालें. सोव्हिएट विद्यामंदिरांतील नवें वातावरण, नवी दृष्टि, शिक्षकांची ध्येयनिष्ठा आणि प्रगमनशीलता, आपल्या नव्या पिढीवर नवीन संस्कृतीचे नवे संस्कार घडवून आणणाऱ्या सोव्हिएट राष्ट्राच्या पद्धति साऱ्याच गोष्टी अभिनव व मोहक वाटल्या. एका शिक्षिकेनें शिक्षकांना परिचित् वातावरणांत व प्रसंगांनीं सर्व गोष्टी जिव्हाळ्यानें कथन केल्या असल्यानें शिक्षकांच्या दृष्टीनें पुस्तक अनमोल वाटलें. या पुस्तकाचा परिचय आपल्या शिक्षकबंधूंना करून दिलाच पाहिजे अशी अनावर इच्छा झाली. जसजसा आपल्या शैक्षणिक वातावरणाशीं, रूढ कल्पनांशीं, शिक्षकांच्या उदासी वृत्तांशीं निकट परिचय येत गेला तसतशी ही अनुवादाची आवश्यकता अधिकच भासली. गेल्या नोव्हेंबरमध्यें आरंभ केला. कामाच्या गर्दीतून वेळ काढून मेपर्यंत काम पुरेंहि केलें.

त्यानंतर प्रा. अ. रा. कामत यांचें "नवें शिक्षण" बाहेर पडलें. त्यामुळें अनुवाद प्रसिद्ध करावा कीं न करावा असा असा कांहीं क्षण संदेह निर्माण झाला. पण आरंभींच डोळ्यांत भरलेलें पुस्तकाचें वैशिष्ट्य लक्षांत घेतां त्याची उपयुक्तता अजूनहि आहेच अशी खात्री वाटल्यानें हें धाडस करीत आहें.

पुस्तक वाचतां वाचतांच रशियांतील विद्यामंदिरांत खेळणाऱ्या वातावरणाचा वाचकांना अनुभव येईल. त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाहीं. तरीपण दोन तीन गोष्टींकडे लक्ष वेधावेंसें वाटतें.

सोव्हिएट रशियांत जी नव संस्कृति निर्माण होत आहे तिचें बाळकडू लहानपणींच विद्यार्थ्यांना मिळत आहे. तें काम शिक्षक आस्थापूर्वक, श्रद्धापूर्वक करीत आहेत. अशा कांहींतरी श्रद्धेवांचून शिक्षकाचा व्यवसाय निरर्थक आहे. कालिदासाच्या शब्दांत 'तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति' रशियन शिक्षकांत जिवन्त दृष्टि आहे, राष्ट्राच्या गरजा ओळखून व विद्यार्थ्यांची पात्रापात्रता जाणून घेण्याची तयारी आहे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलें अध्यापनविषयक ज्ञान अद्यावत् ठेवण्याच्या कामीं ते जागरूक आहेत, टीका-प्रतिटीकांनीं विद्ध न होतां त्यांतील स्नेहमयता, त्यामागील सद्हेतु जाणून स्वतः प्रगत होत जाण्याचा उदार दृष्टिकोन त्यांच्याजवळ आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतींत विविध संधि उपलब्ध करून देणें ही गोष्ट राज्यतंत्राधीन असेल, पण विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक विकासाकडे लक्ष पुरविण्याच्या योजना आजहि आम्हांस आंखतां येतील. त्यांचें महत्त्व मात्र पटलें पाहिजे. स्वातंत्र्य–मंदिरांत पाऊल टाकल्यानंतर तरी शाळा–चालकांनीं, मुख्यध्यापकांनीं व शिक्षकांनीं परकीय सत्तेनें 'प्रवर्तितं चक्रं' शक्य तितक्या लवकर वेगळ्या दिशेनें नेण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे. शिक्षणपद्धतीची आमूलाग्र पुनर्घटना शिक्षणाधिकारी केव्हांहि करोत, पण ती प्रत्यक्षांत आणतांना ठेवावयाची दृष्टि, बाळगावयाची भावना आपापल्या विद्यालयांचें वातावरण, त्यांतील ताजेपणा, उत्साह यांची जबाबदारी अखेरीस शिक्षकांवर आहे.

याच दृष्टीनें रशियन शिक्षक कसा ध्येयप्रेरित होऊन कार्य करीत आहे याचा शिक्षकांनीं अभ्यास करावा. स्वतःच्या अध्यापनाव्यतिरिक्त प्रत्येक शिक्षक कांहीं तरी सार्वजनिक कार्य कसें करतो हें पाहावें, त्यांच्या शिस्तीच्या

कल्पना अभ्यासाव्यात, शिस्तीचे प्रश्न सोडविण्याची पद्धतिहि बारकाईनें पाहावी, विशेषतः लहानपणापासून विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यांत येणारा सामायिक दृष्टिकोण ( Collective outlook ), त्यांच्यांत बिंबविण्यांत येणारी सहकार्याची भावना व त्यांना लावून देण्यांत येणारी सामाजिक कार्याची आवड या गोष्टी विशेष उल्लेखनीय आहेत. संस्कारक्षम वयांतच आपलें तत्त्वज्ञान नव्या पिढीच्या अंगीं लहानसहान कृतींतून मिरविण्याची महती यामुळें स्पष्ट होईल.

शिक्षकांच्या दृष्टीनें आणखी एका गोष्टीचा निर्देश करणें आवश्यक वाटतें. ती म्हणजे शिक्षक कामगार-संघ व तिचें कार्य. आपल्याकडे ' शिक्षकांचा कामगार संघ हीं शब्दयोजनाच अधिक्षेपाचा विषय होत आहे. पण याला कारण भिन्न भिन्न व्यवसायांत उच्चानीचता, पवित्रापवित्रत्व असे कृत्रिम भेद कल्पिण्याची आमची विचारसरणी. स्वतःच्या व्यवसायाची पातळी उंचाविण्यासाठीं, त्यांत जिवंतपणा आणण्यासाठीं आणि विशेषतः शिक्षकाच्या वैय्यक्तिक जीवनांत उत्साह, आनंद, विश्रांती यांना स्थान मिळवून देण्याच्या दृष्टीनें शिक्षक-संघाचें कार्यक्षेत्र किती विशाल आहे, याची कल्पना सोव्हिएटच्या प्रयत्नावरून सहज येईल. पण ' समानीनी आकुतिः' वृत्तीनें शिक्षक स्वयंप्रेरणेनें कार्यप्रवण होतील तेव्हांच कांहीं आशा.

अनुवादांत मूळ पुस्तकाचें नांव कां बदललें याचें वेगळें स्पष्टीकरण देण्याची गरज नाहीं.

हें अनुवादाचें कार्य लवकर संपविण्यास माझ्या स्नेहीवर्गाची निकड जशी कामीं आली, तशीच ही कृति प्रकाशांत आणण्यासाठीं माझे स्नेही श्री. अनंतराव कुलकर्णी यांची निर्व्याज आपुलकी उपयोगी पडत आहे, त्याचें श्रेय त्यांनाच आहे. एवढें सांगितलें म्हणजे आभाराचा उपचार पाळा-वयास नको.

आगामी पुस्तक

मादाम क्यूरी

—अकोलकर

## १ श्री गणेशा

१९३३ च्या उत्तरार्धांत मी सोव्हिएट रिपब्लिकमध्यें येऊन दाखल झालें. तेथें थोडासा काल घालवावा आणि सोव्हिएट शिक्षणपद्धतीचा सूक्ष्म अभ्यास करावा असा माझा मनोदय होता. मॉस्कोंतील पुष्कळशा शाळा मीं पाहिल्या आणि शिक्षण-तज्ज्ञांच्या गांठीभेटीहि घेतल्या. त्यामुळें पुष्कळ नव्या आणि गंमतीच्या गोष्टी मला समजूं लागल्या होत्या; आंकडेहि मीं गोळा केले होते. पण हें सारें एकांगीपणाचें होत असून, शिक्षणपद्धतीचें संपूर्ण चित्र अद्याप पाहावयास मिळालें नाहीं असेंच प्रत्येक वेळीं माझ्या मनास वाटे. एखाद्या शाळेंत सबंध दिवस काढूनहि माझ्या मनाचें समाधान होईना; तेव्हां मॉस्कोंत कांहीं काल वास्तव्य करावें व एखाद्या शाळेंत प्रत्यक्षच काम करावें हा विचार हळूहळू दृढ झाला आणि त्यासंबंधानें ताबडतोब चौकशी करण्याचें मीं ठरविलें.

" तूं इंग्लिश-अमेरिकन शाळेंत कां जात नाहींस? त्यांना शिक्षकाची गरज आहे, आणि तेथें काम करण्यांत तुलाहि खात्रीनें मौज वाटेल, " असें एका मैत्रिणीनें मला सुचविलें.

" मला खऱ्याखुऱ्या सोव्हिएट शाळेंत काम करण्याची इच्छा आहे," मीं म्हटलें, " तुम्ही सांगतां ती शाळा परकीय लोकांसाठीं असणार; तेव्हां तिला कांहीं नमुनेदार म्हणतां यावयाचें नाहीं."

"ती सुद्धां खरीखुरी सोव्हिएट शाळा आहे," मला उत्तर मिळालें.

"एकदां जाऊन पाहाच आणि मग तुझें तूंच ठरव," असें बोलून तिनें मला त्या शाळेचा पत्ता दिला.

दुसऱ्याच दिवशीं मी त्या इंग्लिश-अमेरिकन शाळेंत जाऊन थडकलें. निदान कांहीं नवीन गोष्टी पाहून आपली करमणूक होईल असा विचार होता. शाळेची इमारत म्हणजे मॉस्कोंतील जुन्या नमुन्याचा दोन मजली वाडा होता. पूर्वीं तो एका श्रीमान् व्यापाऱ्याच्या मालकीचा होता. खिडक्या उंच होत्या. भोंवतालीं अंगणहि ऐसपैस होतें. त्यांत झाडें असल्यानें तिथला देखावा रमणीय वाटत होता. इतस्ततः बर्फाचे थर पसरले होते. पुष्कळशीं मुलें स्केटिंगचा खेळ तेथें खेळत होतीं.

मी आंत शिरलें आणि 'मुख्याध्यापिकेची भेट होऊं शकेल कां' म्हणून विचारलें. अंगावरील पावसाळी कोट आणि बूट काढून ठेवण्याची मला विनंति करण्यांत आली. मी एका हंसतमुख तरुणीच्या मागोमाग आंत शिरलें. माझें चांचरत चांचरत रशियन बोलणें तिला समजलें असावेसें दिसलें. तिनें भराभरा बोललेले शब्द मात्र मला नीटसे उमगले नाहींत.

आम्ही एका अरुंद वाटेनें जाऊं लागलों. कानावर हंसण्याखेळण्याचे ध्वनि येत होते. हे सुटीचे दिवस असल्याचें मला ठाऊक होतें; त्यामुळें अगदीं कामांत गर्क दिसणारीं व वर्गांत ये-जा करणारीं इतकीं मुलें शाळेंत पाहून मला साहजिकच विस्मय वाटला. आम्हीं एक दिवाणखाना ओलांडला. तेथें अर्ध्याविजारी व अर्ध्या बाह्यांचे शर्ट घातलेल्या मुलांचा एक घोळका उभा होता. दोरीवर उड्या मारण्याचा त्यांचा क्रम चालू होता. हवेंत उलट्या उड्या घ्यावयास ते शिकत होते. त्यांच्या हंसण्याखिदळण्यावरून त्यांचा वेळ मोठा मजेंत जात असावा. एक सतरा वर्षांचा तरुण त्यांना शिकवीत होता.

मुख्याध्यापिकेची कचेरी दिवाणखान्यापासून अलग होती. त्यांनीं मोठ्या आपुलकीनें माझें स्वागत केलें. शाळा पाहण्याची मीं इच्छा व्यक्त केली. 'माझें भाषण मोठ्या आस्थापूर्वक त्यांनीं ऐकून घेतलें. मला सात वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे; सोव्हिएट शिक्षणपद्धतीबद्दल मला आवड आहे; सोव्हिएट शाळेंत काम करण्याची मला उत्सुकता आहे; त्यामुळें सोव्हिएट पद्धतींचें अंतरंग मला परिचित होईल' इ. इ. मीं सर्व त्यांना सांगितलें.

" आमची शाळा दाखविण्यांत मला आनन्दच आहे, " मुख्याध्यापिका म्हणाल्या, " तुम्हांला ठाऊक असेलच की सध्यां शाळेला सुटी आहे. **तेव्हां इतर शाळांप्रमाणेंच या शाळेचेंहि रूपांतर सध्यां क्रीडामंडळांत झालें आहे.** चला मुलें काय करीत आहेत हें पाहा तर खरीं."

इतकें बोलून त्या निघाल्या. आम्ही एका खोलींत शिरलों. तेथें मुलांचे–मुख्यतः मुलगेच–गट टेबलावर बुद्धिबळें, सोंगट्या आणि तसलेच इतर खेळ खेळण्यांत गढून गेले होते. " ही खोली शांततेनें खेळ खेळण्यासाठीं आहे," अध्यापिकेनें खुलासा केला. " आणि आज सकाळीं देखरेख करण्याचें काम त्या पलीकडे उभ्या असलेल्या काळगेलेशा मुलाकडे आहे. सध्यां बुद्धिबळाच्या चढाओढी सुरू आहेत."

आम्ही पुढें गेलों. दुसऱ्या एका खोलींत कांहीं मुलें एकमेकांच्या साहाय्यानें कांहीं वस्तु तयार करीत होतीं. कांहीं लहान मुलें ठोकळ्यांच्या साहाय्यानें चित्रें बनवीत होतीं. येथें त्यांच्यावर देखरेख करणारा मला कोणीच आढळला नाहीं. खोलींत मात्र संपूर्ण शांतता नांदत होती. प्रत्येकजण आपापल्या खेळांत गर्क होता. " तूं काय बनवीत आहेस ? " म्हणून मीं एका छोकऱ्याला प्रश्न केला. " वोल्गा नदीवर पूल बांधत आहेत त्याचाच सांचा आम्ही बनवीत आहोंत. वर्तमानपत्रांतून सारी माहिती आम्हीं गोळा केली."

" आम्ही आमचें मॉडेल प्रदर्शनांत ठेवणार आहोंत," एक दहा वर्षांची चिमुरडी पोर म्हणाली. मी गोंधळून गेलें आहे असें पाहून ती म्हणाली, " आमच्या जिल्ह्यांत प्रदर्शन भरणार आहे. सगळ्या शाळा सुटींत काय काय तयार केलें तें प्रदर्शनांत पाठवतील."

आम्हीं त्यांना तेथेंच सोडलें आणि ग्रंथालयांत व वाचनालयांत गेलों. एक शिक्षक तेथें बसलेले होते. भिंतीवर विविध प्रकारच्या गंमतीच्या आकृति, रेखाचित्रें आणि नकाशे हीं टांगलेलीं होतीं. तीं निरखून पाहिल्याशिवाय पुढें जाणें शक्य नव्हतें. दुसऱ्या एका खोलींत अगदीं रंगांत आलेल्या मुलांमुलींचा घोळका होता. त्यांची नाटकाची रंगीत तालीम चालली असल्याचें स्पष्ट दिसत होतें. एक अठरा वर्षांची मुलगी त्यांना दिग्दर्शन करीत होती. नंतर आम्ही कचेरींत परतलों.

इकडल्या तिकडल्या विषयावर आमच्या गप्पा झाल्यावर मुख्याध्यापिकेनें

'आमच्या शाळेंत येतां का' म्हणून मला प्रश्न केला. अँग्लो-अमेरिकन शाळेंत जाऊन मला काय फायदा होणार—म्हणून मीं शंका व्यक्त केली. सोव्हिए-एटचें शालेय जीवन अनुभवण्याची माझी मनीषा होती. म्हणून एखाद्या रशियन शाळेंत इंग्लिश शिकवण्याचें काम करण्याची इच्छा असल्याचें मीं त्यांना सांगितलें.

"आमच्या शाळेविषयीं तुमचा कांहीं तरी गैरसमज होतो आहे," त्या मला म्हणाल्या; "मॉस्कोमधील इतर कोणत्याहि शाळेइतकीच ही शाळाहि सोव्हिएट तत्त्वावर चालविली जाते. जिथें जिथें एखादी भाषा बोलणाऱ्या लोकांची वसति असेल तेथें तेथें आपल्या राष्ट्रीय धोरणानुसार, सोव्हिएट सरकार ती भाषा माध्यम असलेली शाळा काढतें. **आमच्या मॉस्कोंत तुम्हांला तार्तर, जर्मन, जिप्सी अशा भाषांच्या शाळा पाहावयास सांपडतील.** इंग्लंड-अमेरिकेंतून कितीं तरी तज्ज्ञ सोव्हिएट राष्ट्रसंघांत काम करण्यासाठीं आले आहेत. त्यांच्या मुलांना रशियन भाषा येत नाहीं. त्यांना रशियनमधून अभ्यास करावयास लावणें म्हणजे त्यांना किती त्रासाचें होईल ? सोव्हिएटमधील कित्येक कामगार. इतर देशांत काम करतात. त्यांना त्यांच्या मायबोलीपेक्षां इंग्लिशच अधिक चांगलें येतें. तीं मॉस्कोला किंवा लेनिनग्राडला परतलीं कीं इंग्लिशमधूनच आपला अभ्यास चालू ठेवण्याची त्यांची सोय होते."

"मॉस्कोंतील इतर शाळांत जी कार्यपद्धति आहे तीच तुम्हांला येथेंहि आढळेल. आमचा अभ्यासहि तोच. पाठ्यपुस्तकेंहि तींच. मुद्दाम आमच्या-साठीं रशियनमधून त्यांचीं भाषांतरें करवून सोव्हिएट संघांत छापून घेतलीं आहेत. तुम्ही जर आमच्या शाळेंत काम करण्याचें ठरविलेंत तर सोव्हिएट पद्धतीचें अंतरंग अभ्यासावयास तुम्हांस संपूर्ण संधि मिळेल, अशी मी तुम्हांस ग्वाही देतें. या शाळेंत तुमचीच भाषा असल्यानें तुमचें कार्य उलट सुकर होईल."

त्या बाईचें म्हणणें पटण्यासारखें होतें. 'विचार करून एक दोन दिवसांत काय तें कळवितें' म्हणून मीं त्यांस अभिवचन दिलें. माझ्या मनाची जवळ-जवळ तयारी झालीच होती. तेथील वातावरण मला अतिशय आवडलें होतें.

शेवटीं असें ठरलें कीं, सुटीनंतर १५ जानेवारीस तिसरीचा वर्ग मीं मजकडे

घ्यावयाचा. त्या वर्गावरील शिक्षिका चार महिन्यांच्या रजेवर जावयाच्या होत्या. गणिताच्या शिक्षिकाहि उन्हाळ्यांत जाणार होत्या. हिंवाळ्यापासून त्यांचें काम मजकडे येणार होतें.

मध्यंतरींच्या काळांत मीं मुलांसमवेत सहलीस जावें म्हणून मला पाचारण करण्यांत आलें. मींहि मुलांशीं अगोदरच परिचय व्हावा या हेतूनें या संधीचें स्वागत केलें आणि पहिल्या सहलीची वाट पाहूं लागलें. **आमची सहल एका सार्वजनिक उद्यानांत जावयाची होती आणि दिवसभर पुरेल एवढा भरगच्च कार्यक्रम आमच्यापुढें सज्ज होता.**

आम्ही सकाळीं दहा वाजतां शाळेंत जमलों. १० ते १४ च्या दरम्यानच्या वयाचीं पंचवीस मुलें एकत्र जमलीं होतीं. नाटकाच्या रंगांत तालमीचें दिग्दर्शन करतांना ज्या मुलास मीं पाहिलें होतें, तिच्याचकडे या सहलीचें नेतृत्व होतें. शाळेंतील पायोनीअर दलाची ती मुख्य असल्याचें मला समजलें. सहलीचा खर्च म्हणजे उद्यानांत जाण्यायेण्यास लागणारें ट्रॅमचें भाडें एवढाच. त्या मुलीनें प्रत्येकाकडून तेवढे पैसे गोळा केले. सुमारें २० मिनिटांत आम्ही उद्यानांत येऊन दाखल झालों. **बर्फावरून घसरण्याचा लांकडी जोडा** (Skis) मिळण्यासाठीं आम्ही रांगेनें उभे राहिलों. प्रत्येकाला एक करकरीत जोडा मिळतांच आम्ही बर्फावरून चालण्यास आरंभ केला.

तें उद्यान म्हणजे पूर्वीच्या एका सरदाराची शिकारीची राखीव जागा होती. तेथील झाडी जशीच्या तशीच, राखून ठेवण्यांत आली होती. झाडींतून खेळण्यांत आमचा वेळ मोठ्या आनंदांत गेला आणि एकदोन तासांच्या खेळण्यानें जेवणाचा खरपूस समाचार घेण्यास आम्ही तयार झालों. आम्हीं आमचे लाकडी जोडे परत केले आणि प्रवेश-द्वारानजीकच्या मोठ्या इमारतीचा रस्ता सुधारला. बाहेर शेंकडों मुलें गोळा झालीं होतीं त्यांत जाऊन आम्ही मिसळलों. आम्हां सर्वांना एका भव्य भोजनगृहांत व्यवस्थित बसविण्यांत आलें आणि सडकून भूक लागल्यामुळें पुढें आलेल्या चमचमीत पदार्थांवर आम्ही यथास्थित ताव मारूं लागलों.

भोजनोत्तर आम्हांस जवळच्या एका बालक्रीडाभवनांत नेण्यांत आलें. **मुलांसाठीं असलेला एक चित्रपट आम्हांस दाखविण्यांत आला.** अशा रीतीनें सारा दिवस मौजेनें घालविल्यावर मुलें घरोघर परतलीं.

स्थानिक सोव्हिएट शाळांशीं सहकार्य करून मुलांच्या सुटीचा कार्यक्रम कसा आंखतात याचें ही सहल म्हणजे एक विस्मयजनक मासलाच होती, असें मला नंतर आढळून आलें. मुलांना सुटीच्या दिवसांत सार्वजनिक बागा, चित्रपट, अजबखाने, पदार्थसंग्रहालयें, नाटकगृहें या सर्वांचा मनमुराद उपभोग घेण्याची सोय तेथें असते. त्यांच्या वेळेची अशीच आंखणी करण्यांत येते कीं, कोणीहि मुलगा रस्त्यावर निरर्थक भटकतांना आढळूं नये किंवा आईवडील कामावर गेल्यावर घरीं खोड्या करण्यास त्यास संधि सांपडूं नये. या सुटीच्या कार्यक्रमांत भाग घेणें न घेणें हें ज्याच्या त्याच्या इच्छेवर अवलंबून ठेवलेलें असतें. पण कार्यक्रमच इतके आकर्षक असतात कीं, बहुसंख्य विद्यार्थी त्यांत सामील होतात.

माझा त्या मुलांविषयीं पहिलाच ग्रह झाला तो असा कीं, तीं मुलें बुद्धिमान् असून मोठीं उत्साही होतीं, त्यांचा उत्साहहि दांडगा होता. त्यामुळें या वर्गाचा ताबा घ्यावा कीं न घ्यावा याबद्दल गंभीर विचार माझ्या मनांत येऊं लागले. दहा ते अकरा वयाच्या, नसानसांतून चैतन्य ओसंडत असलेला मुलांचा वर्ग म्हणजे काय साधीसुधी गोष्ट आहे ! मीं आजपर्यंत ज्या शाळांत काम केलें होतें तेथें डाल्टन पद्धति किंवा गटपद्धति प्रचारांत होती. आणि मुलांच्या वैयक्तिक विकासाला वाव देण्याच्या याच काय त्या पद्धति, असें तेथें समजण्यांत येत असे. वर्गपद्धतीनें मुलें यंत्राच्या साच्यांतून काढल्याप्रमाणें एक साच्याचीं बनतात असें आम्ही मानीत आलों होतों. खरें सांगावयाचें म्हणजे त्या क्षणापर्यंत ‘ प्रगमनशील ’ वा ‘ स्वतंत्र ’ शिक्षणपद्धतीवर माझी पूर्ण श्रद्धा होती. सर्व मुलांना एका वर्गांत शिकवावयाचें ही कल्पनाच माझ्या विचारसरणीशीं विसंगत होती.

“ तुम्हांला पर्यवेक्षिकेकडून अवश्य तें साहाय्य मिळेल; तुम्ही कांहीं फिकीर करूं नका,” मला मुख्याध्यापिकेनें सांगितलें, “ त्या माझ्या मदतनीसच आहेत. आणि अभ्यासक्रमाची जबाबदारी त्यांच्या शिरावर आहे.”

त्या पर्यवेक्षिकेचें नांव को. हॉलंड असें होतें. शाळा झाडावयाच्या अगोदर त्या माझ्याबरोबर बसत आणि माझ्या कामाची आंखणी कशी करावयाची हें मला समजावून देत. **संपूर्ण वर्षाचा प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम**

**छापलेला होता. माझ्या आठवड्याच्या अंदाजपत्रकांत प्रत्येक पाठाची मांडणी कशी करणार तें तपशीलवार नमूद करणें अवश्य होतें. पाठाची हवीतशी मांडणी करण्याचें स्वातंत्र्य मला होतें.** अट फक्त एवढीच होती कीं, प्रत्येक सहामाहीचा अभ्यास वेळेवर पुरा झाला म्हणजे झालें.

"कांहीं अडचण आली तर मजकडे यावयास विसरूं नका," हॉलंडबाई जातां जातां मला म्हणाल्या. "अभ्यासपद्धति समजावून देणें व शिस्त राखणें हेंच माझें काम आहे. तुमच्या पाठास मी कधीं आलें तर चकित होऊं नका; माझ्या कामांतलाच तोहि एक भाग आहे."

मीं त्यांचा निरोप घेतला. त्याच वेळीं मीं मनाशीं निश्चय केला कीं, शिस्तीचें एकहि प्रकरण तिजकडे घेऊन जाण्याची पाळी येऊं द्यावयाची नाहीं. आजपर्यंत शिस्तीचा प्रश्न मला उद्भवला नव्हता; पण आतां मजकडे असलेला वर्ग वेगळ्या पद्धतीचा होता. त्यामुळें थोड्या अडचणी येणार अशी मी अपेक्षा करीत होतें. पण हॉलंडबाईंच्या सूचनेचें मला जरा नवलच वाटत होतें. शिस्त राखण्यासाठीं त्यांचें साहाय्य घ्यावयाचें म्हणजे मला एक प्रकारें कमीपणा वाटत होता.

**शाळा उघडण्याचे आधले दिवशीं सर्व शिक्षिकांची सभा झाली.** तेथें माझी व इतर शिक्षिकांची भेट झाली. त्या साऱ्यांचें वर्तन मला मोकळेपणाचें वाटलें. त्यांच्यांत स्नेहभाव होता. त्यांत अमेरिकन शिक्षिका बऱ्याच होत्या. एक इंग्लिश होती. दोन रशियन होत्या. आणि त्या इंग्लिश मोठ्या सुरेख बोलत. एक ऑस्ट्रियनबाई होत्या त्या अमेरिकेंत बरीच वर्षें राहिलेल्या होत्या. त्या व्यायामाचे तास घेत आणि जर्मन व ऑस्ट्रेलियन भाषा शिकवीत. एकंदरीनें आमचा संच म्हणजे पूर्णपणें आंतरराष्ट्रीय होता.

शिक्षकसभेंत पुढील सहामाहीच्या कामाची स्पष्ट कल्पना सर्वांस देण्यांत आली. पुढील वर्ष कोणीहि विद्यार्थी मागच्या यत्तेंत राहतां कामा नये, आपण आपल्या अध्यापनाचा दर्जा अधिक उच्च केला पाहिजे, आणि नेमलेले अभ्यास आत्मसात् करण्यास **विद्यार्थ्यांस व्यक्तिशः साहाय्य** दिलें पाहिजे, अशी आम्हांस सांगी होती. नंतर गेल्या सहामाहींत राहिलेल्या उणीवांची

चर्चा झाली. दुसरींतील विद्यार्थ्यांशीं योग्य तऱ्हेनें वागणूक न ठेवल्या-बद्दल पर्यवेक्षिकेनें बोल्टनबाईची कडक शब्दांत हजेरी घेतली. बोल्टनची शिस्त फार कडक होती. तिच्या कडक स्वभावामुळें मुलांस तिची भीति वाटे. त्या भीतीमुळें मुलें तिला शंका विचारीत नसत कीं शाळा सुटल्यावर तिच्याशीं चर्चा करीत नसत. "तुमचें वर्तन वडील मैत्रिणीसारखें असावयास हवें, मुलांनीं आपल्या अडीअडचणी मोकळेपणानें तुम्हांला सांगाव्या; तुमच्याविषयीं त्यांस आदर व प्रेम वाटावें, असें तुम्हीं वागलें पाहिजे. तुमच्यांत आणि मुलांत मोठी भिंत उभी असल्यासारखें झालें आहे. तुम्ही कोणी स्वकीयांपैकीं आहांत असें तुम्हांस वाटतच नाहीं. आणि शिक्षक या नात्यानें मुलें तुमच्याकडे यावयास कचरतात. उदाहरणार्थ, कोळ्याची गोष्ट घ्या. तो एक हुषार मुलगा आहे. पण त्याला नीट न वागविल्यामुळें तो शिक्षकांना एक अवघड प्रश्न, **समस्या**—होऊन बसला आहे. कितीतरी मुलांना वर्गांतून काढून देण्यांत आलें. ही सोव्हिएट पद्धति नव्हे. आपण जरी अध्यापनासाठीं वर्गपद्धतीचा अवलंब केला असला तरी प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंतरंगांत आपण शिरलेंच पाहिजे. प्रत्येकाचा स्वभावविशेष आपण समजावून घ्यावयास हवा. सर्वांवर आपण प्रेम केलें पाहिजे. आपला कटाक्ष **आत्म-निग्रहावर** आहे. आणि त्याची योग्य जोपासना सहकार्याच्या आणि निःपक्षपातीपणाच्या वातावरणांतच होऊं शकेल."

भर सभेंत इतक्या स्पष्टोक्तीनें केलेल्या टीकेमुळें मी तर स्तंभितच झालें. बोल्टनबाईना हें कितपत रुचलें हें पाहण्यासाठीं मीं तिच्याकडे दृष्टि वळवली. त्या कांहींच बोलल्या नाहींत. पण त्यांचें मत ऐकण्याविषयीं सर्वजणी उत्सुक असल्याचें मला दिसून आलें. नंतर मला समजलें कीं, त्या सोव्हिएट प्रदेशांत नवीनच आल्या होत्या आणि सोव्हिएट पद्धतीशीं जमवून घेण्यांत त्यांना बरेच प्रयास पडत होते. त्या पूर्वीं दुसऱ्या कुठल्या तरी देशांत काम करीत असत. तेथें **खूप** मुलांचे वर्ग त्यांना संभाळावे लागत, आणि म्हणून शिस्तीच्या कडक उपायांचा अवलंब करणें त्यांस भाग पडे. ती संवय त्यांना नडत होती.

सभेचें काम चालू होतें. "मला पांचव्या यत्तेच्या वर्गांत कांहीं अडचणी आहेत." वरच्या वर्गांना इंग्लिश शिकविणाऱ्या यंगबाई सांगूं लागल्या,

"सहावी-सातवींतील विद्यार्थी आपला अभ्यास व्यवस्थितपणें करतात. आपले गृहपाठ करून आणतात. एकंदरीनें आपल्या अभ्यासांत त्यांना गोडी वाटते. पण पांचवीच्या वर्गांत गोंगाटच अधिक होतो. पाठाविषयीं कधीं तयारी करून येतच नाहींत. गेल्या सहामाहीच्या शेवटीं शेवटीं तर त्यांनीं कहरच केला. या सभेनें मला जर कांहीं सूचना व मार्गदर्शन केलें तर बरें होईल." या खेपेस माझ्या आश्चर्याला पारावारच उरला नाहीं. एक शिक्षिका भर सभेंत आपली दुर्बलता स्पष्टपणें व्यक्त करीत होती आणि जणूं कांहीं ही एक मामुली गोष्ट आहे असें समजून दुसऱ्याचा सल्ला मागत होती!

निरनिराळ्या सूचना व मदतीचीं आश्वासनें पुढें आलीं. पर्यवेक्षिकेनें इंग्लिशच्या तासाला हजर राहून या परिस्थितीचें मूळ हुडकून काढण्याचें अभिवचन दिलें. ती म्हणाली, "मला असें वाटतें कीं, तुम्हांस तुमच्या पद्धतींत बदल करावयास हवा. त्या वर्गांत स्वतंत्र पद्धत योजली पाहिजे हें तर उघडच दिसतें. कदाचित् तुमची पाठ्यवस्तु योग्य रीतीनें पुढें मांडली जात नसेल. कांहीं कां असेना. आम्ही तुम्हांस साहाय्य करूं आणि पुढील मासिक सभेच्या वेळीं आपला अहवाल सादर करूं."

सभेच्या कामकाजाविषयीं माझा ग्रह चांगलाच झाला. प्रत्येक शिक्षिका सर्व प्रश्नांत बारकाईनें लक्ष घालीत होत्या, आणि सूक्ष्मपणें केलेल्या त्या टीकेंत स्नेहभावनाच प्रत्ययास येत होती. टीकेचा स्वीकारहि तितक्याच मोकळे-पणानें केला जात होता, आणि हा सारा प्रकार नित्याचाच असावा असें दिसून आलें. सर्व चर्चेचें व्यवस्थित टिपण करून ठेवण्यांत येत होतें. आणि जरूर त्या ठिकाणीं प्रत्येक मुद्यावर ठराव मंजूर करण्यांत येत होता.

सभेचें काम संपतांच मजकडे दिसायला सुरेख पण भुऱ्या केसांची एक शिक्षिका आली. तिनें मला आपली ओळख करून दिली. भाषान्तरें करण्याचें तिचें काम होतें. शालेय ट्रेड युनियनची ती अध्यक्षहि होती. शिक्षकांसाठीं चालविण्यांत येणाऱ्या रशियन वर्गांत येण्याची माझी इच्छा आहे काय म्हणून तिनें चौकशी केली: आणि 'कांहीं अडचण आली किंवा गरज लागली तर मजकडे येण्यास मुळींच कांकूं करूं नका' म्हणून तिनें मला आग्रहानें सांगितलें. **शाळेच्या दैनंदिन कारभारांत कांहीं कमतरता दिसल्यास त्या नजरेस आणून देण्याचें तिनें मला**

**मुद्दाम बजावलें.** मी नवीन असल्यानें अशा कांहीं उणीवा माझ्या दृष्टीस येणें स्वाभाविक होतें. इतरांना रोजच्या सरावामुळें त्यांचें महत्त्व वाटणार नव्हतें असें ती म्हणाली.

"शाळेंत ज्या उणीवा असतील त्या काढून टाकण्यास साहाय्य करणें हें ट्रेड युनियन समितीचें कर्तव्य आहे. आमचें दुसरें कर्तव्य म्हणजे सभासदांची विचारपूस करणें. त्यांना काम करण्याला योग्य वातावरण आहे कीं नाहीं, मनोविनोदनाचीं साधनें—मग नाट्य म्हणा, बोलपट म्हणा, सहली किंवा क्रीडा म्हणा—त्यांच्या आटोक्यांत आहेत कीं नाहींत किंवा त्यांना गोडी असणारे दुसरे छंद यांच्या त्यांना सोयी आहेत कीं नाहींत हेंहि आम्हांस पाहावें लागतें."

कितीतरी नवीन विचार घेऊन मी घरीं परतलें. माझ्या विचारशक्तीला भरपूर खाद्य मिळालें होतें. एकंदरींत सोव्हिएट शिक्षक आपले दोष प्रामाणिकपणें कबूल करतात तर! खरोखर हाच मार्ग प्रगतीला पोषक नव्हे काय? सगळ्या पद्धतींचा पाया कांहीं असेल तर सहकार्य व परस्पर साहाय्य. ट्रेड युनियन म्हणजे तर मला एक देव-माउलीच वाटली. मलाहि निश्चित वाटूं लागलें कीं, उद्यां आपल्याला वर्गासंबंधीं कांहीं अडचणी आल्या तर साहाय्य मागावयाचें.

पहिल्या आठवड्याच्या पाठाबद्दल मी योजना करूं लागतांच माझ्या मनांत शंकाकुशंकांचें काहूर माजलें. ठराविक वेळांत प्रत्येक विद्यार्थ्याचा दिलेला विषय मी घटवून कसा काय घेणार? कारण आम्हांला तर सांगितलें होतें कीं, प्रत्येक विद्यार्थ्याला सर्व अभ्यासक्रम उत्तम प्रकारें आकलन झाला पाहिजे. कोणीहि खालच्या वर्गांत राहतां कामा नये. संथपणें, गोगलगायीच्या पावलानें चालणाऱ्या विद्यार्थ्यांचें मी काय करणार? हुषार विद्यार्थ्यांना सतत उद्योगांत मी गुंतवून कसें ठेवणार? या प्रश्नांची सविस्तर चर्चा मुख्याध्यापिकेबरोबर किंवा पर्यवेक्षिकेबरोबर केली असती तर बरें होतें, असें मला वाटूं लागलें. पण सभेंतील ती सर्वांची स्नेहशील वृत्ति आठवतांच माझी भीति मालवली आणि आपल्याला कांहींहि अडचणी आल्या तरी त्यांचें निराकरण करण्यास आपल्यास साहाय्य मिळणार आहे या एकाच विचारानें मनास धीर आला.

## २ माझा वर्ग

"आपण जरी वर्गपद्धतीचा अवलंब केला असला, तरी प्रत्येक विद्यार्थ्याशीं आपला निकट संबंध यावयास पाहिजे."—पर्यवेक्षिकेनें पहिल्याच शिक्षकसभेंत उच्चारलेले हे शब्द तो तीस उत्साही मुलांचा वर्ग यशस्वीपणें सांभाळण्यास मला अति उपयोगी पडले.

**नुसतें पुस्तकी ज्ञान देणारा शिक्षक अगदीं कुचकामाचा असून त्याला कोणी मानहि देत नाहीं.** ही गोष्ट मॉस्कोंतील एक वर्षाच्या अनुभवानें माझ्या लक्षांत आली. शिक्षक हा खरा विद्यादाता किंवा रशियन म्हणतात त्याप्रमाणें 'पालक' असावयास पाहिजे आणि ज्ञानाबरोबरच शीलाची जोपासना व संवर्धन यांविषयींचें ज्ञान त्यानें दिलें पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याचे व्यक्तिविशेष समजावून घेतल्यामुळें आणि त्यांना सहकाऱ्यांच्या नात्यानें वागविल्यामुळें मी त्यांच्या अंतःकरणांत पटकन् स्थान पटकावूं शकलें.

माझ्या वर्गातील मुलें हुषार होतीं. पण तीं गोंगाटच फार करीत आणि त्यांना आवरणें कठिण होई. पण कोणत्याहि विषयांत तीं चटकन् रमून जात. माझा पहिला तास अंकगणिताचा झाला. मीं मुलांना भरपूर काम देऊन सतत गुंतवून ठेवलें. पण भूगोलाच्या तासाला मात्र त्यांना आवरणें कठिण झालें. त्यांना भूगोलाची आवड होती यांत शंकाच नाहीं. पण सारेच एकदम

प्रश्न विचारून कलकल करूं लागले. वर्गांत शिस्त राखावयास हवी याची त्यांना कल्पनाच येईना. मीं माझा पाठ थांबविला. असा गोंधळ माजविला तर आपल्याला अभ्यास करतां येणार नाहीं ही गोष्ट मीं त्यांना समजावून दिली. तेव्हां एक मुलगी उभी राहून म्हणाली, "बाई, आमच्या वर्गाला हे सारे नियम ठाऊक आहेत. पण ते आमच्या लक्षांतच राहात नाहींत."

"काय, नियम तरी काय आहेत ?" मीं उत्सुकतेनें विचारलें.

"एक नियम असा कीं, शिक्षक बोलत असतील किंवा पाठ समजावून देत असतील तेव्हां मुकाट्यानें ऐकावयाचें. जर आपल्याला शंका असली नि प्रश्न विचारावयाचा असला तर हात वर करावयाचा. कारण सारेच बोलूं लागले, तर कोणालाच कांहीं ऐकूं यावयाचें नाहीं. मला वाटतें, आपण गेल्या सहामाहीप्रमाणें चौथ्या यत्तेबरोबर **साम्यवादी** चढाओढी घेऊं या."

"होय, होय." सर्वांनीं रुकार दिला.

त्या तासाच्या अखेरीस एक मुलगा व मुलगी वर्गांत आलीं. मुलीचें वय सुमारें बारा वर्षांचें असेल. तिचे केस काळेभोर होते नि तसेच डोळेहि. दिसायला मोठी सुरेख. "वर्गाला आम्हांस कांहीं सांगावयाचें आहे, आपली परवानगी असावी," असें म्हणून ती थांबली. मीं परवानगी देतांच वर्गाकडे वळून ती म्हणाली, "चवथ्या यत्तेचें या सहामाहींत चढाओढीसाठीं तुम्हांस आव्हान आहे. चढाओढ पुढील मुद्यावर होईलः वर्ग चालू असतांना राखावयाची शिस्त, पाठासाठीं तयारी, साबण व रुमाल व्यवस्थित असणें. आमच्या वर्गानें सिडनेला व मला तपासनीस म्हणून नेमलें आहे. तुमची तयारी असेल तर तुम्ही दोन प्रतिनिधि निवडा. त्यांनीं आमच्याबरोबर तपासनीस म्हणून काम करावयाचें. पाहा, आहे कां कबूल ?"

तिसऱ्या यत्तेंतील मुलें एकमतानें या गोष्टीस तयार झालीं. त्या मुलीनें जातां जातां सांगितलें कीं, आम्ही शाळा सुटल्यावर थांबूं. त्या वेळीं रेखाफलक तयार करूं. तुमच्या प्रतिनिधींनींहि थांबावें.

तिसऱ्या यत्तेनें आपल्या दोन प्रतिनिधींची निवड केली. या साम्यवादी चढाओढीची जिनें कल्पना पुढें मांडली ती ल्युबा आणि व्होव्हा नांवाचा एक पाणीदार डोळे असलेला मुलगा हे ते दोन प्रतिनिधि. सकाळीं हाच मुलगा विशेष गोंगाट करीत होता.

मीं वर्ग सोडला. ल्युबा आणि व्होल्हा मजकडे आलीं. "बाई, आपण जर रेखापटासाठीं तुर्कस्थान ते सैबेरिया अशी आगगाड्यांची शर्यत कल्पिली तर खूप गंमत होईल, नाहीं? अगदीं अलीकडच्या धर्तीचे एंजिनानें प्रत्येक वर्ग दाखवूं या—फेलिक्स नमुन्याचें एंजिन छान होईल. प्रत्येक वर्गानें एक एक अंक मिळविला कीं एंजिन एक एक घर पुढें सरकवावयाचें."

"कल्पना तर नामी आहे." असें मीं माझें सहमत व्यक्त केलें.

जुलिया व सिडने एक मोठा ड्रॉइंगचा कागद, पेन्सिली, रंग इत्यादि साहित्य घेऊन वर्गांत आलीं. त्या दोघांनीं लगेच कामास आरंभ केला. दोन एंजिनचे आकार कापण्यांत आले. त्यांना रंग देऊन यत्ता ३ व यत्ता ४ अशीं नांवें देण्यांत आलीं. तुर्कस्तान ते सैबेरियाचा मार्ग आंखून त्यावर खोबणी करण्यांत आल्या, आणि तो आलेख मोठ्या सभागृहांत एका फलकावर टांगून ठेवला. त्या फलकावर कितीतरी आलेख आणि साम्यवादी चढा-ओढीच्या वैयक्तिक प्रतिज्ञा अगोदरच लावलेल्या होत्या, असें माझ्या नजरेस आलें. मी इतर कागद तपाशीत होतें. त्या चौघांत या तीन मुद्यांची रोजची चांचणी कशी घ्यावयाची याबद्दल चर्चा चालली होती.

"प्रत्येक वर्गानें आपली शिस्तवही उद्यां सकाळीं तयार ठेवावी," जुलिया म्हणाली, "व्होल्हा, प्रत्येक तासानंतर त्या तासाच्या शिस्तीबद्दल शिक्षक आपले गुण नोंदवितात कीं नाहीं हें तूं पाहात जा. जो मुलगा शिस्तभंग करील त्याचें नांव लिहून ठेवायचें. म्हणजे आपल्या प्रगतीला अडथळा कुणामुळें होतो हें समजेल. मी आमच्या वर्गाची वही पाहीन. यामुळें पहिल्या मुद्याची परीक्षा होईल. तसेंच वर्गांत मुलें अभ्यासासाठीं तयार होतीं कीं नव्हतीं हें शिक्षकांनीं नमूद करून ठेवावें. म्हणजे दुसऱ्या मुद्याचाहि खुलासा होईल. मला वाटतें, वर्गाच्या अध्यक्षानेंहि आपली नोंद-वही ठेवावी, म्हणजे कोण कोण मुलें चुकारपणा करतात तें सभेच्या वेळीं पुढें मांडतां येईल."

"स्वच्छता पाहणाऱ्या वर्गनायकांनीं आपला टॉवेल-साबण याविषयींचा साप्ताहिक अहवाल द्यावा. म्हणजे मग आपणांस एंजिन सरकवण्यास बरें पडेल."

सगळ्या गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणें ठरल्या. घरीं जावयासाठीं आपापलीं

पुस्तकें घेण्यास ते वळले. तेवढ्यांत ल्युबा मजकडे येऊन म्हणाली, "आपल्या वर्गानें चढाओढ जिंकली पाहिजे अं. पहिली आणि दुसरी हे वर्ग पण भाग घेणार आहेत. मग मात्र खूपच रंग चढेल. बघूं या लाल ध्वजाचा मान कोणास मिळतो या खेपेस. गेल्या सहामाहींत तर तो ४ थ्या यत्तेनें मिळवला."

"अर्थात्, आपल्या वर्गास हा मान मिळालाच पाहिजे." आणि हें बोलत असतांच यासाठीं पडतील ते श्रम करावयाचा मीं मनाशीं निश्चय केला. "आपण यशस्वी व्हावयाला तुझ्या मतें काय करावयास हवें?" मीं ल्युबाला प्रश्न केला. "या खोड्या करणाऱ्या मुलांना आपला वर्ग बिघडवूं देतां कामा नये. लाल ध्वज मिळवण्यासाठीं काय काय करावयाचें हें ठरविण्यास आपण वर्गाची सभा घेऊं या. वर्गाच्या अध्यक्षाची व पुढारी प्रतिनिधींची निवडणूक लवकरच व्हावयाची आहे. मग हें काम सोपें होईल." ल्युबाची ती कळकळ आणि वर्गाच्या सुधारणेबद्दलची आस्था पाहून मला तिचें कौतुक वाटलें. तिनें माझा निरोप घेतला व ती घराकडे पळाली, त्या वेळीं माझ्या मनांत विचार आला कीं कांहींहि अडचणी येवोत, एकंदरीनें या कामांत आपला वेळ सुंदर रीतीनें जाणार हें खास.

फलकावर लावलेल्या साम्यवादी प्रतिज्ञांपैकीं मीं कांहीं वाचल्या. दोन मुलींनीं असा निश्चय व्यक्त केला होता कीं, अभ्यासाच्या सर्व विषयांत फक्त 'चांगला' नि 'उत्तम' असेच शेरे मिळवूं आणि आपलें सामाजिक कार्य पुढें चालवूं. समाजकार्य? हें प्रकरण मला नवीनच होतें. तेव्हां याबाबत अधिक चौकशी करण्याचें मीं ठरविलें. तूर्त तरी साम्यवादी चढाओढींनीं काय साधतां येईल हें पाहण्यांतच मी गढलें होतें. शाळेंतील अभ्यासाचा व शिस्तीचा दर्जा वाढविण्यास यांचा चांगला उपयोग होणार होता. पण मुलांत त्यामुळें स्पर्धेची हीन वृत्ति तर जोरावणार नाहींना अशीहि शंका मनाला चाटून गेली. मी शिक्षिकांच्या विश्रामधामाकडे वळलें. तेथें मला यंग भेटला.

"काय, कसें काय चाललें आहे तुमचें?" त्यानें सवाल केला.

"या साम्यवादी चढाओढींनीं माझें लक्ष वेधून घेतलें आहे. मुलांमध्येंहि त्याची खूप आवड दिसते. खरोखरीच याचा कांहीं उपयोग होतो काय?"

"हो तर. याच मार्गानें तर आमच्या देशाचा दर्जा उंचावत आहे. आमचें

औद्योगिक, कृषिक–सर्वच जीवन भराभर बदलत आहे नि सुधारत आहे, तें या साम्यवादी चढाओढीमुळेंच. त्यांचा कसा उपयोग होतो तें हळूहळू तुम्हांस अनुभवानें समजेलच. बरं. मला तुम्हांला एक विनंति करावयाची आहे. 'माझें शाळेविषयीं प्रथम भेटींत झालेलें मत' या विषयावर तुम्ही एक लेख लिहून द्या. शिक्षकांच्या भिंतपत्रासाठीं मला तो हवा आहे. मी त्याचा संपादक आहें आणि पुढील अंक लवकरच निघावयाचा आहे."

प्रत्यक्ष अनुभवानें साम्यवादी चढाओढी म्हणजे प्रचंड शक्ति असल्याचें माझ्या निदर्शनास आलें. दररोज मुलें फलकाभोंवतीं गोळा होत आणि कोणाची सरशी होत आहे हें पाहात. पांचवी, सहावी व सातवीच्या वर्गांनींहि चढाओढीस आरंभ केला होता आणि त्यांच्या त्या उत्साहपूर्ण फलकावरून चढाओढीचा निर्णय ठरविणें ही मोठी कठिण गोष्ट होणार असल्याचें दिसत होतें. असूया आणि मत्सर उत्पन्न होण्याची मला वाटत असलेली धास्ती साफ खोटी ठरली होती. आमचा वर्ग व चवथीचा वर्ग यांची कांहीं दिवस तरी बरोबरीच होती. मुलांमधील उत्साहाचें प्रमाण वाढतच होतें. अखेर एके दिवशीं जुलिया म्हणाली, "खरंच दोन्ही वर्ग विजयी झाले, तर किती छान होईल?" व्होल्व्हानें तिचें भाषण ऐकलें. तो म्हणाला, "माझी तर इच्छा आहे कीं, साऱ्या शाळेलाच लालध्वज मिळावा. तसें झालें तर आपल्याला जिल्हा लालध्वज मिळवतां येईल."

या त्याच्या विधानानें चढाओढीचें सारें स्वरूपच पालटलें. आमच्या सर्व शाळेला लालध्वज मिळाल्यास शाळेला जिल्हा-चढाओढींत भाग घेतां येईल आणि आमच्या जिल्ह्याला लालध्वज मिळाला तर प्रांतिक चढाओढींत जिल्हा भाग घेऊं शकेल. आमचें कार्यक्षेत्र क्षितिजासारखेंच अनंत होतें.

मला शाळेंत काम करून कांहीं दिवस लोटल्यानंतर पायोनिअर दलाची सोन्या मजकडे आली. रंगानें गोरीपान, केंस कुरळे, पाणीदार चेहरा आणि नाचरे डोळे–अशी ती अठरा वर्षांची तरुणी होती. दलाचें चिन्ह म्हणून लाल गळपट्टी तिनें आपल्या गळ्याभोंवतीं गुंडाळली होती.

"तुमच्या साहाय्यानें मला चालू सहामाहीचा कार्यक्रम आंखावयाचा आहे. तुम्हांला माहीत असेलच मी पायोनिअर दलाची मुख्य आहें. पण

तिसरीच्या वर्गाची विशेष जबाबदारी मजकडे आहे. आतां आपली एकमेकांची खूप ओळख होईलच."

ती मुलगी मोठी आकर्षक होती. तिच्या तोंडावर नेहमीं हास्य खेळे. तिच्या साध्या चालण्यांतहि जीवनाची प्रचीति होती. करमणुकींच्या कार्य-क्रमाचे वेळीं मीं तिला अनेकवार सभागृहांत बघितलें होतें. नेहमीं मुलांचा घोळका तिच्याभोंवतीं असावयाचाच. ती कुठेंहि दिसली कीं "हे पहा सोन्या किंवा 'काय ग सोन्या आपण...' म्हणून मुलें तिच्याशीं बोलायला अधीर असत. ती विद्यार्थ्यांत भारीच प्रिय होती. आणि गळ्याभोंवतीं तांबड्या पट्ट्या असलेलीं मुलें तिजवर भारीच प्रेम करीत.

"खरोखरी मला या तुमच्या ,पायोनिअर दलाच्या संघटनेविषयीं कांहीं माहिती नाहीं." मीं म्हटलें, "तुम्ही ती सांगाल काय ? नि सामाजिक कार्य म्हणजे काय याचीहि कल्पना द्या ? तसेंच पायोनिअर संघटना म्हणजे काय याचीहि माहिती मला हवी आहे."

"थोडक्यांत पायोनिअर दलाच्या संघटनेचें कार्य विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासांत सुधारणा होण्यास साहाय्य करावयाचे आणि शिस्त वाढवावयाची. आणि ही शिस्त् देखील विद्यार्थ्यांनीं आपापल्या वैयक्तिक जीवनाला योग्य वळण देऊन वाढवावयाची. तसेंच शाळा सुटल्याबरोबर विद्यार्थ्यांसाठीं करमणुकीचे कार्यक्रम आम्ही आंखतों, हिंवाळी व उन्हाळी वर्ग चालवितों, आणि खेळांच्या संघाची व्यवस्था पाहतों. शिक्षकांच्या सहकार्यानें आमचीं कामें चालू असतात. प्रत्येक बाबतींत आम्ही त्यांना साहाय्य करीत असतों. पायोनिअर दलाच्या तीस शाखा आहेत. प्रत्येक शाखेचे दोन किंवा तीन विभाग असतात. प्रत्येक विभाग आपापल्या नायकाची निवड करतो. आणि प्रत्येक नायक आपल्या 'सोव्हिएट'ची निवड करते. अशा तऱ्हेनें, आम्हीं आमची स्वयंशासनाची पद्धति बनविली आहे. सर्व शाळांमधून त्यांच्या शाळेचें सोव्हिएट तयार होतें. आणि शाळेच्या कामकाजांमध्यें या मंडळाला खूपच महत्त्व असतें."

"पण जे या पायोनिअर दलांशीं निगडित नाहींत त्यांचें काय ? त्यांना या स्वयंशासनांत किंवा स्वराज्य-सभेंत कांहींच स्थान नाहीं कीं काय ?" मीं विचारलें.

" पहिली गोष्ट अशी कीं, असा एकहि दहा वर्षांचा मुलगा मला भेटला नाहीं, कीं जो या स्वयंसेवक-दलांत येऊं इच्छीत नाहीं. याचा अर्थ असा कीं, प्रत्येक उत्कृष्ट विद्यार्थी या दलाचा घटक असतो. दलांत यावयाला लागणारी तयारी म्हणजे एवढीच कीं, त्या विद्यार्थ्याला अगर विद्यार्थिनीला अभ्यासांत व वर्तणुकींत चांगले गुण मिळाले असले पाहिजेत. ज्यांना या दलांत सामील करून घेतलें जात नाहीं त्यांना वाटल्यास निरनिराळ्या शाखांचा अनधिकृत सभासद म्हणून शाखा-सभांना उपस्थित राहतां येतें. त्यांची योग्य तयारी झाली कीं, त्यांचा सभासद म्हणून स्वीकार करण्यांत येतो."

" पण सामाजिक कार्य म्हणजे काय ?" मीं पुनः विचारलें.

" समाजकार्य याचा अर्थ एवढाच कीं, समाजासाठीं आपण होऊन केलेलें कांहीं काम. सोव्हिएट संघांतील प्रत्येकजण असें समाजकार्य करतो. आणि विद्यार्थीहि तें काम करतात. ते वर्गनायक असूं शकतात. वाचनालयांत ते साहाय्य करतात. पथकांचे पुढारी म्हणूनहि ते काम करतात. वर्गाच्या सभेचे अध्यक्ष म्हणूनहि हें काम करतात, किंवा एखाद्या विभागाचे ते प्रमुख असूं शकतात. हें कार्य अगदीं ऐच्छिक आहे. पण प्रथाच अशी पडून गेली आहे की, प्रत्येक विद्यार्थी कांहींना कांहीं काम करतोच. त्यामुळें विद्यार्थी समाजप्रिय बनतात. कित्येक वेळां विद्यार्थ्यांना सामाजिक कार्य पुरवतां पुरवतां माझ्या नाकीं नव येतात. इतकी त्यांच्यांत कामाची आवड आहे."

" मला वाटतें तुमच्याबरोबर काम करण्यांत खूपच मौज आहे." सोन्यानें आधींच माझें मन वेधून घेतलें होतें. आणि आम्ही अगदीं निकटचे मित्र होणार असा मला विश्वास वाटूं लागला होता. " आपल्याला कोणकोणते कार्यक्रम आंखावयाचे, याची मला कल्पना नाहीं. त्यांत माझें काय काम आहे हेंहि मला तुम्हीं समजावून द्या."

" आपण तिसऱ्या यत्तेसाठीं आठवड्यांतील पांचवा दिवस दल-दिन म्हणून राखून ठेवूं या. त्या दिवशीं पाठ संपले कीं, आपण दलशाखेची सभा बोलावूं किंवा सर्व शाखेची सिनेमाला अथवा पदार्थसंग्रहालयाचा सहल काढूं. तुम्हीं सभांना उपस्थित राहूं शकाल अशी मला आशा आहे. जर पायोनिअर दलांतील एखादा विद्यार्थी अभ्यासांत कच्चा राहिला किंवा

शिस्तींत मागें पडला तर मला त्याची खबर द्या. म्हणजे आम्ही लगेच आमच्या सभेंत त्याची चर्चा करूं. मी कधीं कधीं तुमच्या पाठास येत जाईन आणि आमच्या दलांतील विद्यार्थी कसा वागतो हें पाहीन. या आठवड्यांत शाखांच्या पथकांच्या निवडणुका होतील. तेव्हां आपण जरूर या. पांचव्या दिवसाचा अभ्यासानंतरचा वेळ त्यासाठीं राखून ठेवा."

मीं निवडणुकीस उपस्थित राहण्याचें अभिवचन दिलें आणि पायोनिअर दलाच्या सभांसहि उपस्थित राहण्याचें मनाशीं ठरविलें. ही शाळेच्या कामकाजांतील द्विदल पद्धति कशी काय यशस्वी होते हें जाणण्याची मला उत्सुकता होती. सोन्या प्रथम भेटींत वाटली तितकी खेळीमेळीच्या वृत्तीची असेल तर कांहींच अडचण नव्हती. पण माझी अशी खात्री होती कीं वाटतें इतकें हें काम सोपें नाहीं. मतभेदाचे प्रसंग आले तर विद्यार्थ्यांची निष्ठा दुभंगणार.

सोन्याशीं झालेल्या संभाषणामुळें शिस्तीच्या प्रश्नाकडे मी वेगळ्याच दृष्टीनें पाहूं लागलें. नव्या सामाजिक व्यवस्थेबरोबर नवीन रूढि प्रस्थापित करणें अगत्याचें झालें होतें. शिस्त याचा अर्थच वेगळा होता. आपण अभ्यास कशासाठीं करतों, आपली शाळा समाजाचा एक घटक आहे, आणि आपला अभ्यास संपल्यानंतर समाजाची प्रगति करण्याचें कार्य आपल्या शिरावर यावयाचें आहे. याची जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण करून त्यांना शिक्षण द्यावयाचें हें खरें कार्य. येथें सक्तीची शिक्षा नाहीं, छडीला जागा नाहीं. आणि अमुक वयापर्यंत अभ्यास केलाच पाहिजे अशा केवळ कायद्यामुळें अभ्यासांत जुलमाचा रामराम नाहीं. ल्युबा, ज्युलिया, व्होल्हा, सिडने हीं सर्व याचीं उदाहरणें होतीं.

हातून शिस्तीच्या नियमाचा भंग झाला तर या सर्व व इतरहि अभ्यासासाठीं सदा उत्सुक असलेल्या मुलांची कैफियत होती.

केवळ अधीर झाल्यामुळेंच किंवा नियमांचा विसर पडल्यामुळेंच मुलांकडून चुका होत होत्या. कालापव्यय करण्याची किंवा शिक्षकांचा अपमान करण्याची त्यांची बुद्धि नसे. विद्यार्थी अभ्यासांत मनापासून लक्ष घालीत होते. कारण अभ्यासांत त्यांना जिवंतपणा वाटत होता. शिवाय त्यांना स्वयंशासन, मनोनिग्रह शिकावयाचा होता, कारण उत्कृष्ठ नागरिक होण्यास तो गुण अत्यावश्यक होता याची त्यांना जाणीव होती.

पांचव्या दिवशीं शाळा सुरू होण्यापूर्वी माझ्या वर्गातील उत्कृष्ट कार्यकर्त्री एल्गा नांवाची मुलगी मला जिन्यांत भेटली. "बाई, आज पायोनिअर दिन आहे, लक्षांत आहे ना? शाळा सुटल्यावर तुम्ही निवडणुकीच्या सभेला यायचं अं?" सभा चुकविण्याचा माझा मुळींच विचार नसल्याचें मीं तिला सांगितलें. "सभा पायोनिअर वर्गाच्या खोलींत आहे," असें बोलून ती वर्गांत सरकली.

पायोनिअर वर्गाची खोली मोठीशी नव्हती. पण तेथील वातावरण रम्य होतें. एका कोपऱ्यांत लेनिनचा पुतळा होता. त्याच्या पार्श्वभागीं रक्त ध्वज फडकत होते. त्यामुळें खोलीला उज्ज्वलता आली होती. भिंतीवर चित्रें आणि तसबिरी होत्या. भिंतीशीं कांचेच्या तावदानाचें एक कपाट होतें. त्यांतील एका कप्प्यांत वाद्यें दिसत होतीं. दुसऱ्या खणांत टेबलावरील खेळांचें साहित्य होतें. वाचण्याची किंवा खेळण्याची ज्यास इच्छा असेल त्यासाठीं खुर्ची-टेबलाची सिद्धता होती.

माझ्या वर्गांत तीस दल-सभासद असल्यानें त्यांचें एक स्वतंत्र पथक बनलें होतें. खोली गच्च भरली होती. मुलें बाकावर, खुर्च्यांवर, टेबलाच्या कडेवर, खिडक्यांच्या उंबरठ्यावर जागा सांपडेल त्याप्रमाणें बसलीं होतीं. एल्गानें आपल्या शेजारीं मला जागा करून दिली. पण थोड्याच वेळांत सोन्यानें सूचना देतांच सभेंतील मुलें तीन गटांत विभागलीं गेलीं. पथकाच्या त्या शाखा असाव्यात. प्रत्येक गटानें खोलीचा एक एक कोपरा धरून आपल्या गटाच्या पुढाऱ्याची निवडणूक करण्यास आरंभ केला. या निवडणुकांचें काम मुलेंच आपापसांत करीत होतीं. त्यांच्यांत गोंगाट चालू होता. पण भांडण, तंटा किंवा द्वेषभाव यांचें यत्किंचित्‌हि चिन्ह तेथें नव्हतें. सोन्या तीनहि विभागांवर देखरेख करीत होती. ल्युबा व व्होल्हा ज्या विभागांत होते, तेथेंच मी बसून राहिलें होतें.

अखेर बरीच चर्चा होऊन आणि परस्परांच्या गुणांची छाननी करून एलिनोरची बहुमतानें निवड झाली आणि मिल्टन तिचा उपाध्यक्ष नेमला गेला. मिल्टन स्वभावानें शांत होता, पण थोडा विनोदी होता. एलिनोर याच्या अगदीं उलट. सदा गोंगाट करणारी नि खोडकर. पण एकंदरीनें चांगली विद्यार्थिनी. मिल्टन हा वर्गातील चांगला मुलगा हें सर्वांस मान्य होतें. पण

एलिनोरजवळ कल्पनाशक्ति भरपूर होती. शाखा-सभा चालविण्याची पात्रता तिच्याठायीं अधिक आहे, असा सर्वांचा अभिप्राय होता.

पंधरा मिनिटांत प्रत्येक गटानें आपल्या नेत्याची निवड केली. त्यानंतर तें पथक आपली सोव्हिएट किंवा 'पंचायत' निवडण्यासाठीं एकत्र आलें. सोन्यानें अध्यक्षस्थान स्वीकारलें.

"आपल्याला पांच सभासद निवडावयाचे आहेत," तिनें घोषणा केली. त्यांपैकीं तीन गट-नेते आपण निवडलेच आहेत. आतां भित-पत्रासाठीं संपादक व सांस्कृतिक कार्यक्रमाचा कार्यवाह या दोघांचीच निवड करावयाची. ज्यांना नांवें सुचवावयाचीं असतील तीं त्यांनीं सुचवावींत.

जॉर्ज चित्रें चांगलीं काढतो, म्हणून त्याचें नांव संपादकाच्या जागेसाठीं सुचविण्यांत आलें. फिलिप लिहितो छान, म्हणून कोणीं त्याचें नांव सुचविलें. अखेर जॉर्जनेंच सूचना केली कीं, 'फिलिप माझ्यापेक्षां चांगला संपादक होईल; मी त्याचा मदतनीस म्हणून काम करीन.' त्याची सूचना सभेनें मान्य केली. राया नांवाच्या मुलीची सांस्कृतिक कार्यकारी मंडळाची चिटणीस म्हणून निवड झाली. सभेचें काम संपलें. नवीन पंचायत–कार्यकारी मंडळ-विचारविनिमयासाठीं थांबलें नि बाकीचीं मुलें घरोघर निघून गेलीं.

पंचायतीनें दर महिन्यास एक वृत्तपत्र काढण्याचें मुक्रर केलें. २१ जानेवारीस लेनिनच्या स्मरणार्थ एक खास पत्रक काढावयाचा बेत केला. रायानें 'आपल्या कार्यक्रमाचा आराखडा लवकरच तयार करतें,' म्हणून अभिवचन दिलें. प्रत्येक गट-नेत्यानें महिन्याच्या कार्यक्रमाची आपली रूपरेषा पुढील आठवड्यापर्यंत तयार ठेवावी, अशी त्यांना सूचना देण्यांत आली. एलिनोरला कार्यकारी मंडळाचें अध्यक्षपद देण्यांत आलें, आणि कार्यकारी मंडळाची बैठक बरखास्त झाली.

"बालक-नाट्य-मंदिरांत एक नवीन खेळ लागला आहे. मी तुमच्यासाठीं तिकीट घेऊं ना, बाई?" पायोनिअर खोलींतून बाहेर पडतां पडतां रायानें मला विचारलें.

"अगदीं आनंदानें," मीं म्हटलें, "केवढ्याचें तिकीट आहे?"

"पन्नास कोपेक. सर्वांत छान जागेसाठीं."

मीं तिच्या हातावर पैसे ठेवले. 'किती अल्प दर' असा विचार माझ्या मनांत आल्याखेरीज राहिला नाहीं.

"सोन्या, या मुलांचा प्रत्येक गोष्टींतला गंभीरपणा पाहून मी तर स्तिमितच झालें आहें." मीं शिक्षिकांच्या विश्रांतिगृहाकडे जातांना तिला म्हटलें, "यामुळें हीं मुलें अकालींच पोक्त तर नाहींना होत?"

"छे! छे! मला तसें मुळींच वाटत नाहीं. दहा वर्षांच्या आंतील मुलांवर जवळ जवळ कांहींच जबाबदारी नसते. त्यांना कांहीं कामें असलीं तर वर्गापुरतीं किरकोळ. त्यांचें मुख्य काम म्हणजे स्वावलंबी होण्यास शिकण्याचें. आणि तिसऱ्या यत्तेंत आम्ही असेच कार्यक्रम ठेवतों कीं, त्यामुळें मुलांवर ओझें पडणार नाहीं. त्यांना झेपेल एवढीच जबाबदारी त्यांजवर टाकण्यांत येते आणि शील-वर्धनाच्या शिक्षणाला ती आवश्यकहि आहे."

"तुझें शिक्षण कोठें झालें?" मीं विचारलें.

"माझें सारें जीवितच दल-संघटनेंत गेलें आहे!" ती हंसून म्हणाली. "मी पंधरा वर्षांची असतांनाच मी कोमसोमॉलची सभासद झालें. अल्पवयीन पायोनिअर दलाची व्यवस्था पाहाणें, हें माझें सामाजिक कार्याचें क्षेत्र त्या वेळीं मीं ठरविलें. पुढें एक वर्षानें परभाषा शिकण्याच्या विभागांत दाखल झाल्यावर मी या शाळेंत आठवड्यांतून दोनदां येत असें. त्यांत माझे दोन उद्देश होतेः पायोनिअर दलाच्या नेत्यांची भेट घ्यावयाची व इंग्लिशचा सराव करावयाचा. माझा शिक्षणक्रम संपल्यावर मीं येथेंच नोकरी पत्करली. माझ्या अगोदरची कार्यकर्ती विश्वविद्यालयांत गेली. मी आठवड्यांतून एकदां पायोनिअर वर्गाच्या अभ्यासमंडळास जातें. तेथें आम्हीं आमच्या अडचणींचा विचार करतों, आणि आम्हांला आमच्या कार्यक्रमाच्या सूचना मिळतात. आमचें मुख्य ध्येय आमच्या मुलांना खरेंखुरें वडील बंधु-भगिनींच्या नात्यानें मार्गदर्शन करतां यावें आणि आपला रिकामा वेळ कारणीं लावण्यास त्यांना होईल तितकें साहाय्य देतां यावें एवढेंच आहे."

जसजसे दिवस लोटले, तसतसे सोन्याहि उत्कृष्ट पुढारी असल्याचें मला अनुभवानें पटूं लागलें. लहानमोठ्या साऱ्याच विद्यार्थ्यांत ती सारखीच प्रिय होती. सारेच तिच्यावर मनापासून प्रेम करीत. दुर्बलता किंवा भावनावशता यांचा तिच्याठायीं संपर्कहि नव्हता. वेळप्रसंगीं खरमरीत टीका केल्याखेरीज

ती राहात नसे. ती इतरांच्या अडचणी किंवा तक्रारी सहानुभूतीनें ऐकून घेई आणि त्यांतून मार्ग काढण्याचा आटोकाट प्रयत्न करी. क्वचित् तिच्या विसराळूपणामुळें किंवा चुकीमुळें शिक्षकवर्गास सभेची सूचना वेळेवर न मिळाली तर शिक्षकवर्गाशीं तिचा खटका उडे. कारण यामुळें आपल्या वर्गाची प्रगति अजमावण्याची संधि गेली, असें त्यांना वाटे. पण तिच्या दिलगिरी-प्रदर्शनांत तिचा प्रामाणिकपणा इतका उघड उघड व्यक्त होई कीं, त्यामुळें लोकांचा राग चटकन् मावळे. ती खरोखरच शिक्षकांशीं सहकार्यानें वागे, त्यांना आपले बेत वरचेवर कळवी आणि त्यांचा सल्ला घेण्याचा प्रयत्न करी. अधिकार-वर्गांत कांहीं तट पडले आहेत किंवा त्यांत कोठें विसंवाद उत्पन्न झाला आहे असें यत्किंचित्‌हि वाटूं न देण्याचा तिचा प्रयत्न असे.

अशा तऱ्हेनें पायोनिअर दलाची संघटना ही एक सामर्थ्यशील अशी शैक्षणिक संस्था होती. शिक्षकांच्या कार्यास ती पूरक होती. विद्यार्थ्यांचें जीवन आनंदांत व सुखासमाधानांत जात आहे कीं नाहीं हें पाहणें हेंच तिचें मुख्य काम असे.

* * *

जसजशी मी माझ्या कामांत रुळत चाललें आणि सोव्हिएट विचारप्रणाली व पद्धति या मला परिचित होऊं लागल्या तसतसें विद्यार्थ्यांच्या नि ओघा-ओघानें पालकांच्याहि जीवनांतील शिक्षकाचें स्थान किती महत्त्वाचें आहे, हें मला उमजूं लागलें.

नवीन समाजव्यवस्थेच्या कार्याचे घटक या नात्यानें तरुण पिढीला जी कामगिरी बजावावयाची आहे तिला उपयुक्त असें शिक्षण देण्याची महत्त्वाची जबाबदारी सोव्हिएट शिक्षकांवर सोंपविण्यांत आली आहे. या कामाबद्दल त्यांनाच जबाबदार धरण्यांत येतें. शिक्षकाला निव्वळ विश्व-विद्यालयीन पदव्या असून भागत नाहीं. तो कुशल मानसशास्त्रज्ञहि पाहिजे; तरच त्याला मुलांच्या स्वभावदोषांकडे किंवा प्रगतींतील अडथळ्यांकडे लक्ष पुरवितां येईल. त्याला सोव्हिएट राष्ट्रसंघाच्या अद्ययावत् प्रगतीची व कार्याची माहिती तर हवीच, पण त्याबरोबरच जागतिक घडामोडींचें ज्ञानहि हवें. सोव्हिएट राष्ट्रसंघाच्या राजकीय घटनेची, शासन-संस्थेची, निर्मिति-योजनांची आणि धोरणांची संपूर्ण माहिती प्रत्येक शिक्षकाला असणें अगत्याचें असे.

थोडक्यांत प्रत्येक सोव्हिएट शिक्षकानें रोजचा थोडा तरी वेळ वाचनांत आणि अभ्यासांत घालविलाच पाहिजे. नाहींतर तो ( अथवा ती ) मागें पडे आणि वर्तमानपत्रें वाचणारीं व जगांतील घडामोडींचें अद्यावत् ज्ञान असलेलीं मुलें पुढें जात.

तिसऱ्या यत्तेच्या एक वर्षाच्या कामांत मला खूपच मजेदार अनुभव आले; एवढेंच नव्हे, तर मी कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी शिकल्यें. मला कांहीं कांहीं विद्यार्थ्यांच्या बाबतींत अडचणीहि आल्या. त्यांच्या घरांतील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण, त्यांच्या पालकांचा व विद्यार्थ्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण या गोष्टी समजून घेतल्यामुळेंच मला त्यांच्याशीं नीट वागून त्यांना मार्गावर आणतां आलें.

एकंदर वर्गाचा बौद्धिक दर्जा बराच उच्च होता. बरींच मुलें अतिशय बुद्धिमान् होतीं; त्यांना शिकण्याची जबरदस्त हौस होती. आपल्या पाठासंबंधीं निरनिराळे प्रश्न त्यांच्याजवळ सदा तयार असत; आणि जेव्हां जेव्हां प्रचलित घडामोडींसंबंधीं चर्चा निघे त्या वेळीं भोंवतालीं जगांत काय चाललें आहे याचें यथातथ्य ज्ञान त्यांना असल्याचें अनुभवास येई. खोड्यांच्या बाबतींत जगांत इतरत्र सांपडणाऱ्या त्यांच्या वयाच्या मुलांसारखींच तीं असत.

लंडन, न्यूयॉर्क किंवा इतर आंग्लभाषी देशांतून नवीनच आलेल्या मुलांना आरंभींआरंभीं रशियन विद्यार्थ्यांची शिक्षकांशीं वागण्याची पद्धति हें एक कोडेंच असे. विद्यार्थ्यांच्या खोड्या अथवा कारवाया शिक्षकांना सांगणें अथवा शिक्षकांच्या कानावर घालणें हा रशियन विद्यार्थ्यांचा स्वभाव पाहून त्यांना प्रथम धक्काच बसे. एखाद्या वर्गसभेंत शिक्षकांच्या देखत एखादा विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्यावर खोडीचा किंवा दुष्कृत्याचा उघड उघड आरोप करूं शकतो, याचा अर्थच त्यांस प्रथम कळत नाहीं. करमणुकीच्या वेळीं अमुक अमुक मुलें दुसऱ्यास त्रास देत होतीं अशी कागाळी शिक्षकांकडे करणें हें त्यांस चमत्कारिक वाटे. शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचाहि प्रयत्न सर्व वर्गाची पातळी उंच करण्याच्या एकाच दिशेनें चालू असतो, शिक्षकांचा कोणासहि शिक्षा करण्याचा इरादा नसतो, आणि स्पष्ट व उघड टीकेनें आपापले दोष सुधारणें शक्य असतें, वगैरे गोष्टी त्यांना अखेर समजून येत.

प्रथम प्रथम खरा टीका कोणती, आणि खरोखरीच अ-सामाजिक

( समाजविरोधी ) अशा एखाद्या कृत्याची काळजी कोणती यांतला फरकहि नवीन मुलांच्या चटकन् ध्यानांत येत नसे. दोन बरोबरीच्या मुलांत जर मारामारी झाली तर त्याची बातमी शिक्षकांस कोणी देत नसे, पण एखादा मोठा मुलगा लहान मुलाच्या वाटेस गेला तर मात्र त्याच्या ते साहाय्यास धांवत. आपल्या वर्ग-मित्राची गंमतीनें चेष्टा करून त्याला भंडावलें तर त्याची तक्रार शिक्षकांकडे जात नसे, पण सूडबुद्धीनें दुसऱ्यास त्रास दिला तर सभेंत त्याबद्दल त्याची हजेरी होई. या गोष्टी समजावयाला विचारशक्तीची वाढच व्हावयास हवी आणि ‘ मानापमाना’च्या नवीन कल्पना परिणत व्हावयास हव्यात.

माझ्या अडचणींच्या प्रसंगीं मला मुख्याध्यापिकेकडून म्हणा, हॉलंडबाईकडून म्हणा अथवा सोव्हिएट युनिअनच्या पद्धतींत मुरलेल्या आणि मुलांशीं वागायचें कसें, त्यांच्या अंतरंगांत शिरण्याचे मार्ग कोणते हें जाणणाऱ्या शिक्षकांकडून म्हणा बिनमोल मार्गदर्शन होई. कित्येक प्रसंगीं मुलांचा आलेला अनुभवच मला मार्गदर्शक ठरे. एखादा प्रश्न निर्माण झाला तर तो निवारावयाचा कसा किंवा मुलांना स्वातंत्र्य द्यावयाचें किती हें ठाऊक करून घेणें मात्र अगत्याचें होतें. कारण सोव्हिएट राष्ट्रसंघांत प्रत्यक्ष शिक्षांना पूर्ण मज्जाव आहे.

माझा रेमंड नांवाचा एक विद्यार्थी दिसायला तरी अगदीं आळशी आणि अभ्यासाविषयीं उदासीन दिसे. त्याचें ठराविक उत्तर म्हणजे ‘ मला ठाऊक नाहीं.’ त्यावरून असें वाटे कीं, आपल्याला एखादी गोष्ट येवो न येवो त्याला त्याची फिकीर नाहीं. मी त्याला शाळा सुटल्यावर थांबवून ठेवलें आणि कांहीं विषयाची त्याची चांचणी घेतली. गणितांतील त्याचा तल्लखपणा पाहून मला नवल वाटलें. “ तूं वर्गांत उदाहरणें कां सोडवींत नाहींस ?” या माझ्या प्रश्नाला त्यानें उत्तर दिलें, “ मला काय त्याचा उपयोग ?” मला व्हायचंय विमान-तज्ज्ञ. मला मोजतां आलं कीं संपलं. तेवढं मला येतं.” मी रेमंडच्या आईस निरोप पाठविला व त्याला विमानाची आवड असल्याचें सांगितलें. तो घरीं नेहमीं विमानांचे नवे नवे नमुने तयार करीत असे. त्यांचाच त्याला भारी छंद होता. त्यामुळें तो आपल्या गृहपाठाकडेहि दुर्लक्ष करी.

पुढल्या भेटीच्या वेळीं मी रेमंडशीं विमानांचेंच बोलणें काढलें. “ शाळेंत

विमानें बनविणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघ आहे, त्यांत तूं कां सामील होत नाहींस ?" म्हणून मीं त्यास विचारलें. तो म्हणाला, " तीं मुलें बनवितात तीं विमानें सोपीं आहेत. तसलीं मला सहज करतां येतात. तेव्हां जिल्ह्यांतील औद्योगिक केन्द्राच्या वर्गांत जाण्याचा मीं त्याला सल्ला दिला. तो त्यास मान्य झाला. " रेमंड, तुला जर उत्कृष्ट विमान-कल्पक व्हावयाचें असेल तर तुला अंकगणित चांगलें यावयास हवें. अगदीं अपूर्णांकांत व दशांशांत देखील तुला हिशेब करतां यावयास हवेत. शिवाय तुला भूगोल व शास्त्रविषय ठाऊक पाहिजेत. आपलें विमान कोणत्या प्रदेशांतून जाणार, कोणकोणत्या हवामानांतून त्याला फिरावे लागणार या सर्वांची तुला चांगली माहिती हवी, तूं चांगला सुशिक्षित व्हावयास पाहिजेस, असें तुला नाहीं वाटत ? तें कांहीं असो. आपण औद्योगिक केन्द्रांत उद्यां नांव तर नोंदवून टाकूं. आईला सांगून ये, ' रोजच्या पेक्षां घरीं यावयास उशीर होईल ' म्हणून. "

रेमंड गेल्यावर मीं औद्योगिक केन्द्राला टेलिफोन केला आणि नवीन विमानें बनविणाऱ्या संघाच्या मुख्याशीं बोललें, त्याला थोडक्यांत मजपुढील प्रश्न निवेदन केला. मला काय मदत पाहिजे, हें त्याच्या चटकन ध्यानांत आलें. त्यानेंहि योग्य तें करण्याचें आश्वासन दिलें.

हलके हलके औद्योगिक केन्द्राच्या संघनायकाच्या सहकार्यानें रेमंड आपल्या अभ्यासांत अधिक मन घालूं लागला. वर्गाच्या जीवनक्रमांत तो उत्साहानें भागहि घेऊं लागला. शाळेच्या वैमानिक पुनर्घटना–विभागाचा तो कार्यवाह बनला. आपल्या वर्गांतील बरींच मुलें त्यानें त्या विभागांत आपल्या मागोमाग खेंचलीं. तेथील सामानासुमानावर देखरेख करण्याच्या कामांत तो मदत करी. सर्व सभासद उपस्थित राहतात ह्याबद्दल तो जागरूक राही. माझ्या दृष्टीनें महत्त्वाची गोष्ट झाली ती ही कीं, रेमंडचा शालेय जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण सुधारला. उत्कृष्ट विमान-तज्ज्ञ होण्यासाठीं इतर विषयांचा अभ्यास करावयास हवा याचें त्यास महत्त्व कळलें.

रेमंडपेक्षांहि अधिक जीव खाणारा मुलगा म्हणजे जॉर्ज. तो आपले गृहपाठ कधींच व्यवस्थित करीत नसे. सर्वांच्या नेहमीं खोड्या करावयाच्या हा त्याचा खाक्याच. वर्गसभेची बैठक भरवून याची चौकशी व्हावयास पाहिजे असा सर्वांचा आग्रह सुरू झाला. त्याप्रमाणें एक दिवस शाळा सुटल्यावर आम्ही

जमलों. हीं लहान पण कर्तबगार मुलें सभेचें काम कसें पार पाडतात हें पाहण्याची मलाहि तीव्र जिज्ञासा होतीच.

एल्गानें अध्यक्षस्थान स्वीकारलें. कारण चालू सहामाहीची वर्गाध्यक्ष म्हणून तिची निवड झालेली होती. "जॉर्जच्या प्रश्नाचें ज्यांना महत्त्व वाटत नसेल त्यांनीं घरीं निघून जावें; कारण आपल्याला एका गंभीर प्रश्नावर विचार करावयाचा आहे; तेव्हां सभेंत मुळींच गडबड होतां कामा नये," असा आरंभींच तिनें इषारा दिला. पण घरीं जाणारा कोणीच निघाला नाहीं.

"जॉर्जच्या वर्तणुकीमुळें आपली लाल-ध्वज मिळवण्याची संधि जात आहे," एल्गानें आपलें भाषण पुढें चालू केलें. "आपण या आठवड्यांत चार गुणांनीं चौथीच्या मागें पडलों आहोंत, तें केवळ त्याच्यामुळें. तो गृहपाठ कधींच करून येत नाहीं. त्याजजवळ स्वतःचा टॉवेल व साबण नसतो. उपाहारापूर्वी तो दुसऱ्याच कोणाच्या तरी टॉवेलाचा उपयोग करून घेतो. त्याची आपल्या वर्गबंधूंशीं वागणूक उर्मटपणाची होत आहे. तेव्हां या बाबतींत आपल्याला कांहींतरी निश्चित धोरण ठरवावयास हवें. तरी आपण चर्चेस आरंभ करूं या. प्रथम कोण बोलणार आहे?"

"जॉर्जशीं वर्गांत कोणींच संबंध ठेवूं नये, म्हणजे आपोआप तो सुधारेल," अलेक नांवाचा एक अगदीं शांत स्वभावाचा मुलगा म्हणाला. "तो कांहीं मूर्खासारखें बोलला कीं इतर मुलें हंसतात. त्यानें तो अधिक बिघडतो. तो गृहपाठ करून आणतो कीं नाहीं हें मी पाहात जाईन किंवा त्यास ते येथें करावयास लावीन. मी त्याच्याजवळ बसेन. मला वाटतें आपल्या बाईंनीं त्याच्या पालकास पत्र पाठवून आपण घेऊं तो निर्णय त्यास कळवावा."

होव्हा उठून उभा राहिला. "माझें मत असें आहे कीं, आपण त्याला सुधारण्यासाठीं पांच दिवसांची मुदत द्यावी. त्या अवधींत तो सुधारला नाहीं तर एक आठवडा त्याला वर्गांतून काढून द्यावे, आणि त्याच्या पालकांना पत्र पाठवून त्याला सक्तीनें घरीं अभ्यास करावयास लावावा."

"मनांत असेल तेव्हां तो व्यवस्थित अभ्यास करतो," राया म्हणाली, "आपल्या हस्तलिखित वर्तमानपत्रासाठीं त्यानें पाहा किती मेहनत घेतली आहे. त्यानें कितीतरी सुंदर चित्रें काढलीं आहेत. त्यावरून तो वाटतो तसा वाईट खास नाहीं."

" जॉर्जला संगतच वाईट आहे," युजेन म्हणाला, "हें मला माहीत होण्याचें कारण असें कीं, मी एक दिवशीं त्याच्या घरीं गेलों होतों. तेव्हां तेथें तो मुलगा आला होता. तो म्हणत होता कीं, उद्यां आपण शाळेस बुट्टी मारूं या नि बाहेर भटकूं या. मीं त्याला साफ सांगितलें कीं, मी पायोनिअर दलाचा स्वयंसेवक आहें; असली गोष्ट मी कधीं करणार नाहीं. मी जॉर्जला नंतर सांगितलें कीं, मी ही गोष्ट शाखासभेंत मांडीन. तेव्हां आपण त्यांच्याशीं खेळणार नाहीं असें त्यानें कबूल केलें. म्हणून मी इतके दिवस गप्प होतों."

जॉर्ज खूप गोंधळून गेलेला दिसला. तो उठून म्हणाला : " आतां त्याची माझी मुळींच गट्टी नाहीं. मला सुधारण्याची संधि द्या. मी सुधारणा करून दाखवितों. त्या मुलाची नि माझी दोस्ती होती तेव्हां मला अभ्यास करावासें वाटत नसे. तो मला सिनेमाला बोलावी, किंवा फिरावयास नेई. त्यामुळें माझा अभ्यास राहून जाई. मला वाईट संवयी लागल्या आहेत. मला त्या सोडवत नाहींत. पण मी सुधारेन म्हणून प्रतिज्ञा करतों. मी वर्गांत अलेकच्या जवळ बसेन. त्यामुळें माझ्या वागणुकींत सुधारणा होईल."

थोड्याशा चर्चेनंतर अलेकची सूचना मान्य करण्यांत आली. जॉर्जच्या आईला भेटून मीं सर्व गोष्टी तिच्या कानावर घालाव्यात असें मला सांगण्यांत आलें. सभा संपली. मी जॉर्जशीं बोलण्यासाठीं मागें थांबलें. एका कागदाच्या तुकड्यावर तो कांहींतरी रेखाटीत होता. त्याला चित्रकलेची निसर्गदत्त देणगीच होती असें मला दिसून आलें. " जॉर्ज, तुला चित्रें काढण्याचा खूपच आवड आहे कीं !" मीं म्हटलें.

" मला सगळ्यांत हेंच अधिक आवडतें." त्यानें उत्तर दिलें.

" मग तूं चित्रकलामंडळाचा सभासद कां होत नाहींस ?" मीं विचारलें.

" मला जिल्हा चित्रकलाविभागांत कधींपासून जावयाचें आहे. पण सोन्या मला शिफारसपत्रच देत नाहीं. ती म्हणते तुझे गुण फार कमी आहेत."

" जॉर्ज, या आठवड्यांत आपल्या अभ्यासांत व वागणुकींत तूं सुधारणा दाखव. मी सोन्याला चित्रकला वर्गाबद्दल सांगतें. बोल, आहेस कबूल ?"

जॉर्जची कळी खुलली. " बाई, पाहा मी सुधारणा करून दाखवितोंच आणि कलामंडळांत प्रवेश मिळवितोंच." तो निश्चयी चेहऱ्यानें घरीं परतला.

त्या दिवसापासून जॉर्जमध्यें बदल झाला. अर्थात् त्याच्या मार्गांत अडथळे होतेच. पण अलेकची त्यास फार मदत झाली. मी मधूनमधून त्याची चौकशी करीत होतें. त्याच्या कच्च्या विषयांत त्याला मी अधिक मदत करीं. त्यामुळें त्याच्या गुणांत सर्व बाजूंनीं सुधारणा दिसूं लागली. सर्व वर्ग त्याच्याशीं मोठ्या बंधुभावनेनें वागे. पुढील सभेचे वेळीं जॉर्जनें आपला शब्द पाळला असल्याचें समाधानपूर्वक निवेदन केलें. त्यानें चित्रकलामंडळांत नांव दाखल केलें. शाळा सुटल्यावर आठवड्यांतून तीनदां तो तेथें जाई. तेथें हुषार मुलगा म्हणून त्याची प्रसिद्धि झाली. त्या वर्षाअखेर भरलेल्या विद्यार्थ्यांच्या चित्रकला-प्रदर्शनांत त्याचीं चित्रें मांडण्यांत आलीं. पायोनिअरदलाच्या खोलींत जॉर्जनें काढलेलें स्टॅलिनचें चित्र टांगलें होतें. त्यानें तें शाळेस मोठ्या अभिमानानें नजर केलें होतें.

मी जॉर्जच्या आईस शाळेंत बोलावून घेतलें आणि तिच्याशीं गंभीरपणें चर्चा केली. आपल्या मुलाकडे आणि त्याच्या मित्रपरिवाराकडे तिचें मुळींच लक्ष नव्हतें. तिचा स्वभाव मला जरा लहरीच दिसला. 'पण जॉर्ज अभ्यास नियमानें करतो कीं नाहीं हें मी पाहीन आणि त्याचे मित्र कोण आहेत यावर मी नजर ठेवीन' असें मीं तिजकडून कबूल करून घेतलें. जॉर्जचे मित्र कोणत्या शाळेंत जातात, हेंहि पाहून मला कळविण्यास मीं तिला बजावलें. म्हणजे त्याप्रमाणें त्या त्या मुख्याध्यापिकांच्या कानांवर ही गोष्ट घालण्याची माझी इच्छा होती.

जॉर्जसंबंधींची वर्गाची वृत्ति पाहून मात्र मी खरोखरच आश्चर्यचकित झालें. मोठ्या माणसांपेक्षां लहान मुलेंच एकमेकांच्या गुणदोषाचा न्याय-निवाडा अधिक कठोरपणें करतात असा सर्वसाधारण अनुभव आहे. पण येथें पाहावें तों आपल्या मित्राच्या दुर्वर्तनाला कांहींतरी कारण शोधून काढण्याकडे साऱ्यांची प्रवृत्ति. भर दिला जाई तो त्यांच्यांतील चांगल्या गुणांवर. तरीपण आपल्या संघाविरुद्ध कोणी वागला आणि त्याचे नांवास कमीपणा आणूं लागला तर त्याची गय करण्यास तीं तयार नव्हतीं. जिमीच्या बाबतींत आम्हांला वरचेवर अडचणी येत गेल्या. पण त्या वेळीं मुलांनीं दाखविलेली वृत्ति माझ्या विधानाची सत्यता पटवील. जिमीचें हें एक शेवटचें उदाहरण मी सांगणार आहें.

जिमीबद्दल मला काळजी वाटूं लागली होती. इतर मुलांच्या बाबतींत काय असें कीं एकदां त्याची पूर्ण छाननी केली कीं गाडी रुळावर येई. कारण त्यांच्या बाबतींत पालकांचें सहकार्य असे. जॉर्जची आई जरी तितक्या उच्च अभिरुचीची स्त्री नव्हती. तरी तिला आपण घरीं काय केलें पाहिजे हें समजावून सांगणें व मग तिजवर विसंबून राहणें शक्य होतें. पण जिमीच्या बाबतींत मात्र घरची परिस्थितिच अशी चमत्कारिक होती कीं, शाळेनें त्याला सुधारण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांत अडचणीच येत गेल्या. त्याच्या घरगुती वातावरणाचा प्रश्न आम्हीं सोडविला तेव्हांच जिमीमध्यें टिकाऊ स्वरूपाची अशी थोडीफार सुधारणा आम्ही करूं शकलों.

जिमीकडे शिक्षकाचें लक्ष वेधलें जाण्यासारख्या पुष्कळच गोष्टी होत्या. तो गृहपाठ दुसऱ्याच्या वहीवरून उतरून घेई. खोड्या करून इतरांच्या अभ्यासांत व्यत्यय आणी. थाडक्यांत इंग्लंडमध्यें जे "कूट विद्यार्थी" म्हणून गणले जातात, त्यांच्यांत त्याची जमा होती. इतकें असूनहि त्याच्या चालचलणुकींत अशी एक मोहकता होती कीं, सैतानानेंहि त्यापासून सावध राहावें. यामुळें प्रथमपासूनच त्याच्याविषयीं माझ्या अंतःकरणांत स्निग्धभाव वसत होता. मला वाटलें कांहीं अंशीं या स्निग्धतेच्याच जोरावर मी त्याच्याशीं चटकन् मैत्री जोडूं शकलें.

मी जिमीच्या आईला बोलावून घेतलें. ती अर्धवट साक्षर असल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. क्रान्तीच्या वेळीं आपण पूर्ण निरक्षर होतों; पुढें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कांहीं शिकूं शकलों नाहीं असें ती म्हणाली. तिनें कांहीं वर्षें अमेरिकेंत काढलीं होतीं. सोव्हियट राष्ट्रसंघासाठीं यंत्रसामुग्री विकत घेण्यास तिच्या नवऱ्यास जेव्हां तिकडे पाठविलें होतें, तेव्हां त्याजबरोबर ती तेथें गेली होती. तेथून परतल्यावर निरक्षरता-निवारणाच्या एका वर्गात तिनें नांव घातलें होतें. सध्यां ती चवथ्या वर्गांत होती. म्हणजे आपल्या मुलाच्या पुढें एकच वर्ष. तेव्हां जिमीला आवरणें तिच्या शक्तीपलीकडचें होतें हें उघड होतें. तो तिचें ऐकत नसे आणि तिचें इंग्लिशचें ज्ञान बेताबाताचेंच असल्यानें त्याच्या गृहपाठावर लक्ष ठेवणें तिला शक्य नव्हतें. त्याच्या वडिलांना काम फार, त्यामुळें ते फार उशिरां घरीं परत येत.

मीं जिमीला हांक मारली आणि त्याच्या समक्ष त्याच्या आईस बजावलें

कीं आठवड्यांतून एकदां तरी येऊन त्याच्या वर्तनाबद्दल मला तिनें अहवाल दिला पाहिजे. त्याच्या वडिलांनीं पुढल्या आठवड्यांत भेटून जावें किंवा निदान टेलिफोनवर तरी माझी गांठ घ्यावी असेंहि मीं तिला सांगितलें.

जिमीच्या वडिलांच्या भेटीच्या प्रसंगीं उपस्थित राहण्याबद्दल मीं प्रिन्सिपलना विनंति केली. 'त्यांच्याशीं मीच बोलेन' म्हणून त्या मला म्हणाल्या. जेव्हां त्याचे वडील आले तेव्हां त्या उभयतांतील मोठें उद्बोधक संभाषण मला ऐकावयास मिळालें. मींहि त्यांच्या चर्चेंत बराच भाग घेतला. सोव्हिएट कामगारांच्यांत परस्परांबद्दल वसत असलेल्या जिव्हाळ्यानें मी बरीच दिपून गेलें.

आपल्या मुलाकडे आपण दुर्लक्ष्य करीत आहांत आणि पालकाच्या एका मोठ्या कर्तव्यांत हेळसांड करीत आहांत, असा मुख्याध्यापिकेनें त्याजवर आरोप केला. आठवड्यांतून वरचेवर तरी तुम्हीं घरीं लवकर यायला पाहिजे, आपल्या मुलाशीं बोलावें, त्याचा अभ्यास तपासावा, असा तिनें आग्रह धरिला आणि 'पंधरा दिवसांतून एकदां तरी शाळेंत टेलिफोन करून त्याच्या प्रगतीची चौकशी करीत जा' म्हणून त्यांस बजावलें. "आपण जर जिमीकडे लक्ष पुरविणार नसाल तर आपल्या कामगार-संघ-समितीच्या कानावर या गोष्टी घालून तुम्हांला अधिक मोकळा वेळ देण्याबद्दल मला कळवावें लागेल." अशी तिनें जवळजवळ धमकीच दिली.

'जिमीच्या शिक्षणाबाबत आपण अधिक लक्ष पुरवूं' असें जिमीच्या वडिलांनीं अभिवचन दिलें. कारण या परिस्थितींत त्याला दुसरा मार्गच कोणता होता?

जिमीच्या जीवनचित्राच्या दर्शनास पूर्णता यावी म्हणून त्याच्या घरीं पुढील आठवड्यांत जाऊन त्याच्या वडिलांस भेटण्याचा योग मीं जुळवून आणला.

जिमीचा जो आम्हांस उपसर्ग होत होता त्याचा शेवट या भेटीनें अर्थातच झाला नाहीं. ज्याला थोडेंफार यश म्हणतां येईल तें मिळविण्यास बरेच महिने आम्हांस चिकाटीनें प्रयत्न करावा लागला. जिमीच्या बाबतींत मला आलेल्या अडचणी आणि त्यांचें निराकरण करण्याचे माझे मार्ग, माझी पद्धति यांचें चित्रण पुढील प्रकरणांतून मीं केलें आहे. ही मुलाखत दुसऱ्याच एका दृष्टीनें महत्त्वाची आहे. सोव्हिएट शिक्षणपद्धतीच्या एका स्वरूपावर तिनें चांगला प्रकाश पडतो. सोव्हिएट शिक्षणपद्धति ही तेथील समाजव्यवस्थेशीं

संपूर्णपणें निगडित झाली आहे. तिचा पालकांशीं व त्यांच्या परिस्थितीशीं तसेंच बालकासभोंवतालच्या वातावरणाशीं निकटचा संबंध आहे. तिनें पालकांचें जीवन व परिस्थिति तसेंच बालकाच्या भोंवतालचें वातावरण संपूर्णतया व्यापून टाकलें आहे. कारण सोव्हियटमधील शाळा हें तेथील समाजपद्धतीचें प्रधान अंग समजलें जातें. मुलांच्या संवर्धनांत समाजानें आपला भाग उचलला पाहिजे. शाळेइतकीच पालकांवरहि मुलांची जबाबदारी आहे.

जिमीचा प्रश्न बिकट होता. घरांत त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष झालें होतें. त्याला खोटें बोलण्याची आणि लबाडीची संवय लागली होती. घरीं आणि शाळेंत त्यावर करडी नजर ठेवून आणि रिकाम्या वेळांत त्याला निरनिराळ्या विभागांत गुंतवून ठेवून आम्हीं त्याला हलकें हलकें असें पटवून दिलें कीं, रस्त्यांत इतस्ततः भटकून व्यर्थ वेळ दवडण्यापेक्षां निरनिराळ्या खेळांत प्रावीण्य संपादन करणें व एंजिनचे विविध नमुने बनविणें ह्या गोष्टी अधिक चांगल्या आहेत.

मुलांच्या बाबतींत येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठीं किंवा त्यांच्या बिघडलेल्या परिस्थितींत सुधारणा करण्याकरितां सोव्हियट पद्धतींत कोणते उपाय अवलंबितात याची रेमंड, जॉर्ज व जिमी यांच्या उदाहरणांवरून कल्पना येईल. सोव्हियट शिक्षणतज्ज्ञ नाठाळ मुलांचा वेगळाच वर्ग असतो, हें मानावयास तयार नाहींत. साधारणपणें कोणत्याहि मुलाचा प्रश्न वैयक्तिक रीतीनें, सहानुभूतीनें व त्याची परिस्थिति समजावून घेऊन सोडवावयाचें ठरविलें, तर प्रत्येक मुलगा हा सर्वसाधारण मुलासारखाच होऊं शकतो. जरूर तेथें त्याच्या भोंवतालच्या परिस्थितींत मात्र योग्य तें परिवर्तन घडवून आणावयास हवें. पण ही गोष्ट सोव्हियट पद्धतींतच शक्य आहे. कारण तेथें प्रत्यहीं जुनीं घरें पाडून नवीन घरें उभारलीं जात आहेत आणि संस्कृतीचा दर्जा उंचावण्याचा सदा सर्वकाळ अव्याहत प्रयत्न सुरू आहे.

थोड्याच दिवसांत माझ्या वर्गाची घडी नीट बसल्यासारखें मला वाटूं लागलें. आम्ही परस्परांशीं सहानुभूतीच्या व सहकारित्वाच्या दृढ पाशांनीं निगडित झालों असल्याचा प्रत्यय मला येऊं लागला. मुलांच्या घरीं जाऊन भेटी घेण्याचा मीं उपक्रम सुरू केला. त्यामुळें मला त्यांच्या शालेय जीवना-

बरोबरच गृहजीवनाचें चित्र पाहावयास मिळून त्यांचें अंतरंग मला कळे. मुलांच्या वह्या पाहून त्यांना गुण देतांना महिन्यांतून दोनदां तरी प्रत्येकाशीं बोलण्याची मी संधि गमावीत नसें. त्या वेळीं त्यांना अधिक सुधारण्याबाबत सूचना देई. अशा संभाषणाच्या वेळीं साहजिकच इतर गप्पा निघत. कधीं कधीं मैत्री, स्नेह अशा विषयांवर बोलणें निघे. 'आपला वर्ग सर्वांत उत्कृष्ट ठरेल तर किती छान होईल' असें मुलें बोलून दाखवीत. तें कसें साधतां येईल, याविषयीं त्यांच्यांत खल होई. मी त्यांचें सारें भाषण सावधानतेनें ऐकून घेई. मुलांच्या जिव्हाळ्याच्या विषयांत लक्ष घातल्यानें व समरस झाल्यानें मला माझ्या विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करतां आला.

सहामाहीच्या अखेरीस आमच्या वर्गास तर लालध्वज मिळालाच, पण चौथ्या यत्तेसहि तो मिळाला. त्यामुळें आम्हांस फार समाधान वाटलें. दोन्ही वर्गांनीं शिस्त आणि अभ्यास यांत खूपच उच्च दर्जाची प्रगति दाखविली. दोन्ही यत्तांतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी समाधानाची व उत्साहाची छटा हें सहामाहींतील दीर्घोद्योगास पुरेसें पारितोषिक होतें.

# ३ शरीरमार्थं

एक डॉक्टर आणि एक नर्स ह्या दोन शिक्षक वर्गातील प्रमुख व्यक्ति होत्या. डॉक्टरांची खोली ही अद्ययावत् उपकरणांनीं परिपूर्ण असे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैद्यकीय तपासणीचा इतिहास कटाक्षानें सांभाळून ठेवण्यांत येई.

डॉक्टर दररोज सकाळीं शाळेंत एक फेरी मारीत. तजबिरा, कपाटें, यांच्या कडा आणि कानेकोपरे बोटानें चाचपून पाहात आणि कोठें धुळीचा अवशेष सांपडतो का तें धुंडाळीत. आरोग्याची इतर व्यवस्थाहि नीट आहे कीं नाहीं यावर दृष्टि टाकांत. मुलांच्या फराळाच्या वेळीं भोजनगृहांत ते उपस्थित असत आणि मुलांना देण्यांत आलेले पदार्थ प्रमाणबद्ध आणि रुचकर आहेत कीं नाहींत हें ते पाहत. आपल्या रोजच्या तपासणीची व कामाची नोंद करून मुख्याध्यापिकेच्या अवलोकनार्थ आणि स्वाक्षरीसाठीं ते लगेच पाठवीत.

डॉक्टर आणि नर्स विद्यार्थ्यांत अतिशय प्रिय होते. असंख्य विद्यार्थी त्यांच्या औषधालयास भेट देत. कोणी बोट कापलें म्हणून, तर कोणी डोळ्यांत कचरा गेला म्हणून तर उगीच कोठें दुखतें म्हणून अशा खऱ्या वा काल्पनिक सबबींवर ते तेथें गोळा होत. प्रत्येकाची तक्रार मोठ्या आस्थेनें ऐकून घेतली जाई आणि आपण येथें आलों हें बरें झालें असेंच प्रत्येकास वाटावें असा प्रयत्न होई. शाळेंत आल्यावर बरें वाटत नसल्यामुळें वर्गांत प्रवेश करण्याआधीं पुष्कळ मुलें सरळ डॉक्टरकडे जात. त्यामुळें संसर्गजन्य रोगाचा व्हावयाचा तो फैलाव

झाला नाहीं, अशीं कितितरी उदाहारणें मला माहीत आहेत. या उलट अभ्यासांत अळंटळं करणारे विद्यार्थी डोकेदुखीच्या सबबीवर अभ्यास बुडविण्याची संधि मिळविण्यासाठीं आले कीं, ते हटकून हुडकले जात आणि उपदेशाचा डोस देऊन त्यांना परत वर्गांत पाठविण्यांत येई.

मी वर्गांत काम करावयास लागल्यानंतर थोड्याच दिवसांनीं स्टेला आणि ईव्हा नांवाच्या दोन मुली मजकडे आल्या व मला म्हणूं लागल्या कीं, वर्गाच्या स्वच्छता-तपासनिसाचें काम आम्हांस करूं देण्यास परिचारिकेची परवानगी आहे. खोलींत उष्णतामान बरोबर सांभाळलें जातें कीं नाहीं हें पाहावयाचें; तसेंच प्रत्येकजण टॉवेल व साबू व्यवस्थित ठेवतात कीं नाहीं, जेवणापूर्वी त्यांचा उपयोग करतात कीं नाहीं, तसच प्रत्येकाचे कपडे स्वच्छ व नीटनेटके असतात. कीं नाहीं, जमीन झाडलेली असते कीं नाहीं, ह्या गोष्टी बघणें ही त्यांचीं कामें होतीं. या दोघींपैकीं एकजण आळीपाळीनें औषधालयांत सुटीच्या वेळांत परिचारिकेला साहाय्य करी. किरकोळ जखमा, ओरखाडे यांना परिचारिकेच्या देखरेखीखालीं उपचार करीत. या प्रथमोचार विभागातर्फे दर महिन्याला एक पत्रक निघत असे. त्यांत आरोग्याच्या अंगोपांगांसंबंधीं माहिती देण्यांत येई. जॉर्ज किंवा कोल्या किंवा चित्रकला विभागापैकीं कोणीतरी त्यांत रेखाचित्रें अथवा व्यंगचित्रें काढून तें आकर्षक करीत. कधीं कधीं आरोग्यमंत्र्यांनीं छापलेलीं मोठ्या फलकांच्या स्वरूपांत हीं पत्रकें निघत. कधीं त्यांत मुलांनीं लिहिलेलेच लेख असत. आणि कधीं कधीं स्वच्छता व आरोग्य यांचे धडे देणारीं उत्कृष्ट चित्रें त्यांत असत. कोणत्याहि व्याख्यानानें व्हावयाचा नाहीं एवढा परिणाम या पत्रकांचा होई.

औषधालयाच्या खोल्यांच्या भिंतीवर विविध फलक लावलेले असत. सकाळीं कोणता व्यायाम घ्यावा, थंडीपडसें कसें टाळावें, जखमांवर काय उपचार करावा, हाडें कशीं बसवावींत हीं आणि इतर नित्योपयोगी वैद्यकीय माहिती त्यांतून भरपूर देण्यांत येई.

या विभागाखेरीज डॉक्टर व परिचारिका एक लहान मुलांसाठीं व एक लहान मुलींसाठीं अशीं दोन अभ्यासमंडळें चालवीत. त्यांत तयार झालेले विद्यार्थी प्रथमोचार परीक्षेस बसत; त्यांत मिळालेलें यशश्चिन्ह अनेक विद्यार्थी आपल्या कोटांवर लावीत.

मी त्या अँग्लोअमेरिकन शाळेंत काम करीत होतें. त्या अवधींत एकदांहि कधीं सांथीचा आजार तेथें उद्भवला नाहीं. त्यामुळें इतर कोणत्याहि देशांतील शाळेपेक्षां येथें विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचें प्रमाण अधिक असे. याचीं मुख्य कारणें म्हणजे डॉक्टरांचे प्रतिबंधक उपाय व आजार झाला असतां ताबडतोब होणारी उपाययोजना.

माझ्या वर्गांतील एका मुलाची गोष्ट मला स्मरते. डोकें दुखत असतांच तो शाळेंत आला आणि पहिल्या तासापूर्वीच तो डॉक्टरकडे गेला. त्याला ताप भरला असून त्याचें तोंड लालसर झाल्याचें डॉक्टरांच्या नजरेस आलें. तिनें त्याला इस्पितळांत ठेवून घेतलें आणि इतरांस तेथें जाण्याची बंदी केली. थोड्याच वेळांत स्कार्लेटफिव्हरच्या बारीक पुटकुळ्या त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागल्या. डॉक्टरांनीं लगेच मोठ्या इस्पितळास टेलिफोन केला. रुग्णगाडी येतांच एलीची इस्पितळांत रवानगी झाली. ताबडतोब त्याच्या पालकांसहि निरोप पाठविण्यांत आला. जेव्हां संपूर्णपणें बरा झाल्याचा दाखला घेऊन एलीची हॉस्पिटलमधून मुक्तता झाली, तेव्हांच तो पुनः शाळेंत आला.

ज्या दिवशीं एलीला हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत आलें, त्याच सायंकाळीं जिल्हा आरोग्यविभागानें पाठविलेल्या माणसांनीं जंतुनाशक औषधांनीं सर्व शाळा धुऊन काढली. दुसऱ्या दिवशीं शाळेचें कामकाज चालू होतें. त्या सहामाहींत त्या तापाची पुनः एकहि लागण आमच्या शाळेंत झाली नाहीं. अशा गोष्टी अनेकवार झाल्या पण रोगाचा फैलाव कधींच झाला नाहीं.

एखाद्या मुलांत विशेष दोष आहे आणि त्याला विशेष उपचाराची गरज आहे असें आढळलें तर बालकांसाठीं उघडलेल्या जिल्हा-औषधालयांत शाळेंतून सुटल्यावर तो जाई. तेथें तज्ज्ञ डॉक्टराकडून त्याची तपासणी होई आणि उपचार केले जात. अशक्त मुलांना सुटीच्या दिवसांत आरोग्यकेंद्रांच्या गांवीं धाडण्यांत येई. तेथून चांगलें आरोग्य संपादून व दुप्पट उत्साहानें ते परत येत. हें एवढ्यावरच थांबत नसे. झालेल्या सुधारणेंत खंड पडूं नये म्हणून उपचार चालूं ठेवण्यांत येत; त्यासाठीं मुलांची वरचेवर तपासणी चालूंच राही.

सर्व प्रकारची वैद्यकीय मदत विनामूल्य मिळे; आणि ती मदत उत्कृष्ट

दर्जाची असे. बालकऔषधालयें, इस्पितळें, आरोग्यकेंद्रें या संस्था आपापल्या परीनें कामाचा वांटा उचलीत आणि मुलांचें आरोग्य टिकावें म्हणून झटत.

शाळेंत चाललेल्या सक्रिय प्रचारामुळें आरोग्याच्या या मोहिमेंत पालकांना सामील व्हावें लागे. अद्याप पुष्कळ मातापित्यांच्या क्रान्तिपूर्व काळांतील प्रवृत्ति आणि ग्रह कायम असल्यानें आरोग्यकारक संवयी मुलेंच घरांत प्रस्थापित करीत. हिंवाळ्यांत देखील थोडीतरी खिडकी उघडून झोंपण्याचा तीं आग्रह धरीत. तीं नियमानें दांत घाशीत. आपापले वेगळे रुमाल असावेत म्हणून हट्ट धरून बसत. आणि डॉक्टरांनीं बोलाविलें कीं, शाळेंत चलण्याविषयीं आणि डॉक्टरांच्या सूचना अमलांत आणण्याविषयीं तीं अडूनहि बसत.

एक दिवस स्टेलानें मजपाशीं कुरकूर केली कीं व्यायामासाठीं मी कपडे बदलतें तें माझ्या आजीला आवडत नाहीं. मला थंडी बाधेल अशी तिला भीति वाटते. मीं तिला समजावून सांगितलें कीं, या गरम कपड्यानेंच व्यायाम करून घामानें भिजलेल्या कपड्यांतच मी बसलें, तर मला सर्दी होईल, पण तिला तें खरेंच वाटत नाहीं. मी तिला म्हटलें विचार शाळेंतल्या डॉक्टरांना. अर्थात् माझ्या आजीला हें सारें कसें समजणार? ती मुळींच कधीं शाळेंत गेली नाहीं. तिला हें कधीं समजावयाचेंच नाहीं!

"डॉक्टर, माझे वडील सिगरेट फारच ओढतात हो. काय करावं बरं याला?" एका चौथींतल्या मुलानें डॉक्टरांना एकदां प्रश्न केला. "तंबाखू ओढण्याचे किती वाईट परिणाम होतात, हें आजच मी शाळेंतील पाठाच्या तासास शिकलों. मला तें आधींच माहित होतें. आमच्या पायोनिअर दलांत कोणीच सिगरेट पीत नाहीं. पण आतां मला त्याचें कारण समजलें. मी आज वडिलांशीं बोलणार आहें. पण कसें सांगितलें म्हणजे त्यांचें हें व्यसन सुटेल?"

"तूं असं कर. आपलें शास्त्रीय ज्ञानाचें पुस्तक त्यांना तूं दाखव, आणि शिक्षकांनीं जें तुम्हांस सांगितलें तें त्यांना सांग. तसंच खूप तंबाखू ओढणारांचीं फुफ्फुसं कशीं होतात, याचीं हीं चित्रं त्यांना दाखव. उद्यांपर्यंत तुला तीं घरीं ठेवण्यास परवानगी आहे." डॉक्टर म्हणाले.

सिडनेला आपल्या वडिलांची समजूत घालणें फार कठिण झालें असेल; पण एवढी मात्र मला खात्री आहे कीं मोठा झाल्यावर तो कधींच धूम्रपान करणार नाहीं.

प्रकृति निरोगी व निकोप राखण्यासाठीं खेळ व विविध व्यायाम यांवर विशेष भर देण्यांत येतो. शाळेच्या वेळापत्रकांतील व्यायामाचा तास म्हणजे शाळेच्या वेळानंतरच्या विविध कार्यक्रमांची नुसती प्रस्तावनाच होय. आमच्या क्रीडाविभागांत अनेक पोटमंडळें असत. पोहणें, कुस्ती खेळणें, झाडावर चढणें, बर्फावर घसरणें इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या व्यायामासाठीं त्यांनीं आपणांस वाहून घेतलेलें असे. "श्रम करण्यास आणि स्वरक्षणास सिद्ध असा," असें ब्रीदवाक्य असलेलें एक विजयचिह्न युवक-विभागाकरितां ठेवलेलें होतें. त्यासाठीं होणाऱ्या चढाओढींत सर्व प्रकारच्या शारीरिक खेळांचा अंतर्भाव होत असे. आमच्या शाळेंतील बरींच मुलें त्यांसाठीं तयारी करीत होतीं.

व्यायामविभागांतील उत्साही युवक हिंवाळ्यांत बंदिस्त तलावांतून पोहत. उन्हाळ्यांत मॉस्को नदीवर ठिकठिकाणीं बांधलेल्या घाटावर ते जात. स्केटर्सची सोय मुद्दाम करावी लागत नसे. बर्फ पडलें कीं, आपोआपच त्यांची सोय होई. झाडांवर चढण्याच्यासाठीं सार्वजनिक उद्यानांत कांहीं जागा राखून ठेवल्या होत्या, तेथें विद्यार्थी सुटीचा दिवस घालवीत. उन्हाळ्यांत मुलें शाळेच्या क्रीडांगणावर व्हॉलीबॉल खेळत. त्याचप्रमाणें पोहणें, धांवणें, उड्या मारणें अशा तऱ्हेच्या शरीरसंवर्धनाच्या गोष्टींत वेळ घालवीत. बहुतेक वरच्या वर्गांतलीं सर्व मुलें आपलें क्रीडानैपुण्यदर्शक पदक आपल्या जाकिटावर मोठ्या अभिमानानें लावीत. मुलें आणि मुली यांच्या शारीरिक नैपुण्याच्या कसोट्या या वेगवेगळ्या आंखलेल्या होत्या. इतर खेळांत मात्र मुलें-मुली सारखाच भाग घेत.

उन्हाळी शिबिरें आणि आरोग्यकेंद्रें हीं आरोग्यविभाग मंत्र्यांच्या खास देखरेखीखालीं असत. या केंद्रांचा मुख्य अधिकारी एक डॉक्टर असून सर्व व्यवस्थेच्या बाबतींत त्याचा शब्द म्हणजे अंतिम निर्णय असे. विद्यार्थ्यांना जास्तींत जास्त विश्रांति ज्या तऱ्हेनें मिळेल, पुढील वर्षासाठीं भरपूर उत्साहशक्तीचा संचय करण्याची संधि लाभेल आणि प्रकृति निकोप राहील, अशी दृष्टि बाळगून सुटीचे कार्यक्रम आंखले जात.

१९३७ मध्यें काळ्या समुद्रावरील ॲनापा येथें मी सुटींत गेलें असतांना मुलांसाठीं आरोग्यकेंद्रें कशीं चालविलीं जातात, हें बघण्याची मला उत्कृष्ट संधि मिळाली. आजारी विद्यार्थ्यांसाठींच हीं आरोग्यकेंद्रें चालविण्यांत

येतात असें नव्हे, तर अशक्त व नाजुक प्रकृतीच्या मुलांना विश्रांति व विशेष औषधयोजना यांच्या द्वारा आपल्या पायांवर उभे करण्यासाठीं त्यांचा उपयोग होई. ॲनापा हें एक मोठेंच बालककेंद्र आहे आणि तेथील डोंगर, टेकड्या नि किनारा हे नेहमींच अर्धविजार, अर्ध्या बाह्यांचा शर्ट, डोक्यांवर लोंकरीची टोपी व पायांत सुटसुटीत सँडल्स अशा वेषांत असणाऱ्या मुलांनीं गजबजलेले असतात.

किनाऱ्याचा बराच मोठा भाग बालकसंघटनासाठींच राखून ठेवण्यांत आला आहे. तेथें ते स्नान करतात, सूर्यस्नान करतात आणि उरल्या वेळांत वाळूचे किल्ले बांधतात. बहुतेक सारीं मुलें तजेलदार, गुबगुबीत व रंगानें तांबुस दिसलीं. मीं अशीं शेंकडों मुलें पाहिलीं. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून तीं सगळीं मोठ्या आनंदांत व सुखांत असावींत असें दिसलें. जरी त्यांचा दिवसाचा कार्यक्रम काटेकोर रीतीनें आंखला जात असे, तरी त्यांना मोकळेपणें खेळण्यास मुबलक वेळ मिळेल अशी तरतूद त्यांत केलेली असे.

तीन ते चार वर्षांच्या अर्भकांसाठीं स्वतंत्र विश्रांतिगृहें आहेत. हीं लहानगीं बालकें हातांत हात घालून आपल्या बोबड्या आवाजांत गाणीं गात गात, रमत गमत विविध रंगांचे झगे पेहरलेल्या तरुणींच्या देखरेखीखालीं किनाऱ्याकडे जातांना तेथें नेहमींच पाहावयास मिळत.

आपापल्या बालकांच्या संगोपनांतील आपला वांटा आपण उचलावा अशी सोव्हिएटमधील पालकांकडून अपेक्षा केली जाते खरी; पण त्यांच्या प्रकृति-स्वास्थ्याच्या बाबतींत केवळ पालकांवर भिस्त ठेवण्यांत येत नाहीं. प्रत्येक बालकमंदिरांत, तज्ज्ञ डॉक्टर असतच इतकेंच नव्हे तर पायोनिअरदलाचें केंद्र, बालकनगर, संस्कृति-उद्यान, विश्रांतिगृहें इत्यादि साऱ्या ठिकाणीं देखरेखी-साठीं डॉक्टरांची कायम नेमणूक केली जाई. हे सर्व डॉक्टर व परिचारिका, वर्गशिक्षक आणि व्यायामशिक्षक यांच्या सहकार्यानें कामें करीत. त्यामुळें अभ्यासाइतकीच आरोग्याच्या बाबतींतहि मुलांची प्रगति सुरक्षित असल्याचा सर्वांस विश्वास वाटे.

## ४ शिक्षकांच्या जगांत

१९३४ च्या सप्टेंबरमध्यें वरच्या वर्गाचें गणित शिकविण्याचें काम मजकडे आलें. या वेळीं माझा तिसरीचा वर्ग चवथीचा झाला होता. पण आतां त्यावर स्वतंत्र विषय-शिक्षकांच्या नेमणुकी झाल्या. तरी पण त्या विद्यार्थ्यांना सर्व शालेय जीवनांत मार्गदर्शन करण्याचें काम मजकडेच राहिलें.

इयत्ता ४ ते ७ मधील अध्यापनामुळें शाळेच्या सर्व विभागांतील विद्यार्थ्यांशीं परिचित होण्याची संधि मला मिळून माझें अनुभवाचें क्षेत्र व्यापक झालें. माझाच विषय पुनरपि मला शिकविण्यास मिळाल्याचा मला आनंद झाला. पण मी गतवर्षीं संपादिलेला अनुभव इतका बिनमोल होता कीं, त्यासाठीं मी हा आनंदहि एक वेळ गमावण्यास तयार झालें असतें.

या सहामाहीच्या सुरवातीस माझ्या एका भूमितीच्या तासास हॉलंड व शाळा-तपासनीस अशा दोघी येऊन बसल्या. पाठीमागच्या बाकावर बसून त्या टिपणें करूं लागल्या. हॉलंडबाई, पालक, तपासनीस किंवा मुख्याध्यापिका यांच्या या अशा भेटी नित्याच्या असल्यानें विद्यार्थ्यांनीं अथवा मी त्यांजकडे लक्ष्य दिलें नाहीं. तासाच्या अखेरीस तपासनीस मजकडे येऊन त्यांनीं चर्चेस आरंभ केला. सर्वसाधारण संभाषण करण्याइतकें रशियन मला आतां येत असल्यानें मी त्यांच्याशीं सहज बोलूं शकलें.

"तुमचा पाठ मला फार आवडला," त्या म्हणाल्या. "सर्वांना सहज समजेल

अशा तऱ्हेनें तुम्ही आपल्या विषयाची मांडणी करूं शकतां. पण तुमची व आमची मांडणी यांत जरा फरक आहे. मला वाटतें, गणित विषयाच्या शिक्षकांसाठीं चालविलेल्या वर्गांना जातां येण्याइतकें रशियन तुम्हांस येत आहे. तुमची तयारी असेल तर पाहा. हॉलंडबाई तुम्हाला सविस्तर माहिती सांगतील. मीहि जिल्हा अध्यापनशास्त्रकेंद्राला फोन करून तुमच्या पद्धतीची माहिती देईन. तिथल्या गणिताच्या अध्यापकांना त्यामुळें खचित आनंद वाटेल. भेटूं या पुनः आपण," असें म्हणून अभिवादन करून त्या निघून गेल्या.

आणि अशा तऱ्हेनें मॉस्कोंतील शैक्षणिक जगाशीं माझा खराखुरा संबंध येऊं लागला. एक वर्षापूर्वी रशियनभाषेचें माझें ज्ञानच इतकें तोडकें-मोडकें होतें, कीं एकटीच्या जिवावर सभा-व्याख्यानांस जाणें मला शक्यच नव्हतें. मजबरोबर माझी दुभाषी असे अथवा सभेच्या वेळीं माझ्या शेजारीं बसून मला कोणी तरी भाषांतर करून सांगे; पण त्यामुळें इतर शिक्षकांशीं मला खरें संभाषण करतां येत नसे अथवा सभेंतील चर्चेचें मर्म मला ग्रहण करतां येत नसे.

आमच्या तपासनीसबाईनीं अध्यापन केंद्रास फोन केल्याचें लवकरच माझ्या अनुभवास आलें. कारण थोड्याच वेळानें गणित-विषयाचे तपासनीस माझ्या वर्गांत उपस्थित झाले. माझा अंकगणिताचा पाठ संपतांच त्यांनीं विचारलें, "इंग्लंडमध्यें गणित शिकविण्याची पद्धति कोणती आणि येथें तुम्ही कोणत्या पद्धतीनें शिकवतां याबद्दल गणिताच्या शिक्षकांस तुम्ही कांहीं माहिती द्याल का?" मीं सांगितलें, "माझ्या मोडक्यातोडक्या रशियन-मध्यें त्यांची ऐकून घेण्याची तयारी असेल तर माझी कांहींच हरकत नाहीं. उलट मला आनंदच होईल." शेवटीं असें ठरलें कीं, इंग्लिश चांगलें येत असलेल्या आमच्या एका शिक्षिकेनें मजबरोबर यावें आणि माझ्या इंग्लिश भाषणाचा रशियनमध्यें अनुवाद तिनें करून सांगावा; आणि वादविवादांत मात्र मीं स्वतः भाग घ्यावा.

तपासनिसांशीं झालेल्या अधिक संभाषणावरून मला समजलें कीं, गणित विषयाचे वर्ग ते स्वतः चालवीत. इकडे पाठ्यपद्धतीचें विवेचन उत्कृष्ट शिक्षक करतात आणि नवशिक्या, कमी अनुभवी शिक्षकांस आपल्या ज्ञानाचा फायदा देतात. अभ्यासक्रमांतील कांहीं कठीण स्थळें असलीं किंवा पाठ्य-

पद्धतींत अडचणी असल्या तर चर्चा करून त्यांचें निराकरण करण्याची येथील पद्धति आहे.

तपासनीस मला म्हणाले, " आमचें ध्येय असें आहे कीं, प्रत्येक मुलाला विषयाचें उत्कृष्ट ज्ञान असलें पाहिजे. कमींतकमी ज्ञान मिळवून काठावर उत्तीर्ण होऊन परीक्षेंतून विद्यार्थी निसटला कीं झालें, ही इतर देशांतील विचार-सरणी आम्हांस मान्य नाहीं. प्रत्येक विद्यार्थ्याला जास्तींत जास्त ज्ञान मिळून तो उत्कृष्ट नागरिक व्हावा अशी आमची इच्छा आहे. यासाठीं अध्यापनाचें तंत्र आणि उत्कृष्ट पाठ्यपद्धति प्रत्येक शिक्षकानें आत्मसात् कराव्या यासाठीं शिक्षकांना आम्ही साहाय्य करण्याची पराकाष्ठा करतों. मी शाळांना वरचेवर भेटी देतों. तेथील पाठ पाहतों. आमच्या जिल्ह्यांत एकंदर तीस शाळा आहेत. तेथील गणिताच्या अध्यापनाच्या पद्धतींसंबंधीं मला यथातथ्य ज्ञान आहे. शिक्षक एकमेकांना भेटतात, एकाद्या शाळेंतील शिक्षक नमुना पाठ घेतात. इतर शाळेंतील शिक्षक त्यास उपस्थित असतात. यासाठीं शिक्षकांना वरचेवर– वर्षांतून अनेक वेळीं– मोकळा वेळ देण्याची मुख्याध्यापिका कोशिस करतात. तुमची हरकत नसेल तर तुमच्या पाठाचें अवलोकन करण्याची मी पुष्कळ शिक्षकांना शिफारस करीन. अर्थात् साऱ्यांनाच इंग्लिश येत नसणार, पण आपला विषयच असा आहे कीं त्यांत भाषेची इतकीशी आडकाठी नसते."

ठरल्याप्रमाणें माझें भाषण झालें. त्या सभेस एकंदरीनें खूपच रंग भरला. त्यानंतर झालेल्या चर्चेवरून हे शिक्षक आपापल्या विषयांत किती लक्ष्य घालतात याची मला कल्पना आली. गणितांतील कोणत्या प्रकारच्या उदाहरणांना किती वेळ द्यावा, कोणत्या प्रकारच्या उदाहरणांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीस चालना देण्यास आणि ती वाढविण्यांत होईल याचाच प्रामुख्यानें तेथें विचार झाला.

सभेच्या सर्व वृत्तांताचें काळजीपूर्वक टिपण करण्यांत आलें आणि त्याच्या टंकलिखित प्रती काढण्यासाठीं तें पाठविण्यांत आलें. जिल्हा–अध्यापनशास्त्र-केंद्रांत गणित विषयाच्या विभागांत शिक्षकांच्या वाचनाकरितां त्याचा उपयोग व्हावयाचा होता.

अशा तऱ्हेनें गणित विषयाचें अध्यापन करणाऱ्या सहकाऱ्यांशीं माझे संबंध

जोडले गेले. अध्यापनपद्धतीसंबंधीं मीं नवीन कल्पना संपादन केल्या. याच तऱ्हेनें आमच्या शाळेंतील त्या त्या विषयांचे शिक्षक आपल्या समव्यवसायिकांशीं जोडले गेले होते.

जिल्हा अध्यापनशास्त्र केंद्रास मी प्रथम गेलें, ती आमच्या शाळेंतील प्राणिशास्त्राची शिक्षिका एडमंड्स हिच्या समवेत. माझ्यानंतर थोड्याच दिवसांनीं ती आमच्या शाळेंत दाखल झाली होती आणि अध्यापनाचा तिला विशेषसा अनुभवहि नव्हता.

आमच्या शाळेपासून साधारण पंधरा मिनिटांच्या अंतरावर हें केंद्र होतें. ज्या इमारतींत एज्युकेशन बोर्डाची कचेरी होती, त्याच इमारतीच्या शेवटच्या मजल्यावर त्याची जागा होती. ऑफिसच्या जागेंत पुष्कळशा हवेशीर खोल्या होत्या. एक एक किंवा दोन विषयांसाठीं एकेका खोलीचा उपयोग होई. प्रत्येक खोलींत शिक्षकांनीं किंवा मुलांनीं बनविलेल्या शैक्षणिक वस्तूंचे उत्कृष्ट नमुने, पाठ्य-पुस्तकें, विविध मासिकें व वर्तमानपत्रें, आदर्श पाठांचें अक्षरशः घेतलेलें इतिवृत्त, नवीन उपकरणीं, थोडक्यांत त्या त्या विषयाला लागणारें सर्व साहित्य व्यवस्थित मांडलेलें होतें. त्यांतील तज्ज्ञ खोलीच्या एका बाजूस बसलेला असे आणि त्यासभोंवती इतर शिक्षक बसलेले असत. इतर शिक्षक टेबलाशीं बसून टंकलिखित कागदावरून पाहिजे त्या माहितीचीं टांचणें करून घेत.

एडमंड्स व मी प्रथम निसर्ग विभागाच्या खोलीकडे वळलों. वनस्पतिशास्त्रासंबंधीं अध्यापन कसें करावें याविषयीं तिच्या निरनिराळ्या कल्पना होत्या. रशियन शाळेंतील पांचव्या यत्तेंतील विद्यार्थ्यांनीं केलेले घडीचे कांहीं सुंदर नमुने तिजजवळ होते. त्या नमुन्यावरून फुलांच्या रचनेची संपूर्ण कल्पना येई. पांचव्या यत्तेच्या अभ्यासक्रमांत असे नमुने बनविण्याच्या कामाचा अंतर्भाव करावयाचें तिनें ठरविलें होतें.

"प्रत्यक्ष निरीक्षणानें फुलाचें ज्ञान करून घेतल्यावर, त्यांची रचना मनावर ठसविण्यास या नमुन्याचा उपयोग होईल," ती म्हणाली.

तेथील तज्ज्ञांची आम्हीं भेट घेतली. त्या बाई आमच्या शाळेंत पूर्वी अनेक वेळां आल्या होत्या. त्या म्हणाल्या, "प्रत्यक्ष वस्तूंच्या अभ्यासाची जागा नमुने किंवा चित्रें घेऊं शकत नाहींत. वनस्पति-उद्यानांतून तुम्ही वस्तु आणवितां हें

अगदीं योग्य आहे. ज्या वस्तूंचा अभ्यास करावयाचा त्या वस्तू विद्यार्थ्यांनीं डोळ्यांनीं पाहणें व हाताळणें ह्याला अत्यंत महत्त्व आहे. नाहीं तर त्या विषयाची जीवनापासून फारकत होईल आणि त्याला रुक्षता येईल."

नंतर आम्ही गणितविषयाकडे वळलों. माझ्या तपासनीसबाई कांहीं शिक्षकांशीं बोलण्यांत गढून गेल्या होत्या. त्यांची सल्लामसलत घेण्यासाठीं ते सारे तेथें जमले होते.

सर्व शिक्षकांना एकत्र आणून परस्परांच्या अनुभवांची देवघेव करवावयाची आणि सर्वांना शैक्षणिक आघाडीवरील अद्ययावत् ज्ञानाशीं परिचित ठेवावयाचें या उद्देशानें आंखलेल्या या अभिनव व्यवस्थेविषयीं आम्ही परत येतांना बरेच बोललों. आमच्या जवळ तेथील सभांच्या कार्यक्रमपत्रिका होत्याच. वरचेवर या केंद्रांत येऊन आपलें ज्ञान अद्ययावत् राखण्याचा आम्हीं मनाशीं निश्चय केला.

प्रत्येक सहामाहीच्या अखेरीस सर्व शैक्षणिक कार्यकर्त्यांची (शिक्षक, मुख्याध्यापक आणि एज्युकेशन बोर्डाचे अधिकारी) सहामाहींतील कार्याचा आढावा घेण्यासाठीं त्या त्या जिल्ह्यांत एक परिषद् भरे.

परिषदेला सुरवात बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या मुख्य अधिकाऱ्याच्या इतिवृत्तानें होई. त्यांत जिल्ह्यांतील उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचें प्रमाण याविषयीं तपशीलवार आंकडे, उत्कृष्ट दर्जा संपादणाऱ्या आणि सांभाळणाऱ्या शाळांचे उल्लेख, तसेंच निकृष्ट कामामुळें ज्यांच्या निकालाचें प्रमाण खालीं येत आहे अशा शाळांचे उल्लेख इत्यादि माहिती सविस्तरपणें असे.

त्यानंतर जिल्ह्यांतील उत्कृष्ट शाळांपैकीं एखाद्या शाळेचे मुख्याध्यापक अथवा एखादे नाणावलेले शिक्षक त्यांच्या शाळेचा दर्जा उंचावला तो कोणत्या कार्यपद्धतीमुळें, त्यांना अडचणी कोणत्या येत गेल्या, त्यांचा निरास कसा केला इत्यादि गोष्टी उदाहरणांनीं विशद करीत.

चर्चेला सुरवात झाली कीं, पुष्कळ मुख्याध्यापक नि शिक्षक त्यांत भाग घेत. ते बोर्डावर, तपासनिसावर सर्वांवर टीका करीत. थोडक्यांत जिल्ह्यांतील शिक्षणपद्धतींत जो जो दोष आढळे त्यावर ते टीकास्त्र चालवीत.

आमच्या पहिल्या परिषदेंतील उपाहाराचे प्रसंगीं या प्रचंड टीकेनें आपण तर कसें गांगरून गेलों, हें मीं सांगितलें. "या टीकेनें एज्युकेशन बोर्डाचे

मुख्याधिकारी तर बावरूनच जातील कीं!" मीं माझी शंका व्यक्त केली. टीका हें सुधारणा करण्याचें एक साधन आहे हें आतां मी समजूं शकलें, तरी पण..."

"तुम्ही अगदींच भांबावला कीं!" हंसत हंसत आमची मुख्याध्यापिका तेथें येऊन म्हणाली.

"थोडेसें तसेंच," मींहि कबूल केलें.

"त्यांत कांहीं विशेष नाहीं. हाच एक सुधारण्याचा मार्ग आहे. यांत कोणी मनाला लावून घेण्यासारखें किंवा अपमान वाटण्यासारखें कांहींच नाहीं. या टीकेंत वैयक्तिक भाग कांहींच नसतो. तुम्ही जर तुमच्या या गोंधळाचें बारकाईनें पृथक्करण कराल तर तुम्हांला असें आढळेल, कीं तुमचें ज्या पद्धतीनें शिक्षण झालें, त्याचा हा परिणाम आहे. त्या पद्धतीमुळें अभिमानाच्या भलत्याच कल्पना बनल्या जातात. जर मित्रत्वाच्या भावनेनें टीका केली गेली तर त्यांत मनाला लागण्यासारखें काय आहे? तसें लागत असेल तर टीकेला जागाच मिळूं न देण्याची प्रत्येकानें खबरदारी घ्यावी. तुम्हांला दिसेलच कीं बोर्डाचे अधिकारी देखील समारोप करतांना ज्या वृत्तीनें टीका केली त्याच वृत्तीनें त्या टीकेचा स्वीकार करतील."

तिचें म्हणणें खरें ठरलें. समारोपाच्या वेळीं ती सर्व टीका विचारांत घेण्यांत आली; आणि तींतील बराचसा भाग ग्राह्य म्हणून स्वीकारण्यांत आला. पुढील सहामाहीसाठीं आंखलेली योजना मूर्त स्वरूपाची होती. आपला सारा वेळ कारणीं लागला, याबद्दल समाधान मानीत आम्ही घरीं गेलों.

त्या सायंकाळीं शिक्षकांसाठीं असलेल्या क्रीडा-मंडळांत जाण्याकरितां आम्हांला तिकिटें देण्यांत आलीं होतीं. बरेच फेरफार होऊन तें मंडळ आतां फिरून सुरू झालें होतें. प्रत्येक जिल्ह्यास शिक्षकांचें एखादें मंडळ असेच, पण हें मंडळ सर्व मॉस्कोसाठीं होतें. इमारत मोठी सुंदर व भव्य होती. एका मोठ्या दिवाणखान्यांत ६०० माणसें बसतील अशी व्यवस्था होती. लहान दिवाणखाना तेथील झुळझुळत्या हिरव्यागार पडद्यामुळें नृत्यास योग्य असाच होता. तेथें ग्रंथालय, वाचनालय यांची सोय असून विश्रांतीसाठींहि लहान लहान जागा होत्याच. त्या खोल्यांतून आरामखुर्च्या, रेडिओ आणि ग्रामोफोन ठेवलेले

होतें. अगदीं वरच्या मजल्यावर एक उपाहार-गृह असून मध्यरात्रीपर्यंत येथें जेवण मिळण्याची व्यवस्था होती.

आम्हीं गेलों त्या दिवशीं तेथें एका सुंदर जलशाचा कार्यक्रम होता. सोव्हिएट संघाच्या उत्कृष्ट गवयांपैकीं एक ताफा बोलविण्यांत आला होता. शिवाय चेकॉव्हाच्या गोष्टी म्हणून दाखविणारा नटवर्गहि तेथें हजर होता. त्यानंतर नृत्याचा कार्यक्रम होता.

शिक्षकांचें क्रीडामंडळ म्हणजे केवळ करमणुकीचेंच ठिकाण नसून तें एक सांस्कृतिक केंद्रही होतें. आपापल्या हौशीप्रमाणें नाट्य, संगीत,नृत्य किंवा इतर खेळ यांपैकीं कोणत्याही विभागांत शिक्षकाला जातां येई, किंवा भाषामंडळाचा सभासद होऊन नवीन भाषा शिकतां येत; अथवा शैक्षणिक इतिहासावर, व्याख्यानें ऐकतां येत. सर्व तिकिटें विनामूल्य मिळत आणि स्थानिक कामगार संघामार्फत तीं वांटण्यांत येत. तेथील उपस्थितीवरून पाहतां हीं क्रीडामंडळें अतिशय लोकप्रिय असल्याचें दिसलें. तेथील कार्यक्रमांवर मधून मधून भरणाऱ्या सभांतून चर्चा होई, आणि पुढें येणाऱ्या टीकांचा व सूचनांचा व्यवस्थापक योग्य तो विचार करीत.

शिक्षकांची मासिक सभा म्हणजे सर्व अडचणींचा निरास होण्याचें स्थळ होतें. आमच्या कामाचा दर्जा वाढविण्याचें तें एक उत्कृष्ट साधन होतें. सभेच्या आरंभीं मुख्याध्यापक अथवा पर्यवेक्षक आपला अहवाल वाचीत. त्यांत झालेली प्रगति अथवा राहिलेल्या उणिवा यांचा नामनिर्देश असे. त्यानंतर त्या महिन्यांत झालेल्या आपल्या प्रगतीचा आढावा शिक्षक मांडीत व मागाहून सर्वसाधारण चर्चा होई.

एकमेकांच्या तासास अधून मधून जावयाचें आणि वर्गांत पाठीमागल्या बाकांवर वह्यांचे गठ्ठे किंवा इतर काम घेऊन बसावयाचें, असा साऱ्याच शिक्षकांचा परिपाठ असल्यानें सर्व शाळेच्या कामकाजाचें त्यांस ज्ञान असे. ते केवळ स्वतःच्याच विषयांत लक्ष्य घालीत असें नसून इतरांच्याही पाठांत लक्ष्य घालीत. स्वतःच्या यशाइतकीच इतरांच्या यशाचीही त्यांना चिंता असे आणि सर्व शाळेची सर्वांगीण उन्नति व्हावी यासाठीं ते झटत. वर्गाचे सल्लागार म्हणून जे शिक्षक असत त्यांना तर इतरांच्या तासास जाण्यांत अधिकच उत्साह वाटे; कारण आपल्या वर्गांतील प्रत्येक विद्यार्थ्याची प्रगति कशी होत आहे

याकडे त्यांचें लक्ष्य असे. त्यामुळें प्रत्यकजण चर्चेंत अहमहमिकेनें भाग घेई. आम्हांला आमच्या शाळेस सर्व जिल्ह्यांत महत्त्वाचें स्थान मिळवून द्यावयाचें होतें आणि शक्य तर लालध्वजाचा मानही मिळवावयाचा होता.

१९३६ च्या हिंवाळी सहामाहींत सुरवाती सुरवातीस झालेली शिक्षक-सभा एक नमुनेदार उदाहरण होती. आमच्या शिक्षकवर्गांत बरेच फेरबदल झाले होते. त्यामुळें शिस्तीचा प्रश्न तीव्र मतभेदाचा झाला होता. तोच चर्चेसाठीं पुढें आला.

आमचे इंग्लिशचे शिक्षक कॉ. यंग ह्यांनीं त्या प्रश्नास चालना दिली. ते म्हणाले, "आपलें अभ्यासाचें एकंदर मान कमी झालें आहे. शिक्षकांत झालेला बदल हा त्यास अंशतः कारणीभूत आहे. प्रत्येकजण आपापल्या परीनें वेगवेगळ्या अपेक्षा मुलांकडून करितात. त्यामुळें वरच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांत शिस्तीचें प्रमाण कमी झालें आहे. कॉ. एडमंड्स पुनः आळशी बनूं लागली आहे. गतवर्षी तिचा वर्ग चांगलाच सुधारला होता. त्यमुळें जूनमध्यें तिचे निकालही चांगले होते. कॉ. इव्हॅनोव्हनें इतर वर्गांत जाऊन आपल्याशीं मुलें वागतात त्याहून किती वेगळ्या तऱ्हेनें तीं इतरांशीं वागतात हें नीट समजावून द्यावें. आपण एकदां सगळ्याच गोष्टींची मोकळेपणें चर्चा करूं या. शिक्षक समजावून सांगत असतां कोणीहि बोलतां कामा नये; ज्यांना बोलावयाचें असेल त्यांनीं हात वर केला पाहिजे. हे दोन नियम पाळायला कांहींच अक्कल लागत नाहीं. विद्यार्थ्यांना ते समजतात. त्यांचें पालन झाल्याशिवाय आपण पुढेंच जाऊं शकत नाहीं."

कॉ. इव्हॅनोव्ह ही आमची एक नवीन रशियन शिक्षिका होती. ती इंग्लिश सफाईदार बोले. तिनें आपली चूक कबूल केली. पण ती म्हणाली कीं, मुलांचा उत्साहच इतका दांडगा आहे कीं त्यांना अडविणें माझ्या जिवावर येतें.

"त्यांना भूगोलाची पण तशीच आवड आहे," कॉ. रोजर्स म्हणाली, "म्हणून ते कांहीं आरडाओरड नि गोंधळ कधीं करीत नाहींत. मीं प्रथम शिकवायला सुरवात केली तेव्हां त्यांनीं तसा प्रयोग माझ्याही तासाला केला. पण त्यांना मीं स्पष्ट बजावलें कीं आपल्याला संपवावयाचा अभ्यास पुष्कळ आहे आणि एकही क्षण वायां दवडून आपणास चालणार नाहीं. आतां मुलांना चांगलें वळण लागलें आहे आणि ते चांगला अभ्यास करितात."

"होय, हेंच बरोबर आहे," आमच्या मुख्याध्यापिका शांतपणें म्हणाल्या. "आम्हांला लहान बंडखोर तयार करावयाचे नाहींत. आम्हांला मुलांच्या जीवनाला उत्कृष्ट वळण लावावयाचें आहे. त्यासाठीं चांगल्या संवयी त्यांच्या अंगीं बाणाव्या म्हणून आम्ही यत्न करीत आहोंत; आम्हांला नुसते विषय शिकवावयाचे नाहींत. कॉ. इव्हॅनोव्हची चूक होते आहे ती हीच. मुलांना त्या विषयाची गोडी आहे यांत शंकाच नाहीं. पण तो खरा मुद्दा नव्हे. त्यांच्या मनांत शिक्षकांविषयीं आदर असला पाहिजे. त्यांनीं एकमेकांस मान दिला पाहिजे. आणि ह्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या आचरणांत सुसंस्कृतपणा दिसला पाहिजे. आपण अभ्यास कां करावयाचा हें जरी आपल्या मुलांना माहीत असलें, आणि आपल्याला उत्कृष्ट शिक्षण मिळावें अशी त्यांना हौस असली तरी तीं अद्याप मुलेंच आहेत, आणि त्यांना सर्व शालेय जीवनांत मार्गदर्शनाची गरज असतेच, ही गोष्ट आपण दृष्टिआड करून चालणार नाहीं.

या सभांमुळें आम्हांस जो मुख्य लाभ होई तो मोकळ्या टीका-प्रतिटीकांनीं. ही टीका वैयक्तिक स्वरूपाची कधींच नसे. एकदां खोटा अभिमान गळाला कीं तिचें महत्त्व सर्वांस समजून येई. या खोट्या अभिमानामुळेंच आपलें दोष-दिग्दर्शन चार चौघांत झाल्याचा मनुष्याला राग येतो, भावना दुखवल्या-सारख्या वाटतात. पण आमची टीका आपुलकीच्या भावनेनें केलेली असल्यानें ती आमच्या प्रगतीस उपकारक ठरे. स्वाभिमानांतूनच आपण कांहीं तरी साधावें आणि टीका टाळावी, अशी प्रेरणा मिळे. अर्थात् मजवर टीका झाली तर ती मला आवडेल असें निश्चयानें सांगतां येत नाहा. पण मीं स्वतःशीं विचार करून अखेर निष्कर्ष काढला कीं, आपल्यांत जे काय दोष असतील—मग ते कितीहि क्षुल्लक असेनात—ते उघडकीस आणण्याचा व स्वतःची सुधारणा करण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

क्षुल्लक स्वरूपाच्या गोष्टीवर साधारणपणें आपापसांतच चर्चा होई. पण जेव्हां त्याला कांहींच यश येत नसे किंवा त्याचा परिणाम फारच थोडा होई, त्या वेळीं अथवा तो प्रश्न सर्वांच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे असें वाटे, तेव्हांच तो सभेपुढें ठेवण्यांत येई.

वर्षअखेर शिक्षकांची सर्वसाधारण सभा भरे. त्यांत एकंदर निकालांचा विचार होई आणि आमच्यांत 'उत्कृष्ट' कार्यकर्ते असतील त्यांची निवड

करण्यांत येई. शिक्षकाला 'उत्कृष्टते'चें प्रशस्ति-पत्रक मिळण्यास त्याच्या वर्गांत सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असले पाहिजेत. कांहीं ठराविक संख्येपेक्षां अधिक विद्यार्थ्यांना 'बरा' असा शेरा असतां कामा नये; आणि बहुसंख्य विद्यार्थी 'उत्कृष्ट' श्रेणींत आले असले पाहिजेत. यांशिवाय त्या वर्गाचीं गुणपत्रकें, उपस्थितिपत्रकें, आंखलेल्या योजना इ. दप्तर उत्कृष्ट रीतीनें सांभाळून ठेवलेलें असलें पाहिजे. त्या शिक्षकानें शाळेच्या सामुदायिक जीवनांत भाग घेऊन आपली छाप सर्वत्र बसविली असली, त्याच्या अस्तित्वाचा ठसा सर्वत्र उमटलेला असला म्हणजेच त्या शिक्षकास उत्तम कार्यकर्ता म्हणून मान मिळे.

दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस माझ्या वर्गाचे निकाल खूपच छान लागले. आमच्या वर्गांत अनुत्तीर्ण विद्यार्थी फारसे नव्हतेच. जे होते तेहि ऑगस्टच्या पुनःपरीक्षेंत उत्तीर्ण होतील अशी आम्हांस आशा होती. आमच्या वर्गाला तीन चांगले शिक्षक लाभले होते. आमचे निकाल चांगले असल्यानें माझी बढतीसाठीं मॉस्कोच्या शिक्षणखात्याकडे शिफारस झाली आणि दोघांना शाळेंनेंच बढती दिली.

कांहीं दिवसांनंतर आमच्या मुख्याध्यापिका, कामगार-संघटनेच्या अध्यक्ष आणि मी, अशा तिघींस ऑपेरा हौसमधील एका मोठ्या सभेचीं निमंत्रणें आलीं. सभागृहांत 'आमच्या उत्कृष्ट शिक्षकांचें स्वागत असो', 'स्टॅलिन चिरायु होवो' असे मोठमोठे फलक लावून ते सुशोभित करण्यांत आले होते. बँडमधून निघणारे सुस्वर सूरहि आमचें स्वागत करीत होते. उत्फुल्ल चित्तानें आम्ही आमच्या आसनांवर विराजमान झालों.

मॉस्को शिक्षणसमितीच्या अध्यक्षांच्या हस्तें कामकाजास सुरुवात झाली. वर्षांतील कामाचें इतिवृत्त तिनें थोडक्यांत निवेदन केलें आणि सांगितलें कीं सन्मानासाठीं यंदां आम्ही साठ शिक्षकांची निवड केली आहे. तिनें भराभरा शिक्षकांचीं व त्यांच्या शाळांचीं नांवें वाचण्यास सुरुवात केली. सभामंचकावर एकामागून एक शिक्षक जाऊन सुंदर कातडी पिशव्यांतून त्यांना देण्यांत येणारीं प्रशस्तिपत्रकें स्वीकारीत होते. त्यांना आणखी पारितोषिक काय मिळणार हें ऐकण्यासाठीं आम्ही कान टवकारून ऐकत

होतों. या पारितोषिकांत सोनेरी घड्याळें, फर्निचर, पुस्तकें इ. सर्व प्रकारच्या वस्तूंचा अंतर्भाव होता. बक्षिसांची किंमत पांचशें रूबलपर्यंत होती.

इतक्यांत मला विजेचा धक्का बसल्यासारखें झालें. माझें नांव पुकारलें गेलें होतें. त्याबरोबर शाळेचा क्रमांक व नांव उच्चारलें असल्यानें तर शंकेस जागाच नव्हती. माझ्या मैत्रिणीनें मला जागेवरून जवळजवळ ढकलूनच उठविलें. मी भ्रांत स्थितींतच अध्यक्षांच्या खुर्चीकडे गेलें. इतका हा सर्व प्रकार अनपेक्षित होता. अध्यक्षांनीं माझ्या हातीं तें सुंदर प्रशस्तिपत्र दिलें आणि मोठ्या प्रेमानें हस्तांदोलन केलें. मलाहि पांचशें रूबल पारितोषिक मिळालें होतें.

मी जागेवर येऊन बसतांच माझ्या मैत्रिणीनें हंसून माझें स्वागत केलें. 'आम्हीं तुम्हांला चकित करून सोडावयाचा बेत केला होता,' कामगार संघाच्या अध्यक्ष मला म्हणाल्या. "आमच्या जिल्हा समितीनें तुमची शिफारस केली होती; आणि ती सर्वथा योग्य होती. मी तुमचें अभिनंदन करतें." सोव्हिएटमधील माझ्या मुक्कामांतील अत्यंत रोमहर्षक अशा क्षणांपैकीं तो एक क्षण होता.

समारंभानंतर चेकोवस्कीच्या 'मझेप्पा' नांवाच्या संगीतिकेचा प्रयोग झाला. जवळजवळ मध्यरात्रीच्या सुमारास तें सुंदर प्रशस्तिपत्र काखेंत घालून मी माझ्या बिऱ्हाडीं आलें.

## ५ कार्य-पद्धति

१९३५ च्या सप्टेंबरमध्यें कॉ. हॉलंड अमेरिकेस निघून गेली. तेव्हां नेहमींच्या शिकवण्याच्या जोडीला तिचें निरीक्षकाचेंहि काम मजकडे आलें. या नवीन कामामुळें माझ्या अनुभवांत चांगलीच भर पडली. त्यामुळें सोव्हिएट शाळेच्या अंतर्गत कामकाजाच्या पद्धतींचा मला खोलांत जाऊन अभ्यास करतां आला. शालेय अभ्यासक्रम पार पाडले जातात कीं नाहीं हें बघण्याची मजवर जबाबदारी येऊन पडली. पाठांवर देखरेख करणें, कच्च्या शिक्षकांना मार्गदर्शन करणें, अध्यापनपद्धतीसंबंधीं लहान लहान व्याख्यानें देणें आणि सर्व अभ्यासात्मक कार्याचा दर्जा उच्च राहण्यासाठीं त्यावर नियंत्रण ठेवणें हीं कामें मला करावीं लागत. त्यासाठीं सर्व शिक्षकांची व प्रत्येक विद्यार्थ्याची माहिती करून घेणें मला भाग होतें. मी दररोज तीन तास अध्यापनाचें काम करी आणि बाकीच्या वेळांत निरीक्षकाचें काम पार पाडी.

माझी या कामावर नेमणूक झाली तेव्हां प्रथम मीं नाखुषीच व्यक्त केली. मला असल्या व्यवस्थेचा पूर्वी अनुभव नव्हता आणि मला अध्यापनपद्धतीचें पद्धतशीर शिक्षणहि मिळालें नव्हतें. परंतु आमच्या मुख्याध्यापिकेनें व तपासनिसांनीं सांगितलें कीं, ही जबाबदारी उचलण्यास मी सर्वतोपरी लायक आहें, आणि मला हवें तें साहाय्य अध्यापनशास्त्र केंद्राकडून मिळूं शकेल. विद्युत्‌वेगानें वाढत असलेल्या शिक्षणपद्धतीला आवश्यक तेवढे शिक्षक व

मुख्याध्यापक यांची सोव्हिएट संघांत अद्याप तत्त्व आहे. त्यामुळें इच्छा नसली तरी शिक्षकांना निरीक्षक वा मुख्याध्यापक म्हणून बढती मिळते. उत्कृष्ट शिक्षकांना नेहमींच वरच्या जागा मिळतात आणि नव्या जागेवर ते अगदीं यशस्वी ठरतात असा अनुभव आहे.

माझी निरीक्षक म्हणून नेमणूक होतांच मीं कोणती महत्त्वाची गोष्ट केली असेल तर अध्यापन केंद्रास भेट देऊन मीं तेथून सल्लामसलत घेतली. निरीक्षक-विभागाचें कार्य एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडे सोपवलेलें होतें. मला त्या बाईचें खूप साहाय्य झालें. तिनें मला अनेक टंकलिखित पत्रिका-पुस्तिका दाखविल्या. त्यांत निरीक्षकांचें कार्य व कर्तव्यें यांची तपशीलवार माहिती होती. तिनें निरीक्षकांच्या कार्यपद्धतीची एक नमुनेदार योजनाहि मजपुढें ठेवली आणि कार्य तपासण्याचे कांहीं अडाखेहि समजावून दिले. त्यांत आलेख व तक्ते यांना बरेंच महत्त्व होतें. निरीक्षकासाठीं एक आठवड्याचा वर्गहि चालविण्यांत येत असे. मीं तात्काळ त्यांत नांव दाखल करण्याचें ठरविलें.

पहिल्या सभेचा आरंभ मॉस्कोंतील एका अनुभवी निरीक्षकानें केला. सर्व सहामाहीच्या कार्याची आंखणी कशी करावयाची हें तिनें तपशीलवार समजावून दिलें, आराखडा वाचून दाखविला आणि तो कसा तयार केला हें विशद केलें. त्या तिच्या भाषणानंतर सर्वसामान्य चर्चा झाली आणि उपस्थित शिक्षकांपैकीं बहुतेकांनीं त्यांत उत्साहानें भाग घेतला. या सभेमुळें मला खूपच नवीन कल्पनांचा लाभ झाला आणि यापुढील सर्व सभांना उपस्थित राहण्याचें मीं ठरविलें. मॉस्कोंतील अनेक निरीक्षकांशीं माझा परिचय झाला. त्यांच्या अनेक शाळांस मी भेटी दिल्या आणि त्यांना प्रत्यक्ष काम करतांना पाहण्याची मला संधि मिळाली.

मला माझ्या कामांत एक अडचण आली ती गुण देण्याबाबत. सोव्हिएट शाळांतील गुणदानपद्धति म्हणजे उत्तम, चांगला, बरा, साधारण, किंवा वाईट अशा तऱ्हेनें शेरे देणें. साधारण व वाईट शेरा मिळणें म्हणजे सर्वथा अपात्रतेचें निदर्शक. विद्यार्थ्यांना या अभिप्रायाचें फार महत्त्व वाटे आणि आपली प्रगति अजमावण्यासाठीं त्याचा ते उपयोग करीत. या गुणपद्धतीच्या आधारेंच सामुदायिक चढाओढींचा किंवा वर्गावर्गांतील चढाओढींचा निर्णय दिला जाई. हे गुण वर्गाच्या गुणपत्रकांत प्रविष्ट केले जात आणि त्याचबरोबर प्रत्येक

मुलाच्या दैनंदिनींत वर्गशिक्षक भरीत. या दैनंदिनींत प्रत्येक विद्यार्थी गृहपाठ लिहीत असे, आणि आपल्या प्रगतीचा तक्ता भरीत असे.

आमच्या शिक्षकवर्गांत कांहींजण गुणदानाच्या पूर्ण विरुद्ध होते. ज्या शाळांत गुणदानपद्धति मुळींच नव्हती अशा शाळांतून ते आलेले होते. त्यामुळें त्यांना असें वाटे कीं, सोव्हिएटसारख्या पुढारलेल्या देशांत गुणपद्धति मुळींच नसावी. पण प्रत्येकाची प्रगति ही महत्त्वाची बाब असल्यानें प्रगतीचें मोजमाप दाखविणारी कांहीं तरी पद्धति असणें आवश्यक आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नव्हती. शिवाय याचा दुसरा उपयोग असा होई कीं, शालेय कामकाजाच्या दृष्टीनें शिक्षकांवर एक प्रकारचा निर्बंध त्यामुळें राही.

अखेर आम्ही ह्या शिक्षकांस सोव्हियटच्या चालू शिक्षणपद्धतीच्या अवस्थेंत गुणदानाचें महत्त्व किती आहे हें पटवून दिलें. पण वर्गावर्गाला भेटी देऊन जेव्हां मी निकालपत्रें पाहूं लागलें तेव्हां मला आढळून आलें कीं, या गुणदानांत एकसूत्रीपणा नव्हता. कांहीं ठिकाणीं तें प्रमाण अतिशय खालीं होतें. आमची शास्त्रशिक्षिका कॉ. एडमंड्स अगदीं मुक्तहस्तानें गुण देई. त्याचबरोबर मला असेंहि दिसलें कीं तिच्या वर्गाची शिस्तहि खालच्या दर्जाची असून विद्यार्थ्यां-तील उत्तरांचें मान अगदीं सामान्य होतें.

मी सहाव्या यत्तेवर 'सृष्टवस्तु' पाठ पाहिला. मुलांची अभ्यासासाठीं मुळींच तयारी नव्हती. मीं तो वर्ग शाळा सुटल्यानंतर थांबविला. कॉ. एडमंड्स व वर्गाचे सल्लागार यांनाहि थांबवून घेतलें. मीं सरळ मुद्यासच हात घातला. "तुमची शिस्त सृष्टवस्तु पाठास चांगली नव्हती. पुष्कळांनीं गृहपाठ तयार केले नव्हते. याचें कारण मला समजेल का ? तान्या, तूं या वर्गाची अध्यक्ष आहेस. तुला या बाबतींत काय सांगावयाचें आहे ?

तान्या उठून उभी राहिली. ती म्हणाली, "बाई, मला वाटतें हें असें होतें. हा विषय खूप मनोरंजक आहे. मायक्रोस्कोपमधून बघावयाला मला मोठी गंमत वाटते आणि सिनेमाची देखील. पण मला वाटते कीं, शिक्षकांनीं आम्हांस याहून अधिक अवघड गोष्टी सांगाव्यात. आजचा पाठ अगदींच सोपा होता. सर्वांनाच त्यांतली माहिती होती त्यामुळें गंभीरपणें काम करावेंसेंच कोणास वाटेना !"

"मला वाटतें, गट-अधिकारी आपल्या कामांत ढिलाई करीत आहेत."

एडमंड म्हणाला, " हा प्रश्न आपण गट-अधिकाऱ्यांच्या सभेंत चर्चेस घेऊं. कॉ. एडमंड्स ह्या उत्कृष्ट शिक्षिका आहेत हें जर आपणांस माहीत आहे तर तिच्या पाठाकडे आपण लक्ष्य दिलेंच पाहिजे. त्या मायाळू असल्या म्हणून काय झालें ?"

बहुतेकांचें तेंच मत असावें असें दिसलें. ती वाजवीपेक्षां अधिक दयाळू होती. प्रश्नाचा मूळ उलगडा झाला होता. मुलांची मोठ्या माणसांच्या वागणुकीवर प्रतिक्रिया झटकन होते. कॉ. एडमंड्सनें मुलांना फारच सवलती दिल्या होत्या. मुलांना पुरेसें काम तिनें दिलें नव्हतें. गुणदानांतहि तिनें उच्च दर्जा राखला नव्हता.

मुलांनीं आपली शिस्त सुधारण्याचें व झटून अभ्यास करण्याचें ठरविलें. मुलें निघून गेल्यावर एडमंड्स व मी विचारविनिमय करण्यासाठीं थांबलों. मुलांच्या मताचा तिजवर परिणाम झाल्याचें मला दिसून आलें. मुलांना कार्यमग्न कसें ठेवतां येईल याचा विचार करून आम्हीं पुढील तीनचार पाठांची आंखणी केली. पुढील एकदोन आठवडे मीं तिच्या पाठास जावयाचें, तिनें व मी बरोबरच गुण द्यावयाचे व त्यांत तफावत कशी पडते हें बघावयाचें असें आम्हीं योजिलें. मी माझे पाठ कसे घेतों व तोंडी उत्तरास गुण कसें देतों हें तिनें येऊन पाहावयाचें ठरविलें.

त्यानंतर सहाव्या यत्तेंत शिस्त व अभ्यास यांत हळूंहळूं सुधारणा होत गेली. मुलें स्वतः प्रयत्न करूं लागलीं आणि शिक्षकानेंहि पूर्वीचें मतप्रदर्शन लक्ष्यांत घेऊन आपल्या गुणदानांत कडकपणाचें धोरण स्वीकारलें. तिनें गृहपाठहि अधिक कटाक्षानें तपासण्यास सुरवात केली. सर्व तासभर मुलें आपल्या कार्यांत मग्न राहतील अशी दक्षता आतां ती घेऊं लागली. शिस्तींत सुधारणा होण्याचें तेंच एक प्रमुख कारण होतें.

गणित व भाषा हे विषय सोडले तर सर्व विषयांत तोंडी उत्तरावर विशेष भर देण्यांत येई. चवथ्या यत्तेपासून पुढें अशी अपेक्षा असे कीं, विद्यार्थ्यानें उठून उभे राहावें आणि आपसांतील चालू विषयासंबंधीं प्रश्नाचें संपूर्ण उत्तर द्यावें. त्या उत्तराला गुण देण्यांत येत. सोव्हिएट अध्यापनपद्धतींत मुलांना अडविण्याचे मार्ग व ' सांपळे ' नाहींत. शिक्षकानें जो भाग समजावून दिला असेल व जेवढ्याचें स्पष्टीकरण झालें असेल वा वर्गांत अभ्यास झाला असेल तेवढ्या-

वरच प्रश्न विचारले जात. पण त्या अभ्यासास पूरक अशा वाचनानें किंवा स्वयंशोधनाच्या रूपानें घरीं काम करून त्यानें झालेला अभ्यास आत्मसात करावा आणि वर्गांत उत्तर देण्यासाठीं सज्ज असावें अशी अपेक्षा असे.

या तोंडी उत्तराच्या बाबतींत एक अडचण निर्माण झाली ती पदार्थविज्ञान व रसायन या विषयांच्या बाबतींत. सातवींतल्या कांहीं विद्यार्थ्यांनीं येऊन तक्रार केली कीं, त्यांना आजपर्यंत वर्गांत प्रश्नच विचारले गेले नव्हते; त्यामुळें 'रसायन' शास्त्रांत त्यांना अजून गुणच मिळाले नव्हते. सहामाहीं संपत आल्यामुळें त्यांना काळजी वाटूं लागली होती. कारण त्या विषयांत उत्कृष्ट गुण मिळवून दाखविण्याच्या त्यांनीं प्रतिज्ञा केल्या होत्या.

विद्यार्थ्यांनीं अभ्यासांत केलेल्या समाजवादी प्रतिज्ञा किंवा चढाओढी यांत शिक्षक सर्वसाधारणपणें लक्ष घालतात आणि उभयपक्षांना उत्तरें देण्याची संधि देऊन गुण मिळविण्याची सोय करतात. पण सोव्हिएट शिक्षणपद्धतींतील ही कार्यपद्धति अंगीं मुरण्याइतके दिवस कॉ. ग्रँटला येऊन झाले नव्हते.

मी त्यांशीं गोष्ट काढली. तेव्हां पुढील तासांतून अर्धा तरी वेळ इतरांना प्रश्न विचारण्यासाठीं राखून ठेवण्याचें त्यानें मान्य केलें. प्रत्येक विद्यार्थ्याला सर्व सहामाहींत तोंडी प्रश्नास दोनदां तरी गुण मिळालेच पाहिजेत म्हणून मीं त्यास पुनः बजावलें. दोनदां तरी त्यांची लेखी चांचणी व्हावी, आणि शंकास्पद विद्यार्थ्यांच्या बाबतींत आणखी एखादे वेळीं परीक्षा व्हावी, असा मीं त्यास सल्ला दिला. पण दुर्दैवानें कॉ. ग्रँटनें माझ्या सूचनेकडे लक्ष दिलें नाहीं व त्यामुळें शिक्षकवर्गांतील वर्तमानपत्रांत मला त्यावर खरमरीत लेख लिहावा लागला. पुढील शिक्षक सभेंत हा प्रश्न चर्चेसाठीं आला आणि जी वस्तुस्थिति पुढें मांडली गेली तीमुळें आपण मुलांशीं नीट वागत नसल्याचें कॉ. ग्रँट यास कबूल करणें भागच पडलें. आपण आपल्या पद्धतींत बदल करूं असेंहि त्यानें आश्वासन दिलें. याप्रमाणें त्यानें केलेंहि, पण त्यासाठीं मला व मुख्याध्यापिकेला त्याच्या वर्गास अनेक वार भेटी द्याव्या लागल्या आणि त्याच्यावर कडक लक्ष ठेवावें लागलें.

शाळेच्या सहामाहीच्या प्रगतिवृत्तांत कॉ. ग्रँटच्या बाबतींत आलेल्या अडचणीचा आम्हीं उल्लेख केला आणि उन्हाळयाअखेर त्यांची बदली करण्यास परवानगी मागितली. पण त्याला शक्य तें शिक्षण देऊन सुधारा

असें आम्हांस सांगण्यांत आलें. कारण अगदींच गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याखेरीज शिक्षकांना काढतां येत नसे. जर अध्यापनास तो अपात्र असेल आणि योग्य शिक्षक म्हणून त्यास काम करतां येत नसेल तरच त्याला आपला व्यवसाय बदलण्याची शिफारस करावी, असेंहि सांगण्यांत आलें.

वर्षअखेर कॉ. ग्रँटनें आपण होऊनच नौकरी सोडली व तो संशोधनखात्यांत गेला. असें करण्याचा मींच त्यास सल्ला दिला. कारण शास्त्रज्ञ म्हणून जरी तो हुषार असला तरी आपलें ज्ञान मुलांना द्यावें याची त्यास हौस नव्हती.

कॉ. ब्राऊन तिसरी व चवथी या वर्गास पदार्थविज्ञान शिकवीत असे. आम्हांला शिक्षकांची तर अत्यंत उणीव होती. त्यानें अमेरिकेंतील प्रगतिपर शाळांतून काम केलें होतें. आपण कोणताहि वर्ग शिकवूं शकूं अशी त्याची खात्री होती. तेव्हां एक महिनाभर प्रयोगादाखल त्याची नेमणूक करण्यांत आली.

दहा एक दिवसांनीं चवथींतील एकदोन विद्यार्थी मजकडे आले व म्हणाले, "बाई, तुम्ही आमच्या वर्गसभेस याल काय? ती अगदीं खाजगी पण महत्त्वाची आहे."

मी जरा बुचकळ्यांत पडल्यें. मी वर्गांत गेलें व काय भानगड आहे म्हणून चौकशी केली. त्यांच्या अध्यक्षानें लगेच खुलासा केला:

"आम्हांला आपल्या नजरेस असें आणावयाचें आहे कीं, निसर्ग-परिचय-शास्त्रांत आमची कांहींच प्रगति होत नाहीं. माशाविषयीं आम्हीं अधिक माहिती मिळवावयास पाहिजे. पण आम्ही तो सर्व वेळ त्यांचीं चित्रें काढण्यांतच घालविला. माशांचीं चित्रें आम्ही घरीं काढूं शकूं. वर्गांत त्यांचे सांगाडे, ठेवण व त्यांच्या संवयी याचा अभ्यास व्हावयास हवा. ह्या आमच्या पाठ्य पुस्तकांत या साऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत. पण कॉ. ब्राऊन म्हणतात कीं, पाठ्य पुस्तकांच्या भानगडींत तुम्ही पडूं नका. आम्ही मागें पडत आहोंत अशी आम्हांला भीति वाटते. आणि वर्षअखेरहि आम्हांला बहुधा कांहीं येणार नाहीं."

तो जें सांगत होता तें मीं मन लावून ऐकलें. मुलें अगदीं मनापासून जीव तोडून बोलत होतीं. कांहीं दिवस तरी त्यांची या बाबतींत आपसांत चर्चा झाली असावी. कारण त्यांचें भाषण अगदीं मुद्देसूद होतें. आपल्या

शिक्षकांशींहि हा प्रश्न त्यांनीं चर्चिला होता. पण त्यांजकडून समाधानकारक उत्तर त्यांना मिळालें नव्हतें. या बाबतींत अधिक चौकशी करण्याचें मीं आश्वासन दिलें, आणि त्यांना वर्गांत जावयास सांगितलें. आणि मीं परवानगी दिल्याशिवाय या प्रश्नाची पुनः चर्चा करूं नका असें त्यांस जातां जातां बजाविलें.

कॉ. ब्राऊन यांस मुलांशीं परिचय करून घेण्याची संधि मिळावी आणि आपली घडी बसवितां यावी या हेतूनें आम्ही त्यांच्या वर्गावर गेलों नव्हतों. परंतु कार्यक्रमाबाबतच्या संपूर्ण सूचना मीं त्यास दिल्या होत्या. इतकेंच नव्हे तर दोन्ही वर्गांतील अभ्यासक्रमाच्या प्रतीहि त्यास देण्यांत आल्या होत्या. या सभेनंतर मात्र अधिक विलंब न करतां त्यांच्या वर्गावर जाण्याचें मीं ठरविलें. आणि मुलांनीं केलेली टीका सर्वथैव वाजवी असल्याचें माझ्या निदर्शनास आलें.

शाळा सुटल्यानंतर त्याच्या पाठाबद्दल मी त्याशीं चर्चा केली. मी दिलेल्या सूचना अंमलांत कां आणल्या नाहींत म्हणून मी त्यास विचारलें. मुलांच्या सभेची हकीगत मी त्याच्या कानांवर घातली. त्याचें म्हणणें पडलें कीं, त्याची अध्यापनपद्धति चांगली होती आणि मुलें त्यापासून खूप शिकत होतीं. शेवटीं मला त्यास स्पष्ट करून सांगावें लागलें कीं, सोव्हिएट पद्धतींत अभ्यासक्रमाच्या बाबतींत शिक्षकांना स्वातंत्र्य नाहीं. नेमलेला अभ्यासक्रम त्यांस दूर सारतां येणार नाहीं, आणि मुलेंहि एकंदर प्रगतीविषयीं असंतुष्टच आहेत. ज्या शाळांत अभ्यासक्रमाच्या बाबतींतहि शिक्षकांना स्वातंत्र्य देण्यांत येतें अशा शाळांतून येणाऱ्या शिक्षकांस सोव्हिएट शिक्षकांकडून बाळगण्यांत येणाऱ्या अपेक्षा पार पाडतांना जड जाणें स्वाभाविक आहे, याची मला जाणीव असल्याचें मीं त्यास सांगितलें. तरी पण आमच्या शाळेंत काम करतांना आपलीं कर्तव्यें काय आहेत याची त्यानें नीट जाणीव ठेविली पाहिजे आणि अभ्यासक्रमाप्रमाणें चाललें पाहिजे असें त्यास बजावलें.

कॉ. ब्राऊन यास अभ्यासक्रमाची निश्चित आंखणी करून त्याप्रमाणें शिकविणें जड जाई. निसर्गपाठाच्या वेळींहि चित्रकला, इतिहास किंवा जें काय डोक्यांत येईल त्या सर्वांची सरमिसळ करण्याचा मोह त्याला आवरत नसे. महिनाभर चांचणी घेऊन त्याच्या जागीं दुसरा शिक्षक नेमणें आम्हांस

भाग पडलें. मुलांनाहि सांगाडा, मांशाच्या शरीरांतील इतर अवयव यांची हवी असलेली माहिती मिळाली आणि गृहपाठासाठीं त्यांनीं सुंदर चित्रें काढून आणलीं.

मी शाळेच्या 'पंचायती'च्या सभांस नियमानें उपस्थित असे. पण एक दिवस मला इतर कामामुळें थोडा उशिर झाला. त्या वेळीं मुख्याध्यापिका आणि इतर पांच सभासद सातवीच्या वर्गाच्या इतिहासभूगोलाच्या शिक्षकाविरुद्ध आलेल्या तक्रारीबद्दल विचार करीत होते. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, त्या बाई मुलांना गृहपाठ फार देत होत्या आणि त्यांचे कांहीं पाठ मुलांना समजतच नसत. मुलांचें म्हणणें मला पटलें नाहीं. मी मुलांना व शिक्षकांना समक्ष बोलावण्याची सूचना दिली. त्याप्रमाणें निरोप पाठविल्यावर कॉ. रोजर समवेत त्या वर्गांतलीं चार अभ्यासांत मागें पडणारीं मुलें येऊन दाखल झालीं.

मीं त्यांना सांगितलें कीं, मीं कॉ. रोजरचे पुष्कळ पाठ पाहिले आहेत. त्यांचें विवेचन सामान्य मुलांनाहि सहज समजण्याजोगें असतें. भूगोल हा विषयच जरा त्या वर्गाला कठीण आहे पण त्यासाठीं मुलांनींच अधिक लक्ष द्यावयास हवें. घरीं थोडी फार चांगली तयारी करावयास पाहिजे. दुसरी गंमतीची गोष्ट म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनीं तक्रार केली होती, ते तितका मन लावून अभ्यास करीत नसत. अभ्यासांत ते आळसावत चालले होते.

कॉ. रोजरला ही हकीगत कळतांच तिला आश्चर्य वाटलें व रागहि आला. 'तुम्हीं प्रथम मजकडेच कां आला नाहीं, म्हणून त्यांनीं चार विद्यार्थ्यांना विचारलें. "तुम्हांला जर कांहीं अडचणी असतील तर मला विचारा. शाळा सुटल्यावरहि थोडा वेळ थांबून विद्यार्थ्यांना मदत करण्याची माझी रीत आहे हें तुम्हांला ठाऊक नाहीं का?" विद्यार्थ्यांनीं अशा रीतीनें वर तक्रार कां न्यावी, याचा तिला उमग पडेना.

त्या समितीचा अध्यक्ष सातव्या वर्गाचा विद्यार्थीच होता. कॉ. रोजर जो अभ्यास नेमून देत तो विशेष कठिण असतो, हें त्यासही मान्य झालें नाहीं. त्या चार विद्यार्थ्यांनीं कॉ. रोजरकडेच प्रथम जावयास हवें होतें हें त्यालाहि पटलें. कॉ. रोजर क्वचित् भरभर बोलतात आणि त्यामुळें त्यांचें बोलणें कांहीं वेळां समजत नाहीं हें मात्र खरें, अशी त्यानें पुस्ती जोडली आणि तो विषय

येथेंच थांबवावा म्हणून सुचविलें. त्याप्रमाणें चर्चा थांबलीहि. पण अशा प्रकारें चर्चा करण्यांत किंवा समितीपुढें विषय आणण्यांत कोणाच्या हक्कावर अतिक्रमण झालें असें कोणास वाटलें नाहीं. परिस्थितीचें स्वरूप ओळखून त्याला योग्य वळण देणें हें शिक्षकाचें काम आहे. कॉ. रोजरनीं शाळा सुटल्यावर त्या चार विद्यार्थ्यांस साहाय्य करण्यास आरंभ केला. या साऱ्या प्रकरणांत सूचित झालेल्या टीकेचा परिणाम तिजवर इष्ट असाच झाला. आपल्या वर्गाशीं वागण्याच्या पद्धतींत ती यापुढें दक्ष राहूं लागली.

वरील उदाहरणावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, विद्यार्थ्यांमध्यें शिस्त बाणविण्याचा जो प्रयत्न होई त्याचा आधार लोकशाहीच्या कल्पना हाच होता. त्यांच्या मुळाशीं शिक्षकांची चालना असे. विद्यार्थ्यांच्या सभांना व निर्णयांना योग्य दिशा लावण्याचें काम विद्यार्थ्यांना आपला वरचष्मा न वाटेल अशा रीतीनें करण्याची जबाबदारी शिक्षकांवरच होती. टीका करण्याचें भरपूर स्वातंत्र्य होतें; आणि शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध खेळीमेळीचे असल्यानें रास्त असेल तेव्हां शिक्षक विद्यार्थ्यांच्या सूचना व टीका यांचें स्वागत करीत. उलट विद्यार्थ्याला अपमान न वाटेल अशा तऱ्हेनें त्याजवर शिक्षकांना निर्भीड टीका करतां येत असे.

शाळा चालविण्याची कार्यपद्धति अशीच लोकशाही तत्त्वांवर आधारलेली होती. जरी मुख्याध्यापक हेच शिक्षणखात्याला जबाबदार असत, तरी शिक्षकसभेंत ठरणारे निर्णय आणि होणाऱ्या टीका मुख्याध्यापकावर बंधनकारक असत आणि मुख्याध्यापकावर अशी टीका जरूर तेव्हां शिक्षक मोकळेपणानें करीतही. उलटपक्षीं, सोव्हिएटमधील शिक्षकांचा आपल्या कार्याबद्दलचा दांडगा उत्साह, भावि समाजाच्या जोपासनेबद्दल स्वतःच्या शिरावर असणाऱ्या जबाबदारीबद्दलची त्यांची जागरूक भावना यामुळें सर्व शिक्षकांत मोठा सुंदर एकोपा वसत असल्याचें मला आढळलें यामुळेंच. शिक्षका-शिक्षकांत आणि शैक्षणिक जगांत परस्पर सहकार्याची सतत तयारी दिसे. याचा सुपरिणाम शिक्षणकार्याच्या सुफलतेंत झाला तर नवल कसलें ?

## ६ परीक्षा

जगांतील बहुतेक देशांत बालकांच्या जीवनांतील मोठें दिव्य कोणतें असेल तर तें म्हणजे परीक्षा. शैक्षणिक ' जगांत ' परीक्षांच्या इष्टानिष्टतेबद्दल अनेक चर्चा झाल्या आहेत, कमेट्या नेमल्या गेल्या आहेत; परंतु अद्यापहि त्या प्रश्नाची तीव्रता कमी झालेली नाहीं आणि त्याला नेटस समाधानकारक उत्तरहि सांपडलेलें दिसत नाहीं.

सोव्हिएट संघांत विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची चांचणी घेण्याच्या हेतूनें चौथ्या यत्तेनंतर परीक्षा घेण्यांत येतात. या चांचणीचा दुसराहि एक हेतु असतो आणि तो म्हणजे शिक्षकाच्या अध्यापनपद्धतीला सुव्यवस्थित वळण लागावें, त्यांतील दोष सुधारले जावेत. परीक्षांच्या निकालावर चर्चा करून पाठ्यपद्धतींत पुढील वर्षी काय सुधारणा करतां येतील, याचा विचार केला जातो.

कोणत्याहि कठीण वा ' भुलावक ' प्रश्नाचें जाळें टाकून विद्यार्थ्यांना गोत्यांत आणण्याचा यत्न करण्यांत येत नाहीं. वर्गांत जो भाग झाला असेल तेवढ्यावरच प्रश्न विचारण्यांत येतात. वर्षाच्या अखेरीस आपापल्या विषयाच्या उजळणीसाठीं व सिंहावलोकनासाठीं कांहीं वेळ शिक्षकांनीं राखून ठेवावा अशी आंखणी करण्यांत येते. प्रश्न बहुतेक तोंडीच असतात. भाषा व गणित विषयांची परीक्षा लेखीहि घेण्यांत येते.

प्रत्येक विषयाच्या वार्षिक अभ्यासक्रमाची ' चर्चेचे विषय ' अशा स्वरूपांत

विभागणी करण्यांत येते. टंकलिखित करून परीक्षेपूर्वी एक महिना वर्गांतील भिंतीवर ती यादी लावण्यांत येते. त्यामुळें आपणांस कोणत्या प्रश्नाचीं उत्तरें द्यावीं लागणार याची कल्पना विद्यार्थी-विद्यार्थिनींना येते. परीक्षेच्या दिवशीं निरनिराळ्या कपट्यांवर त्यांची नोंद करण्यांत येते. प्रत्येक विद्यार्थी आपली पाळी आली कीं त्यांतील एक कपटा घेऊन जातो.

विषयशिक्षकच आपापल्या विषयाची परीक्षा घेतात. पण बहुतेक त्यांना दोन साहाय्यकर्ते असतात. एक दुसऱ्या वर्गाचे शिक्षक आणि दुसरे मुख्याध्यापक पर्यवेक्षक वा बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सभासद. प्रत्येक दिवशीं एकाच विषयाची चांचणी घेण्यांत येते. त्यांतहि अशी व्यवस्था असते कीं, साधारणपणें दर ४५ मिनिटांनंतर विद्यार्थ्यांस विसांवा मिळावा.

मी वर्गाची सल्लागार असल्यानें माझ्या वर्गांतील मुलें परीक्षेची कशी तयारी करतात या बाबतींत मी पुष्कळळच लक्ष्य घालीत असे. परीक्षेच्या खूप आधीं मी त्यांना सांगे कीं अनुपस्थितीमुळें कोणाचा अभ्यास मागें राहिला असेल तर त्यानें तो पुरा करण्याच्या तयारीस लागावें. त्यासाठीं आपल्या विषयशिक्षकांची मदत घ्यावी आणि कच्चा अभ्यास तयार करावा. अभ्यासक्रमाची प्रश्नस्वरूपांत यादी भिंतीवर लागली कीं विद्यार्थ्यांचे गट करून त्यांच्यासह मी ते प्रश्न वाचून काढी आणि कोणाचा काय भाग कच्चा आहे तें हुडकून काढण्यास त्यास मदत करी. त्याचबरोबर जरूर तेव्हां शिक्षकांचें त्यांस मार्गदर्शन मिळवून देण्याच्या कामास मी लागे.

वर्गसभेच्या वेळीं हुषार व अभ्यासू मुलें आपण परीक्षेसाठीं कशा पद्धतीनें तयारी करीत आहोंत याची माहिती सांगत. मागासलेल्या विद्यार्थ्यांनाहि आपला हिशोब देण्यास सांगण्यांत येई. या कच्च्या विद्यार्थ्यांना साहाय्य करण्याचें काम हुषार विद्यार्थी अंगावर घेत. अशा तऱ्हेनें सर्व वर्ग मनापासून आणि व्यवस्थित रीतीनें कामास लागे. परीक्षा म्हणजे केवळ त्यांच्या ज्ञानाचें मोजमाप नसून वर्षभर ते कशा रीतीनें काम करीत आले याचें निदर्शक आहे हें मी त्यांस समजावून सांगे. त्यांना हेंहि माहीत असे कीं, केवळ परीक्षेच्या निकालावरच उत्तीर्ण-अनुत्तीर्ण होणें अवलंबून नसून वर्षांत दाखविलेली प्रगति ही जमेस धरण्यांत येणार आहे.

विषयशिक्षक या नात्यानें मी निदान दहा मिनिटें तरी पुनरालोचनासाठीं

खर्च करीत असे. कमीअधिक महत्त्वाच्या आणि कठिणपणाच्या क्रमानें सर्व मुद्यांचा त्या वेळीं विचार होई. कोणी विद्यार्थी मागें पडत आहे असें दिसतांच मी त्याजकडे अधिक लक्ष्य पुरवून त्यास वर्गाबरोबर ठेवण्याचा यत्न करीं. वेळींच हे परिश्रम घेतल्यानें कोणीहि विद्यार्थी फार मागें पडलेला आढळत नसे.

प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमाची अशीच आंखणी केली जाई कीं, वर्षअखेर आवृत्ति वा पुनरालोचनासाठीं कांही तरी वेळ उरावा आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यास सर्व अभ्यासक्रम सहजासहजीं पार पाडतां यावा.

पालकांच्या सभा बोलावण्यांत येत आणि परीक्षेसंबंधीं पालकांची जबाबदारी काय आहे तें पालकांना समजावून सांगण्यांत येई. मुलाच्या मागें काळजी वा भगभग लावून द्यावयाची नाहीं, त्यांना धाकदपटशा दाखवावयाचा नाहीं, अशी सक्त ताकीद पालकांस देण्यांत येई. मुलें जागरण वगैरे न करतां नियमितपणा राखतील आणि त्यांना भरपूर मोकळ्या हवेंत खेळण्यास मिळेल अशी तजवीज करण्याबद्दल त्यांस सूचना दिली जाई. त्याचबरोबर मुलें आपला गृहपाठ मन लावून करतात कीं नाहीं यावर देखरेख ठेवून त्यास वळण लावण्याची जबाबदारी पालकांची आहे, हें तत्त्व त्यांच्या मनावर बिंबविण्यांत येई. स्वावलंबनाची वृत्ति अंगीं बाणविण्यास आणि संशोधनात्मक स्वतंत्र दृष्टि येण्यास गृहपाठ हें उत्तम साधन आहे, असा सोव्हिएट शिक्षणतज्ज्ञांचा कटाक्ष आहे.

एकंदरीनें चांचणी किंवा परीक्षा म्हणजे एक वर्षांतील शैक्षणिक कार्यक्रमांत ओघानेंच येणारी एक मामुली बाब आहे अशी विद्यार्थ्यांची दृष्टि असे. त्याचें विशेष दडपण त्यांच्या मनावर असलेलें दिसत नसे. जीं मुलें अगदींच मनानें हळवीं अशीं असतील, त्यांना डॉक्टर परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करीत. मागील प्रगतीवरूनच त्यांना वरच्या वर्गांत घालण्यांत येई.

तोंडी परीक्षेच्या वेळीं मुलें उत्तरें स्पष्ट व आत्मविश्वासानें देत. त्यावरून त्यांना विषय चांगला समजला आहे व तयारी उत्तम आहे हें निदर्शनास येई. हातांत प्रश्नाचा कागद पडल्यावर तो घेऊन उत्तराच्या तयारीसाठीं विद्यार्थी जेव्हां पुढील बाकावर बसत त्या वेळीं त्यांच्या मुखावर विलसणारें समाधानाचें मंदस्मित पाहून कोणालाहि आनंदच वाटे.

नमुना म्हणून सातवीच्या वर्गातील प्राणिशास्त्राच्या एका चांचणीची हकीगत मी पुढें देत आहें. खूप उशीर लागून विद्यार्थ्यांना कंटाळा व थकवा येऊं नये म्हणून वर्गाचे दोन भाग केले होते. एक भाग सकाळीं ९ वाजतां व दुसरा दुपारीं २ वाजतां बोलावण्यांत आला होता. त्या विषयासंबंधीं वर्षभर वापरलेले तक्ते, आराखडे, आलेख खोलींत सर्वत्र विखुरलेले होते. एका बाजूस रुंद टेबलें ठेवलीं असून त्यावर मासे, पक्षी व इतर प्राणी यांचे सांगाडे व प्रतिमा हीं ठेवण्यांत आलीं होतीं.

बरोबर नऊ वाजतां पहिल्या गटांतील सतरा विद्यार्थी वर्गांत येऊन दाखल झाले. एडमंड्सबाईनीं थोडक्यांत त्यांना परीक्षेची माहिती दिली. "मी एकेका वेळीं तीन विद्यार्थ्यांना बोलावीन. त्यांनीं येऊन प्रश्नाचा कागद घ्यावा आणि या पुढच्या बाकावर बसावें. उत्तर तयार करण्यास त्यांना ४।५ मिनिटें देण्यांत येतील. बाकावर कागद पेन्सिल ठेवण्यांत आलीं आहेत. आपल्या उत्तराच्या स्पष्टीकरणासाठीं तुम्हांस लागेल त्या आलेखाचा वा चित्राचा तुम्ही उपयोग करा. उत्तर देऊन झालें कीं शांतपणें वर्गाबाहेर जा अथवा पाठीमागें बसा. दर ४५ मि.नीं आपण थोडा विसांवा घेऊं. सर्वांचें संपल्यावर तुम्ही वर्गाबाहेर थांबा. मी एकेकास हांक मारून निकाल सांगेन. आतां कोणास कांहीं शंका आहे ?"

नंतर तिनें तीन विद्यार्थ्यांस पुढें बोलाविलें. त्या मुलांनीं प्रश्नाच्या चिठ्या काढून घेतल्या आणि पुढच्या रांगेंतल्या बाकावर तीं जाऊन बसलीं, आणि आपल्या मुद्याचें टांचण करूं लागलीं. आपणांस हवें असलेलें चित्र वा आलेख त्यांनीं निवडून घेतला. एडमंड्सबाईनीं सुरवातीस मुद्दामच हुषार विद्यार्थ्यांची निवड केली होती. त्यामुळें सर्व वर्गाला आत्मविश्वास वाटावा अशी तिची योजना होती.

पहिल्या विद्यार्थ्यानें ज्या वेळीं उत्तर देण्यास सुरवात केली, त्या वेळीं आणखी एक पुढचा मुलगा प्रश्न घेऊन उत्तराच्या तयारीस लागला.

"माझा विषय माशाच्या शरीराचें बाह्यांग व अंतर्गत रचना असा आहे. मी प्रथम बाह्यांगवर्णनापासून आरंभ करतों," असें म्हणून रोडरिकनें एक सांगाडा पुढें केला आणि त्यानें आपला विषय तपशीलवार व मुद्देसूद रीतीनें पुढें मांडला.

मी त्याला ' उत्कृष्ट ' असा शेरा अगदीं निःशंकपणें दिला आणि त्याप्रमाणें मजजवळील गुणपत्रिकेवर मीं नोंदहि केली. त्याच्या विषयविवेचनावरून त्यानें विषय उत्तम प्रकारें ग्रहण केला आहे इतकेंच नव्हे तर आपले विचार त्यास स्पष्टपणें मांडतांहि येतात याची अगदीं सहज मला खात्री पटली होती.

या तऱ्हेनें एकामागून एक विद्यार्थी येत गेले. बहुतेकांनीं उत्तरें संपूर्णपणें दिलीं. एक मुलगी मात्र घाबरली होती. ती उत्तर देतांना अडखळूं लागली. तेव्हां एडमंड्सनें तीस बसावयास सांगितलें. " तूं थोडा वेळ पुनः विचार कर, घाबरूं नकोस. मी तुला पुनः विचारीन," असें तिला सांगितलें होतें. पुनः उत्तर देण्यास ज्या वेळीं ती उठली तेव्हां मात्र न डगमगतां अधिक आत्मविश्वासानें तिनें उत्तर दिलें. एका विद्यार्थ्याचें ज्ञान यथातथाच दिसत होतें; त्याला दुसरा प्रश्न देण्यांत आला. त्याचें उत्तर त्यानें बरें दिलें. एडमंड्सनें त्यास इतर भागावर आणखी पुरवणीप्रश्न विचारले आणि अभ्यासांतील फारच थोडा भाग त्याचा कच्चा आहे अशी खात्री करून घेतली. त्यामुळें मी त्यास " चांगला " असा शेरा दिला. मागाहून तुलना करतां एडमंड्सचाहि तोच शेरा असल्याचें मला आढळलें.

सर्वांचीं उत्तरें देऊन झाल्यावर तीं सर्वजण खोलीबाहेर गेलीं. मी व एडमंड्स दोघी आमच्या गुणपत्रांची तुलना करूं लागलों. बहुतेक सर्व बाबतींत आमचें एकमत होतेंच. जेथें मतभेद झाला तेथें प्रत्येकाची वेगळी छाननी करून गुण कशा पद्धतीनें द्यावयाचे हें आम्हीं ठरविलें. एकंदरीनें निकाल खूपच समाधानकारक होते. अकरा उत्कृष्ट, चार चांगले व दोन मध्यम. सर्व विद्यार्थ्यांना आंत बोलावण्यांत आलें आणि आपापला निकाल ऐकून ते घरीं गेले. परीक्षेनंतर अनेक दिवस त्यांना जे संदेहांत लोंबकळत ठेवण्यांत येतें, त्या पद्धतीचा येथें मागमूसहि नव्हता.

शेवटची परीक्षा झाल्यानंतर सर्व शिक्षकांची निकालाची चर्चा करण्यासाठीं बैठक भरली. सर्व विद्यार्थ्यांना वर्षाच्या कामगिरीबद्दल ' बरा ' किंवा त्यापेक्षां सरस शेरा असल्यानें सर्वजण वरच्या वर्गांत गेले होते. ज्यांना ' कच्चा ' असा शेरा मिळाला होता अशा बाबतींत बारकाईनें तपासणी व विचारणा होई. जे विद्यार्थी एक किंवा अधिक विषयांत अनुत्तीर्ण होत त्यांना हिंवाळी अधिवेशनापूर्वी पुनः परीक्षा द्यावी लागे.

# ७ पालक

" मुख्याध्यापकांना भेटण्याच्या वेळेखेरीज पालकांस आंत येण्यास मनाई आहे," अशी एक सूचना लंडनच्या सीमेवरील एसेक्स नांवाच्या एका प्राथमिक शाळेच्या दरवाज्यावर लावलेली आहे. ही गोष्ट जेव्हां मी कांहीं सोव्हिएट शिक्षकांना सांगितली, तेव्हां त्यांचा तीवर विश्वासच बसेना.

सोव्हिएट संघांत पालकांनीं शाळेशीं आपला निकट संबंध राखणें हें पालकांचें एक महत्त्वाचें कर्तव्य मानलें जातें. तें त्यांनीं पाळलें नाहीं तर आपल्या मुलाबाबतची आपली जबाबदारी काय आहे हें नीटपणें पालकांना समजावून देण्याचा शाळा यत्न करीत असते. कांहीं विशिष्ट प्रसंगांनीं पालकांना शाळेंत पाचारण करण्यांत येते. अधूनमधून त्यांनीं यावें, पाठ पाहावेत किंवा मुलांच्या जेवणाच्या वेळीं स्वयंपाकघरांत देखरेख करावी म्हणून त्यांस उत्तेजन देण्यांत येतें. वर्ग-सभा, शालेय सभा किंवा पायोनिअर दल यांमध्यें पालकांनीं येऊन कांहीं माहिती सांगावी किंवा भाषणें करावींत म्हणून पालकांस निमंत्रण करण्यांत येतें.

प्रत्येक शाळेची एक पालकसमिति असते. पालकांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत निवडणुकी होऊन ती तयार होते, आणि शालेय जीवनांत या समितीचें महत्त्वाचें कार्यहि असतें. समारंभांची व्यवस्था, मुलांसाठीं मेजवान्या, सहली यांची व्यवस्था हीच समिती पाहते. तसेंच शाळेंतील करमणुकींच्या वेळीं

किंवा स्वयंपाकगृहांतील कामावर देखरेख या कामीं माणसांची निवड हीच समिति करते, आणि अशा तऱ्हेनें शाळेच्या कामावर थोडेंफार नियंत्रण ही समिति ठेवूं शकते. पालकांच्या सहामाही सभेंत मुख्याध्यापक शाळेंतील कामाचें इतिवृत्त त्यांचेपुढें ठेवतात. चर्चेंत बराच जिव्हाळा व पालकांची तीव्र तळमळ हीं व्यक्त होत.

या सर्वसाधारण सभेशिवाय वर्गाच्या मासिक सभाहि होतात. त्या वेळीं त्या वर्गासंबंधीं विशिष्ट प्रश्नांची चर्चा होते. एखादे वेळीं पालक शिक्षकांनीं वर्गाशीं ज्या तऱ्हेनें वर्तन केलें किंवा एखादा विषय ज्या पद्धतीनें हाताळला, त्यावर टीका करतात आणि मग ते, शिक्षक व पालक यांच्यांत चर्चा होते. पालकांचें लक्ष सामान्यतः आपल्या मुलाच्या प्रगतीकडे असे आणि त्यावरूनच वर्गाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण तयार होई असें साधारणपणें आढळून येई. तरीपण त्यांच्या या टीकेंतून आम्हांला पुष्कळच नवीन कल्पना मिळत, आणि शक्य तेवढें सविस्तर स्पष्टीकरण करून त्यांचें समाधान करण्यास आम्ही झटत असूं.

एकदां सातवीच्या वर्गाच्या पालकांच्या सभेंत पदार्थविज्ञान विषयाच्या शिक्षकांचा प्रश्न निघाला. वर्गाशी वागण्याच्या त्यांच्या रीतीवर बऱ्याच जणांनीं टीका केली आणि आम्ही शिक्षणसभेंत जे मुद्दे चर्चिले होते, तेच पुढें आणले. त्या वेळीं मुख्याध्यापकांनीं सांगितलें कीं, शिक्षकांच्या या दोषांची आम्हांस जाणीव असून ते दूर करण्यास आम्ही त्यांस साहाय्य करीत आहोंत. ते शिक्षक तरुण असून त्यांच्यांत सुधारणा होईल अशी आम्हांस खात्री आहे. त्या सभेस ते शिक्षक उपस्थित नव्हते. तेव्हां पुढील सभेवर हा विषय ढकलावा म्हणजे त्या शिक्षकांनाहि चर्चेंत भाग घेतां येईल असें ठरलें.

प्रत्येक विद्यार्थ्याजवळ एक दैनंदिनी असे. त्यांत रोजच्या गृहपाठाची तो नोंद ठेवी. निरनिराळ्या विषयांत मिळविलेल्या गुणांची नोंद शिक्षक त्यांत करीत. आठवड्याच्या अखेरीस वर्गाचे सल्लागार थोडक्यांत अहवाल देत आणि मुलाची ती प्रगतीची नोंद आपण पाहिली अशाबद्दल पालकास त्यावर स्वाक्षरी द्यावी लागे. शिक्षकांना जर कांहीं सूचना द्यावयाची असेल किंवा आपलें म्हणणें कळवावयाचें असेल तर त्यासाठींहि तेथें थोडी जागा असे. अशा तऱ्हेनें मुलांस काय गृहपाठ करावयाचा होता आणि गुण किती होते व

मिळाले याची खबर पालकास मिळे. एखाद्या पालकानें सही केली नाहीं तर लगेच फोन करून त्यांना बोलावण्यांत येई किंवा शिक्षक त्यांस पत्र पाठवीत. अशा रीतीनें पालकावर व पर्यायानें विद्यार्थ्यावर शिक्षक आपला दाब ठेवीत.

पालकांनीं-बहुधा मुलाच्या माता-क्वचित् वडील-तासाचे वेळीं वर्गांत पाठी-मागल्या बाकावर येऊन बसणें सोव्हिएट शिक्षकांच्या परिचयाचें झालें आहे. तास संपल्यानंतर शिक्षकाशीं ते चर्चा करतात. गृहपाठाच्या बाबतींत मुलांची अडचण पालक शिक्षकांच्या नजरेस आणूं शकतात किंवा विषय मांडणीबाबत कांहीं सूचना शिक्षकांना देतात. त्यांतील अनेक शिक्षकांना मार्गदर्शकहि ठरतात.

वर्गांतील प्रत्येक मुलाच्या गृहस्थितीचें संपूर्ण व यथातथ्य चित्र वर्गाच्या सल्लागार शिक्षकांस माहीत असावें अशी अपेक्षा असते. त्यासाठीं वरचेवर विद्यार्थ्यांच्या घरीं जाणें आवश्यक असतें. हें माझें काम मला गंमतीचें वाटे, पण कधीं कधीं तितकेंच तें कंटाळवाणें होई. पण सोव्हिएट कामगारांच्या कौटुंबिक जीवनाचें सखोल दर्शन मला त्यामुळें झालें.

मी ज्या ज्या घरीं गेलें त्या त्या घरीं माझें उत्साहानें स्वागतच झालें. मी घरीं आलें कीं त्यांच्याविषयीं पालकांजवळ तक्रार करणार हें मुलांना माहीत असूनहि मीं घरीं यावें म्हणून मुलें उत्सुक असत. पुष्कळशा पालकांच्या भेटी घेतल्यानंतर मला कळून चुकलें कीं ज्या घरांत आई आणि वडील दोघेहि बाहेर कामावर जातात, त्या घरांत तरी मुलांचें संगोपन म्हणजे साधी गोष्ट नाहीं. त्यामुळें जास्तींत जास्त मुलांना शालेतर कार्यक्रमांत जिल्ह्यांतील व्यावसायिक केंद्रांत व कलामंडळांत किंवा एखाद्या क्रीडासंघांत गुंतवून ठेवणें किती जरूरीचें आहे याचीहि मला कल्पना आली.

इंग्लिशमधून शिक्षण देणारी आमचीच एक शाळा होती. त्यामुळें आमचे पालक सर्व मॉस्कोभर विखुरलेले होते, तेव्हां कामाचा व्याप सांभाळून माझ्या-सारखीला त्या सर्वांच्याच भेटी घेणें दुरापास्त होई; तेव्हां माझ्या वर्गांतील जीं मुलें अधिक त्रासदायक असतील अशांच्या पालकांपासून आरंभ करण्याचें मीं ठरविलें. त्याप्रमाणें जिमीच्या घरीं प्रथम जाण्याचा मीं बेत केला. कारण या विद्यार्थ्यानें मला बरेंच छळलें होतें. मीं प्रथम जिमीच्या वडिलांना आपणांस कोणता दिवस व वेळ सोयीची होईल म्हणून पत्र पाठवून खुलासा केला, आणि अमुक वेळीं या म्हणून मला उत्तरहि आलें. जिमीच्या वडिलांना

लवकर घरीं येणें शक्य होत नसल्यानें त्यांनीं मला सायंकाळची वेळ सुचविली.

जिमीनें मला घराच्या खणाखुणा सांगितल्या होत्या. त्या अनुरोधानें मी सायंकाळीं ८ वाजतां त्याच्या घरीं जाऊन दाखल झालें. कुटुंबांतील सर्वच मंडळी त्या वेळीं घरीं होती. मेजावर चहा उकळत होता. खास बेत म्हणून ती तयारी चालल्याचें माझ्या लक्षांत आलें. मी खुर्चीवर विराजमान होतांच मजपुढें चहा, बिस्किटें, पावलोणी वगैरे जिन्नस आलें. माझी ही सरबराई पाहून मला जरा ओशाळल्यासारखेंच झालें.

जिमीचें बहुतेक घर लाकडीच होतें. क्रान्तिपूर्व काळांतील रशियाचा तो एक उत्तम नमुना होता. बिऱ्हाडांत दोनच खोल्या होत्या व त्याहि लहान होत्या. स्वयंपाकघर आणखी एका बिऱ्हाडामिळून सामाईकच होतें. 'या उन्हाळ्यांत आम्हांस एक स्वतंत्र गाळा मिळणार आहे,' जिमीचे वडील म्हणाले. ते भूमिगत बांधकामाकडे कामावर होते. "तेव्हां तुम्ही जरूर आमच्याकड या, म्हणजे आम्हांला आपली बडदास्त चांगली ठेवतां येईल. ही सगळी गल्लीच्या गल्ली पाडण्यांत येणार असून नवीन इमारती येथें व्हावयाच्या आहेत. जुन्या मॉस्कोंत सारींच घरें लाकडाचीं असत. पण येत्या दहा वर्षांत त्यांचा अवशेषहि उरणार नाहीं. वस्तु-संग्रहालयांत फारतर एखादें पाहावयास मिळेल !"

चहा होतांच आम्ही कामाकडे वळलों. मीं त्यांस सांगितलें कीं, शाळेंत जिमीचा अभ्यास सुधारत आहे. पण तो आपले गृहपाठ नियमितपणें तयार करीत नाहीं. जिमी आपला मोकळा वेळ कसा घालवितो, तो घरीं काय काम करतो, म्हणून विचारण्यास मीं सुरवात केली. मला असें दिसून आलें कीं, तो सरळ घरीं येत नाहीं. तो गृहपाठासाठीं फारच थोडा वेळ खर्च करतो, तो बराचसा वेळ बाहेर खेळण्यांत घालवितो आणि घरीं बराच उशिरां येतो.

आमचें संभाषण चालू असतांना जिमी तेथेंच बसून ऐकत होता.

"जिमी, तुझ्या आईनें सांगितलेली हकीगत खरी आहे का ?" मीं विचारलें.

"होय," तो उत्तरला.

"पुस्तकें वाचायाला आवडतात का तुला ?"

"विशेष नाहीं," त्यानें मला आपला पुस्तकसंग्रह दाखविला. त्याजवळ इंग्रजी व रशियन दोन्हींमधील बऱ्यापैकीं पुस्तकें होतीं.

"वाचनापेक्षां मला स्केटिंग अधिक आवडतें," तो आपण होऊन सांगूं लागला. "उन्हाळ्यांत मला मासे पकडणें आवडतें. संध्याकाळीं स्केटिंग करतों. म्हणून मला घरीं यावयास उशीर होतो."

शाळेनंतरच्या मोकळ्या वेळाचें एक वेळापत्रक जिमीस करून द्यावयाचें आम्हीं ठरविलें. त्यानें गृहपाठ केव्हां व किती करावा, त्यानें झोपी केव्हां जावें हें आम्हीं त्याच्या संमतीनें ठरविलें. त्यानें रशियन वा इंग्रजी वाचन दररोज अर्धा तास तरी स्वतःचें स्वतः करावें म्हणून त्यास सल्ला दिला.

दोन आठवडे त्या वेळपत्रकाप्रमाणें वागून त्याचा कसा काय उपयोग होतो तें पाहण्याचें त्यानें कबूल केलें. त्याची आई कामावर जात नसे तेव्हां मुलाची साप्ताहिक प्रगति मला शाळेंत भेटून कळविण्याचें तिनें मान्य केलें. जिमी त्यानंतर झोपावयास गेला. मी थोडा वेळ थांबून त्याला अभ्यासाची गोडी चांगल्या प्रकारें कशी लावतां येईल याबद्दल त्याच्या आईशीं चर्चा केली. मी असें सुचविलें कीं, जिमीच्या वडिलांनीं त्याला वाचनाची गोडी लागण्यासाठीं स्थापत्यशास्त्र व क्रीडा या विषयांवरील पुस्तकें आणून द्यावींत. तसेंच बाल-प्रकाशन-गृहातर्फे प्रसिद्ध होणारीं कांहीं आकर्षक पुस्तकें त्यास द्यावींत.

जिमीच्या वडिलांनीं आपल्या गाडींतून मला घरीं पोहोंचविलें. प्रथम त्यांनीं मला मॉस्कोमध्यें नवीनच बांधलेल्या रुंद रस्त्यावरून फिरवून आणलें. त्यांनीं आपली गाडी अमेरिकेंतून आणली होती. "मी आतां ती लवकरच बदलून घेणार आहें. जगांतील उत्कृष्ट गाड्या आतां मॉस्कोच्या रस्त्यावर फिरूं लागतील. झिस १०१ हें उत्कृष्ट मॉडेल होणार आहे. स्टॅलिन ऑटोवर्क्समध्यें तें तयार होत आहे." त्यांनीं मला दाराशीं आणून सोडलें.

"कांहीं झालें तरी जिमीला विसरूं नका. सध्यां तुमच्यावरील ती महत्त्वाची जबाबदारी आहे," असें बोलून व त्यांनीं केलेल्या स्वागत-सत्कारा-बद्दल त्यांचे आभार मानून मीं रजा घेतली.

"जरूर, जरूर. आम्ही शक्य तें करूंच. आपण पुन्हा जरूर येऊन जा, हं," असें म्हणून त्यांनीं आपली गाडी सुरू केली.

* * *

" बाई, आचारी नि वैमानिक यांत तुम्हांला कोण होणें बरें वाटतें ?" युजेननें एक दिवस प्रश्न केला.

" प्रश्न मोठा बिकट आहे. कशासाठीं ही चौकशी ?" मीं उलट विचारलें.

" माझी आई आहे स्वयंपाकीण नि ईनाची आहे वैमानिक. आमचा वादविवाद चालला होता कीं दोन्हींपेक्षां अधिक श्रेष्ठ कोण ?"

" मा म्हणतें, आपण असें करूं या कीं, आपण हा प्रश्न वर्ग-सभेपुढें चर्चेला घेऊं. नि साऱ्यांचेंच मत अजमावूं. खूप गंमत होईल."

युजेनला माझी कल्पना पटली.

या तऱ्हेनें पालकांविषयीं चर्चा सुरू झाली. मला ठाऊक होतें कीं, हा प्रश्न जरा गहन नि गंभीर होता. पण बारा वर्षांचीं मुलें या प्रश्नावर गंभीरपणें चर्चा करतील अशी मला कल्पना नव्हती. युजेननें सभेपुढं प्रश्न टाकतांच प्रत्येकजण कांहींतरी बोलण्याविषयीं उत्सुक दिसला.

" मला वाटते, वैमानिकापेक्षां स्वयंपाकी श्रेष्ठ. कारण त्यामुळें आपणांस जेवावयास मिळतें," एकजण म्हणाला.

" मुळींच नाहीं, लढाईची वेळ आली कीं, वैमानिकाचीच गरज अधिक," दुसऱ्यानें उत्तर दिलें.

" माझी आई कपडे शिवते; मला वाटतें तिचेंच काम अधिक महत्त्वाचें आहे."

" तें सारें ठीक आहे. पण मला वाटतें खरा प्रश्न आहे कीं, युजेनची आई उत्कृष्ट स्वयंपाकी आहे कीं नाहीं. असेल तर तिचें महत्त्व आहेच. तीच गोष्ट ईनाच्या आईची. प्रत्येक प्रकारचें काम करणारी व्यक्ति श्रेष्ठच आहे. माझी आई शिक्षिका आहे. माझ्या मतें तिचेंहि महत्त्व आहेच," ॲन म्हणाली.

" बरोबर ! बरोबर !" सर्वांनीं एकच गिल्ला केला.

" माझी आई उत्कृष्ट स्वयंपाका आहे. ती ज्या भोजनगृहांत काम करते, तेथें पांचशें असामी जेवण करतात. तिला नुकतीच बढती मिळाली आहे;" युजेन बोलत होता. त्याच्या आवाजांत त्याचा अभिमान पुरेपूर व्यक्त होत होता.

मातांच्या उद्योगापुरताच विषय मर्यादित झाला होता. आपापल्या

वडिलांच्या उद्योगाबद्दल जणूं काय त्यांची खात्रीच होती. वादाचा निर्णय अखेर असा लागला कीं, प्रत्येक उद्योग हा श्रेष्ठ दर्जाचाच आहे आणि कोणाचेंहि महत्त्व ठरवावयाचें तें तिच्या कामांतील कौशल्यावरून. माता आणि त्यांचें कार्य या विषयावर एक वर्तमानपत्राचा अंक काढण्याचें आम्हीं ठरविलें. कारण आमच्या पालक वर्गांत सर्व प्रकारचे कामकरी, कारागीर, अगदीं सामान्य मजुरापासून ते थेट फॅक्टरी मॅनेजरपर्यंत-सर्व दर्जाचीं माणसें असल्याचें आमच्या निदर्शनास आलें होतें.

आमचें वर्तमानपत्र खूपच यशस्वी झालें. कित्येक मातांनीं आपल्या मुलांस आपल्या जीवनांतील प्रसंग वर्णन करून सांगितले होते आणि त्यांची चरित्र-कथा मोठी रोमांचकारी होती. ज्या कोणांच्या मातांचें काम डोळ्यांत भरण्यासारखें होतें, त्यांचीं छायाचित्रेंहि आम्हीं वर्तमानपत्रांत डकविलीं होतीं. यामुळेंहि मुलांना आपापलें काम उठावदारपणें करण्यास चेतना मिळाली होती. शाळेंतली आपली प्रगति जर असमाधानकारक ठरली तर त्यायोगें आपण आपल्या आईवडिलांचें नांव कलंकित करतों, अशी त्यांची भावना झाली. ज्या मुलांच्या मातांचीं छायाचित्रें लावलीं गेलीं नाहींत, त्यांना एक प्रकारें कमीपणा वाटूं लागला, आणि त्याप्रमाणें आपल्या मातांस तसें सांगण्यास ते चुकले नाहींत.

एका मुलानें तर आपल्या आईस अगदींच भंडावून सोडलें. ती कामावरून परत आली कीं, धावत जाऊन तिला तो विचारी तुला कामांत बढती मिळाली कीं नाहीं ? बिचारीनें त्या त्रासांतून सुटण्यासाठीं फोन करून माझी मदत मागितली. मीं त्या मुलास बोलावून सांगितलें कीं, तुझी आई चांगलें काम करीत आहे. तूं जरा धीर धर. एक मे पर्यंत वाट पाहा. त्या वेळीं तिला योग्य शाबासकी मिळेल. पण त्या मुलाची खात्री पटविण्यास मला बरेच कष्ट पडले, अखेर तिला योग्य बढती मिळाली. पण तिला ही बढती मिळाली ती, ती स्वतः आपलें काम नेटानें मन लावून करीत होती म्हणून कीं, मुलाचा लकडा तिच्या मागें लागला होता म्हणून हें मात्र कधींच उघडकीस आलें नाहीं !

* * *

कोस्त्याचें वय अवघें दहा वर्षांचें होतें. त्याच्या वडिलांचा स्वभाव अति चिरचिरा होता. कोस्त्या भारी खट्याळ मुलगा होता आणि त्याचा यत्किंचित्‌हि गोंगाट त्याच्या वडिलास सहन होत नसे.

एक दिवस शाळेंत आल्यावर कोस्त्या आपल्या मित्रास सांगूं लागला कीं, आपल्या वडिलाविरुद्ध मी पोलिसांत तक्रार गुदरणार आहें. कारण आदल्या रात्रीं त्यांनीं त्यास चोप दिला होता, आणि खरोखरीच शाळा सुटल्याबरोबर आपल्या वर्गांतील दोन मुलांस घेऊन तो पोलिस ठाण्यावर हजर झाला. आपल्या वडिलाविरुद्ध तक्रार त्यानें दाखल केली आणि या प्रकरणीं चौकशी व्हावी म्हणून अर्ज दिला.

दुसऱ्या दिवशीं जेव्हां एक पोलिस अधिकारी कोस्त्याच्या वडिलास भेटावयास आले तेव्हां ते बुचकळ्यांत पडले. अधिकाऱ्यांनीं सर्व हकीगत त्यास सांगितली. कोस्त्याचे वडील चांगले सुसंस्कृत सभ्य गृहस्थ आहेत हें पाहून अधिकाऱ्यास आश्चर्य वाटलें होतें. त्यांची कल्पना कीं, त्याचे वडील म्हणजे एखादा अशिक्षित, बहुधा दारूबाज मनुष्य असेल. कोस्त्याच्या वडिलांनीं त्यास परोपरीनें सांगितलें कीं, मुलाला मारण्याची आपल्याला खोड नाहीं, फारच डोकें दुखत होतें, मुलाला गप्प बस अथवा बाहेर जा असें वरचेवर बजावूनहि त्यानें ऐकलें नाहीं, म्हणून आपण एक चापटी त्यास दिली, तेव्हां कोठें त्याचें समाधान झालें. कोस्त्याला चापट खाण्याचा बहुधा तो पहिलाच प्रसंग असावा आणि म्हणून त्याला आलेली चीड अगदीं स्वाभाविक होती.

आपलें समाधान झालें आहे आणि असा प्रकार पुन्हा घडणार नाहीं अशी मला खात्री आहे, पण नियमाप्रमाणें महिन्याभरानें मी पुन्हा चक्कर टाकीन, असें सांगून अधिकारी निघून गेला. कोस्त्याला हांक मारतांच त्यानें कबुली दिली कीं, आपण पूर्वी कधीं मार खाल्ला नाहीं आणि ही प्रथमच चपराक आपणास मिळाली होती. "पण पालकांनीं आपल्या मुलांच्या अंगावर हात टाकतां कामा नये असा कायदा आहे, आणि माझे वडील स्वतः सोव्हिएटमधील वकील असल्यानें त्यांना तो ठाऊक असायला पाहिजे," त्यानें पुस्ती जोडली.

# ८ शालेतर चळवळी

शाळेंतील पाठ बौद्धिक ज्ञानदानासाठीं असतात. प्रत्येक विद्यार्थ्याची वैयक्तिक आवडनिवड कांहींहि असली तरी शाळेंतील सर्व तासांना उपस्थित राहणें त्यास भागच असे. पुष्कळशा विद्यार्थ्यांना कांहीं विशिष्ट विषयांची आवड असल्याचें आढळे. त्या विषयाचा अधिक अभ्यास वाढविण्याची त्यांना इच्छा असे. ही त्यांची हौस भागविण्यासाठीं प्रत्येक शाळेंत विविध प्रकारचीं अभ्यासमंडळें असतात. रोजचे ठराविक वेळापत्रकांतील तास संपले कीं, हीं मंडळें सुरू होतात. वाङ्मय आणि नाट्य यांची हौस असणाऱ्यांसाठीं वाङ्मय-विकासमंडळें व नाट्यकलामंडळें, शास्त्रीय ज्ञानाची आवड असणाऱ्यांसाठीं रसायन व पदार्थविज्ञान यांचे वर्ग, तर उदयोन्मुख कलावन्तांसाठीं कलामंडळें असत. गायनप्रेमी विद्यार्थ्यांसाठीं वृन्दवादन व गायनविभाग यांची तरतूद असे. यांशिवाय होतकरू तरुण यंत्रज्ञांसाठीं यंत्राभ्यास व यंत्ररचना यांचे विभाग ठेवलेले होते. या व्यतिरिक्त आणखी कांहीं कोणाचा विशिष्ट कल दिसल्यास विशिष्ट वर्ग उघडले जात.

या वर्गांत उपस्थित राहणें ही सर्वस्वीं ऐच्छिक गोष्ट होती, आणि त्यांत येण्यासाठीं कोणाचें मनहि वळविण्यांत येत नसे. मात्र मुलानें एखाद्या मंडळांत नांव दाखल केलें कीं, कांहीं ठराविक काल त्यानें नियमित येऊन काम करावें, कला शिकावी, एखादें काम तयार करावें, अशी अपेक्षा असे. प्रत्येक

मंडळाचा एक एक पुढारी असे. शाळेकडून अथवा पायोनिअरदलाकडून त्यास दरमहा वेतन मिळतें. विद्यार्थ्यांपैकीं एकाची कार्यवाह म्हणून निवडणूक होते. आपापल्या वर्गाचें दप्तर सांभाळण्याचें आणि वर्ग चालविण्यास सर्वतोपरी साहाय्य करण्याचें कार्यवाहाचें काम आहे.

एक मे, सात नोव्हेंबर, नववर्षदिन, वर्षअखेर विद्यार्थ्यांस निरोपसमारंभ, अशा कांहीं निमित्तानें वा विशिष्ट दिवशीं सर्व अभ्यासमंडळें एकत्रित येऊन कार्यक्रम करतात. नाट्यविभागातर्फे लहानलहान नाट्यप्रवेश किंवा नाटकें बसविण्यांत येतात. कलाविभागांतील विद्यार्थी वेषभूषा, नेपथ्य व रंगभूमीची सजावट यांचें काम सांभाळतात. दीपरचना, प्रकाशयोजना व्यवस्थित रचण्याचें काम तरुण वैज्ञानिक आपणांकडे घेतात. कारण त्यांना आपल्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करतां आला नाहीं, तर त्या ज्ञानाची काय किंमत ? गायनविभागातर्फे संगीताची योजना असे. अशा प्रसंगीं लहानसें प्रदर्शनहि भरविण्यांत येई. निरनिराळ्या विभागांत तयार झालेल्या वस्तु तेथें ठेवण्यांत येत. त्यांत विमानांचे नमुने, रंगचित्रें, रेखाचित्रें, रंगभूमीचें साहित्य या सर्वांचा प्रामुख्यानें भरणा असे.

आमच्या शाळेंत हौशी कलावंतांचें दहाजणांचें एक पथक होतें. त्यांचा उत्साह अपूर्व होता. आमच्या नाटकांसाठीं ते नेहमीं सजावट करीत. विशिष्ट समारंभप्रसंगीं शाळा सजविण्याचीहि जबाबदारी ते घेत. सातव्या यत्तेंतील आर्थर नांवाचा विद्यार्थी त्यांचा पुढारी होता. तो अतिशय बुद्धिवान् असून त्याच्या योजना नेहमीं नावीन्यपूर्ण व डोळयांत भरणाऱ्या असत. 'कोळी आणि मासा' या पुष्किनच्या धर्तीवर लिहिलेल्या नाटकासाठीं त्यानें बनविलेला रंगभूमीचा नमुना व साहित्य हीं पुष्किनच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त मास्कोंतील विद्यार्थ्यांच्या प्रदर्शनांत मांडण्यांत आलीं होतीं.

* * *

दुसरा एक गंमतीदार विभाग म्हणजे तरुण निसर्गशास्त्रज्ञांचा. त्यांत जवळ जवळ वीस विद्यार्थी होते. त्यांनीं कित्येक जलचरांचीं संग्रहें जोपासलीं होतीं. उंदीर, गिनीपिग इ. सांभाळले होते. त्या प्राण्यांची योग्य निगा ते राखीत. त्यांच्या वाढीची बारीकसारीक नोंद ते ठेवीत. त्यांपैकीं पुष्कळांचा प्राणिसंग्रहालयाशीं आणि उद्भिज्ज-उद्यानांशीं प्रत्यक्ष संबंध असे. तेथें ते

निरनिराळया प्राण्यांची व्यवस्था ठेवण्याच्या कामीं साहाय्य करीत. वानरादि प्राण्यांवर शास्त्रज्ञांचे जे प्रयोग चालत, त्यांत त्यांचे स्वभावविशेष इ. निरीक्षण करण्याच्या बाबतींत शास्त्रज्ञांना साहाय्य देत. वनस्पति-विद्येची आवड असणारे वनस्पति-उद्यानांत श्रम करीत.

एकदां कांहीं इंग्लिश शिक्षक मॉस्कोला आले होते. वनस्पति-उद्यान त्यांना दाखवून आणण्याचें काम मजकडे आलें होतें. आम्ही आंत प्रवेश करतां क्षणींच सेमूरची आमची भेट झाली. सेमूर हा आमच्याच शाळेंतील चौथ्या यत्तेंतील एक विद्यार्थी. आमचा वाटाड्या होण्याचें काम त्यानें मोठ्या आनन्दानें पत्करलें. बागेची पाहणी करतांना तो विविध तऱ्हेच्या बिया, फुलें, फळें यांजविषयीं माहिती आम्हांस सांगत होता. त्याचें तें सखोल ज्ञान बघून आमचे पाहुणे तर चकितच होऊन गेले. त्यानें वाटेंत आम्हांला विशेष प्रकारच्या ज्या वनस्पति होत्या त्या दाखविल्या. शेवटीं तो आम्हांला कलमांच्या प्रयोगविभागांत घेऊन गेला. तेथें *मिचुटिनच्या पद्धतीनुसार झाडांवर कलमें करण्याचे प्रयोग सुरू होते.

आम्ही बागेच्या बाहेर आलों, त्याबरोबर सेमूर कांहीं विद्यार्थ्यांकडे धांवतच गेला. त्यांच्याशीं बोलण्यांत तो एकदम गढून गेला. त्याचा स्वर चढलेला होता. बागेंतील एक फूल तोडल्याबद्दल तो त्यांची कानउघाडणी करीत होता. हीं फुलें कां तोडावयाचीं नाहींत, हें त्यांना सेमूरनें समजावून सांगितलें आणि सार्वजनिक-सामुदायिक-मालमत्तेबद्दल योग्य तो आदर त्यांनीं दाखविला पाहिजे म्हणून त्यांस शेवटीं बजावलें.

शेवटीं आम्हीं संरक्षकविभागाकडे वळलों. मिचुटिननें फलांच्या कलमां-संबंधीं केलेल्या प्रयोगांचें त्या ठिकाणीं प्रदर्शन मांडलेलें होतें. सेमूरनें तेथील दर्शनीय वस्तूंचें सांगोपांग ज्ञान आपणांस असल्याचें आमच्या अनुभवास आणून दिलें.

मी आमच्या वाटाड्यावर बेहद्द खूष झालें होतें. त्याला तसेंच एक कारण

---

*मिचुटिन हा रशियाचा एक प्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञ. यानें सैबेरियांत द्राक्षें आणि उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत कोबी यांच्या निर्मितीचे यशस्वी प्रयोग केले आहेत.

होतें. सेमूर गेल्यावर आमच्या पाहुण्यांना मीं तें मुद्दाम सांगितलें. एके काळीं हाच सेमूर अतिशय खट्याळ मुलगा होता. वस्तूंची मोडतोड तो नेहमींच करावयाचा. सार्वजनिक मालमत्तेबद्दल त्याला कधींच आदर नव्हता. परंतु उद्भिज्ज-उद्यानांतील तरुण निसर्गशास्त्रज्ञांशीं त्याचा संबंध आल्यावर आणि त्याच्या निसर्गाच्या गाढ अभिरुचीमुळें त्याच्या स्वभावांत कमालीचा बदल झाला होता. सामुदायिक मालमत्तेचें रक्षण कां केलें पाहिजे हें त्यास समजूं लागलें होतें इतकेंच नव्हे तर तो स्वतः तिचा एक रक्षक बनला होता.

जे विद्यार्थी यंत्रशास्त्रांत व यंत्ररचनेंत निष्णात असतात व ज्यांना शाळेंतील व्यवसायविभाग अपुरे पडतात, अशांची सोय जिल्हा-यंत्र-केंद्रांत करण्यांत येते. हे यंत्रनिर्माते खरोखरींचे बिनतारी संदेशवाहक, बोटी, विमानें आणि इतर वाहनें यांचे नमुने तयार करीत. लहानशा नावाहि ते तयार करीत आणि उन्हाळ्याच्या सुटींत मॉस्कोजवळच त्या उपयोगांत आणल्या जात. जिल्हा-केंद्रांच्या ठिकाणीं साधन-सामुग्रीची संपन्नता असे आणि होतकरू यंत्र-शास्त्रज्ञांना तेथें मनसोक्त प्रयोग करण्याची मुभा असे.

यंत्र-व्यवसाय-विभागांत दाखल व्हावयाचें तें शाळेच्यामार्फत व्हावें लागे. त्यासाठीं वर्गशिक्षक आणि पायोनिअर दलप्रमुख यांची विद्यार्थी उत्तम असल्याबद्दल शिफारस लागे. यामुळें विद्यार्थ्यांच्या कामावर शाळेचें आपोआपच लक्ष राही. ते उगीचच अधिक उद्योगाचा ताण स्वतःला देतात कीं काय यावर नजर राही. शिफारसपत्राच्या आवश्यकतेमुळें विद्यार्थी साहजिकच अभ्यास मन लावून करीत.

*   *   *

गायन व इतर कलांचींहि अशींच जिल्हा-केंद्रें असतात. तेथेंहि शाळेच्या मध्यस्थीनें विद्यार्थी घेण्यांत येतात. प्रवेश देण्यापूर्वी त्या त्या कलेंत प्रगति करण्याजोगी विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं कांहीं पात्रता आहे का याची चांचणी घेण्यांत येते. याप्रमाणेंच क्रीडा व व्यायाम यांचींहि मंडळें आहेत. निरनिराळे खेळ, कसरती, शरीरसंगोपन व वर्धन यांची आवड असणारे विद्यार्थी त्यांत दाखल होतात. अशा तऱ्हेनें प्रत्येक विद्यार्थ्याला आपला रिकामपणचा वेळ या ना त्या छंदांत वा आवडीच्या कलेची जोपासना करण्यांत घालवितां येईल अशी तजवीज करण्यांत येते.

पायोनिअर दलाच्या मध्यवर्ती गृहांतील–ज्याला पायोनिअर–प्रासाद असें गौरवानें संबोधण्यांत येतें–कोणत्या ना कोणत्या विभागांत आपल्याला स्थान मिळावें म्हणून मॉस्कोंतील प्रत्येक मुलाची धडपड चालू असते. तेथील नाट्य-गृह, ग्रंथविभाग किंवा वाचनमंदिर यांत बिनाशुल्क प्रवेशपत्र मिळणें म्हणजे मोठा अनुग्रह मानण्यांत येतो. प्रासादाची इमारत मर्यादित स्वरूपाची असल्यानें मॉस्कोंतील हजारों विद्यार्थ्यांपैकीं ठराविक संख्येचीच तेथें सोय होऊं शकते. त्यामुळें त्या प्रवेशास विशेष महत्त्व आलें आहे.

ज्या पायोनिअर स्वयंसेवकानें उच्च गुणविकास दाखविला असेल किंवा सामाजिक कार्यांत ज्यानें आघाडी मारली असेल, त्यालाच असें प्रवेशपत्र लाभतें.

पायोनिअर प्रासाद म्हणजे खरोखरी विद्यार्थ्यांचें स्वप्नमंदिर आहे. त्याच्या करड्या रंगाच्या भिंती आणि मनोरे यामुळें बाहेरून तो एखाद्या मध्ययुगीन किल्ल्यासारखा वाटतो. पण आंतून मात्र तो अद्ययावततेचा एक सर्वोत्तम आदर्श आहे. कला, नाट्य, वाङ्मय, छायाचित्रें आणि आणि चित्रपट-निर्मिति यांपासून तो थेट यंत्ररचना आणि शास्त्रीय संशोधन यांपर्यंत कोणत्याहि क्षेत्रांतील मुलांच्या आकांक्षा, ध्येयें, स्वप्नें यांची परिपूर्ति होण्यास लागणारी संपन्नता आणि सज्जता तेथें आहे. त्या ठिकाणीं एक खरेंखुरें नाट्य-प्रयोग गृह आहे. तेथें मुलांचे नाट्यप्रयोग होतात. त्याचप्रमाणें सोव्हिएट संघांतील आकाशयान, भूमिशोध, इत्यादि क्षेत्रांतील वीर, तसेच नाणावलेले लेखक, कवि, कलावंत आणि गायक तेथें येतात, भाषणें करतात आणि प्रत्येक क्षेत्रांतील जें जें सर्वोत्कृष्ट असेल त्याविषयीं त्यांच्या मनांत गोडी निर्माण करण्यासाठीं आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठीं ते झटत असतात.

एकदां पायोनिअर प्रासादांतील नाट्य-गृहांत साजऱ्या झालेल्या आन्तर-राष्ट्रीय सायंकाळीं आमच्या शाळेंतील गायन-विभागाला पाचारण करण्यांत आलें होतें. इंग्लिश आणि अमेरिकन लोकगीत आम्हांस गाऊन दाखविण्याची विनंति करण्यांत आली. आमच्या गायनशिक्षिकेनें खूपच काळजीपूर्वक त्यासाठीं तयारी केली. एक खास गाडी पाठवून आम्हांला नेण्याची सोय करण्यांत आली होती. आम्ही गेलों तों सर्व नाट्य-गृह हरतऱ्हेचे पोशाख

केलेल्या बालबालिकांनीं नुसतें फुलून गेलें होतें. कित्येकांची जिन्यावरून धांवपळ सुरू होती. कित्येक आईस्क्रीम खाण्यांत व दूध पिण्यांत गढले होते.

नाट्यगृहांत थोडेसे प्रौढ स्त्रीपुरुष होते. पण मुलांच्या घोळक्यांत त्यांची उपस्थिति मोठी चमत्कारिक वाटत होती. मुलें आनंदानें गप्पागोष्टी करीत प्रयोगाची उत्कंठतेनें वाट पाहत होतीं. इतक्यांत ब्यॉडची सलामी झाली आणि रंगपटांतून नटांनीं रंगभूमीवर प्रवेश केला. युक्रोनियन, ज्यू, जर्मन, पोलिश, जिप्सी, असेरियन इ. भिन्नभिन्न राष्ट्रीयत्वाच्या प्रतिनिधींनाहि निमंत्रण करण्यांत आलें होतें. समरंभाचें नेतृत्व एका आठनऊ वर्षांच्या बालिकेकडे होतें. तिनें खांद्यावरून वेणीचे दोन शेपटे सोडले होते. गळ्यांत एक तांबडा रेशमी गळपट्टा होता. प्रत्येक कार्यक्रमाची ती सूचना देई. प्रयोगांत भाग घेणाऱ्यांचा प्रेक्षकांना परिचय करून देई. भीतीचें किंवा बुजरेपणाचें यत्किंचितहि चिन्ह तिच्या मुद्रेवर नव्हतें.

कार्यक्रमांत गाणीं, नृत्य, पाठांतर आणि वादन यांचा समावेश करण्यांत आला होता. कांहीं कांहीं राष्ट्रीय नृत्यांवर-विशेषतः युक्रोनिअन आणि जिप्सी यांवर-मी अगदीं मोहून गेलें. एक दहा वर्षांच्या बालिकेनें व्हायोलिन फारच सुंदर बाजवून दाखविलें, आणि एका ज्यू मुलीनें एक कविता इतकी भावपूर्ण रीतीनें गाऊन दाखविली कीं गीताचा फारसा अर्थ न समजतांहि मुलांनीं तिला टाळ्यांवर टाळ्या दिल्या.

प्रयोगकांपैकीं कोणीच आत्मजाणिवेचा किंवा सभाभीरुत्वाचा लवलेशहि प्रगट केला नाहीं. श्रोतृवर्गाची भीति न बाळगणें, नवख्या परिस्थितीला अथवा व्यक्तींना न बुजणें हें एक सोव्हिएट मुलांचें वैशिष्ट्य आहे. उत्कृष्ट तयारी असणाऱ्या व्यक्तींप्रमाणें आत्मविश्वासानें आणि सराईतपणें तीं आपलीं कामें करतात. त्यामुळें आपले गुण त्यांना योग्य रीतीनें प्रगट करतां येतात. आपणांस अभ्यासाचें व प्रयोगाचें पूर्ण स्वातंत्र्य आहे, आपणांवर या बाबतींत कोणी रागावणार नाहीं या गोष्टी त्यांना माहीत असतात आणि यांतच त्यांच्या आत्मविश्वासाचें बीज आहे.

विद्यार्थ्यांचीं चित्रपटमंदिरेंहि सदा गजबजलेलींच असत. सामान्य माणसांसाठीं असलेल्या खेळांना चौदा वर्षांखालील विद्यार्थ्यांना प्रवेश नसे. आणि सायंकाळच्या खेळांना तर त्यांना नेहमींच बंदी असे. त्यामुळें खास मुलांसाठीं

असलेला बोलपट ते चुकवीत नसत. या ठिकाणीं प्रौढांना लहान मुलांना सोबत म्हणून आले असले तरच प्रवेश मिळतो. मुलांसाठीं असलेला शेवटला खेळ सायंकाळीं साडेसात वाजतां संपतो. त्यामुळें मुलांना रात्रीं जाग्रण करण्यास कधींच प्रोत्साहन मिळत नाहीं.

* * *

अधूनमधून चित्रपट-निर्माते मुलांना कांहीं विशेष खेळ दाखवितात. त्याचा उद्देश मुलांशीं त्या चित्रपटाबद्दल चर्चा करण्याचा असतो. मुलांनीं केलेल्या टीकेंत खूपच स्वारस्य असून त्याचा पुढील बोलपटाचे वेळीं उपयोग होतो, असा अनुभव आहे. मुलांच्या आवडीनिवडी विचारांत घेतल्याशिवाय उत्कृष्ट बोलपट तयार होणार नाहींत, याची चित्रपट-निर्मात्यांना जाणीव झाली आहे.

आमच्या शाळेंतील विद्यार्थी आठवड्यांतील पांचव्या दिवशीं नियमितपणें चित्रपट पाहण्यास जात. बहुतेक ते गटागटानें जात. त्यामुळें चित्रपट पाहून आल्यानंतर शाळेंत त्याविषयीं त्यांना चर्चा करतां येत असे. याच कारणासाठीं मुलांचे चित्रपट शिक्षकहि न चुकतां पाहात. मला तर प्रौढांसाठीं काढलेल्या चित्रपटांपेक्षां बालकांचेच चित्रपट अधिक आवडत. वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना मात्र प्रौढांसाठीं असलेल्या चित्रपटांपैकीं कांहीं पाहण्याची संधि मिळे.

सर्व वयांच्या विद्यार्थ्यांसाठीं रेडिओवर कार्यक्रम आंखले जातात. दिवसांतून दोन कार्यक्रम असतात. एक अल्पवयीन बालकांसाठीं व दुसरा प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं. रेडिओच्या द्वारां मुलांना सर्व राष्ट्रांतील गोष्टींचा परिचय करून देण्यांत येतो. सोव्हिएट राष्ट्रसंघाच्या वीरांच्या कथा त्यांना ऐकविण्यांत येतात. त्यांत संशोधक, वैमानिक, सरहद्दांवरील रक्षक, विनोग्रादोवा, स्ताखानोवसारखे वीणकर आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत काम करणाऱ्यांचा समावेश करण्यांत येतो. त्यांचीं चरित्रें अगदीं सोप्या पण मनोरंजक व स्फूर्तिदायक भाषेंत सांगण्यांत येतात. आपणहि अशींच कामें करावीं अशी प्रेरणा त्यापासून मुलांना व्हावी असा उद्देश असतो. पायोनिअर वृत्तांतून सोव्हिएटमधील अगदीं ताज्या घडामोडी, नवे यांत्रिक शोध, निसर्गावर केलेली मात, नव्या कार्यपद्धति यांची माहिती देण्यांत येई. अशा तऱ्हेनें सोव्हिएटमधील

मुलांना आपल्या बलाढ्य पितृभूमीची होत असलेली सर्वांगीण प्रगति यांची अद्यावत् माहिती देण्यांत येई. आपल्या पितृभूमीवर त्यांनीं प्रेम करण्यास शिकावें, आपल्या पितृभूमीचें रक्षण करणें, त्याच्या प्रगतीस हातभार लावणें हें आपलें कर्तव्य आहे अशी जाणीव त्यांच्यांत निर्माण व्हावी हे उद्देश डोळ्यांसमोर ठेवले जात. रेडिओवरील कार्यक्रमांत इतर देशांतील बालकांबद्दल त्यांच्या मनांत बंधुभाव नांदावा व वाढावा, यासाठीं इतरहि कांहीं कार्यक्रम असत.

आमच्या शाळेंतील विद्यार्थी आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांत भाग घेत. रशियन विद्यार्थी फ्रेंच, जर्मन किंवा इंग्लिश या भाषांतून भाषणें करीत किंवा गीतें म्हणून दाखवीत. इतर भाषा बोलणाऱ्या अल्प संख्यांकांचीं मुलें आपल्या संख्या मुळाक्षरें रेडिओवरून सांगत. आमच्या शाळेंतील विद्यार्थी इंग्लिश व अमेरिकन जानपदगीतें गाऊन दाखवीत किंवा अभिजात वाङ्मयांतील कविता म्हणून दाखवीत.

मुलांचे कार्यक्रम आकाशित करणारी समिति मुलांशीं पत्रव्यवहार करीत असते. सोव्हिएट संघाच्या कानाकोपऱ्यांतून बालश्रोते आपापले अभिप्राय, गोष्टी आणि चित्रें समितीला पाठवीत असतात. या मुलांच्या अभिप्रायांचा कार्यक्रमांवर सुधारणा होण्याच्या दृष्टीनें पुष्कळच परिणाम होतो.

* * *

सामाजिक उत्सव तर सर्व विद्यार्थ्यांप्रमाणें आमच्याहि शाळेंतील विद्यार्थ्यांना प्रिय असत. नव वर्षदिनाच्या आदल्या रात्रीं झालेला उत्सव हा त्यांत विशेष उल्लेखनीय आहे. दिवाणखान्याच्या मध्यभागीं एका अंजिराच्या झाडाची स्थापना केली होती. त्याचे शेंडे आढ्याला पोचले असून तेथें तारकाप्रमाणें चमकणारे विद्युद्दीप लावले होते. फांद्याफांद्यांतूनहि रंगीत दीपगोलकांची आरास केली होती. त्याच्याभोंवती नृत्याचे कार्यक्रम झाले. कार्यक्रमाला आरंभ संगीतानें झाला आणि सर्व नटवर्गाची पाहणी झाली. त्या प्रसंगीं उत्कृष्ट वेषभूषेची निवड करण्यांत आली होती आणि हें काम मुलांनींच केलें होतें. नंतर वृद्ध हिमपुरुषाची स्वारी रंगभूमीवर आली. त्यानें मुलांना उखाणें घातले, गोष्टी सांगितल्या आणि जाण्यापूर्वी खोलींतल्या प्रत्येकाला एक एक बक्षिस दिलें.

खाद्यपेयें संपल्यानंतर मुलांचे वैयक्तिक व सामुदायिक खेळ झाले. मध्य रात्रीपर्यंत जागण्याची व कार्यक्रम करण्याची या दिवशीं मुभा होती. कारण दुसऱ्या दिवसापासून हिंवाळ्याची सुटी सुरू व्हावयाची होती.

*　　　*　　　*

दुसरा एक नेहमींचा करमणुकीचा प्रकार म्हणजे सायंकाळच्या वेळीं एखाद्या शेकोटीभोंवतीं मुलांनीं जमावयाचें, गोष्टी सांगावयाच्या व गाणीं म्हणावयाचीं. भिन्नभिन्न जमातींचीं मुलें त्यांत एकत्रित होत. शेगडी विद्युत्प्रकाशाची असे. त्या संधिकाळच्या मंद प्रकाशांत मुलें नृत्यगीतांनीं एकमेकांची करमणूक करीत. सोव्हिएट राष्ट्रसंघांतील भिन्नभिन्न जमातींमध्यें बंधुभाव आणि स्नेहभाव वृद्धिंगत होण्यास अशा एकत्रित घालविलेल्या सायंकालीन कार्यक्रमांची फार मदत झालेली आहे.

पायोनिअर पथकांचेहि असेच सायंकालीन कार्यक्रम साजरे होत. शेकोटी-भोंवतीं जमून पथकांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टींची चर्चा होई. एकदां अशा प्रसंगी प्रौढ विद्यार्थ्यांनीं जमून 'मैत्री' संबंधीं चर्चा केलेली मला चांगली स्मरते. त्या वेळीं सभोंवार पसरलेला अंधुक प्रकाश एक प्रकारचा विश्वास निर्माण करण्यास साहाय्यकच झाला असें मला त्या वेळीं वाटलें. व्यक्ति-व्यक्ति, निरनिराळे समूह आणि राष्ट्रें यांच्यांतील मित्रभावाविषयीं चर्चा झाली. स्त्रीपुरुषांतील मैत्रीविषयींहि त्याचप्रमाणें पुरुषापुरुषांतील स्नेहाविषयीं ऊहापोह झाला. त्या सर्वांचा निष्कर्ष असा होता कीं, जर कोणत्याहि दोन व्यक्ति स्नेहातिरेकानें बाकीच्या समाजापासून दूर जातील व फुटून निघतील तर ती मैत्री खरी मैत्रीच नव्हे आणि ती त्या उभयतांस अपायकारक झाल्याविना राहणार नाहीं. याच्या उलट ते जर समाजांतच राहतील आणि आपल्या मैत्रीचा उपयोग समाजाचें हित वाढविण्याच्या कामीं करतील तर ती खरी व हितकारक मैत्री होय.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यांतील स्नेहभावाचाहि प्रश्न उपस्थित करण्यांत आला. नुकत्याच इतर देशांतून आलेल्या आणि छडीचा सर्रास उपयोग करणाऱ्या शिक्षकांच्या हाताखालून आलेल्या विद्यार्थ्यांनीं आपली भूमिका विशद केली. त्यांपैकीं एकानें तर शारीरिक शिक्षेच्या पद्धतीचें समर्थनहि केलें. पण इतरांनीं त्याला वेड्यांत काढलें. कोणी कोणी शिक्षकांच्या पक्षपातीपणाचा

उल्लेख केला. शेवटीं सर्वांचें असें मत पडलें कीं, सोव्हिएटच्या शाळांतच विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यांत खरेखुरें सहकारित्वाचे संबंध नांदणें शक्य आहे.

त्याच वेळीं आणखी एक गंमतीदार मुद्दा निघाला होता. विद्यार्थ्यानें आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांबद्दल कांहीं गोष्टी शिक्षकांना जाऊन सांगणें हें योग्य आहे काय ? ही 'चहाडी' नव्हे काय ? 'चहाडी कधी सांगूं नये' या जुन्या विचाराचींच पुष्कळ मुलें अद्याप होतीं. या मुद्यावरील चर्चा फार कडाक्याची झाली.

'चहाड्या सांगूं नयेत ही गोष्ट मलाहि मान्य आहे. पण त्याचा अर्थ एखाद्या माणसाची मर्जी संपादण्यासाठीं दुसऱ्या कोणाची त्याच्यामागें नालस्ती करणें.' एक विद्यार्थी म्हणाला, "आपल्या मित्राचे किंवा एखाद्या विद्यार्थ्याचे तुम्हांस जे दोष आढळले असतील, त्याबद्दल त्याला खाजगी रीतीनें जाणीव करून देणें हें आपलें पहिलें काम. पण जरूर पडली तर भर सभेंत आपल्या मित्राच्या तोंडावर टीका करावी लागली तरी त्याच्यांत सुधारणा होण्यासाठीं ती करणें आवश्यकच आहे."

"अमेरिकेंत माझ्या वर्गमित्राविषयीं शिक्षकांशीं कांहीं बोलण्याचें माझ्या स्वप्नांतहि येणार नाहीं. कारण त्यामुळे आपण अडचणींत येऊं किंवा निष्कारण त्याला शिक्षा होईल याची खात्रीच. पण इथं पाहावें तर शिक्षाबिक्षा कांहीं नाहीं. साऱ्या गोष्टींची उघड चौकशी व चर्चा होते. पण त्यामुळें आपले दोष आपल्याला सुधारतां येतात"—दुसऱ्यानें पुष्टि दिली.

समारोपांत सोन्यानें आंतरराष्ट्रीय मैत्रीवर विशेष भर दिला. "जगांतील सर्व विद्यार्थ्यांशीं स्नेहभाव वाढविण्यावर आपल्या देशांत कटाक्ष ठेवला जातो हें आपण विसरतां कामा नये. एखादा विद्यार्थी निग्रो आहे कीं ज्यू आहे, अमेरिकन आहे कीं अरब आहे, याकडे येथें लक्ष दिलें जात नाहीं. सर्व तऱ्हेच्या जातीय आणि वांशिक हेव्यादाव्यांना आणि पूर्वग्रहांना मूठमाती देण्यांत आली आहे. आपल्या पथकांत व्यक्ति-व्यक्तींतील किंवा गटगटांतील मैत्रीबद्दलच्या कल्पना समाजोपकारक अशाच आहेत. आपण हीच भावना आपल्या सर्व कार्यक्रमांत व वागणुकींत ठेवूं या, म्हणजे सातव्या यत्तेचा वर्ग

सर्वांशीं अधिकतर स्नेहभावानें वागेल. आतां आपण हा गंभीर विषय येथेंच संपवूं या. खाद्यपेयाची काय व्यवस्था आहे?"

* * *

मॉस्कोंतील बालकांच्या नाट्यगृहाविषयीं मीं पूर्वी बरेंच लिहिलें आहे. तरी पण माझा तेथला आणखी कांहीं अनुभव सांगावासा वाटतो. कारण नवीन पिढीच्या जीवनाला वळण लावण्यांत त्याचा किती उपयोग होतो तें त्याशिवाय नीटसें कळणार नाहीं. विद्यार्थ्यांचीं नाट्यगृहें हीं खरीखुरीं विद्यार्थ्यांचीं आहेत. प्रत्येक नटनटीचीं नांवें त्यांना ठाऊक असतात. चालू असलेल्या खेळांची त्यांना पूर्ण माहिती असते.

माझ्या वर्गातलीं मुलें व्यक्तिशः किंवा संघशः नाटकास जात. तिकिटें मिळविण्याचें व जाण्यायेण्याची व्यवस्था ठेवण्याचें काम करण्यास एका विद्यार्थिनीची निवडणूक झाली होती. ती आपलें काम चोख बजावी. कोणता खेळ पाहावयाचा यासंबंधीं ती वर्गाच्या सूचना बोलावी आणि त्याप्रमाणें व्यवस्था करी. एकदां आमचा सर्व वर्गच्या वर्ग 'तरुण प्रेक्षक' नांवाच्या नाट्यगृहांत 'शालेयशिक्षण' नांवाचा नाट्यप्रयोग पाहाण्यास गेला होता. झारच्या अमदानींत शालेय जीवन कसें असे, क्रान्तीकडे कल असणाऱ्या विद्यार्थ्यांना कसें वागविलें जाई, याचें चित्र त्यांत रेखाटलें होतें. खेळ फारच सुरेख वठला.

भोंवतालच्या प्रेक्षकवर्गाकडेहि खेळाइतकेंच माझें लक्ष होतें. मी माझ्या वर्गाच्या मुलांसमवेत बसलें होतें. माझ्या एका बाजूस एक अमेरिकन मुलगी होती. तिला रशियन नीटसें समजत नव्हतें. त्यामुळें प्रसंगांतल्या विनोदाचें मर्म तिला चांगलें आस्वादितां येत नव्हतें. पण मध्यंतरीच्या कालांत तिच्या पलिकडे बसलेला मुलगा तिखटमीठ लावून त्यांचें स्वारस्य तिला भाषांतरित करून सांगत होता. कथानकांतील प्रसंगावर मुलांची प्रतिक्रिया स्पष्ट दिसून येत असे. श्रोतृवर्ग नटांशीं समरस झाला होता. अंकाच्या शेवटीं टाळ्यांचा कडकडाट करून आपला संतोष, गुणग्राहकता तो व्यक्त करी. त्यामुळें आपल्या परिश्रमाचें चीज झालें असें नटवर्गास वाटणें स्वाभाविक होतें. मधल्या विश्रान्तीच्या काळांत मुलें मला रंगपटांत घेऊन गेलीं. नाट्यप्रयोगाच्या गुणदोषांविषयीं त्यांनीं मजबरोबर चर्चा केली. मला

पाहुण्याप्रमाणें लेखून माझी शक्य तेवढी सरबराई ठेवण्याचा ते प्रयत्न करीत होते, आणि खरोखरीच तेथें प्रौढ माणसें अशीं विशेष नव्हतींच, आणि मी माझ्याच वर्गातल्या मुलांबरोबर नसतें, तर त्या वातावरणांत मलाहि चमत्कारिक वाटलें असतें.

रंगपटांत वेगवेगळ्या खेळांसाठीं रंगभूमीचें साहित्य व्यवस्थित लावून ठेवलें होतें. नेपथ्यांचीं रेखाचित्रें व आलेख भिंतींवर टांगून ठेवलीं होतीं. बाहेर चहा, कॉफी, बिस्किटें व फळें किफायतशीर दरानें मिळण्याची सोय होती.

मध्यंतरींच्या वेळांत मी बाहेर फेरफटका करीत असतांना माझ्या सभोंवार नुकत्याच झालेल्या खेळाबद्दलच मुलांत कडाक्याचा वादविवाद चाललेला मीं ऐकला. कांहीं मुलें रंगभूमीवर दाखविलेल्या शाळेची स्वतःच्या शाळेशीं तुलना करीत होतीं, तर कित्येक याच नाट्यगृहांत पूर्वी पाहिलेल्या खेळाशीं या प्रयोगाची तुलना करून त्यांतील सरसनिरस आपापल्या मताप्रमाणें ठरवीत होतीं. एकंदरीनें नाट्यगृहाबद्दलचें आकर्षण सर्वांनाच असल्याचें दिसलें, आणि बहुधा ते नियमितपणें तेथें येत असावेत असें त्यांच्या संभाषणावरून वाटलें.

* * *

मी आणखी एकदां मध्यवर्ति कुमार नाट्यगृहांत तिसरीच्या मुलांना घेऊन गेलें होतें. अलेक्सी टॉलस्टायचा ‘सोनेरी किल्ली’ हा खेळ तेथें लागला होता. हें नाट्यगृह पूर्वी कलामंदिर म्हणून प्रसिद्ध होतें. अव्वलप्रतीच्या नाट्यगृहाप्रमाणेंच तेथें निरनिराळ्या प्रकारच्या बसण्याच्या सोयी होत्या. त्यामुळें चौकोनी आकाराच्या अलीकडील नाट्यगृहासारखें तें मुळींच मनांत भरलें नाहीं.

तें नाट्यमंदिर जरी खूप भव्य होतें, तरी विद्यार्थ्यांनीं पार भरून गेलें होतें. सात ते तेरा वयाच्या दरम्यानचींच बहुतेक मुलें होतीं. त्यांच्यासमवेत शिक्षक, पायोनिअरदल स्वयंसेवक व क्वचित् पालक होते. मुलांचा गोंगाट आंतल्या घुमटाकृति तक्तपोशींत घुमत होता. खेळ सुरू झाला म्हणजे तरी हा गोंगाट थांबेल म्हणजे बरें अशा विवंचनेंत तेथील पर्यवेक्षक इकडून तिकडे हिंडत होते. खेळ सुरू होण्यापूर्वी त्यांना अशी फिकीर नेहमींच पडते. पण

खेळाला सुरुवात होतांक्षणींच नव्हे आरंभींच्या वाद्यांच्या एकदोन सुरेल ताना बाहेर पडतांच हा गलबला आपोआप शांत होतो आणि मुलें एकाग्र मनानें खेळ पाहूं लागतात.

मी दुसऱ्या दिवशीं सकाळीं नाट्यगृहांत पुनः गेलें आणि तेथील व्यवस्था कशी असते याबद्दल सविस्तर माहिती मला कोठें मिळेल म्हणून एका परिचारकाला प्रश्न केला. त्यानें मला कचेरींत नेलें. तेथें एका टेबलाशीं किंचित् स्थूल अशा एक बाई बसलेल्या होत्या. त्यांना मी माझा परिचय करून दिला. माझें येण्याचें कारण मी त्यांना स्पष्ट करून सांगणार होतें, तोंच टेलिफोनवर त्यांचें संभाषण सुरू झालें. मॉस्कोमधील एका शाळेंतील पायोनिअरदल-प्रमुखाशीं त्या बोलत होत्या.

"नमस्ते, ॲन होय? तुमच्याकरितां मीं काल निरोप ठेवला होता. रंगीत तालमीला बराच उशीर झाला काल. म्हणून मी मुलांना थांबवून घेतलं नाहीं. तेव्हां खेळासंबंधीं कांहीं चर्चा झालीच नाहीं. तेव्हां असं करा, कीं मुलांना काय काय वाटतं, तें लिहूनच कळवायला सांगा. त्यांना कांहीं सूचना करायच्या असतील तर त्याहि येऊं द्या. विशेषतः त्यांना कोणता भाग कंटाळवाणा वाटला तें लिहायला जरूर सुचवा, बरं कां! तसंच, त्यांच्या मतानं अभिनयांत कोठें सुधारणा हवी असेल, मांडणींत फेरफार हवे असतील तर तेंहि त्यांना लिहूं द्या, आणि असं बघा, प्रत्येकाला आपलं मत वेगवेगळ्या कागदावर कळवूं द्या. नाहींतर काय होतं, सामुदायिक पत्रांत कांहीं गोष्टी राहून जातात, आणि, परवांपर्यंत हीं सारीं पत्रं मला मिळूं शकतील तर बरं, म्हणजे मला सुधारणा कांहीं असल्या तर करून पुनः लवकर पुढल्या प्रयोगाची व्यवस्था करतां येईल."

'प्रेक्षकांशीं संबंध ठेवणें' हेंच या बाईचें काम असल्याचें मला दिसून आलें. मीं त्यांना म्हटलें,

"तुमच्या आतांच्या भाषणावरून मला हवी ती माहिती मिळाली आहे." मीं त्यांना माझ्या येण्याचा उद्देश सांगितला. आमच्या शाळेंतील विद्यार्थ्यांचा तुमच्या गृहाला चांगलाच पाठिंबा आहे. नेहमीच तीं कांहींना कांहीं पत्रें व चित्रें तुमच्याकडे पाठवीत असतात. मी तुमचें नाट्य-गृह पाहावयास आज पहिल्यादांच येतें आहे. तेव्हां तुमच्या इथला नटांचा

संच कसा आहे आणि तुमची व्यवस्था पद्धति काय आहे हें सांगाल तर मी आपली आभारी होईन."

" तुम्हांला ठाऊकच आहे कीं, आमचें नाट्यगृह खास बालकांसाठीं आहे; तेव्हां त्यांचें मनोरंजन होईल आणि त्यांना नेहमीं येथें यावेंसं वाटेल अशी आमची सदा खटपट सुरू असते. त्यांना आम्ही चर्चेसाठीं व विचार करण्यासाठीं योग्य ते विषय पुरविण्याची तजवीज करतों," ती सांगू लागली. " हे उद्देश डोळ्यांपुढें ठेवूनच आमचें काम सुरू असतें. आमच्या नट-नटींत मात्र प्रौढांचा भरणा आहे. पण त्यांतील बरेचसे वयानें तरुणच आहेत. मुलांचा अभिनय ते उत्कृष्ट करतात हें तुम्हीं पाहिलेंच आहे. आणि तसा तो नेहमीं यशस्वी रीतीनें व्हायचा म्हणजे आम्हांला आमच्या प्रेक्षकांशीं निकट संबंध राखणें भाग आहे. एवढ्याचसाठीं वेगवेगळ्या शाळांच्या प्रतिनिधींना आम्ही रंगीत तालमीला निमंत्रण देतों आणि नव्या प्रयोगांची त्यांजबरोबर चर्चा करतों. कांहीं विद्यार्थी आमचे जुने मित्र बनले आहेत; म्हणून आम्ही नव्या विद्यार्थ्यांना बोलावतों. पुष्कळदां मत द्यायला ते संकोच करतात, म्हणून आम्ही आतां कॉ. ॲनला सांगितलं तसं, पायोनिअर दलप्रमुखाला किंवा शिक्षकांना सांगतों. आम्ही प्रत्येक सूचना किंवा टीका स्वीकारतोंच असं नाहीं. शैक्षणिक दृष्ट्या आम्ही या प्रश्नाकडे पाहतों. पण असा मुलांशीं निकट परिचय राखल्यानें एवढें मात्र होतें कीं, मुलांच्या आवडीनिवडी कळतात, त्यांना आवडेल असा खेळ रंगभूमीवर आम्हांस आणतां येतो."

" तुम्ही सेरेझ्हा स्ट्रेल्झॉर हा खेळ कां बंद केला ? तो तर फार लोकप्रिय झाला होता ?" मीं विचारलें.

" त्याचं कारण त्याचा आतां कांहीं उपयोग नाहीं. तें नाटक आमच्या शाळांच्या विकासाच्या विशिष्ट अवस्थेंत लिहिलें गेलें होतें. त्या वेळीं प्रौढ विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यांत निर्माण झालेल्या एका विशिष्ट प्रश्नाचा त्यांत खल केला होता. शाळांतील दोष चव्हाट्यावर आणण्यासाठीं त्याचा बराच उपयोग झाला. आणि सातव्या यत्तेपासून पुढल्या विद्यार्थ्यांना त्यापासून आनन्द मिळे व बोधहि होई. पण दुर्दैवानें सातवीच्या खालच्या वर्गांतलीं मुलेंहि परवानगी नसतांना कांहीं तरी युक्तीनें खेळास येत. त्या खेळाचा

खरा उद्देश त्यांना कळत नसे; आणि त्यामुळें कल्पना विकृत मात्र होत. शिवाय, आमचीं आधुनिक नाटकें वास्तववादी असलीं पाहिजेत, आणि मुलांच्या आवडी व वस्तुस्थिति यांची त्यांनीं दखल घेतली पाहिजे, नाहींतर त्यांचा कांहीं उपयोग नाहीं."

"खरंच, मीं तुमच्या एखाद्या रंगीत तालमीला आलें असतें तर बरें झालें असतें," मी म्हणालें. "कारण आमचीं मुलें नेहमींच येतात इथं."

"होय, सोन्या माझ्या चांगली ओळखीची आहे," ती म्हणाली, "पायोनिअर दलाचें मोठ्या आस्थेनें ती काम करते आणि मुलांना नेहमींच येथें आणते. पुढच्या खेपेस तिच्या बरोबर आपण जरूर या."

यानंतर मी नाट्यगृहांत पुष्कळदां आलें गेलें; निरनिराळ्या वर्गांतील मुलांच्या समवेत मीं खेळ पाहिले आणि त्याजबद्दल त्यांच्याबरोबर चर्चाहि केली. नाट्यगृहांतील कर्मचारी वर्गांशींहि माझा परिचय होत गेला. त्यांतील बहुतेक शिक्षणतज्ज्ञ होते आणि नाट्यकलेची त्यांना चांगली माहिती होती. विद्यार्थ्यांसाठीं त्यांनीं चालविलेलें हें कार्य मॉस्कोंतील उत्कृष्ट शैक्षणिक कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

# ९ उन्हाळी शिबिरें

प्रत्येक शाळेचें उन्हाळी शिबिर असतें. त्यासाठीं अगोदरच महिना दोन महिन्यांपासून तयारी सुरू होते. ज्या विद्यार्थ्यांना उन्हाळयाच्या सुट्टींत आपलें गांव सोडून अन्यत्र जाण्याची साधनें अनुकूल नसतात, अशा विद्यार्थ्यांना शिबिरांत दाखल होण्याची प्रथम संधि मिळते. तसेंच ज्यांना विश्रांतीची वा वैद्यकीयदृष्ट्या उपचारांची विशेष आवश्यकता असते, अशांची प्रथम सोय करण्यांत येते.

सर्व शिबिरांना शिक्षणखात्याकडून आर्थिक साहाय्य मिळत असतें. पालकां-वर फारच थोडा बोजा टाकण्यांत येतो आणि त्याचें प्रमाण पालकांच्या उत्पन्नावर अवलंबून असतें.

शिबिरांची व्यवस्था बहुतेक कायम स्वरूपाच्या इमारतींतून होते. लांकडी घरें किंवा खेड्यांतून अवशिष्ट असणारीं मोठीं घरें यांचा त्यासाठीं उपयोग करण्यांत येतो. स्वतंत्र इमारती नसतील तेथें जागा भाड्यानें घेण्यांत येतात. शहरांतील शाळांनीं खेडयांतील शाळागृहांत शिबिर उघडावयाचें अशी वहिवाटच पडून गेली आहे. त्यामुळे पुष्कळशा सोयी अनायासेंच होतात. त्यांत सांडपाण्यासाठीं व इतर आरोग्यविषयक तजविजी आपोआपच उपलब्ध असतात. स्वयंपाकघरहि तेथें असतेंच. तंबूराहुट्यांतून शिबिरें उघडणें ही गोष्ट सोव्हिएट शिक्षणतज्ज्ञांना व डॉक्टरांना संमत नाहीं. कारण अशा

ठिकाणीं राहून जशी विद्यार्थ्यांना विश्रांति मिळावी, मोकळेपणानें त्यांना राहण्यास सांपडावें आणि पुढील हिंवाळ्यांतील कामासाठीं सत्त्व-बळ संवर्धनानें त्यांची तयारी व्हावी, तितकी होत नाहीं, असें त्यांचें मत आहे.

आमच्या शिबिराचें ठिकाण ओकानदीवरील एक कायम स्वरूपाचें निवासस्थान होतें. तें कलुगाच्या जवळ असून एका घनदाट पाईनवृक्षांच्या अरण्याच्या तोंडाशीं नदीकांठापासून थोडेसें आंत असें बांधलें होतें. तेथें एकंदर सहा इमारती असून त्या लाकडाच्याच बांधलेल्या होत्या. त्यांपैकीं दोन दुमजली असून तेथें झोपावयाची व्यवस्था केलेली होती. जेवणगृह जवळ जवळ सर्व बाजूंनीं खुली अशी एक प्रशस्त पडवी होती. नाहीं म्हणावयास पावसापासून संरक्षण असावें म्हणून तीवर छप्पर टाकलें होतें. भोजनगृहाच्या पाठीमागील बाजूस बैठ्या खेळासाठीं एक खोली व पलीकडे वाचनालय होतें. त्या पलीकडे दोन खोल्या इतर छंदमंडळांना पावसाच्या वेळीं वापरण्यासाठीं राखून ठेवण्यांत आल्या होत्या. पण सामान्यतः सर्व कार्यक्रम उघड्यावरच होत.

उन्हाळ्याच्या सुटींत दीडमहिना शिबिरांत काम करण्याचें मीं कबूल केलें होतें. प्रथम मला दोन महिन्यांऐवजीं एक महिन्याचीच सुटी मिळाली आणि त्याची भरपाई म्हणून एक महिन्याचा पगार मिळाला. शिबिरांत असतांना माझ्या कामाबद्दल मला वेतन मिळतच होतें. शिबिरांत नेहमीं एक शिक्षक असतात. मोठ्या शाळांतून पन्नास वर्षांनीं एकदां प्रत्येक शिक्षकावर अशी पाळी येते !

शिबिर सुरू होण्याच्या दहा दिवसआधीं मी मॉस्कोहून निघालें. प्रवास सहा तासांचा होता. मी सकाळीं सहा वाजतां कलुगा येथें जाऊन पोहोंचलें. गांव अगदीं स्वच्छ होतें आणि त्या वेळीं गांवांत नितांत शांतता नांदत होती. मजबरोबर वीस पालकमंडळी होती; कारण तो दिवस विशेष महत्त्वाचा होता. त्या दिवशीं अधिकृतरीत्या शिबिराचें उद्घाटन व्हावयाचें होतें; अनेक लोक भेटी देण्यासाठीं त्या दिवशीं यावयाचे होते.

बससाठीं एक तासभर तिष्ठत बसण्याची आम्हांला इच्छा नव्हती; त्यामुळें शिबिरापर्यंतचें चार मैल अंतर आम्हीं चालत जावयाचें ठरविलें. गांव मागें टाकून पलीकडील एक मैदान आम्हीं ओलांडलें व सुगंधानें दरवळलेल्या रानांत

प्रवेश केला. वाटेनें अनेक शिबिरांचीं निवासस्थानें आम्हांस लागलीं. शेवटीं मोठा रस्ता सोडून नदीकडे जाणारा रस्ता आम्हीं धरला.

आमची छावणी आमच्या दृष्टिपथांत आली. अजून ती झोपेंतच दंग होती; पण आमच्या आगमनाची त्यांना वार्ता होती. आम्हीं रस्त्यावर दिसतांच शिबिर-प्रमुख आमच्या स्वागतासाठीं घाईघाईनें फाटकापाशीं आला. आम्ही आंत जाऊन दाखल होतों न होतों तोंच आमच्यापुढें गरम कॉफीचे पेले ठेवण्यांत आले. न्याहारीचीहि व्यवस्था करण्यांत आली. चालून आल्यामुळें तिचा आम्हांस चांगला आस्वाद घेतां आला.

कॉ. हॉलंडनें माझें स्वागत केलें. मला तिच्याच जागीं काम करावयाचें होतें. आम्ही बाहेरच्या मोकळ्या आवारांत फेरफटका केला. तें आवार रानांत चोहों बाजूस कुंपण घालून तयार केलेलें मोकळें मैदान होतें. शिबिराची कार्यपद्धति कॉ. हॉलंडनें मला समजावून सांगितली.

"तुमचं खरं काम म्हणजे मार्गदर्शनाचं," ती म्हणाली, "एक प्रकारें 'अध्यापन-तज्ज्ञच' म्हणाना ! कॅंपची सर्व व्यवस्था पायोनिअर दलामार्फत होते. त्याचा रोजचा कार्यक्रम व्यवस्थित आंखलेला आहे. शिबिरांतील डॉक्टर, परिचारिका आणि 'शिबिर-माता' हीं सर्व विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे चांगलें लक्ष पुरवितात." आपल्याला येथें कांहींच काम नाहीं असेंच जवळ जवळ मला वाटूं लागलें; म्हणून मीं विचारलें, "मग माझं इथं काम तरी काय ?"

"काम पुष्कळ आहे. तुम्हांला वाटलं तर एक नाट्यमंडळ सुरू करा. मुलांबरोबर सहलीस जा. लहानग्या मुलांवर लक्ष ठेवा. शिबिर-चालकांच्या सभांस हजर राहा. मुलांच्या बाबतींत कांहीं अडचणी आल्या तर त्या दूर करा–थोडक्यांत मुलांच्या बाबतींत योग्य ती शैक्षणिक दृष्टि बाळगली जाते आहे कीं नाहीं हें पाहाणें तुमचें काम आहे. मोठ्या मुलींवरहि नजर ठेवा. एक-दोघी जरा शिष्ट होत चालल्या आहेत, तुमची इथं गरज नाहीं असं मुलींच मानावयाचं कारण नाहीं. काम खूपच आहे आणि माझी खात्री आहे कीं तुमचा इथला वेळ अगदीं मजेंत जाईल !"

तेवढ्यांत पांचव्या यत्तेंतील व्हिक्टर नांवाचा एक विद्यार्थी एका गृहांतून बाहेर पडला. त्यानें आपला बिगुल ओठास लावला आणि थोड्याच अवकाशांत सारें शिबिर गजबजून गेलें. मुलें भराभरा बाहेर पडलीं. कित्येकजण आपले

कपडे सावरीतच आलीं. सर्व मुलें आपल्या उंचीच्या क्रमानें उभीं होतीं. व्यायाम-शिक्षक पुढें झाले. दहा मिनिटें अगदीं हलकासा व्यायाम करून मुलें हातपाय धुऊन न्याहारीसाठीं तयार राहण्यासाठीं पांगलीं.

सगळीं मुलें मला घेरून माझें आनंदानें स्वागत करीत होतीं. प्रथम मला तीं सारींजण ओळखूंच येईनात इतके तांबूस व पिंगट त्यांचे चेहरे बनले होते. एल्गानें एका बाजूनें येऊन मला पकडलें. दुसऱ्या बाजूनें जिर्मी येऊन बिलगला.

" बाई, आमचे बिछाने काढून झाले आहेत. आमचीं तोंडधुणीं पण झालीं आहेत; आपण आवारांत चक्कर मारून येऊं चला. जिर्माचे वडील दुपारीं येणार आहेत. येतांना माझ्या वडिलांना पण ते आणतील," एल्गा मला सांगत होती. " हॉलंडबाई म्हणतात तुम्ही येथें राहाणार आहांत. खरंच ना ? छान, छान, मग खूप मौज येईल. आपण बेरी गोळा करूं, पोहायला जाऊं......"

मुलांची गडबड चालूंच होती. त्यांनीं मला क्रीडांगणावर नेलें. क्रीडांगणाला नदीच्या बाजूनें खूप उतार होता. आम्ही चढावाच्या बाजूनें एकदोन इमारती टाकून एका दारापाशीं आलों. एल्गा तेथेंच झोपत असे. "आमचं घर फारच छान आहे." तिचें तोंड चालूंच होतें. " तुम्ही पण येथेंच झोपावयास याल ना ? हॉलंडबाई माडीवर मोठ्या मुलींच्या तिकडे झोपतात. आतां आपण आंत नाहीं जायचं, जिर्माला नाहीं आंत येतां येणार."

आम्ही घराच्या पिछाडीस गेलों. " हा पाहा आमचा जिमखाना," म्हणून मला त्यांनीं ती जागा दाखविली. तेथें झोपाळे, डबलबार, चढण्यासाठीं दोर, तसेंच व्हॉलीबॉलसाठीं चौक इ. गोष्टी होत्या. अगदीं सुटसुटींत पोषाख केलेला कांहीं मुलें तेथें कसरत करीत होती. दोघेजण व्हालीबॉल खेळण्यांत गुंग होते. सर्वचजण आनंदी दिसत होते.

झाडींतून पुनः बिगुलचा ध्वनि आमच्या कानावर आला. तात्काळ भोजनगृहानजिकच्या सपाट मैदानाकडे सर्वजण पळाले आणि चार चारांच्या रांगा करून उभे राहिले. सर्वांचा पोषाख म्हणजे लांड्या विजारी व बिनबाह्यांचे सदरे असा होता. कांहीं कांहीं लहान मुलांनीं तर नुसत्या चड्ड्याच घातल्या होत्या. दहा वर्षांवरील बहुतेक मुलांच्या गळ्यांभोंवतीं तांबडी पट्टी होती. मध्यभागीं एका चबुतऱ्यावर ध्वज-स्तंभ होता.

सोन्या चबुतऱ्यावर उभी होती. तिचे सुंदर कुरळे केस उन्हानें करपून निघाल्यासारखे दिसत होते. तिचा पांढराशुभ्र झगा तिच्या तांबुस पोटऱ्यांवर उठून दिसत होता. तिनें हुकूम सोडला,

" गट–नायक, आपला अहवाल तयार करा."

हे गटनायक आपापल्या पथकांसमोर एक कदम पुढें उभे होते. त्यांनीं आपल्या गटांतील विद्यार्थ्यांची संख्या मोजली व ते आपल्या जागांवर येऊन उभे राहिले.

" पथक–नायक, आपला अहवाल द्या–"

असा दुसरा हुकूम होता. त्याबरोबर गटनायक क्रमाक्रमानें पथक–नायकांनीं जवळ जाऊन आपला अहवाल सादर केला.

" पथक–नायक, आपापला अहवाल आणा–" असा हुकूम देतांच पथक-नायकानें आपल्या पथकास ' हुश्शार ' असा हुकूम दिला आणि सोन्याजवळ येऊन सकाळचा अहवाल सादर केला. पहिला पथक-नायक सांगत होता.

" कामावर असलेल्या पायोनिअर दलांतील स्वयंसेवक, पहिल्या पथकांत पसतीस स्वयंसेवक आहेत. सर्व उपस्थित आहेत. एकानें आपली तांबडी गळपट्टी लावली नाहीं. विसरलों, असें तो म्हणतो."

याप्रमाणें बाकीच्या तीन पथक–नायकांनीं आपापलें वृत्त दिल्यानंतर, " आज शिबिरांतील कामावर दुसऱ्या गटाची नेमणूक केली आहे," म्हणून सोन्यानें जाहिर केलें. आणि त्यांना भोजनगृहाकडे जाण्याचा हुकूम दिला. त्याबरोबर व्हिक्टर व त्याचे दोन स्नेही जोरजोरानें बिगुल वाजवूं लागले.

न्याहारीची व्यवस्था चांगली होती. आमच्या शाळेच्या स्वयंपाक्यांनींच पदार्थ बनविले होते. वाढपीहि नेहमींचेच आमच्या शाळेंतील होते.

न्याहारी होतांच मुलें पुनः एकदां निरनिराळ्या दिशांना पांगलीं. कामावर असणाऱ्या मुलांनीं टेबलें साफ केलीं आणि छावणीच्या सफाईकामाकडे तीं वळलीं.

शिबिरांत पंधरावीस लहान बालकेंहि होतीं. त्यांचा ताबा असलेली एक मुलगी त्यांना घेऊन झाडींत दिसेनाशी झाली. बरेचसे पालकहि तिच्यासमवेत होते. बाकीच्यांपैकीं कांहीं आपल्या पालकांना आजूबाजूचा भाग दाख-

विण्यास घेऊन गेलीं. कांहींजण संध्याकाळीं व्हावयाच्या समारंभाच्या तयारीस लागले.

कांहीं मुलें नदीच्या दिशेनें पसरलेल्या गवताळ मैदानांत कांहीं लाकूडफांटा गोळा करण्यांत गुंतलीं होतीं. रात्रीं शेकोटी-कार्यक्रम येथें व्हावयाचे होते.

सकाळचा बहुतेक वेळ तयारींतच गेला. तेव्हां मी तो वेळ नदीकांठीं भटकण्यांत घालविला. सभोंवार गवताळ कुरणें पसरलीं होतीं. विविध रंगांचीं फुलें त्यांवर विलसत होतीं. मला तो देखावा मोठा मनोरम वाटला. आमच्या शिबिराच्या कांठानें नदीला थोडेसें वाळवंटहि होतें. या बाजूला स्नानाची बरी सोय असावी. शिबिराच्या पाठीमागील वनराई थंडगार असून चटकन् चित्त वेधून घेई. तिथं बेरी खूप आहेत म्हणून मुलें म्हणतच होतीं; आणि दुसऱ्या दिवशीं त्या गोळा करायला जावयाचें मीं त्यांना कबूलहि केलें होतें. दुपारच्या भोजनाची वेळ होईपर्यंत मीं ऊन खात वाळवंटावरच रेंगाळत होतें. मी परतलें तर सारें शिबिर दुपारची विश्रांति घेत होतें, त्यामुळें सर्वत्र अगदीं चिडिचिप झालें होतें.

दुपारचा चहा झाल्यावर समोरच्या मैदानांत खेळ झाले. त्यांत घांवणें, उड्या मारणें, पोहणें, गोळा फेंकणें इ. कार्यक्रम होतें.

सायंकाळचें जेवण सात वाजतां झालें. त्यानंतर शिबिर-ध्वज उभारण्याचा अधिकृत समारंभ झाला. मध्यभागीं उभारलेल्या उच्चासनावरून शिबिर-मुख्यानें छोटेसें भाषण केलें. त्यानें पालकांचें स्वागत केलें आणि सुट्टीचा आनंद मनमुराद उपभोगून पुढील सहामाहींतील अभ्यासासाठीं खूप शक्ति, उत्साह संपादन करा, असा त्यानें मुलांस उपदेश केला. आपल्या शिबिराचे नियम थोडेच आहेत; ते तयार करण्यास तुम्हीं सर्वांनीं साहाय्य केलें आहे, तेव्हां ते नियम पाळण्याची जबाबदारी तुमच्यावर आहेच, असेंहि त्यानें सांगितलें.

त्यानंतर पायोनिअर दलाची मुख्य सोन्या हिला ध्वज चढविण्यास बोलावण्यांत आलें. बिगुल आणि ड्रमच्या आवाजांत तिनें ध्वज उभारला. तो रक्तध्वज जसा अस्मानांत चढून डौलानें फडकूं लागला तसा सर्वांनीं प्रचंड जयजयकार करून राष्ट्रीय गाणीं गाण्यास सुरवात केली.

कवाईत बरखास्त करण्यांत आली. त्याबरोबर जो तो आपापलें ब्लँकेट घेऊन 'शेकोटी' जवळ जागा पकडण्यास पळूं लागला. अद्याप अंधार पडला

नव्हता. तेव्हां सोन्यानें असें सुचविलें कीं, पालकांपैकीं एकानें लालसेनेंत बरेच दिवस काम केलें आहे. तेव्हां त्यांनीं आपल्या जीवनांतले कांहीं धाडसी प्रसंग वर्णन करून सांगावेत. त्यांनीं सांगितलेले अनुभव एखाद्या रोमांचकारी कथेंत शोभण्यासारखे होते. ते ऐकत असतां मुलांचीं चित्तें थरारून गेलीं होतीं. त्यांचें भाषण संपतांच मुलांनीं टाळ्या वाजवून आपला आनन्द व्यक्त केला.

त्यांचें भाषण चालूं असतांच काळोख वाढत गेला. पलीकडील नदीचा ओघ एखाद्या काळ्या फितीप्रमाणें दिसत होता. अंधकार होतांच त्यांतल्या एका मुलानें शेकोटी पेटविली. तिच्यांतून ज्वाला निघूं लागल्या व ठिणग्या सभोंवर फैलावूं लागल्या. गोष्ट संपली. थोडा वेळ सर्वत्र शांतता पसरली. नंतर सोन्यानें एक गाणें म्हणण्यास सुरवात केली. तिच्या मागोमाग इतरांनींहि गाणीं म्हटलीं. शेकोटीमुळें व गाण्यामुळेंहि जवळपासच्या खेड्यांतील मुलें हळू-हळू आमच्याकडे येऊं लागलीं. त्या कडोळ्यांत त्यांचाहि मोठ्या प्रेमानें समावेश करण्यांत आला.

त्यानंतर एक प्रौढ विद्यार्थी उभा राहिला. 'आतां आपण आपल्या कार्य-क्रमास आरंभ करूं या. पहिला कार्यक्रम स्टेलाचें नृत्य हा आहे।' त्यानें सूचना दिली. ॲकॉर्डिन (एक वाद्य) वाजूं लागलें आणि त्या तालसुरावर पावलें टाकीत स्टेला कोठूनतरी अकस्मात् पुढें आली. तिनें किसान–कन्यकेचा पोषाख चढविला होता. तिनें शेकोटीजवळ आपली जागा घेतली. तिनें देशी नृत्याचे बरेच प्रकार दाखविले आणि सर्वांनीं तिचें मोठें कौतुक केलें.

" पुढला कार्यक्रम तिसऱ्या पथकांतील तिसऱ्या गटातर्फे व्हावयाचा आहे. त्याचें नांव 'मी जर्मन भाषा बोलत नाहीं,' असें आहे. तें नाटुकलें मोठें गंमतीदार होतें आणि त्यानें सर्वांची चांगलीच करमणूक केली. जे परभाषा मनापासून शिकत नाहीत त्यांची त्यांत थट्टा उडविली होती. त्यानंतर नृत्य, काव्यगायन, पाठांतर इत्यादि बरेच कार्यक्रम झाले. एकंदर कार्यक्रमाच्या दर्जासंबंधीं माझा अनुकूल ग्रह झाला. वेळ खूपच झर्रकन् निघून गेला.

शेवटीं सर्वांनीं आपल्या घोंगड्या उचलल्या व शिबिराचा रस्ता धरला. ध्वज उतरविण्यांत आला आणि सर्वजण झोंपावयास गेले.

पाहुण्यांना परत नेण्यासाठीं खास मोटर–बसची सोय करण्यांत आली

होतां. ते गेल्यानंतर मीहि झोंपावयास गेलें. माझ्या मनाला खूपच समाधान वाटत हातें. शिबिरांतला माझा पहिला दिवस अतिशय मजेंत गेला होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सोन्या व मी आपापले टॉवेल खांद्यावर टाकून आमचे स्नानाचे पोषाख चढवून गुपचूप शिबिरांतून बाहेर पडलों. दंवबिंदूंनीं आच्छादिलेलें गवत तुडवून नदीकिनारा गांठला. वेळ लवकरची होती तरी चोहोंकडे स्वच्छ प्रकाश पडला होता व हवेंत उष्णता जाणवूं लागली होती.

पोहण्यामुळें आम्हांला खूप तरतरी वाटूं लागली. आम्ही संथपणें आमच्या शिबिराकडे परतलों. पहिल्याच बंगल्यांतील सूचना-फलकावर लावलेली पुढील सूचना वाचण्यासाठीं मी तेथें थबकलें.

वेळापत्रक

| | |
|---|---|
| स. ७ वा. | झोंपून उठणें; कवायत. |
| ७-१५ वा. | मुखमार्जन; बिछाने आवरणें. |
| ७-४५ वा. | ध्वज-सलामी. |
| ८ वा. | न्याहारी. |
| ८-३० ते ११ | विश्रांति ( मोकळा वेळ ). |
| ११ ते १२ | सूर्यस्नान-स्नान; पोहणें. |
| दु. १ वा. | भोजन. |
| १-३० ते ३ वा. | विसांवा. |
| ४ वा. | चहा. |
| ४-३० ते ६-४५ वा. | मोकळा वेळ. |
| ७ वा. | सायंकाळचें भोजन. |
| ८-३० वा. | लहान मुलांनीं झोंपीं जाणें. |
| ९-१५ वा. | ध्वज-सलामी. |
| ९-३० वा. | झोंपावयास जाणें. |
| १० वा. | शेवटचा बिगुल. |

कालच्याप्रमाणेंच आज सकाळच्या कार्यक्रमास सुरवात झाली. सकाळची कवायत, ध्वज-वंदन, न्याहारी. मीं शिबिरांत मुलें हिंडून आपला मोकळा वेळ कसा घालवितात हें पाहण्याचें ठरविलें. मोठालीं मुलें क्रीडांगणाच्या एका कोपऱ्यांत, एका मोठ्या लाकडी टेबलाभोंवतीं गोळा झालीं होतीं. विमानांचे निर-

निराळे नमुने करण्यांत तीं गुंतलीं होतीं. दोघांनीं बलूनें बनविलीं होतीं. त्यांच्या-खालीं थोडासा जाळ करून व आंतील हवा तापवून त्यांनीं तीं वर उडविलीं. लहान मुलांमुलींचा घोळका क्रीडांगणाच्या दुसऱ्या एका टोंकाला फुलांचे वाफे तयार करीत होता. मीं त्यांच्याजवळ जाऊन चौकशी केली. एका सबंध गटानें शिबिराभोंवतीं फुलझाडें लावण्याचें काम अंगावर घेतलें असल्याचें मला आढळून आलें. त्यांच्याजवळ बीं-बियाणें व कलमें इत्यादि सर्व सामग्री जय्यत होती. त्यांनीं मला आतांपर्यंत तयार केलेले वाफे दाखविले, आणि दुसरीकडून आणून तेथें लावलेलीं फुलझाडें जणूं मूळचीं तेथेंच उगवल्याप्रमाणें तेथें फुललीं होतीं.

जिमीचा मासे धरावयाच्या काठीशीं कांहींतरी उद्योग सुरू होता. दोन लहान मुलें त्याला मदत करीत होतीं. मला पुढें आढळून आलें कीं, त्याला लहान मुलांची खूप आवड होती, आणि शिबिरांतील लहान मुलांसाठीं तो नेहमींच कांहींना कांहीं वस्तु तयार करीत असे. त्यामुळें जिमीच्या स्वभावाची मला विशेष ओळख झाली. जिमीनें मला सांगितलें कीं, या नदींत खूप मासे आहेत आणि चौथीमधल्या दोन मुलांसमवेत सायंकाळीं तो नदीवर मासे पकडण्यास जाणार आहे. 'सारा दिवस गळ टाकून बसायला मला कोणीं सांगितलें तर मी आनंदानें बसेन,' तो मला म्हणाला. मला तें ऐकून मोठें नवल वाटलें. कारण साऱ्या मुलांत तो अत्यंत अचपळ होता. अगदीं सुळसुळ भुंगळाच ! तो एका जागीं बराच वेळ स्तब्ध राहूं शकेल, असें मला कधींच वाटलें नव्हतें.

प्रत्येकजण कांहींना कांहीं कामांत दंग असल्याचें मला माझ्या फेरफटक्यांत आढळून आलें. कोणी झाडाखालीं सावलींत वाचीत बसले होते; तर कांहींजण गवतावर बसून गप्पा छाटीत होते; कोणी चित्रें काढण्यांत, तर कोणी लेख लिहिण्यांत गर्क होते; कोणी आपल्या कार्यक्रमाची रूपरेषा आंखीत होते; कांहींचे बगीच्याविषयीं विचार चालू होते; तर कोणी व्यायाम-शिक्षकां-कडून नवीन प्रकार समजावून घेत होते; इतर कांहींजण शिबिराचें आवार साफ करण्यांत गढले होते.

अकराच्या ठोक्याला जो तो स्नानाचा पोषाख चढवून नदीवर स्नानास जावयास तयार होता. शिबिरांतील डॉक्टर त्यांच्याबरोबर होते. मुलांची

व्यवस्था एक ठिकाणीं होती. तेथून जवळच दुसऱ्या ठिकाणीं मुलींची व्यवस्था होती. दोन्ही समूहांमध्यें डॉक्टर उभे होते. "खालीं पडा," असा सर्वांस त्यांनीं आदेश दिला. नंतर घड्याळ पाहून "डाव्या कुशीवर वळा," असा हुकूम दिला, आणि थोड्या वेळानें "उजव्या कुशीवर," याप्रमाणें थोडा वेळ सूर्यस्नान झाल्यावर "पाण्यांत उतरा," असा हुकूम मिळाला. त्याबरोबर त्या मुलांत कोण गर्दी उडाली. पाणी उडवण्याचा डबडब् आवाज आणि हास्यकल्लोळ यांनीं वातावरण भरून गेलें. मलाहि त्या मुलांइतकीच त्या वेळीं गंमत वाटली. लहान मुलांनीं विशेष खोल पाण्यांत जाऊं नये म्हणून मोठ्या मुलांनीं नदींत साखळी धरली होती. लहान मुलांचीं स्नानें आटोपल्यावर मोठ्या मुलांनीं आपलें पोहणें सुरू केलें.

सर्वांना भुका कडकडून लागल्या होत्या हें सांगणें नकोच. मांस, बटाटे, सॅलड आणि शर्करामिश्रित स्ट्रॉबेरीज यांचा भरपूर पुरवठा करून सर्वांची तृप्तता करण्यांत आली.

जेवणानंतरचा नियम असा कीं, तीन वाजेपर्यंत सर्वांनीं आपापल्या बिछान्यावर स्वस्थ पडून राहाणें. प्रथम कांहीं दिवस या विश्रांतीवर डॉक्टर किंवा एखादी परिचारिका, अगर दुसरा कोणी अधिकारी यास देखरेख करावी लागत असे; कारण झोंपण्याची किंवा स्वस्थ पडून राहण्याची कोणासच इच्छा नसे, असें मला सांगण्यांत आलें. पण मी आलें तेव्हां बहुतेक विद्यार्थ्यांना झोंप घेण्याची संवय लागली होती. तास-दीडतास ते सहज झोंपत; आणि त्यांचें त्यांनाच याबद्दल आश्चर्य वाटूं लागलें होतें.

चहानंतर बेरी गोळा करायला आपण जाऊं म्हणून मीं त्यांना कबूल केलें होतें. हातांत पेले घेऊन पंचवीस विद्यार्थी माझ्यापुढें येऊन ठाकले. "बेरीसाठीं मीं दोन पेले आणले आहेत. एक घ्या तुम्हांला," व्होल्गा मला म्हणाली.

बेरी मुबलक असलेल्या वनराईच्या भागांत जाऊन पोहोंचावयास आम्हांस सुमारें दहा मिनिटें लागलीं. व्हिक्टर आपला बिगुल घेऊन आला होता. "बिगुल होतांच तुम्ही मजकडे आलें पाहिजे," तो म्हणाला. "आणि थोड्या थोड्या वेळानें एकमेकास साद द्यायला विसरूं नका, म्हणजे कोणी

चुकणार नाहीं. बाई, मी तुमच्याबरोबर राहातों. म्हणजे बिगुल केव्हां वाजवा-वयाचा तें तुम्ही सांगू शकाल.'' तो मजकडे वळून म्हणाला.

थोडयाच वेळांत सर्वजण स्ट्रॉबेरीज, राजबेरीज् आणि इतर कितीतरी, मला ज्यांचीं नांवें ठाऊक नाहींत अशीं, फळें गोळा करण्यांत गढून गेले. राजबेरींचें तर तेथें रानच माजलें होतें. मुलांच्या एकमेकांना हांका मारण्याचे झाडींतून पडसाद येत होते. बेरी गोळा करायला एक कप कसा पुरतो, हें कोडें मला आतां उलगडलें. कप भरला कीं, झाडाच्या फांदीवर आसन ठोकून जमवलेला माल गट्ट करण्यांत कपाचा धनी गर्क व्हावयाचा। तेवढा पेला रिता झाला कीं, पुनः फळें गोळा करण्याचें काम सुरू।

ती वनराई सुंदरच होती. पांढऱ्याशुभ्र बर्च वृक्षांच्या शोभेस काळसर घनदाट पाईन वृक्षांनीं पूर्णता आणली होती. इतस्ततः लहान झुडुपें विखुरलीं असून हिरवळीवरून पाऊलवाटा पडल्या होत्या. झाडांच्या फांद्यांतून तिरकस रीतीनें डोकावणारे सूर्यकिरण जमिनीवर सोनेरी पट्टे रेखाटीत होते. चहूं बाजूंनीं आनंदी बालकांचा स्वर कानावर येत होता. उन्हाळ्यांतील तो एक सुंदर दिवस होता आणि सर्व मुलांना त्याचा आस्वाद घेतां येत असल्यानें त्याच्या रमणीयतेंत विशेष भर पडली होती. उन्हाळ्याच्या दिवसांत मोठाल्या शहरांतून किती थोडीं मुलें दिसतात हें पाहण्यासारखें आहे. **सोव्हिएट राष्ट्रसंघ हा असा प्रदेश आहे कीं, जेथें मुलांच्या कल्याणाला प्रथम स्थान दिलें जातें, आणि तेंहि मूठभर धनिक मुलांच्या नव्हे, तर सर्वच प्रकारच्या मुलांच्या.**

* * *

याप्रमाणें शिबिरांतली दिनचर्या सुरू होती. आसपासच्या रानांत सहली, पोहणें, खेळणें, वगैरे मोकळया हवेंतील कार्यक्रमावरच भर असे. आमच्या शिबिरांत आजारपण असें आलेंच नाहीं. एकदोघांना किरकोळ थंडीपडसें आलें; पण लगेच त्यांना इतरांपासून अलग करण्यांत आलें. शिबिरांतील स्वच्छता आणि मुलांचें आरोग्य यांवर डॉक्टरांची करडी नजर असे. नाजुक प्रकृतींच्या मुलांना लांबच्या सहलीस जाऊं देत नसत. हृदय अधू असणाऱ्यांना उन्हांतान्हांत जाऊं देत नसत. सर्वत्र स्वच्छता कसोशीनें पाळण्यांत येई.

अन्न भरपूर आणि रुचकर असे. सर्वांना भूकहि सपाटून लागत असे. एकदोघांनीं तर भोजनांत विक्रम करून शिबिरांत नांव कमावलें होतें.

सायंकाळीं ध्वजवंदनाला मुलें जमलीं कीं, त्या दिवसाच्या कार्यक्रमाचा त्या वेळीं आढावा घेण्यांत येत असे व दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम त्या वेळीं जाहीर करण्यांत येत असे. कोणीं नियमभंग केला असल्यास त्यांची या वेळींच माहिती देण्यांत येई. चारचौघांत आपल्या नांवाचा अशा रीतीनें उल्लेख होणें कोणासच आवडणारें नसतें. त्यामुळें एखादें उदाहरण जरी घडलें तरी इतरांना त्यापासून धडा मिळे आणि शिक्षेपेक्षां त्याचा परिणाम अधिक होई.

आमच्या शिबिराची मॉस्कोर्तल आमच्या जिल्ह्याचा रक्तध्वज मिळवण्यासाठीं धडपड चालू होती. उन्हाळ्यांत आमच्या शिबिराच्या तपासणीसाठीं शिष्टमंडळ—एक कमिशन येणार म्हणून आम्ही वाट पाहात होतों. सर्व पायोनिअर स्वयंसेवकांनीं खेळांतील प्रावीण्यनिदर्शक फिती आणि प्रथमोपचारज्ञानाचीं प्रशस्तिपत्रकें मिळवावींत म्हणून पथक—पुढाऱ्यांची खटपट सुरू होती. तसेंच शिबिरांत तयार झालेले नमुने, गोळा केलेले शंखशिंपले, पानें, त्या जिल्ह्यांतील फल-पुष्पासंबंधीं गोळा केलेलीं टिपणें आणि शिबिरांतील विविध विभागांत व छंद मंडळांत चालणाऱ्या हालचालींच्या छायाचित्रांचे संग्रह, या सर्वांचें एक प्रदर्शन भरविण्याची त्यांनीं योजना आंखली होती. त्यांच्यांतीलच कांहीं बुद्धिवान् तरुण फोटोग्राफरनीं हे छायाचित्रांचे संग्रह तयार केले होते.

कमिशननें अचानकपणेंच आमच्या शिबिरास भेट दिली, व सर्व गोष्टींची बारकाईनें पाहणी केली. ते येऊन गेल्यावर त्यांच्या शिफारशींकडे सर्वांचे डोळे लागले होते. " तुमचें शिबिर उत्कृष्ट आहे," कमिशनचे अध्यक्ष म्हणाले होते, " आणि तुम्हांला लाल झेंडा मिळविण्याची संधि मिळेल असें मला वाटतें; पण आपल्या जिल्ह्यांतील आम्हीं पाहिलेलीं शिबिरेंहि चांगलींच आहेत हेंहि सांगायला पाहिजेच. एकंदरीनें चढाओढ मोठी कसोशीची होणार असें दिसतें. आरोग्याच्या बाबतींतली तुमची प्रगति सर्वांपेक्षां अधिक आहे. आणि हिचाच तुम्हांला विशेष फायदा मिळेल."

आमचें संभाषण संपतांच एक लहान बालिका पुढें आली आणि आवेशानें म्हणाली, " मित्र हो, लाल झेंडा आपण निश्चित मिळवणार. आपणांला फक्त

आपल्यांत थोडीशी सुधारणा करावयास पाहिजे, आणि आपला बेत शेवट-पर्यंत तडीस नेला पाहिजे. सर्वांची इच्छा असेल आणि सर्वांनीं प्रयत्न केला तर जमेल." तिच्या मनांतील त्या खळबळीमुळें तिचा चेहरा लाल झाला होता. "होय, आपण जिंकणारच." अशा आरोळ्यांनीं चोहोंकडून तिला प्रत्युत्तर मिळालें.

आणि त्याप्रमाणें त्यांनीं लाल झेंडा जिंकलाहि. हिंवाळी अधिवेशनाच्या आरंभीं मॉस्कोमध्यें भरलेल्या पायोनिअर दलाच्या एका प्रचंड सभेंत तो आमच्या शाळेस देण्यांत आला आणि पुढील वर्षभर तो शाळेंतील सभा-गृहांत डौलानें फडकत होता. त्यानंतर तो जिल्ह्यांकडे परत करण्यांत आला.

सोव्हिएटमधील सामुदायिक जीवन बहुतेक विद्यार्थ्यांच्या पचनीं पडलें होतें आणि त्यांना शिबिराची गोडी लागून त्यांचें मन त्यांत रमलें होतें; त्यामुळें शिस्तीच्या बाबतींत कधीं त्रास वा प्रश्न निर्माण होत नसे. तरी पण एकदोन विद्यार्थी असे निघालेच, कीं ज्यांना शिबिराची शिस्त मानवत नसे, आणि तेथील अधिकाऱ्यांना त्यांना वळण कसें लावावें याचा मोठा पेंच पडला होता.

शाळेंत जरी जिमी व्यवस्थित वागूं लागला होता आणि इतरांप्रमाणें अभ्यासहि करूं लागला होता, तरी शिबिरांत मात्र त्याची वागणूक कांहींशी एकांड्या शिलेदारासारखीच होती. मासेमारीचें त्याला एक प्रकारचें वेडच होतें. सर्व दिवसभर त्याच नादांत तो असे. त्यामुळें तो विश्रांतीकडे किंवा शिबिरांतील कामाची पाळी असतांना त्या कामाकडे दुर्लक्ष करूं लागला. जिमीच्या वर्तनाची चौकशी करण्यासाठीं शिबिरांतील कार्यकारी मंडळाची बैठक बोलावण्यांत आली. त्याच्या गटाच्या नायकानें तक्रार केली कीं, त्याच्या बाबतींत माझा कांहींच इलाज चालत नाहीं, आणि त्याच्यामुळें त्याच्या गटाच्या कामावर पाणी पडत आहे. जिमीला आपल्या समर्थनार्थ कांहींच सांगतां आलें नाहीं. पुनः तुझ्याहातून नियमभंग झाल्यास पायोनि-अर दलाची तुझी लाल फीत काढून घेण्यांत येईल, असा त्यास इषारा देण्यांत आला.

मी या सभेस उपस्थित होतें; आणि गेले सहा महिने मीं जिमीबरोबर काढले असल्यानें त्याच्या प्रकरणांकडे मी मन लावून पाहात होतें. त्याला

अधिक साहाय्य करतां आलें तर करावें असा माझा इरादा होता. त्याला लहान मुलांची आवड होती हें मीं पाहिलें. या गोष्टीचा उपयोग करून घ्यावयाचें मीं ठरविलें.

दुसऱ्या दिवशीं न्याहारीच्या वेळीं मी जिमीला म्हटलें, "मी कांहीं लहान मुलांना बेरी वेंचायला घेऊन जाणार आहें; तूं येशील मदत करावयाला?"

"अवश्य." तो म्हणाला, "चांगल्या बेरी कुठं आहेत हें मला ठाऊक आहे." त्या आमच्या सहलींत त्याची संगत आम्हांस फार सुखावह झाली. अगदीं थोडया वेळांत पेले आणि खिसे भरभरून तो बेरी गोळा करून आणी. त्यानें स्वतः एकहि फळ तोंडांत टाकलें नाहीं. सारीं त्या लहानग्या मुलांना त्यानें वांटून दिलीं, आणि कांहीं निवडक मजपुढें ठेवून मला खाण्याचा आग्रह केला. "मी जातां जातां खाईन." तो मला म्हणाला. त्याची त्या लहान मुलांशीं वागणूक एखाद्या प्रेमळ थोरल्या भावासारखी होती. तो मला म्हणाला, "जेव्हां केव्हां तुम्ही लहान मुलांना घेऊन बाहेर जाल, तेव्हां मला बोलवा. मी तुमच्याबरोबर येऊन हवी ती मदत करीन."

"पण जिमी, तूं तुझी तांबडी गळपट्टी गमावून तर नाहींना बसणार?" मला अगदींच राहवेना म्हणून मीं कांहींशा आतुरतेनें त्यास विचारलें.

"छे, छे. मी आतां विश्रांतीच्या वेळांत मासे पकडायला मुळींच जाणार नाहीं." तो म्हणाला; पण त्याच्या सुरांत एक प्रकारचा मिस्किलपणा दिसत होता. त्यामुळें त्याचें तें बोलणें वरपांगी असावें असें वाटलें.

"तुझी तांबडी गळपट्टी तुला खरंच बहुमोल वाटते?" मीं त्याला विचारलें, "तुला खरंच का पायोनिअर स्वयंसेवक व्हायचं आहे? का इतर मुलं पायोनिअर दलांत गेलीं म्हणून तूंहि गेलास?"

"तसं नव्हे, बाई; मला खरंच पायोनिअर व्हायचंय. पायोनिअर दलांत खूप मौज असते. पण मला मासे पकडायला फार आवडतं हें मात्र खरं. पुढच्या वर्षी मी शिबिरांत येणारच नाहीं. त्यापेक्षा मी माझ्या मावशीकडेच जाईन. ती मॉस्कोपासून लांबच्या एका खेडयांत राहते. तेथें सारा वेळ मला मासे पकडतां येतील."

पण जिमीला आपलें मोहीम आवरून, आपल्या फुरसतीच्या वेळ मासे पकडण्यांत घालविण्यास त्याला परवानगी देण्यांत आली होती. त्याच्या गटाची शिबिरांतील कामाची पाळी दहा दिवसांनीं एकदां होती. तरी पण त्यानें त्या वेळीं आपल्या कामाकडे दुर्लक्ष केलें. दुसऱ्या एका मुलाचें मन वळवून त्याला तो आपल्याबरोबर घेऊन नदीवर गेला. वास्तविक त्या वेळीं शिबिरांतील इतर कामें करण्याची त्यांची पाळी होती. या खेपेस कार्यकारी मंडळास मोठ्या गंभीरपणें या गोष्टीचा विचार करावा लागला; कारण स्वतः तर त्यानें नियमभंग केलाच होता; पण दुसऱ्या एका मुलाला त्यानें आपल्याबरोबर ओढून त्यालाहि नियम मोडावयास लावलें होतें.

त्या दिवशीं सायंकाळीं ध्वज-प्रणामाच्या वेळीं जिमीची पायोनिअरदलाचें चिन्ह जी तांबडी गळपट्टी ती सर्वांसमक्ष काढून घेण्यांत आली. तो जागेवर परतला तेव्हां त्याच्या डोळ्यांत अश्रु आलेले मीं पाहिले. ज्यानें ती गळपट्टी काढून घेतली होती, त्या गटनायकानें थोडक्यांत सांगितलें कीं, "जर जिमीला पुनः ती मिळवायची असेल तर आपल्या गटांतील आपला कामाचा भार त्यानें उचलला पाहिजे आणि इतरांशीं स्नेहभावानें त्यानें वागलें पाहिजे." तें ऐकून जिमीला जरा धीर आला; त्याचा चेहरा आनंदला व डोळे चमकूं लागले. "जिमी, तुला ती गळपट्टी मिळवलीच पाहिजे," त्याच्या शेजारचा विद्यार्थी त्यास सांगत होता. "होय, मी मिळवीनच." तो उत्तरला. त्यानंतर जिमीच्या वागणुकींत थोडी सुधारणा झाली हें खरें; पण त्याला आपल्या सामाजिक कर्तव्याविषयीं फारसा जिव्हाळा कधींच वाटत नव्हता. शिबिर संपेपर्यंत तरी त्याला तें दलचिन्ह परत मिळालें नाहीं. शाळेंत जेव्हां त्यानें आपल्या अभ्यासांत आणि वागणुकींत सुधारणा दाखविली, तेव्हांच त्याला ती गळपट्टी परत मिळाली.

एलिझबेथ ही अवघी चौदा वर्षांची होती. पण आपण म्हणजे मोठ्या बाई झालों आहोंत, असें ती समजत असे. घरच्या लाडानें ती बरीच बिघडली होती आणि ती शिबिरास आली ती केवळ तिच्या मैत्रिणी आल्या होत्या म्हणून. दुपारच्या वेळीं विश्रांति घेणें तिला कमीपणाचें वाटत होतें, आणि रात्रीं १० वाजतां झोंपणें ही गोष्ट तिनें कधीं ऐकलीच नव्हती. तिला चित्रकलेचें चांगलें ज्ञान होतें. आपला बराचसा वेळ ती निरनिराळीं

निसर्गदृश्यें चितारण्यांत घालवीत असे. आपल्या गटाची कामाची पाळी असली तरी ती क्वचितच त्यांना हातभार लावी. त्यामुळें पायोनिअर-स्वयंसेवक तिजवर नाखुष होते.

शिबिराच्या सर्वसामान्य सभेंत तिच्या वागणुकीविषयीं चर्चा करण्यांत आली. सर्वांचें मत असेंच दिसलें कीं, ज्या अर्थी ती आपल्या कामांत लक्ष घालीत नाहीं आणि शिबिराचा कार्यक्रम यशस्वी होण्यास साहाय्य करीत नाहीं, त्या अर्थी तिला पायोनिअर-दलांत मुळींच ठेवूं नये.

एलिझबेथ खूपच रागावली. ती चिडून म्हणाली, "तुम्ही असं कसं म्हणतां? मला पायोनिअर-दलांत राहाण्याची हौस आहे. मला त्यांतून काढण्याच्या गोष्टीला माझा विरोध आहे. मी इतरांइतकी खासच चांगली आहें."

तिच्या गटाची मुख्य सहाव्या यत्तेंतील हेलन नांवाची मुलगी होती. ती मध्येंच म्हणाली, "तसं आहे तर मग आपला गट कामावर असतांना तूं आपला वांटा कां उचलत नाहींस ग! आपल्याला कांहीं कामाचे डोंगर उचलावयाचे नसतात. आपल्याला कोणी भांडीं घांसायला, कपडे धुवावयाला किंवा स्वयंपाक करायला सांगत नाहीं. आपलं सारं काम म्हणजे जेवणानंतर टेबलं साफ करायचीं, झाडून घ्यायचं, वाचनालयाचीं पुस्तकं द्यायचीं-घ्यायचीं, असलीं किरकोळ कामं देखील तुझ्याच्यानं होत नाहींत? आणि काय ग, आपल्या शिबिराच्या नियमाची सदान्‌कदा तूं थट्टा कां उडवीत असतेस? तूं शिबिराच्या कार्यक्रमांत भाग कां नाहीं घेत?"

भिंतपत्रिकाची संपादिका पुढें होऊन म्हणाली, "तुला चित्रं चांगलीं काढतां येतात; पण आपल्या वर्तमानपत्रांत तूं कधींच चित्र काढीत नाहींस, कीं लेखांची सजावट करून देत नाहींस. मीं तुला कितीतरी वेळा म्हटलं; पण तूं मला एकदांहि मदत केली नाहींस."

एलिझबेथ कांहींच बोलली नाहीं. :ती रागानें फणफणत होती. ती पायोनिअर-दलांत सामील झालीच कशी याचें मला आश्चर्य वाटत होतें. कँपच्या मुख्याधिकाऱ्यानें समारोप केला,

" एकंदरीनें असें दिसतें कीं, सामुदायिक जीवनाकडे बघण्याची योग्य दृष्टि एलिझबेथला आलेली नाहीं. पायोनिअर-दलाच्या सभासदास न शोभणारें तिचें वर्तन आहे. तिला चांगलीं चित्रें काढतां येतात ही खरोखर आनंदाची गोष्ट आहे आणि तिच्या चित्रांचा संग्रह आपल्या प्रदर्शनांत मांडला जाईल अशी मला आशा आहे. पण ज्या मनुष्याला समाजांत वागावयाचें आहे, त्याला सामाजिक कर्तव्यें पार पाडलींच पाहिजेत; मग तो कलावन्त का असेना, ही गोष्ट तिला समजली पाहिजे. पायोनिअर होणें म्हणजे काय, हें तिला अद्याप नीटसें समजलें नाहीं. यासाठींच आपण तिचें चिन्ह काढून घेत आहोंत असें माझें मत आहे. तिला पुनः कधीं दलांत यावेंसें वाटलें तर तिनें लेखी अर्ज द्यावा."

जवळ जवळ एकमतानें एलिझबेथला दलांतून काढावयाचें ठरविलें. तिनें आपली लालपट्टी परत करतांनाहि आपल्या उद्धटपणाचें प्रदर्शन केलें. ती अजूनहि रागावलेलीच दिसत होती. पण आंतल्या आंत ती खूप शरमिंधी झाली होती असें मला तरी वाटत होतें.

एलिझबेथच्या वागणुकींत पुढें काय काय बदल होतात, म्हणून मी लक्ष लावून पाहत होतें. ती आपली वागणूक पूर्ववत् चालू ठेवील अशी माझी कल्पना होती; पण ती चुकीची ठरली. तिच्या अभिमानाला जबरदस्त धक्का बसला होता आणि आपल्या मित्रांत आपली जी चहा व्हावी असें आपल्याला वाटतें, ती होत नाहीं, असें तिला कळून चुकलें. ती शिबिराच्या वृत्त-संपादकाकडे गेली व आपण कशी मदत करूं शकूं याची तिनें चौकशी केली. अगदीं मन लावून तत्परतेनें ती आपलें काम करूं लागली. अगदीं कुरकुर न करतां दुपारीं ती विश्रांति घेऊं लागली. एका शेकोटी-कार्यक्रमांत तिनें एक जिप्सी गाणें म्हणून दाखविलें आणि टाळ्या मिळवल्या. यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें तिच्यांत बदल झाला होता.

ऑगस्टमधील एका रम्य दिवशीं शिबिर बंद झालें. त्यापूर्वीं एकदां पोहण्याचा कार्यक्रम झाला; रानांत एक सहल निघाली; आणि एक जंगी व अतिसुंदर असा अखेरचा शेकोटी-कार्यक्रम झाला. निशाण उतरवलें; आणि जो तो नुकत्याच मिळवलेल्या विजयाच्या फिती जवळ घेऊन गाढ झोंपी

गेला. ते इतके मनस्वी थकले होते कीं, घरच्या प्रवासाचा विचारहि त्यांच्या मनास शिवला नाहीं.

आमची खास गाडी जेव्हां मॉस्कोंत शिरली, तेव्हांचें दृश्य मोठें मनोहर होतें. खिडकीखिडकींतून मुलें बाहेर डोकावत होतीं; खड्या सुरांत गाणीं गात होतीं. पालकांच्या भेटीसाठीं आणि घरीं जाण्यासाठीं तीं अधीर झालीं होतीं. तो आनंद त्यांनीं लुटला आणि पुढील अभ्यास करून करण्यासाठीं एक सप्टेंबरला पुनः तीं सिद्ध झालीं.

# १० भिंतपत्रिकांतील कांहीं उतारे

शालेय वर्तमानपत्रें विद्यार्थी, मुलें वा इतर कर्मचारी नियमितपणें प्रसिद्ध करतात. त्यांचा उद्देश टीकेनें वा आत्मपरीक्षणानें कामांत सुधारणा होऊन त्यांचा दर्जा अधिक उच्च व्हावा हाच असतो. शिक्षकांच्या पत्रासाठीं संपादकीय मंडळ कामगार-संघ-समिति निवडते; विद्यार्थ्यांच्या बाबतींत सर्व विद्यार्थ्यांची सभा भरून संपादक-मंडळाची निवडणूक होते.

वर्तमानपत्रांतील लेख बहुधा हातानेंच लिहिले जातात. कधीं कधीं मुख्य लेख टंकलिखितहि करून घेण्यांत येत. हे लिहिलेले वा टंकलिखित कागद एका मोठ्या कागदावर डकविण्यांत येतात. त्यांमध्यें प्रचलित विषयांवरील मासिकांतून कापून घेतलेलीं किंवा हातानें काढलेलीं व्यंगचित्रेंहि असत. त्यामुळें त्यांना खुसखुशितपणा येत असे. हा मोठा कागद मोठ्या व्हरांड्यांत अथवा दुसऱ्या एकाद्या सार्वजनिक जागीं टांगण्यांत येई. मुलांची त्याभोंवतीं नेहमींच गर्दी असावयाची. आपले निकाल कसे लागले, प्रगति काय झाली, सूचना काय आहेत, कोणीं टीका केली आहे, हें जाणून घेण्याची सर्वांसच उत्कंठा असे.

आमच्या शाळेंतील भिंतवृत्तपत्र म्हणजे एक खळबळ उडवून देणारी चीज होती. आमच्या मुलांत कलावन्त पुष्कळ होते; आणि प्रत्येक वर्गाचें स्वतंत्र वर्तमानपत्रहि होतें. शिवाय, सर्व शाळेचें मिळून ' द स्कूल *प्रवदा ' नांवाचें एक

*' प्रवदा ' हें मॉस्कोंतील एका मोठ्या वर्तमानपत्राचें नांव आहे.

पत्र असे. या पत्रांत साम्यवादी चढाओढींचे निकाल जाहीर होत. प्रत्येक सहामाहींत मिळालेले गुण तुलनात्मक दृष्टीनें त्यांत मांडण्यांत येत. कच्च्या विद्यार्थ्यांवर खरमरीत टीका होई आणि प्रचलित घडामोडींचीहि त्यांत चर्चा असे. विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या कविता, गोष्टी, त्यांनीं काढलेलीं व्यंग्य-चित्रें यांचाहि त्यांत समावेश असे.

'द टीचर्स व्हॉईस' ( शिक्षकांची गर्जना ) हें पत्र शिक्षकांच्या खोलींत लावण्यांत येई. शाळेच्या मासिक कामकाजाचें त्यांत प्रतिबिंब पाहावयास सांपडे. आमच्या शिक्षकवर्गांतहि कलाचतुर शिक्षकांचा भरणा होताच. आमच्या कामांतील दोषांवर झगझगीत प्रकाश टाकणारें एखादें व्यंगचित्र हटकून त्यांत असावयाचें.

निरनिराळ्या प्रसंगीं भिंतीवर लावण्यांत आलेल्या पत्रकांतून कांहीं उतारे मी पुढें देत आहें. त्यांचा उद्देश त्यावरूनच सहज स्पष्ट होईल. सोव्हिएटच्या शाळांतील दैनंदिन जीवनाचें थोडेंसें दर्शनहि ते घडवून देतील.

*　　*　　*

## सदा तत्पर

( ४ थ्या गटाचें पत्र – यत्ता – ३ री व ४ थी )

५ नोव्हें. १९३७

### आमचा वर्ग

चौथ्या यत्तेनें यंदा चांगलें कार्य केलें आहे. आमची शिस्त उत्कृष्ट राखून आमच्या अभ्यासांत खूप प्रगति दाखवावयाची, अशी प्रतिज्ञा आम्हीं केली होती. ती आम्हीं पार पाडली. बॉबी हा एकटाच विद्यार्थी वर्गांत मागें पडला. तो मन लावून अभ्यास करीत नाहीं. अनेकदां तो आपले गृहपाठ करून आणीत नाहीं. त्याला पायोनिअर-दलांत जाण्याची जर इच्छा आहे, तर मग त्यानें समाधानकारक प्रगति दाखविली पाहिजे.

आमच्या वर्गाचे निकाल इतरांच्यापेक्षां सरस असल्यानें उद्यांच्या सभेंत लाल झेंडा आम्हांसच मिळणार अशी आमची समजूत आहे.

निना एम्. ( वय ११½ )

*　　*　　*

## बॉबी

बॉबीनें आमच्या वर्गास गालबोट कां लावावें? सुटीनंतर होणाऱ्या पहिल्याच वर्गसभेंत आपण त्याच्याविषयीं चर्चा केली पाहिजे. त्या वेळीं त्याच्या आईसहि बोलवावें. आपले गृहपाठ करण्याविषयीं मी त्याला आठवण देतों व अशा रीतीनें त्यास साहाय्य करतों. पण त्याच्या तें लक्ष्यांतच राहत नाहीं. तो माझ्या मतानें खरोखरी खराब मुलगा नाहीं. जरासा आळशी आहे, इतकेंच. इंग्लिश व रशियन यांमध्यें त्याला अधिक गुण मिळण्यासाठीं आपण सर्वांनीं त्यास मदत केली पाहिजे.

ब्लादिमिर ( वय ११ )

* * *

## ऑक्टोबर क्रांतीचा विसावा वाढदिवस

सात तारखेला हा दिन सर्वांनीं साजरा करावयाचा आहे. सर्वत्र लाल बावटे उभारावयाचे. घोषणा म्हणावयाच्या. सर्व सोव्हिएट राष्ट्र-संघांत हा महोत्सव साजरा होणार आहे.

आपल्या देशांत सर्व गोष्टी कामकऱ्यांच्या मालकीच्या आहेत. त्यामुळें प्रत्येकजण सुखी आहे. माझे वडील *स्टॅखॅनोव्हाईट आहेत. क्रान्तीपूर्वी त्यांचें व माझ्या आजोबांचें जीवन किती कष्टाचें होतें, हें त्यांनीं मला समजावून सांगितलें. आतां आम्हांला राहावयास भरपूर जागा आहे. सर्व हव्या त्या वस्तु आम्हांस आतां मिळतात.

ऑक्टोबर क्रान्ति चिरायु होवो!

लेऑन सी ( यत्ता ३, वय ९½ )

* * *

## सात नोव्हेंबर

गतवर्षी या दिवसांत मी अमेरिकेंत होतों. ऑक्टोबर क्रान्तीचा वाढदिवस साजरा करण्यासाठीं आम्ही एका मेजवानीस गेलों होतों. पण या वर्षी मी

---

*स्टॅखॅनोव्ह हा एक खाणीकामगार होता. कामांत व्यवस्थितपणा आणून उत्पादनाचें प्रमाण वाढविण्यासाठीं तो झटला. त्याप्रमाणें वागणारा तो स्टॅखॅनोव्हाईट.

माझ्या वडिलांच्या कारखान्यांतील लोकांबरोबर रेडस्क्वेअरमध्यें मिरवत जाणार. तेथील लाल ध्वजाची शोभा मला पाहावयास मिळेल. माझे वडील मला खांद्यावर उचलून घेतील. मग मला कॉ. स्टॅलिन व कॉ. व्होरोशिलॉव बघावयास मिळतील. मी हात उंच उडवून आनंदानें जयघोष करीन. कारण हा मोठा आनंदाचा सण आहे.

सेमूर ( ३ री, वय १० ).

* * *

## साम्यवादी चढाओढ

( शाळेंतील खालच्या वर्गांतील साम्यवादी चढाओढींचे निकाल पुढें दिल्याप्रमाणें आहेतः

| | |
|---|---|
| यत्ता २ री | सर्व उत्तीर्ण. |
| | शिस्त उत्कृष्ट. |
| यत्ता ३ री | रशियनमध्यें दोन कच्चे ( जॉर्ज व स्वेतलाना ). |
| | इंग्लिशमध्यें एकजण मागें ( व्हिक्टर ). |
| | शिस्त ( तीन दिवस वगळतां ) उत्कृष्ट. |
| यत्ता ४ थी | इंग्लिशमध्यें एक कच्चा ( बॉबी ). |
| | रशियनमध्यें एक कच्चा ( बॉबी ). |
| | शिस्त उत्कृष्ट. |

पंचांनीं दोन ध्वज द्यावयाचें योजलें आहे. त्यांतला एक दुसऱ्या यत्तेला मिळणार. यत्ता चौथींतल्या मुलांनीं पण झटून अभ्यास केला आहे. त्यांचे निकाल पण चांगले आहेत, म्हणून आम्ही त्यांनाहि एक लाल झेंडा देतों. बॉबीनें पुढील सहामाहींत अधिक झटून अभ्यास करावा, अशी आमची सूचना आहे.

( सह्या ) सेमूर ( ३ री )
एव्हालिन ( २ री )
व्लादिमिर ( ४ थी )
मुख्याध्यापक
वर्गशिक्षक ( ३ री )

* * *

## द सर्चलाईट ( प्रदीप )

### ७ वीचें मुखपत्र

### वर्षअखेर-नमस्ते !

मीं अँग्लो–अमेरिकन शाळेंत गेलीं चार वर्षें काढलीं. माझ्या जीवनांतील अति मनोरम असा हा काळ ठरेल, असें मला वाटतें. येथें मला इतक्या विविध प्रकारचें आणि विविध प्रकारांनीं शिक्षण मिळालें आहे, इतक्या नवनवीन गोष्टी मीं शिकलें आहें कीं, मुख्याध्यापकांचें व सर्व शिक्षकांचें मीं कसें उतराई व्हावें हेंच मला समजत नाहीं.

अमेरिकेंत आम्हांला निरनिराळे विषय शिकवीत; पण ते कां शिकावयाचे, हें कधींच समजून देत नसत. उदा. आम्हांला अंकगणित शिकवीत. आम्ही उदाहरणेंहि करीत असूं; पण त्या आंकडेमोडीमागचें कांहींच तत्त्व आम्हांला माहीत नसे. आम्ही कां शिकतों हेंच मुळीं आम्हांला ठाऊक नसे.

येथें एखादा विषय कां शिकावयाचा तें तर आम्हांला सांगतच. त्यांतील तत्त्वेंहि स्पष्ट समजावून देत; पण मुख्य म्हणजे आमचें सारें जीवन मोठें मजेंत जात होतें. स्वतःच्या विचारांविकारांचा आविष्कार करण्याची व चारित्र्य-संवर्धनाची शाळा ही मुख्य जागा आहे.

कला–मंडळामुळें आपल्याला चित्रकार व्हावयाचें अशी इच्छा माझ्या अंतः-करणांत निर्माण झाली. मीं सध्यां जरी आणखी तीन वर्षें पुढील अभ्यासा-साठीं रशियन शाळेंत जात असलें, तरी मी माझी चित्रकला कायम ठेवीन आणि दहावें वर्ष संपलें कीं, चित्रकलेच्या संस्थेंत दाखल होईन.

मला माझ्या पायावर उभें राहून माझ्या चरितार्थाचा प्रश्न सोडवितां येईल, असा मला विश्वास वाटतो; कारण सोवियत भूमींत कोठेंच बेकारी नाहीं. माझ्या वडिलांनीं याच देशांत राहावयाचें निश्चित केलें, हें माझें केवढें भाग्य !

मेरी ( वय १६ )

* * *

## एक सूचना

प्रथम मी गणित, इतिहास व भूगोल या विषयांच्या शिक्षकांचे त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन-कौशल्याबद्दल आभार मानतों. मला गणिताची खूप आवड निर्माण झाली असून पुढें मीं गणित घ्यावयाचें ठरविलें आहे.

एका गोष्टीवर मात्र मला टीका करावीशी वाटते. आणि ती म्हणजे कॉ. ग्रँट यांची पदार्थविज्ञान व रसायन हे विषय शिकविण्याची पद्धति. त्यांना आपल्या विषयाचें उत्कृष्ट ज्ञान आहे; पण आपल्या विद्यार्थ्यांविषयीं ते बेफिकिर आहेत. ते त्यांची वरचेवर चाचणी घेऊन त्यांना गुण देत नाहींत, आणि विद्यार्थ्यांना गृहपाठहि फार देतात. आम्ही आमची तक्रार वर्गसभेपुढें अनेकवार मांडली होती आणि त्यासंबंधीं आमचीं मतें शिक्षकवर्गास ठाऊक आहेत.

आम्ही आतां निरोप घेत आहोंत. पण कॉ. ग्रँटनीं आमची टीका विचारांत घ्यावी आणि पुढील वर्षी त्या अनुरोधानें आपलें कार्य करावें, अशी आमची त्यांस विनंति आहे; म्हणजे पुढील वर्षीच्या सातवीच्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या-विषयीं आमच्याप्रमाणें ग्रह होणार नाहीं.

पीटर ( वय १५ )

* * *

## द टीचर्स व्हॉईस

### ( शिक्षकांची गर्जना )

### शेवटच्या सहामाहीचें काम

पुढील सहामाही म्हणजे परीक्षेपूर्वीची अखेर संधि. प्रत्येक विद्यार्थ्याला वर्षासाठीं नेमलेल्या सर्व विषयांच्या अभ्यासक्रमाची यथायोग्य कल्पना येईल, अशा तऱ्हेनें आपल्याला आपल्या कामाची आंखणी केली पाहिजे. वर्गाच्या सल्लागार शिक्षकांनीं आपापल्या वर्गाला परीक्षेच्या तयारीसंबंधीं योग्य त्या सूचना द्याव्यात आणि आपल्यापुढें असलेल्या वेळेचा सदुपयोग कसा करावयाचा याची कल्पना द्यावी.

शिक्षकांनीं प्रत्येक तासांतील निदान दहा मिनिटें तरी ह्या आवृत्तीसाठीं राखून ठेवावीत. अशा रीतीनें पुढील सहामाहीअखेर सर्व विषयांची उजळणी संपवावी. आपापल्या विषयांतील प्रश्नांच्या याद्या टंकालेखित करण्यासाठीं

त्यांनीं तयार ठेवाव्यात; म्हणजे योग्य वेळीं मुलांच्या माहितीसाठीं त्या फलकावर लावतां येतील.

अधिक तपशिलाची चर्चा पुढील शिक्षक-सभेंत होईल. ही केवळ स्मरणार्थ सूचना आहे. पुढील सहामाहीच्या कामाबद्दल शिक्षकांनीं आतांपासून विचार करावयास लागावें, या हेतूनें ती करण्यांत येत आहे. उन्हाळ्याच्या सुटीचा त्या दिशेनें शिक्षकांनीं विनियोग करावा.

डी. एल्.

* * *

## स्त्री दिन

८ मार्चचा स्त्री-दिन आम्हीं मोठ्या आनंदानें साजरा केला. सोव्हिएट भूमींतील हें माझें पहिलेंच वर्ष असल्यानें मला तो अगदीं नवीनच अनुभव होता.

माझ्या लहानग्या मुलीला जेव्हां पारितोषिक देण्यांत आलें, तेव्हां तर माझें अंतःकरण आनंदानें उचंबळून आलें. कारण, विवाहित स्त्रीशिक्षकांची सोव्हिएट-प्रदेशांत योग्य कदर होते. त्यांना मान दिला जातो, याची निदर्शकच ती घटना होती. सर्व विवाहित स्त्रीशिक्षकांना त्यांच्या मुलांसाठीं अशींच पारितोषिकें मिळालेलीं पाहून त्यांचा मथितार्थ माझ्या लक्षांत आल्यावर तर माझें अंतःकरण अगदीं सद्गदित झालें.

त्या सायंकाळीं झालेली सुंदर मेजवानी हाहि एक दुसरा मला नवीन अनुभव होता. उत्कृष्ट पक्वान्नें मांडलेल्या टेबलांच्या लांबलांब रांगा, कार्यकर्त्या स्त्रियांच्या सन्मानार्थ दिलेलीं उंची मद्यासवें, आपापल्या सायंकाळच्या पोषाखांत भूषित होऊन आलेल्या आसपासच्या कारखान्यांतील स्त्रीपाहुण्या, यांतील प्रत्येक गोष्ट सांगत होती कीं, 'रशिया म्हणजे उपासमारीचा देश' ही बाहेरच्या जगांत रशियाविरुद्ध पिकवली जाणारी कंडी पूर्णपणें असत्य-मूलक आहे. मित्रहो, रशियांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें कसे हक्क आहेत, तेथील मातांना किती मान मिळतो, त्यांना किती सवलती मिळतात, याविषयीं कोणाहि संशयात्म्याची खात्री पटविण्यास तो एक समारंभ पुरेसा होता.

एम्. के.

* * *

## कामगार-सभा

आपली कामगार-संघ-समिति अलिकडे आळसावत कां चालली आहे? रोज सकाळीं ११ वा. भोजनाची सोय होईल, म्हणून आम्हांस आश्वासन देण्यांत आलें होतें, तें सहज जमेल म्हणूनहि सांगण्यांत आलें होतें. पण आमच्या अध्यक्षांनीं अद्याप कांहींच हालचाल केलेली दिसत नाहीं. कॉ. रोजर्स् उठा, जाग्या व्हा.

मला आणखीहि एका गोष्टीवर टीका करावयाची आहे; ती म्हणजे नाटकांचीं तिकिटें आणण्याची व वांटण्याची पद्धति. आपल्या शिक्षकमंडळींच्या आवडी-निवडींचा परिचय करून घेणें, तिकिटें घेण्याविषयीं ती उत्साह दाखवीत नसली, तर त्यांस नाट्यगृहास जाण्यास प्रोत्साहन देणें, हें सांस्कृतिक कार्यकर्त्यांचें कर्तव्य आहे. जे कोणीं आपलीं नांवें देतात, आणि मागें लकडा लावतात, त्यांच्याचसाठीं तिकिटें आणण्याची कॉ. गोल्डबर्ग सोय करतात. त्यांनीं सूचना-फलकाचा उपयोग करून अगदीं अलीकडील नाटकांचे खेळ कोणते आहेत, चित्रपट कोणते आहेत, यांची माहिती फलकांवर लावावी, म्हणजे आम्हांस जगांत काय चाललें आहे याची कल्पना येईल. प्रत्येक सहामाहींतून सर्वांचा सामुदायिक कार्यक्रम एकदां तरी व्हावयास पाहिजेच. अध्यक्षमहाशय, या बाबतींत आपण काय करणार?

जी. सी.

[ टीपः—वरील सूचना रास्त असून ती विचारांत घेण्यांत येत आहे. ]

पी. आर्.

अध्यक्ष, का. सं. समिति.

* * *

## निरक्षरता

माझें वय आतां पन्नाशीच्या वर आहे. म्हणून कामगार-संघामार्फत निरक्षरतेच्या उच्चाटनासाठीं चालविण्यांत येणाऱ्या वर्गांत जाण्याची मजवर सक्ति नाहीं; पण मी अक्षर-शत्रु कां राहावें? मला आतां थोडें थोडें लिहितां येतें, आणि मी वर्तमानपत्रें वाचूं शकतें.

'मार्च'ला मला माझ्या कामाबद्दल 'प्रिमियम' मिळालें. मला त्याबद्दल किती अभिमान वाटतो! आमच्या अभ्यास-मंडळाच्या प्रगतीचा अहवाल

तेथें वाचला. तो ऐकून मला फार भूषण वाटलें. भित-वृत्तपत्रासाठीं एक एक लेख लिहिण्याची आम्हीं प्रतिज्ञा केली.

क्रान्तीपूर्वी माझें जीवन म्हणजे नुसता काळोख होता. आणि माझी उपासमार चालू होती. आतां माझ्या मुलांचें शाळेंत व्यवस्थित चाललें आहे. तीं मला म्हणतात, "आई, आमचें एकदां शिक्षण संपूं दे. मग तुला मुळींच काम करावयाची जरूर नाहीं. तूं अगदीं आराम कर." मला जरी साधी मोलमजुरी करावी लागत असली आणि कपड्यांच्या खोलीची व्यवस्था ठेवण्याचें माझें काम असलें, तरी माझीं मुलें वाकबगार कामगार होत आहेत; आणि त्यांना पगारहि चांगला मिळेल.

शूरा ( एक नोकर )

* * *

## साम्यवादी प्रतिज्ञा

आम्हीं, खालीं सह्या करणारे, पुढील मुद्यांबाबत साम्यवादी चढाओढींत दाखल होत आहोंत. पुढील सहामाहीअखेरपर्यंत आम्ही आमच्या प्रतिज्ञा पुऱ्या करणार आहोंत.

१. आमच्या वर्गांतील सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होतील; शें. ५० तरी उत्कृष्ट निघतील आणि 'बरा' असा शेरा असणारांचें प्रमाण अत्यंत अल्प असेल, यासाठीं आम्ही झटूं.

२. प्रत्येक विद्यार्थ्याला तोंडीं उत्तरें द्यावयास निदान दोनदां तरी संधि देऊं.

३. वह्या गोळा झाल्याबरोबर त्या तपासून देऊं.

४. एखादा विद्यार्थी कच्चा आहे असें आढळतांच एका आठवड्याच्या आंत त्याला वैयक्तिक साहाय्य करूं.

५. आमच्या कामाची योजना बद्ध ( प्लॅन्स ) करूं. वर्षाचा अभ्यास योग्य वेळांत संपवून परीक्षेपूर्वी आवृत्तीला भरपूर सवड मिळेल अशी दक्षता घेऊं.

डी. एल्. ( गणित )

एल्. जां. ( पदार्थविज्ञान व रसायन )

## ११ दुर्वर्तनी मुलें आणि मुली

एके दिवशीं मी हॉलंडबाईच्या बिऱ्हार्डी तीस भेटण्यासाठीं गेलें होते. आमची मैत्री खूप दृढ झाली होती आणि आम्ही आमचा मोकळा वेळ एकमेकींच्या संगतींत घालवीत असूं. नवीनच बांधलेल्या एका इमारतींत तिनें जागा घेतली होती. सभोंवतालीं जागा खुली असून त्यावर हिरवळ पसरली होती. अधूनमधून लहान लहान झाडें असून लवकरच तीं वाढून शीतल छाया त्यांजपासून लाभण्याची आशा होती.

जिना उतरून रस्त्यावर येत असतां जिन्याच्या तबकडींत कांहीं मुलांचा घोळका जमलेला आम्हीं पाहिला. तीं मुलें खूपच गोंगाट करीत होतीं. त्यांतील एक सुमारें तेरा वर्षांचा मुलगा होता आणि तो सिगरेटचे झुरके ओढीत होता. आम्ही तात्काळ तेथें थांबलों आणि त्या मुलाशीं संभाषण करूं लागलों.

"तूं सिगरेट कां रे ओढतोस ?" मीं त्या मुलास विचारलें.

"जीवनांतला हा एक शोक आहे." तो म्हणाला. उपहासगर्भ मिस्किल-पणाची झांक त्याच्या चेहऱ्यावर होती.

"असेल. पण मी न्यू यॉर्कला परत गेल्यावर अमेरिकन मुलांना तुझी ही हकीगत सांगतांना मला शरमच वाटेल." हॉलंडबाई बोलूं लागली. "सोव्हिएट संघांतलीं मुलें फारच छान, असं तीं मानतात. त्या मुलांच्या-

साठीं किती गोष्टी सोव्हिएट सरकार करतें. त्यामुळें सोव्हिएटमधील मुलें म्हणजे आदर्श बालकें बनायला पाहिजेत, असं त्यांना वाटतं—आणि आतां तूं स्वतांकडे पाहा."

अमेरिकेचें नांव काढतांच मुलें आमच्याभोंवतीं गोळा झालीं. "आम्हांला अमेरिकेबद्दल कांहीं तरी सांगा." म्हणून उत्सुकतेनें तीं आम्हांस म्हणूं लागलीं. सिगरेट ओढणाऱ्या मुलावरची आपली दृष्टि न काढतांच कॉ. हॉलंड सांगूं लागली. न्यू यॉर्कमधील गगनचुंबी इमारतींचें वर्णन तिनें मुलांस सांगितलें.

"पण तें आम्हांला ठाऊक आहे." मुलांनीं मध्येंच अडवून म्हटलें. "आम्ही तें शाळेंतच शिकलों आहों. तिथलीं मुलं कशीं वागतात—राहतात, तें सांगा. आमच्यासारख्या शाळा तेथें आहेत काय? उन्हाळी शिबिरें तेथें असतात का? अमेरिकेंत 'पायोनिअर्स' आहेत का?"

"तुम्ही असं करा, तुम्ही आमच्या शाळेंत या. तिथं अमेरिकेंतलीं पुष्कळ मुलं आहेत. तुम्हांला हवी असलेली सारी माहिती तीं तुम्हांला सांगतील. मी तुम्हांला पत्ता देतें. पण मला तुम्ही सांगा कीं, तुमच्या मित्राला तुम्ही सिगरेट कशा ओढूं देतां? तुमच्यामध्यें तर मला कितीतरी जण 'पायोनिअर दिसतात. तुम्ही तुमचा मोकळा वेळ कसा घालवितां? तुमचा एखादा लाल-कोना या इमारतींत नाहीं काय?"

त्यांच्यापैकीं एकानें उत्तर दिलें, "युरा मोठा खराब मुलगा आहे. त्याची आई वारली आहे. खूप दिवस झाले त्याला. नि तो वडिलांचें मुळींच ऐकत नाहीं. आमच्या या इमारतींत क्रीडासंघ किंवा लालकोना नाहीं. आम्ही गृह-समितीला पुष्कळदां सांगितलें; पण कोणीच लक्ष देत नाहीं. नुसते 'हो' 'हो' म्हणतात."

"ठीक आहे. या बाबतींत मी तुम्हांस साहाय्य करीन." कॉ. हॉलंड म्हणाली, "युरा, ही गृहसमिति कुठं आहे, तें मला दाखव. आम्ही त्यांच्याशीं या बाबतींत बोलूं. पण तुमच्या लालकोन्यांत तुम्ही काय करणार तें मला सांगा."

"आम्ही बुद्बळें खेळूं."

"शिवणकामाचा वर्ग."

" नाटक—नाटक."

" मैदानी खेळ."

एकंदरीनें मुलांचीं उत्तरें इतकीं भराभरा येत होतीं कीं, आपणांस काय हवें, याची त्यांना जाणीव असल्याचें स्पष्ट दिसत होतें.

" बरं आहे. आतां मला गेलं पाहिजे. उद्यां सकाळीं युरा नि मी गृह-समितींत जाऊं नि आम्हांला काय करतां येतं तें पाहूं. कबूल ?"

" मंजूर. " युरा म्हणाला.

" जर तुम्हांला कोणाला शाळा सुटल्यावर आमची शाळा बघावयाची असली, तर हा पत्ता. " असें म्हणून एका कागदाच्या तुकड्यावर पत्ता लिहून हॉलंडनें तो एका मुलाच्या स्वाधीन केला. " नमस्ते. भेटूं या पुन्हा लवकरच." असें म्हणून आम्हीं निघालों.

" नमस्ते, नमस्ते." आम्ही उतरत असतां त्यांनीं आम्हांस ओरडून अभिवादन केलें.

दुसऱ्या दिवशीं सुटीचाच दिवस होता. तेव्हां ठरल्याप्रमाणें कॉ. हॉलंड व युरा गृहसमितीच्या अध्यक्षांस भेटावयास गेलीं. " आपलं घर अगदीं नवीन बांधलेलं, इतकं मोठं-पण त्यांत मुलांसाठीं क्रीडामंदिर–लालकोना नाहीं हें कसं काय ?"

" म्हणजे लालकोना ना ? हो, हो. आम्ही तो एक मेपासून सुरू करणार आहोंत ना !"

" पण तो उघडावयाला दोन महिने थांबावयाची मुळींच गरज नाहीं; त्याची ताबडतोब निकड आहे. या आमच्या बालमित्रांपैकीं कांहींजण विड्या ओढूं लागले आहेत. ते वाहवत चालले आहेत. आणि तुम्ही वाट पाहत आहांत एक मेची. तें कांहीं नाहीं. उद्यांपासून क्रीडामंदिर उघडलें गेलें पाहिजे. या कामीं हा आठवडाभर मी तुम्हांस सायंकाळीं मदत करीन. युरा आणि त्याचे मित्रहि येतील. तोंपर्यंत तुम्हांला योग्य मनुष्य शोधावयाला वेळ सांपडेल."

" पण इतक्या झटपट हें कसं जमणार ? सामानसुमान अद्याप कांहींच नाहीं. खोलीहि स्वच्छ करायची आहे......."

" मनांत असलं तर सगळं कांहीं शक्य होतं." कॉ. हॉलंड त्यांना मध्येंच थांबवून म्हणाली. " १९१७ त लोकांना जेव्हां क्रान्ति घडवून

आणावयाची होती, तेव्हां त्यांनीं अशा सबबी कधीं सांगितल्या नाहींत. यापेक्षां किती मोठीं कामं थोड्या वेळांत झालीं आहेत. तुम्ही मजजवळ थोडे पैसे द्या. टेबल, खुर्च्या वगैरे सामानाची तजवीज मी करतें.''

अखेर तिचा निग्रह यशस्वी झाला. लालकोनासाठीं राखून ठेवलेली खोली तिला दाखविण्यांत आली. तितकीशी ती मोठी नव्हती. पण सुरवातीला बरी होती. ते वर गेलेलें पाहतांच युरानें सिगारेट शिलगाविली, आणि आपल्या मैत्रिणीकडे चोरून पाहिलें. ती कांहींच बोलली नाहीं. जणूं कांहीं नित्याचीच गोष्ट घडत असून ती आपल्या गांवींहि नाहीं असें तिनें दर्शविलें.

"युरा, दोन मुलांना नाहींतर मुलींना घेऊन माझ्या खोलीवर ये जरा. क्रीडामंदिराचें उद्‌घाटन कसें करावयाचें तें आपण ठरवूं या. अध्यक्षांनीं दिलेले तीनशें रूबल्स मजजवळ आहेत. टेबल, खुर्च्या वगैरे सामान खरेदीसाठीं दुपारीं आपणांस बाहेर पडावें लागेल. तसंच आपला हा संघ चालवायला आपल्याला एक लहानसं मुलांचं कार्यकारीमंडळ निवडलं पाहिजे. आपला संघ सुरू होतांच पहिल्याच सभेंत त्याची आपण निवडणूक करूं.''

कॉ. हॉलंडच्या दाराशीं मी जाऊन पोहोंचतें तोंच युरा एका मुलास व मुलीस घेऊन आला. आमच्या बैठकीसाठीं त्यांस त्यानें निवडलें होतें. आम्ही एकत्र बसून पैशाचा पहिला हप्ता मिळाला होता त्याचा कसकसा खर्च करावयाचा याची यादी केली. एक लांब टेबल, बारा खुर्च्या, पडदे, सहा बुद्धिबळाचे डाव, एक बिलियर्डचा सेट, सोंगट्या, इ. वस्तु घ्यावयाचें आम्हीं ठरविलें. तसेंच खुल्या अंगणांत व्हॉलीबॉलसाठीं अंगण तयार करून देण्यास व त्यासाठीं एक जाळें व दोन चेंडू आणून देण्यास गृहसमितीस सांगण्याचें आम्हीं ठरविलें.

एका मुलीनें शिवणकाम-मंडळ उघडण्याची सूचना केली. आठवड्यांतून एकदां येऊन तो वर्ग चालू राहील अशी दक्षता घेण्याचें मीं अभिवचन दिलें. "नि आपल्याला वर्तमानपत्रहि पाहिजे.'' नोरिस नांवाचा दुसरा एक मुलगा म्हणाला. "आपण लिना व मार्कला संपादक व्हायला सांगूं या–अर्थात् सर्वांची संमति असेल तर. तीं चित्रेंहि चांगलीं काढतात, नि लिना लिहितेंहि छान. आपण क्रीडामंदिराच्या उद्‌घाटनाच्या दिवशींच पहिला अंक काढूं या. आपली तयारी झाली कीं, बुद्धिबळाच्या चढाओढी सुरू करावयाच्या असं

माझ्या वडिलांनीं मला कबूल केलं आहे. नि विश्वविद्यालयांत माझी जी थोरली बहिण आहे, तीहि आठवड्यांतून एकदां यायला नि मदत करायला तयार आहे. तिचा नाटकाचा अभ्यास छान आहे नि नाट्यविभाग काढायला ती आपल्याला खूप मदत करील.''

अशा तऱ्हेनें त्या इमारतींतील सारीं मुलें आपल्या क्रीडासंघाच्या कार्यक्रमांत नि व्यवस्थेंत गुंग होऊन गेलीं. तो संघ म्हणजे सर्वस्वीं आपला आहे, असें त्यांस वाटत होतें. युराला त्यांच्या त्या गटांत खूपच महत्त्व आलें होतें. टेबलावरील सर्व खेळ नि खोलीची टापटीप यांजवर तो देखरेख करीत असे. आणि विशेष नवलाईची गोष्ट अशी कीं, त्या सहामाहीअखेर त्याच्या प्रगतीचा शाळेंतून जो अहवाल आला, त्यावरून असें दिसलें कीं, त्याला वरच्या दर्जाचे गुण मिळाले असून मागील सहामाहींत शिस्तीच्या बाबतींत दिसून येणारी ढिलाई जाऊन त्यांत खूपच सुधारणा झाली आहे.

एक क्षुल्लक गोष्ट–मुलांच्या एका लहानशा जमावाला एक खोली देणं. त्यामें साऱ्या इमारतींत केवढें स्थित्यंतर घडून आलें ! जिन्यांत आतां आरडाओरडा ऐकूं येईनासा झाला. उगीचच भटकत फिरण्याची मुलांची खोड बंद झाली. तें क्रीडागृह सदा मुलांनीं गजबजलेलें असे. हवा चांगली असली तर मात्र मुलें बाहेरच खेळत. खोली स्वच्छ करण्याच्या कामांत आणि निरनिराळे खेळ चालू ठेवण्याच्या बाबतींत पालक आळीपाळीनें साहाय्य करूं लागले. भिंतीवर मुलांनींच काढलेलीं सुंदर चित्रें असत. गृहसमितीनें हळूहळू त्यांत मन घालावयास सुरुवात केली आणि प्रत्येक महिन्याकांठीं चालू खर्चास म्हणून कांहीं रक्कम देऊं केली.

युरा आणि त्याची स्नेही मंडळी यांच्या बाबतींत आम्हीं केलेला प्रयोग ताजा असतांच सरकारी हुकूम निघाला कीं, प्रत्येक गृहसमितीनें आपल्या भागांतील मुलांसाठीं क्रीडाकेंद्र–लालकोना–उघडावें. कारण मुलांना खोड्या करण्यापासून अलिप्त ठेवण्यास हें एक उत्कृष्ट साधन आहे असें अनुभवानें सिद्ध झालें होतें.

* * *

प्रत्येक पोलिस ठाण्यावर एक मुलांसाठीं खोली असे. हरवलेलीं मुलें तेथें ठेवीत. तसेंच स्थानिक नियमांचा भंग करणाऱ्यांची रवानगी तेथें होई. मानस-

शास्त्रांत निष्णात आणि मुलांचा अनुभव व ज्ञान असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या ताब्यांत हीं मुलें असत. त्यांच्या कार्याला फार मोठी शैक्षणिक किंमत आहे आणि सोव्हिएट राष्ट्रसंघाच्या शिक्षणव्यवस्थेत त्याला मोठें स्थान आहे.

उन्हाळ्याच्या तसेंच हिंवाळ्याच्या सुटींत आणि इतर मोकळ्या दिवशीं जिल्ह्यांतील शाळांतील शिक्षक पाळीपाळीनें या पोलिस अधिकाऱ्याला मदतनीस म्हणून काम करीत. वरच्या वर्गांतील तरुण विद्यार्थी देखील समाजसेवेचें एक अंग म्हणून या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं या मुलांवर लक्ष ठेवण्याचें काम करीत. कित्येक अधिकाऱ्यांकडे अशा युवकांचीं निश्चित संख्याच साहाय्यक म्हणून नोंदविलेली असते. त्या अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनानुसार हे युवक चांगल्या तऱ्हेनें कामगिरी करतात.

हिंवाळ्याच्या सुटींतील दोन दिवस पोलिस ठाण्यावर कामगिरीसाठीं म्हणून आमच्या शाळेच्या वांट्यास आले होते. मी त्यांत अर्धा तास दिवस मोठ्या मौजेंत घालविला. मुलांच्या विभागावरील अधिकारी तरुणच होता. पण आपल्या कामांत अत्यंत वाकबगार असल्यानें योग्य माणसाची निवड त्या जागीं झाली आहे असें माझें मत झालें. त्याला हवी असणारी सर्व माहिती त्या मुलांकडून अथवा त्यांच्या पालकांकडून मुळींच धाकदपटशा न दाखवितां किंवा यत्किंचितहि आवाज न चढवितां तो मोठ्या कौशल्यानें काढून घेई.

आंत येणाऱ्या मुलांशीं बोलावें, तीं कोणत्या शाळेंत जातात, त्यांना शाळा कितपत आवडते, त्यांच्या घरचें वातावरण कशा प्रकारचें आहे, वगैरे प्रश्न विचारून मिळेल ती माहिती काढून घ्यावी आणि येनकेन प्रकारेण त्यांना ज्या गुन्ह्याबद्दल ठाण्यावर आणण्यांत आलें होतें, त्याला काय कारण असावें हें पाहावें, अशा तऱ्हेचें काम मजकडे आलें होतें.

खोलींत एक लिहिण्याचें टेबल आणि कांहीं खुर्च्या होत्या. कामकाजासाठीं त्यांचा उपयोग होई. पालकांची वाट पाहात बसणाऱ्या लहान मुलांसाठीं छोटीं टेबलें, छोट्या खुर्च्या, टेबलावर खेळतां येतील अशा कांहीं खेळांची सामुग्री, थोडक्यांत त्यांना स्वतःची करमणूक करून घेतां येईल अशी व्यवस्था असे. निरनिराळ्या वयाच्या मुलांना मनोरंजक वाटतील अशा पुस्तकांचा संग्रहहि एका शेल्फांत ठेवलेला असे.

प्रथम ज्या मुलाला आंत आणण्यांत आलें, तो एक दहा वर्षांचा मुलगा होता. त्याला एका घर-गड्यानें आणलें होतें. त्याची तक्रार अशी होती कीं, घरापुढील जागा साफ करीत असतांना हा मुलगा इतर मुलांसह एका लॉरीच्या मागें लोंबकळतांना त्याला आढळला. इतर लहान मुलें पळून गेलीं. पण हा मुलगा असल्या खेळानें स्वतःचा आणि संवगड्यांचा जीव धोक्यांत टाकीत आहे. तेव्हां या मुलाला पोलिसांकडे आणणें उचित वाटल्यानें तो त्यास घेऊन आला होता. भोकांड पसरून तो मुलगा रडूं लागला. गड्यानें त्याला तेथें सोडलें व तो आपल्या कामास निघून गेला.

"बाळ, ये इकडे." त्या पोलिस अधिकाऱ्यानें अगदीं प्रेमळपणानें त्या बालकास जवळ बोलाविलें आणि आपल्या टेबलाजवळच्या खुर्चीकडे अंगुली-निर्देश केला. "अगदीं रडूं नकोस. आम्ही तुला कांहीं करणार नाहीं. तूं फक्त मला सांग कीं, पुन्हा असं करणार नाहीं. असं करण्यांत काय धोका आहे हें तुला कळायला पाहिजे. तुझं नांव सांग मला. तूं रहातोस कुठं? नि तूं त्या लॉरीला कां बरं लोंबकळत होतास? तुझ्याबरोबर आणखी कोण होतं? तूं शाळेंत कां नाहीं जात? सुटींत देखील तुझ्या शाळेंत कितीतरी करमणुकीचे कार्यक्रम चालू आहेत. तुझ्या शाळेचा नंबर किती?"

तो अत्यंत शांतपणें बोलत होता. त्यामुळें मुलगाहि शांत होऊं लागला होता. मुलानें आपलें नांव व पत्ता दिला. लगेच त्या अधिकाऱ्यानें आपल्या स्वयंसेवकांपैकीं एकास त्याच्या आईस बोलावणें पाठविलें.

वीस एक मिनिटांत त्याची आई येऊन दाखल झाली. ती चिन्ताक्रान्त दिसत होती. आपला मुलगा सुखरूप आहे हें पाहतांच तिचा जीव खालीं पडला होता. अधिकाऱ्यानें तिला सर्व परिस्थिति समजावून सांगितली आणि आपल्या मुलावर देखरेख न करण्याबद्दल तिची खूप कानउघाडणी केली. मुलाला जर घरीं कांहीं करमणुकीचीं साधनें देऊन अडकावून ठेवतां येत नसेल तर त्याला दररोज शाळेंत पाठविलें पाहिजे. शाळेंत मुलांची चांगली काळजी घेतली जाते. निरनिराळ्या कार्यक्रमाच्या विभागांत ते रमूनहि जातात. शाळेला फोन करून सर्व हकीगत कळविण्याची हमी त्यानें घेतली. 'कांहीं दिवसांनीं फोन करून मुलाच्या वर्तणुकीची आपण चौकशी करूं' असें तीस बजावण्यास तो विसरला नाहीं.

मुलगा व त्याची आई निघून जातांच त्यानें शाळेला फोन करून तेथील संचालकाची हजेरी घेतली. "तुमचे शिक्षक शाळेंतले संघ, क्रीडा-विभाग, यांजकडे सुट्टी लागण्यापूर्वी मुलांचें लक्ष्य वेधून घेत नाहींत हें कसें काय? सुटींमध्यें शाळांचें रूपान्तर क्रीडाकेंद्रांत करण्यांत येतें याचा उद्देश एवढाच कीं, मुलांनीं रिकामटेकडेपणें भटकूं नये, त्यांना कांहींतरी उद्योग असावा. आणि हा तुमच्या शाळेंतला विद्यार्थी लॉरीच्या मागें लोंबकळून जीव धोक्यांत टाकतोय. तेव्हां जरा चौकशी करा आणि त्या मुलाबद्दल कळवा."

थोड्याच वेळांत टेलिफोनची घंटा वाजूं लागली. एका दुकानावरच्या रखवालदारानें एका मुलीला खिसा कापतांना पकडलें होतें. 'काय करूं' म्हणून त्यानें चौकशी केली होती. 'तिला इकडे पाठवून द्या.' म्हणून त्यानें हुकूम दिला. थोडक्याच वेळांत त्या मुलीस घेऊन तो दाखल झाला. मुलीचें वय चौदा वर्षांचें होतें; ती फारच दांडगोबा दिसत होती. ती कांहींच कबूल करीना. ती मुकाट्यानें एका कोपऱ्यांत बसून राहिली. तिच्या पालकांना निरोप पाठविण्यांत आला होता. एका बाईचा खिसा कापतांना आपण हिला कसें पकडलें, हें रखवालदारानें सविस्तर सांगितलें. आतां ती मुलगी भडभडा बोलूं लागली. आपण मुळींच चोरी केली नाहीं. शेजारच्या घरची मुलगीच पक्की बिलंदर चोर आहे. त्या मुलीचें वर्णनहि ती फडाफडा सांगूं लागली.

"तुला ग इतकी त्या मुलीची माहिती कशी?" पोलिस अधिकाऱ्यानें विचारलें.

अखेर तिला नाइलाजानें कबूल करावें लागलें कीं, मी तिजबरोबर कधीं कधीं असतें.

त्याच वेळीं मुलीचे आईबाप दोघेहि येऊन दाखल झाले. त्यांना खालीं बसण्यास सांगण्यांत आलें. जेव्हां त्यांना सर्व वस्तुस्थिति निवेदन करण्यांत आली, तेव्हां तिचा बाप टेबलावर मूठ आवळून म्हणाला, "पोरगी मोठी खराब आहे. तिला चांगला चोप द्या. मुलांना मारणें कायद्याच्याविरुद्ध आहे हें तिला माहित आहे. नाहींतर आम्हांला लहानपणीं जसा मार मिळे तसा तिलाहि मिळाला असता, हें पण तिला ठाऊक आहे. तीस वर्षें मी

नेकीनें कामधंदा करतों आणि आजवर कधीं पोलिस ठाण्यावर यायची पाळी माझ्यावर आली नाहीं. काळं फासलं कार्टीनं माझ्या तोंडाला."

"ही चोरी करायला कशी लागली याची तुम्हांस कांहीं कल्पना आहे का?" अधिकाऱ्यानें चौकशी केली. "ती म्हणते कीं, तुमच्या शेजारीं एक मुलगी आहे. तिची संगत आहे हिला. तुम्हांला कांहीं माहिती आहे तिची?"

"एक द्वाड मुलगी आहे खरी; पण तिची संगत धरूं नको म्हणून मीं मर्युसाला तीनतीनदां बजावलं होतं. ती पोरगी शाळा बुडवते, नि हिलाहि नादीं लावते. त्यामुळं शाळेंत अभ्यासांत हिला वाईट शेरा मिळालाय, आणि मला तर वाटतं कीं, याच वर्गांत ती पुन्हा पुढल्या वर्षीं राहणार. काय करावं हिला, मला तर कांहीं समजत नाहीं." असें म्हणून तिच्या वडिलांनीं खांदे उडवले.

"पहिली गोष्ट म्हणजे मर्युसानं नियमितपणें शाळेंत गेलंच पाहिजे, आणि यावर लक्ष ठेवणं हें तुमचं काम आहे. तिच्या आईनं ती घरीं अभ्यास करते कीं नाहीं यावर देखरेख ठेवावी. तसंच संध्याकाळीं तिनं घरांतच राहिलं पाहिजे. जायचंच असेल तर वडील माणसाबरोबर जावं. मर्युसानं मला कबूल केलं पाहिजे कीं, ती पुन्हा कधीं चोरी करणार नाहीं. मी तिजवर नजर ठेवीन. एक महिन्यानं तिनं मला पुन्हा भेटायला यायला पाहिजे. मी तिच्या शाळेंत फोन करून चौकशी करीन आणि पाहीन ती नियमित शाळेंत येते कीं नाहीं आणि झटून अभ्यास करते कीं नाहीं. मर्युसा, कबूल आहे ना तुला?"

"मात्र मीं कधींच चोरी केली नाहीं." मर्युसानें पुन्हा जोरानें उत्तर दिलें.

"बरं; पण तुला नियमित शाळेंत जायचंय कीं मजूर-शिबिरांत जायचंय, तें सांग पाहूं?"

"नाहीं. मी अभ्यास करीन." ती म्हणाली.

तीं सर्वजण गेल्यानंतर पोलिस अधिकारी मजकडे वळून म्हणाले,

"तिची शाळाच रद्दड असली पाहिजे. अजून आमच्या मॉस्कोंत अशा

शाळा आहेत. चांगल्या शिक्षकांचा आम्हांला अजून तरी तुटवडा आहेच. हळूहळू तीहि उणीव दूर होईल. मर्युसाच्या वर्गाच्या सल्लागार बाईंना जरा जागं करायला हवं. मी उद्यां जाईन त्या शाळेंत आणि तिचे पालक–तोहि एक बिकट प्रश्न आहे. त्यांनाहि आम्हांला शिकवायला पाहिजे. तिचा बाप चांगला प्रामाणिक मनुष्य दिसला मला. पण मुलीशीं कसं वागावं याचं त्याला ज्ञान नाहीं. पण मला खात्री आहे, मर्युसा चांगली मुलगी होईल. तिच्या शाळेंतल्या कांहीं जाणत्या मुलांचा माझा परिचय आहे. तीं हिला मदत करतील."

"हे सारे प्रश्न तात्पुरते आहेत." तो पुढें बोलूं लागला. "आमच्या योजनांप्रमाणें सगळ्या गोष्टींची सिद्धता झाली, मुलाच्या पालकांची सुधारणा झाली, बालोद्यानमंदिरें, शाळा, वाचनालयें, नाट्यमंदिरें निघालीं, मुलांना खेळायला बागडायला भरपूर क्रीडांगणें तयार झालीं कीं, हे सारे प्रश्न आपोआप नाहींसे होतील. तुम्ही आणखी थोडीं वर्षें वाट पाहा आणि जर लढाई सुरू झाली नाहीं तर जीं केवळ ध्येयवाद्यांचीं नुसतीं स्वप्नें म्हणून वाटत होतीं, त्या साऱ्या गोष्टी प्रत्यक्षांत येतील. सोव्हिएट मुलांना आपला देश म्हणजे स्वर्ग वाटेल."

"गंभीर स्वरूपाचे गुन्हे पुष्कळ येतात का तुमच्याकडे ? आणि आले तर तुम्ही काय करतां ?" मीं पृच्छा केली.

"अट्टल चोरांचीं अशीं प्रकरणें आमच्याकडे क्वचितच असतात. हीं मुलें म्हणजे त्यांच्या परिस्थितीला पडलेले दुर्दैवी बळी. गृहमंत्र्यातर्फे चालविण्यांत येणाऱ्या 'कम्युनस' मध्यें अशा मुलांची आम्ही रवानगी करतों. तिथं त्यांची सुधारणा होऊन खऱ्या माणसांत तीं येतात. पण असे गुन्हे आतां दुर्मिळ आहेत. लोकांत सुधारणा होत आहे. देशांत बेकारीहि नाहीं. तेव्हां जगण्यासाठीं चोरी करण्याची कोणाला बुद्धिच होत नाहीं. आज तुम्ही पाहिले, तसलेच प्रश्न आमच्याकडे नेहमीं असतात. कुठें मोटारीला लोंबकळ, तर कुठें बिनतिकिटानें प्रवास कर, नाहींतर कामावरच्या पोलिसाशीं उर्मटपणें वाग–बस एवढेच. हे प्रश्न सोडवायचे म्हणजे त्याला शिक्षणच नीट दिलं पाहिजे. शाळांतून आणि पालकांच्या सहकार्यानं या गोष्टी करण्यांत येतात."

नऊ वाजतां आम्हीं कचेरी बंद केली, आणि घरीं परतलों. पोलिस अधिकाऱ्यानं अगदीं सोप्या भाषेंत या प्रश्नाचें स्वरूप पुढें मांडलें होतें. सोव्हिएट राष्ट्रसंघांत अशीच परिस्थिति निर्माण करण्यांत येत आहे कीं, गुन्हा करण्याची गरजच कोणाला वाटूं नये नि तें अशक्य व्हावं. आपण समाजाचा एक उपयुक्त घटक आहों, अशी जाणीव होऊन तसं प्रत्येकाला जगतां यावं. अजून कांहीं उणिवा असतील, चुका असतील, पण या विचार-सरणीचा पाया आज घातला गेला आहे. तो म्हणजे सर्वांना सारखी संधि आणि सर्व संपत्तीवर कामगारांची मालकी. असा पाया असल्यावर वाटेल त्या गोष्टी सिद्ध होतील.

## १२ विद्यार्थ्यांचा भविष्यकाल

सोव्हिएट राष्ट्रसंघांतील प्रदेशांत बेकारीचें नांवहि नाहीं. प्रत्येक प्रकारच्या तज्ज्ञ व कुशल कामगाराची प्रत्येक क्षेत्रांत जरूरीच आहे. मुलांना वा मुलींना जर कसली अडचण भासत असेल तर ती व्यवसायाची नाहीं. इतक्या विविध प्रकारांतून आपण योग्य व्यवसाय कसा निवडावा याचीच त्यांना पंचाईत पडते.

सोव्हिएट समाजजीवनाशीं शालेय जीवनाचा निकट संबंध असल्यानें आपल्या देशांत प्रत्यहीं लागणारे नवनवे शोध, तयार होणारीं नवीं यंत्रें, यांविषयीं प्रत्येक विद्यार्थ्यास माहिती असते. इतकेंच नव्हे तर त्यापासून त्यांना स्फूर्तिहि मिळते. शिवाय, विद्यार्थ्यांच्या अंगीं वसत असलेल्या सृजनशक्तीस—मग ती कलाविषयक असो कीं यांत्रिक क्षेत्रांतील असो,—शाळेकडून भरपूर वाव मिळत असतोच. त्यामुळें आपलें शालेय शिक्षण संपवून आपण बाहेर पडतांच ( म्हणजे वयाच्या पंधराव्या-सोळाव्या वर्षीं ) आपण पुढें काय करणार, कोण होणार, याचा विचार विद्यार्थ्यानें स्वतःशीं केलेला असतो, आणि त्या दिशेनें त्याचे यत्न सुरू असतात. भावि कलावन्त शाळा सुटल्यावर कलेचे पाठ घेत असतात. यंत्ररचनेची हौस असणारे तरुण जिल्ह्याच्या औद्योगिक केंद्रांत यंत्ररचना करीत असतात. उदयोन्मुख गायक व नर्तक नृत्य-गायनाच्या खास

संस्थांत तरी जातात किंवा शाळेला जोडून काढलेल्या वर्गांत आपला विकास करून घेत असतात.

कांहीं विद्यार्थ्यांचा आपलें भवितव्य निवडण्याच्या बाबतींत गोंधळ उडतो. अशांना मार्गदर्शन करण्याची सोय केलेली असते. साधारणपणें पहिली सहामाही संपली कीं दहाव्या यत्तेतील विद्यार्थ्यांसाठीं एक व्याख्यानमाला गुंफली जाते. विविध क्षेत्रांतली तज्ज्ञमंडळी आपापल्या व्यवसायांची माहिती मुलांना देतात. विश्वविद्यालयांतील प्राध्यापक आपल्या विषयाचें महत्त्व स्पष्ट करून सांगतात. डॉक्टरमंडळी आपल्या व्यवसायाची आवश्यकता पटवून देतात. पण त्याबरोबरच भडक चित्रें रंगवून विद्यार्थ्यांची फसवणूक होणार नाहीं याची दक्षता घेण्यांत येते. शिक्षक आपल्या व्यवसायांतील आनंदाबरोबर अडचणींचेंहि विवेचन करतात आणि स्थापत्यशास्त्र-विशारद, यंत्रशास्त्रज्ञ आणि कारखान्यांतील इतर विभागांतील प्रमुख मंडळी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची माहिती पुरवून त्यांच्यापुढें असलेल्या अनंत संधींमधून योग्य ती निवड करण्यास त्यांना साहाय्य करितात.

बऱ्याचशा मुलांना आणि मुलींनहि 'आकाशयान' हा उद्योग चित्तवेधक वाटत असतो. भूगर्भशास्त्राचेंहि कित्येकांना मोठें आकर्षण असतें. सोव्हिएटच्या विशाल प्रदेशांतील दूरदूरच्या प्रदेशांत जावें, बहुरत्ना वसुंधरेच्या उदरांतील नवीन खाणी, नवीन संपत्ति, यांचा शोध लावावा, ती प्रकाशांत आणावी, अशीं स्वप्नें त्यांना पडत असतात. स्थापत्यशास्त्रहि अशाच संधि त्यांच्यापुढें मांडीत असतें. नवीन नवीन अज्ञात प्रदेशांत सडका बांधावयाच्या, रेल्वे-रस्ते काढावयाचे, पूल उभे करावयाचे, एक ना दोन, अनेक कामें असतात. तीच गोष्ट इमारती बांधण्याची. झपाट्यानें भरभराटीस येत असलेल्या औद्योगिक केंद्रांच्या ठिकाणीं नवीं घरें बांधावयाचीं, नवीं शहरें वसवावयाचीं, अशीं कितीतरी कामें आहेत.

अगदीं परवां परवांपर्यंत शिक्षक आणि डॉक्टर यांना आपल्या धंद्याकडे विद्यार्थ्यांना आकर्षून घेणें कठिण जात असे. कारण विद्यार्थ्यांना इतर व्यवसायांत पुढें येण्यास खूप वाव असे. पण या व्यवसायांत वेतनाची वाढ खूप झाल्यामुळें आणि कामाच्या इतर व्यवस्थेंत सुधारणा झाल्यामुळें इतर व्यवसायाइतकेच हेहि व्यवसाय आतां विद्यार्थ्यांना प्रिय वाटूं लागले आहेत. त्यामुळें कांहीं

दिवसांनीं नुसत्या शरीरकष्टाच्या कामाला लागणारे मजूर मिळतील कीं नाहीं याचीहि शंका वाटूं लागली आहे. पण अशा अडचणींतूनहि सोव्हिएट जनता आपला मार्ग काढल्यावांचून राहणार नाहीं. कारण यंत्रांना त्यांनीं आपले दास बनविले आहे आणि आपल्या विविध प्रकारच्या श्रमाची बचत करण्याकडे यंत्रांचा उपयोग करून घेण्यांत येत असतो.

थोडक्याच वर्षांत दहा वर्षांचें शिक्षण सक्तीचें होणार आहे. सध्यां प्रत्येक बालकाला आठव्या वर्षापासून पंधराव्या वर्षापर्यंतचा सात वर्षांचा अभ्यासक्रम पार पाडावा लागतो. सातवी यत्ता संपलीं कीं पुढील वर्गांत जाणें न जाणें त्याच्या इच्छेची गोष्ट असे. वाटल्यास तो 'टेक्निकम' मध्यें प्रवेश मिळवतो. तेथें सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच कोणत्यातरी विषयाचें त्याला सविस्तर ज्ञान मिळून त्यांत 'दर्दी' बनतां येतें. 'टेक्निकम' मध्यें अभ्यास करीत असतांना विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति मिळते. शक्य तों वसतिगृहांत राहण्याचीहि त्यांची सोय करण्यांत येते. या टेक्निकममध्यें विद्यार्थ्यांना वृत्त-पत्रव्यवसाय, भाषांतराची कला किंवा यंत्रशास्त्र यांचें शिक्षण मिळतें. तें पूर्ण झाल्यावर त्यांना व्यवसायांत पडतां येतें किंवा अधिक शिक्षणासाठीं उच्च संस्थेंत जातां येतें.

सातव्या वर्षानन्तर जर अभ्यास पुढें चालू ठेवण्याची कोणास इच्छा नसेल तर त्यांना व्यवसायांत शिरण्याची मुभा असते. ज्या व्यवसायांत शिरावयाचें असेल त्याचें शिक्षण एक वर्षभर त्यांना घ्यावें लागतें. आमच्या शाळेंत फिनिश व इंग्लिश जाणणारी एक मुलगी होती. मास्कोंतील एका मोठ्या भांडागारांत विक्रेत्याचें काम करण्यासाठीं म्हणून ती गेली. त्याच्यातर्फे चालविण्यांत आलेल्या शाळेंत तिला एक वर्ष धाडण्यांत आलें. तिला असलेलें विविध भाषांचें ज्ञान तिच्या अति उपयोगीं पडलें. कारण त्या भांडागारांत अनेक परदेशस्थ लोक वस्तुखरेदीसाठीं येत असत.

वाटेल त्याला एखाद्या सायंशाळेंत दाखल होऊन वाटेल त्या विषयाचा अभ्यास करतां येतो अथवा स्वतःच्या ज्ञानांत अधिक भर घालतां येते. एखादा कामगार विशेष तल्लख बुद्धीचा वा कर्तृत्ववान् आहे असें दिसल्यास ती व्यावसायिक संस्था स्वखर्चानें त्यास विश्वविद्यालयीन शिक्षणासाठीं त्याचा पगार सुरू ठेवून पाठविते.

जे विद्यार्थी दहा वर्षांचा अभ्यासक्रम पुरा करतात आणि मुख्य विषयांत उत्कृष्ट व व्यायाम, गायन, कला, इत्यादि विषयांत चांगला, असे गुण मिळवून उत्तीर्ण होतात त्यांना एखाद्या विश्वविद्यालयांत किंवा संस्थेत विनापरीक्षा प्रवेश मिळतो. ज्यांना कमी गुण पडलेले असतात त्यांना प्रवेशपरीक्षा द्यावी लागते. परीक्षेचा हेतु विद्यार्थ्यांतील तर-तमभाव ठरविण्याचा नसतो, तर एक विशिष्ट दर्जाची गुणवत्ता त्यांनीं दाखवावी अशी अपेक्षा असते.

आमच्या शाळेंतील बहुतेक विद्यार्थ्यांनीं दहाव्या वर्गापर्यंत अभ्यास पुरा करण्याचें ठरविलें होतें. कांहीं कांहीं विद्यार्थी टेक्निकममध्यें गेले. फारच थोडे सातव्या वर्षाच्या अखेरीस शिक्षण संपवून व्यवसायांत शिरले. पण त्यानंतरहि त्यांनीं सायंवर्गांत किंवा आपल्या कार्यकेंद्रावरील अभ्यासमंडळांत जाण्याचा परिपाठ ठेवलाच होता.

माझ्या तेथील मुक्कामांत मीं जें पाहिलें तें असें कीं, सातव्या यत्तेचा अभ्यासक्रम पार पाडलेलीं तीस मुलें घेतलीं तर त्यांतील वीस आठव्या यत्तेंत दाखल झालीं. दहाव्या वर्षाचा अभ्यास संपवून पुढें तीं उच्च शिक्षणासाठीं विश्वविद्यालयांत शिरलीं. बाकीच्यांपैकीं एकजण स्टॅलिन ऑटोमोबाईल कारखान्यांत काम करूं लागला. तेथें तो चार तास काम करी. त्यानें तेथील फॅक्टरींतील शाळेंत नांव दाखल केलें होतें. एका मुलीनें एका कापडाच्या गिरणीस जोडून असलेल्या शाळेचा आश्रय केला आणि मागाच्या कार्यपद्धतींत तज्ज्ञता संपादन केली. एका मुलीनें पोहण्याच्या शर्यतींत आतांपर्यंत उत्कृष्ट प्रावीण्य मिळवलें होतें. तिला चित्रकलेचेहि चांगलें ज्ञान होतें. त्यामुळें आपण शारीरिक शिक्षणाचा पेशा पत्करावा कीं नकाशालेखिका व्हावें, याबद्दल तिचा निश्चय होईना. अखेर तिनें नकाशालेखिका व्हावयाचें ठरविलें; पण आपला फावला वेळ मात्र ती पोहण्यांत, विविध क्रीडांत घालवी. एका अमेरिकन मुलीला रशियन चांगलेंसें येत नव्हतें. ती टेक्निकममध्यें दाखल झाली आणि परकीय भाषांचा अभ्यास करून इंग्लिश शिक्षिकेच्या व्यवसायासाठीं तिनें स्वतःची तयारी केली. एक विद्यार्थी असाच हुषार होता. परभाषासंस्थेच्या प्रवेशपरीक्षेंत त्यानें उच्च क्रमांक मिळवला. तो एकोणिसाव्या वर्षी इंग्रजीचा शिक्षक बनेल. दोन विद्यार्थ्यांनीं नृत्य-नाट्यांची निवड केली आहे.

विश्वविद्यालयांत गेलेल्यांपैकीं एकजण वैद्यकीकडे गेला आहे. एकानें नौकानयन शाळेंत नांव घातलें आहे. थोडक्याच काळांत काळया समुद्रावर मालाची ने-आण करणाऱ्या बोटीवर कप्तान म्हणून त्याला काम मिळेल. अनेकांनीं मॉस्को-विद्यापीठांत पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांचा अभ्यास चालविला आहे.

सोव्हिएट राष्ट्रसंघांतील शालेय शिक्षण संपवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी जर कोणती गोष्ट असेल तर ती ही कीं, त्यांना जो विषय निवडावासा वाटेल तो त्यांना निवडतां येईल. निवडण्याची, अभ्यास करण्याची सोय तेथें होती. आपण व्यवसाय निवडण्यांत कांहीं चूक केली असें जर कोणाला वाटलें तर त्याला तो वाटेल तेव्हां बदलतां येत असे. अशा तऱ्हेच्या सोयींमुळेंच आणि सोव्हिएटमध्यें कधींच बेकारी असणार नाहीं अशी सुरक्षितता वाटत असल्यामुळेंच विद्यार्थ्यांत उत्साह व समाधान नांदतांना आपणांस आढळतें. आपल्याला आवडेल तो व्यवसाय ते शिकत असतात. सोव्हिएट नागरिकांना लाभणाऱ्या सर्व हक्कांचा व सुखसोयींचा ते उपभोग घेतात आणि ज्या समाजांत प्रत्येक व्यक्तीला सुखासमाधानानें जीवित कंठतां येईल अशी समाजरचना निर्माण करण्यासाठीं ते झटत असतात.

# १३ कामगार-संघ

मला शाळेंत येऊन एक वर्ष होतें न होतें तोंच माझी शाळेच्या कामगार-संघ समितीवर निवड झाली. मीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कामगार-संघसंस्था ही संघाच्या सभासदास एक देवदूतीच वाटत होती. संघाचे अध्यक्ष प्रत्येकाच्या जीवनांत जातीनें लक्ष घालीत आणि त्याच्या सुखसोयींची काळजी वाहत. प्रत्येकाच्या तक्रारी सहानुभूतिपूर्वक ऐकून घेऊन त्याला सल्लामसलत देण्यास ते सदैव तत्पर असत.

समितीची सभासद या नात्यानें आमच्या सामुदायिक कार्यावर लक्ष ठेवण्याचें मजकडे काम होतें. संघाचे सर्व सभासद मनापासून काम करतात कीं नाहीं आणि आपापलीं सामाजिक कर्तव्यें नीट पार पाडतात कीं नाहीं, यांकडे लक्ष पुरविण्याची जबाबदारी मजवर होती. साम्यवादी प्रतिज्ञा तपासण्याचें काम मला करावें लागे. आणि महिन्यांतून एकदां समितीच्या सभेपुढें कामाचा अहवाल ठेवावा लागे. कधी कधीं कामगार-संघापुढेंहि तें इतिवृत्त ठेवावें लागे. कांहीं करार तपासणें इतकें सोपें नसे. साम्यवादी कराराचा नमुना साधारणपणें पुढीलप्रमाणें असे.

"या सहामाहीच्या अखेरीस मी पुढील गोष्टी साधण्याची प्रतिज्ञा करीत आहें :

१. विद्यार्थ्यांना कमी गुण मिळणार नाहींत.

२. प्रत्येक पाठासाठीं व्यवस्थित तयारी करून जाईन.

३. कोणताहि विद्यार्थी मागें पडत आहे असें दिसतांच त्यास तात्काळ मदत करीन.

४. माझ्या वर्गाचें लेखन व कामाच्या वह्या नमुनेदार करीन.

स्वाक्षरी..........."

ही प्रतिज्ञा तपासावयाची म्हणजे त्या वर्गाच्या वह्या, गुणपत्रिका आणि शिक्षकाची साप्ताहिक योजनावही एवढ्या गोष्टी तपासणें भागच असे. मला अनेक प्रकारच्या प्रतिज्ञा व करार तपासावे लागत आणि त्यासाठीं निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करावा लागे. नाहींतर माझा खूपच वेळ त्यासाठीं घालवावा लागला असता. मीं त्यासाठीं आलेखपद्धतीचा अवलंब केला. शिक्षकांच्या खोलींत वेगवेगळे आलेख टांगलेले असत. प्रत्येक शिक्षकानें आपली साप्ताहिक प्रगति त्यावर नोंदवून ठेवावयाची असे. त्यामुळें निरनिराळ्या शिक्षकांचें काम परस्परांच्या मानानें कसें चाललें आहे याची कल्पना येई. आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें कोण वागत आहे आणि कोण मागें पडत आहे हेंहि त्यांना कळे. त्यामुळें एक प्रकारचें प्रोत्साहनच सर्वांस मिळे. कारण इतरांच्या मागें पडत जाणें कधींच कोणास रुचणें शक्य नव्हतें.

या प्रकारच्या सामाजिक कार्याची मला बरीच आवड उत्पन्न झाली. कारण त्यामुळें सर्वच शाळेचें एकंदर कामकाज कसें चालतें याबद्दलची दृष्टि मला मिळाली, आणि प्रत्येक शिक्षकाच्या कामाची संपूर्ण पाहाणी करण्याची संधि मला लाभली. मला शिक्षकांचे करारलेख तर तपासावे लागतच, पण त्याबरोबरच नोकर-चाकरांच्या साम्यवादी प्रतिज्ञाहि बघाव्या लागत. त्यासाठीं त्यांनीं वर्गाच्या खोल्या झाडून स्वच्छ केल्या कीं नाहीं त्या पाहावयाच्या, बांक जागेवर लावले आहेत कीं नाहींत, फळे पुसलें आहेत कीं नाहींत, दौतींत शाई भरली आहे कीं नाहीं, घंटा वेळेवर दिली कीं नाहीं, कपडे ठेवण्याच्या खोल्यांत सामान-सुमान व्यवस्थित आहे कीं नाहीं हें मला पाहाणें ओघानेंच येई. माझें काम थेट स्वयंपाकगृहापर्यंत जाऊन पोहोंचलें होतें. शिक्षकां-व्यतिरिक्त बाकीचा नोकर वर्ग या साम्यवादी चढाओढींत खूपच उत्साहानें भाग घेत असल्याचें मला आढळलें. सर्व शिक्षकांना एक प्रकारें ते लोक धडाच घालून देत होते. साम्यवादी प्रतिज्ञा करणें, किंवा चढाओढांत भाग घणे ही

गोष्ट ऐच्छिक असतांहि ते यांत अहमहमिकेनें भाग घेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

माझी निवडणूक त्या समितीवर झाल्यावर थोड्याच दिवसांनीं आमच्या अध्यक्षांनीं शाळा सोडली व माझी त्यांच्या जागीं निवड झाली. आपलें काम इतरांना स्वागतार्ह वाटेल असें उठावदार रीतीनें करून दाखविण्याची जबाबदारी मजवर आली होती. आपण या कामास अद्याप अपात्रच आहोंत असें मला वाटूं लागलें. पण लवकरच कामाची माहिती होऊन तो एक मला चांगला अनुभव मिळेल, असा मला सर्वांनीं धीर दिला, आणि हें खरें ठरलें. माझ्या अगोदरच्या अध्यक्षबाईंनीं आमचा निरोप घेण्यापूर्वीं जिल्हा-कामगार-संघाच्या समितीच्या अध्यक्षाशीं माझी ओळख करून दिली. मला ज्या ज्या अडचणी येतील त्यांचें निराकरण करण्याचें त्यांनीं मला आश्वासन दिलें. त्यांची कचेरी शाळेपासून जवळच असल्यानें त्यांची मदत हवी तेव्हां मिळूं शकेल या विचारानें मला धीर आला होता. तसेंच प्रान्तिक समितीच्या केंद्रांतहि मला नेण्यांत आलें व तेथील अधिकाऱ्यांशीं माझी ओळख करून देण्यांत आली. त्या बाईंची व माझी थोड्याच वेळांत चांगली मैत्री जमली. त्या बाईंनीं मला आपला पूर्वेतिहास सांगितला. त्या एका दूरच्या खेड्यांत राहणाऱ्या; मूळच्या अगदीं अशिक्षित; पण सोव्हिएट अधिकारीवर्गाच्या साहाय्यानें त्यांना उत्तम शिक्षण प्राप्त करून घेतां आलें आणि शिक्षक-कामगार-संघांत एका जबाबदारीच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली.

सोव्हिएट राष्ट्र-संघांत कामगार-संघटनेची निरनिराळ्या व्यवसायानुसार विभागणी झाली आहे. प्रत्येक संस्थेंत स्थानिक कामगार-समिति असते. त्या त्या संस्थेंत काम करणारा प्रत्येक नौकर–मग त्याचा पगार वा दर्जा कांहींहि असो–त्या समितीचा सभासद असतो. आम्ही प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या कामगार-संघांत होतों, आणि आमच्या शाळेंतील शिक्षक, कारकून, नौकर इ. सर्वजण स्थानिक समितीचे सभासद असून निवडणुकीचे अधिकार सर्वांस सारखेच होते. व्यवस्थापक मंडळावर काम करणाऱ्या व्यक्तींना मात्र कामगार-संघ-समितींत अधिकारपदें घेतां येत नसत.

आमची शाळा लहान असल्यानें, अध्यक्ष, कार्यवाह आणि सांस्कृतिक कार्यवाहक अशा तिघांचें कार्यकारी मंडळ होतें. सामुदायिक कार्यांची

तपासणी करण्यांत कार्यवाहांची मदत होत असे. इतर सभासदांच्या अनुमतीनें आपलें कांहीं काम इतर व्यवसायांतील कामगार-संघ-सभासदांकडे या तिघांना वांटून देतां येई. एक समाजसेवेचें कार्य म्हणून ती मंडळी हें काम हौसेनें अंगावर घेत. मी अध्यक्ष असतांना माझी सहकारी एक रशियन शिक्षिका होती. ती सांस्कृतिक कार्य पाहात असे. दुसरी सहकारी सफाई काम करणारी एक कामगार होती. मी पूर्वी जे प्रतिज्ञालेख तपासण्याचें काम करीत होतें, तें आतां तिजकडे आलें होतें.

सांस्कृतिक कार्य करणारांचें कार्यक्षेत्र खूपच विशाल होतें. त्यांचें पहिलें काम म्हणजे ज्यांना अधिक शिकण्याची इच्छा वा हौस असेल त्यांना त्या बाबतींत सोयी उपलब्ध करून देणें. आमच्याकडे असे पुष्कळ वर्ग चालत. इंग्लिश आणि अमेरिकन शिक्षक रशियनचा अभ्यास करीत. रशियन इंग्रजी भाषा शिकत. ज्यांचें शिक्षण अर्धवट असेल असे नौकर लोक रशियन भाषा, गणित आणि इतर विषय यांचा अभ्यास सुरू ठेवीत. कोणी प्रथमोपचाराच्या परीक्षा देऊन प्राविण्यचिन्ह मिळवीत. कोणी जिल्हा क्रीडाविभागांत दाखल होत. त्यांचें दुसरें महत्त्वाचें काम म्हणजे शिक्षकांच्या करमणुकीची तरतूद करणें. सोव्हिएटमधील इतर लोकांप्रमाणेंच आमच्या सभासदांना नाटकांची भारी हौस होती, आणि एकंदरीनें नाटकांला गर्दी असल्यानें तिकिटें मिळण्याची मोठी पंचाईत पडे. आमच्या सांस्कृतिक कार्यवाहिकेला आम्हांला नाटकाचीं तिकिटें मिळवून द्यावीं लागत. जिल्हा-कामगार-संघामार्फत एका खास तिकिट–विक्री कचेरीशीं तिचा संबंध जोडलेला असे आणि त्यामुळें आम्हांस हवीं असलेलीं तिकिटें आणविणें तिला सुलभ होई. नाट्यगृहांना आमच्या भेटी पुष्कळदा सामुदायिकच असत. आम्हीं ‘ रोमिओ-ज्युलिएट ’, ‘ मध्यस्थी ’, ‘ दि इन्स्पेक्टर जनरल ’, ‘ चेरी बगिचा ’ असे कितीतरी प्रयोग एकत्र पाहून त्यांचा आनंद लुटला. आमची कार्यवाहिका मधूनमधून पदार्थ-संग्रहालयें, चित्रपटगृहें यांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखी. याशिवाय सभासदांना व्यक्तिशः देखील चित्रपटाचीं वा नाटकांचीं तिकिटें मागणीप्रमाणें त्या मिळवून देत.

सांस्कृतिक कार्यवाहकाचें आणखी एक कार्य म्हणजे वर्तमानपत्रें वाचून चालू घडामोडींशीं संबंध ठेवण्याचे कामीं प्रत्येकास उत्तेजन देणें, आणि सर्व

प्रकारच्या वाङ्मयाचा भरपूर पुरवठा–शाळेच्या वाचनालयामार्फत अथवा सार्वजनिक वाचनालयाद्वारा–सर्वांस करून देणें हें होय. थोडक्यांत म्हणजे कोणालाहि आपल्या सांस्कृतिक विकासांत कशाचीहि उणीव भासूं न देण्याचें काम या कार्यवाहकाचें होतें. या कार्यवाहकास दोन मदतनीस असत आणि तिघे मिळून सर्वांच्या अडचणी दूर करण्यास मनापासून झटत. वर्षअखेरच्या आमच्या सभेंत आमच्या सांस्कृतिक कार्यवाहिकेचा तिच्या उत्कृष्ट सामाजिक कार्यामुळें "धडाडीची कार्यकर्ती" म्हणून सर्वांनीं एकमुखानें गौरव केला.

कामगार-संघ समितीचें कार्यकारी मंडळ ठराविक वेळीं व ठराविक जागीं महिन्यांतून दोनदां जमत असे. ही जागा व वेळ सर्वांनाच माहीत असे. आम्हीं आमच्या सभेस येऊन चर्चा ऐकण्यास सर्वांना मोकळीक ठेवली होती आणि श्रोत्यांपैकीं कोणीं कांहीं सूचना केल्यास त्यांचा आम्हा आदर करीत असूं. त्या वेळीं आम्ही आमच्या आर्थिक प्रश्नांची चर्चा करीत असूं. (प्रत्येक स्थानिक समितीला त्या संस्थेंत होणाऱ्या पगार-वाटपावर एक टक्क्याप्रमाणें रक्कम दिलेली असे.) आपल्याला कोणत्या सांस्कृतिक कार्यक्रमाची आवश्यकता आहे, सभासदांना कोणते कार्यक्रम आवडतील, याची चर्चा होई. कोणते सभासद आपल्या कर्तव्यपूर्तींत मागें पडत आहेत, सुट्टीचा कार्यक्रम काय असावा, पारितोषिकासाठीं कोणाचीं नांवें सुचवावयाचीं इत्यादि अनेक बाबींचा ऊहापोह होई. या सर्वांचा निष्कर्ष सर्वसाधारणसभेपुढें ठेवण्यांत येई. त्या वेळीं सर्व सभासद उपस्थित असावेत अशी अपेक्षा असे.

हें कार्यकारी मंडळ ज्यांना कांहीं सामाजिक कार्य करण्याची इच्छा असेल त्यांना कोणत्या प्रकारचें काम करावयाचें या बाबतींत मार्गदर्शन करीत असे. हें समाजकार्य वेगवेगळ्या प्रकारचें असे. भिंतपत्रिकांचें संपादन करणें, संपादन-समितीवर काम करणें, वर्तमानपत्रांच्या फायली ठेवणें, लहान लहान हस्तपत्रकें काढणें, संघाची वर्गणी गोळा करणें, इतर सभासदांना रशियन, इंग्रजी इत्यादि भाषा शिकविणें हीं व असल्या प्रकारचीं कामें सामाजिक कार्याच्या सदरांत मोडत. आमच्या सभासदांपैकी एकजण ज्यांचें शिक्षण अर्धवट राहिलें होतें अशांना रशियन भाषा शिकवीः दुसरा वाचनालयांतील कारकुनास पुस्तकांची वर्गवारी करण्यास मदत करी, मुलांच्या वाचनालयाकडे लक्ष्य पुरवी आणि जुनीं पुस्तकें दुरुस्त करण्याच्या कामीं हातभार लावी. आमच्या शिक्षकवर्गांत असलेली

परिचारिका इतरांना ‘ प्रथमोपचार ’ शिकवी. कोणत्याना कोणत्या प्रकारच्या सामाजिक कार्यास आमच्यापैकीं प्रत्येकानें हौसेनें वाहून घेतलें होतें.

कामगार-संघातर्फे वर्षांतून दोनदां मेच्या आणि नोव्हेंबरच्या सुटींत सर्व सभासदांस मेजवानी होत असे. मार्च ८, हा दिवस ‘ स्त्री-दिन ’ म्हणून पाळण्यांत येई आणि त्या दिवशीं खास मेजवानी असे. आम्ही नववर्षारंभहि अशाच तऱ्हेनें साजरा करीत असूं. शिवाय वर्षांतून अनेक सणांच्या दिवशीं व इतर वेळीं इतर शाळांतील शिक्षकांच्या सहा अथवा आमच्या शाळेंतील शिक्षकांपुरत्याच अनेक सहली व वनभोजनें यांचे कार्यक्रम आम्ही करीत असूं.

जिल्हा समितीतर्फे बोलावण्यांत येणाऱ्या सभांस मी नियमानें उपस्थित राहात असें. त्या वेळीं सर्व स्थानिक संघांचे अध्यक्ष हजर राहात. आपापल्या संघातर्फे होणाऱ्या चालू कार्याची सर्वांना माहिती देण्यांत येई. त्यापासून इतरांना पुष्कळच बोध घेतां येई. कधीं कधीं माहितीपूर्ण व्याख्यानाचा लाभ मिळेः तर कधीं सुटीच्या कार्यक्रमासंबधीं चर्चा होई, आणि पारितोषिकांसाठीं निवडावयाच्या शिक्षकांसंबंधीं विचारविनिमय होत असे.

या आमच्या सभा कधींच वेळेवर सुरू होत नसत. त्याबद्दल माझी अध्यक्षाजवळ सारखी कुरकुर सुरू असे. कांहीं सभासदांनीं वेळेवर उपस्थित राहावयाचें आणि इतरांनीं उशिरां यावयाचें म्हणजे वेळेवर येणाऱ्या सभासदांचा कालापव्यय नव्हे काय ? बरें, सभेचें काम उशिरां सुरू होतें म्हणून आपणहि उशिरांच जावें या विचारसरणीला कांहीं अर्थ नव्हता. शिक्षक जर शाळेंत अथवा आपल्या पाठांस नियमित जाऊं शकतात तर त्यांना सभेसच वेळेवर येण्यास हरकत कोणती ? मनांत आलें तर तें त्यांना कठिण नाहीं. मला संधि सांपडे तेव्हां या मुद्यावर मी भर देई. एकदां मी माझ्या मोडक्या-तोडक्या रशियनमध्यें हा मुद्दा जोरानें पुढें मांडला. त्याचा परिणाम म्हणून म्हणा वा इतर कारणांनीं आमच्या सभा पुष्कळच नियमित भरू लागल्या. एकदां मात्र मलाच पांच मिनिटें जावयास उशीर झाला. तेव्हां मात्र सर्वांनीं ‘ या, या,’ म्हणून माझ्याभोंवतीं नुसतें काहूर करून मला भंडावून सोडलें.

शिक्षक-कामगार-संघ हें एक वेगवेगळ्या शाळांतील शिक्षकांना एकत्र

आणण्याचें साधनच होतें. दर तिमाहीस सर्व शिक्षकांची एखाद्या जिल्ह्यांतील हायस्कुलांत सभा भरे. जिल्ह्यांतील सर्व उत्कृष्ट शिक्षकांना सहामाहींतून एकदां मेजवानी असे. त्यानंतर नृत्यगायनाचा कार्यक्रम होई. केव्हां केव्हां एका शाळेंतील शिक्षक-संघसमितिमार्फत दुसऱ्या शाळेंतील शिक्षकांना बोलावून लहानसें संमेलन भरवीत. त्या वेळीं त्यांच्या रशियन पद्धतीप्रमाणें चहाफलाहारासाठीं सर्वजण एका टेबलाभोंवतीं बसत. एकजण त्यांच्या जानपदगीतांपैकीं एखादें गीत तालसुरावर गाऊन सर्व वातावरण त्यानें भारून टाकी. कधीं तो सर्व समुदाय त्या गाण्यांत सामील होई. भोजनोत्तर नाचाचा कार्यक्रम असे.

उन्हाळ्यांत सामुदायिक वनभोजनें होत. कधीं कधीं एखादें जहाज आमच्या दिमतीस असे. आम्ही मॉस्को नदीच्या कांठीं कोठेंतरी मुक्काम करून जलविहार व वनविहार यांचा आनंद लुटीत असूं. कधीं कधीं आगगाडीनें मॉस्कोच्या जवळपास असलेल्या एखाद्या घनदाट वनराईंत नदीच्या कांठीं आम्ही दिवस घालवीत बसूं. कधीं कधीं सायंकाळचा वेळ शिक्षकांच्या विहारसंघांतच व्याख्यान ऐकण्यांत, खेळण्यांत वा एखादा चित्रपट पाहण्यांत आम्ही मजेंत घालवीत असूं.

कामगार-समितीच्या कार्यकारी मंडळास अधूनमधून कामगार-संघ व व्यवस्थापकमंडळ यांच्यांत मध्यस्थी करण्याचा प्रसंग येई. आमच्या विद्यालयांत असे दोन प्रसंग घडले. दोन शिक्षकांना मुख्याध्यापकबाईनीं ‘ तुमचें काम वाईट आहे’ म्हणून लेखीं कळवून त्यांची कानउघाडणी केली. शिक्षकांचा असा दावा होता कीं, हा शेरा अनाठायीं आहे. तेव्हां तें प्रकरण कामगारसंघाच्या कार्यकारी समितीपुढें आलें. समितीनें उभयपक्षांचें म्हणणें ऐकून घेऊन त्यांच्या समक्ष परस्परांशीं बिचारविनिमय करावयाचा अशी कार्यपद्धति होती. अखेर ठरावरूपानें समितीनें आपला निर्णय द्यावयाचा असे. कामगारसंघाचा निर्णय मुख्याध्यापकांच्या विरुद्ध गेला आणि मुख्याध्यापकांचा त्यांच्याशीं मतभेद असेल तर सर्व प्रकरण जिल्हाशिक्षणसमिती व जिल्हा शिक्षक कामगार-संघाची कार्यकारिणी यांच्यापुढें जाई. त्यांचा निर्णय मात्र अखेरचा मानावा लागे.

वर्षअखेर नव्या निवडणुका होत. त्यापूर्वी अध्यक्षांना मागील वर्षाचा संविस्तर अहवाल सभेपुढें ठेवावा लागे. त्यांत यशाबरोबर अपयशाची नोंद

करणें भाग असे. त्यावर नंतर सभासद चर्चा-टीका करीत. इतिवृत्तांतील गुणदोषांबरोबरच समितीच्या कार्यावरहि सडकून टीका होत असे. पण टीकाकारांवर दोष व अपूर्णता यांच्या निवारणासाठीं विधायक सूचना करण्याची जबाबदारीच विशेष असे. आतां माझी पर्यवेक्षक म्हणून नेमणूक झाली होती. व्यवस्थापकवर्गांत मी मोडत असल्यानें मला पुनः निवडणुकीस उभें राहतां येत नव्हतें.

मला जें काम करावें लागलें, त्यामुळें सोव्हिएट देशांतील कामगार-संघाच्या कार्यासंबंधीं मला सूक्ष्म ज्ञान मिळालें. कामगारांची-शिक्षकांची परिस्थिति सुधारावयाची, त्याचबरोबर व्यवस्थापनापद्धतींत सुधारणा घडवून आणावयाची आणि कामाचा दर्जा वाढवून एकंदर व्यवसायाचाच कमान उंचावण्यासाठीं सहकार्यानें झटावयाचें, हें त्या संघटनेचें ब्रीद आहे.

## १४ शिक्षकांची सुटी

सोव्हिएट रशियांतील प्रत्येक शिक्षकास उन्हाळ्याच्या दिवसांत भरपगारी दोन महिन्यांची रजा हक्कानें मिळते. त्या सुटीचा योग्य उपभोग कसा घ्यावा याबद्दल ट्रेड युनिअन त्यास मार्गदर्शनहि करितात. सुटीच्या दिवसांत घरांत बसून वेळ काढण्यांत सुटीचा खरा उपभोग घेतां येत नाहीं अशी तेथील शिक्षकांची मनःप्रवृत्ति बनली आहे. त्यामुळें कोठेंतरी आरोग्य-निवास, विश्रांतिधाम किंवा समुद्रकिनारीं एखादें स्थळ शोधून तेथें सुटीचे दिवस घालवावयाचे असा त्यांचा शिरस्ता आहे.

१९३५ च्या उन्हाळ्यांत आमच्या शाळेंतील दुसऱ्या एका शिक्षिकेनें व मीं मिळून बरोबरच सुटी घ्यावयाचें ठरविलें. आम्ही दोघींहि ती सुटी एकत्र घालविणार होतों. दक्षिणेकडे कॉकेशसमध्यें जावयाचा आमचा बेत होता. तेथील बऱ्याच गोष्टी आम्ही आजवर ऐकत होतों. दुसरें म्हणजे आम्हांला शक्य तेवढ्या सोव्हिएट युनिअनचें दर्शन घ्यावयाचें होतें. शिवाय, आम्हांला विश्रांति व करमणूकहि हवीच होती.

आम्हीं आमच्या कामगारसंघ–समितीच्या अध्यक्षांचा सल्ला घेतला. आम्हीं आमच्या गरजा त्यांच्यापुढें मांडल्या. लगेंच त्यांनीं प्रवास-समितीच्या ऑफिसमध्यें टेलिफोन केला आणि लोकांसाठीं सुटीचे कार्यक्रम आंखण्याचे कामावर

स्वतंत्रपणें नेमलेल्या अधिकाऱ्यांना आमची माहिती देऊन भेटीची वेळ मुक्रर केली.

प्रोलिटेरियन प्रवास-समितीची कचेरी चित्रविचित्र जाहिराती, पत्रिका, नकाशे आणि देखावे यांनीं सुशोभित झालेली होती. उत्तर ध्रुवाकडील नौकासफरीपासून दक्षिणेकडील कॉकेशसच्या पर्वतराजींतील सहलींपर्यंत विविध ठिकाणची व प्रकारची माहिती तेथें तयार होती. एका अंडाकृति लांबट टेबलावर पुस्तकें, मासिकें व पत्रकें मांडून ठेवलेलीं होतीं. लोक त्यांमधून आपणांस हवी असलेली माहिती गोळा करून त्यांचीं टिपणें करून घेत होते. एका बाजूला सल्लाधिकारी कांहीं विद्यार्थ्यांशीं बोलण्यांत गुंतले होते. कामा नदीवर होडग्यांतून सहल करणें अधिक मनोरंजक कीं जॉर्जिअन लष्करी भागांत गिर्यारोहण अधिक सुखावह, याविषयीं त्यांची चर्चा सुरू होती.

विद्यार्थ्यांचें भाषण संपेपर्यंत आम्ही खोलींत हिंडत होतों. त्यांचें काम संपतांच आम्हीं आमच्या अपेक्षा त्यांस सांगितल्या. सुटीचा असा आमचा हा पहिला प्रसंग असल्यानें जेवढें पाहावयास मिळेल तेवढें बघण्याचा आमचा इरादा आम्ही त्यांस कळविला.

" तर मग तुम्ही बोटीनें, होडग्यांतून प्रवास करा ना," असें म्हणून त्यांनीं आमच्यापुढें एक नकाशा उलगडला. " तुम्ही प्रथम गॉर्कीहून स्टॅलिन-ग्राड येथें जा, तेथून आगगाडीनें सोचीकडे या. तेथें आमच्या वसतिगृहांत हवे तितके दिवस तुम्हांला राहतां येईल. किंवा नीपरमधून खालीं जाऊन क्रिमियांत हिंडा. तेंहि ठिकाण भारी सुंदर आहे."

आम्हा वोल्गाचीच सफर पसंत केली. लगेच आम्हीं दोन तिकिटें खरेदी केलीं आणि सोचीच्या वसतिगृहाचा दहा दिवसांच्या मुक्कामाचा परवानाहि घेतला. आम्ही आमचा दक्षिणेचा बेत नक्की केल्यामुळें आम्हांस खूप हर्ष झाला. सोव्हिएटच्या ज्या भागांत आमची भाषा कोणी जाणत नव्हता अशा भागांत फिरण्याचें एक साहस आम्ही करणार होतों.

जून महिन्याच्या एका दुपारीं ऊन खूप धगधगत असतांना आम्हीं मॉस्को सोडलें. आम्ही प्रथ गॉर्कीस जाणार होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही इच्छितस्थळीं पोहोंच ों. येथून पुढला प्रवास आम्हांस बोटीनें करावयाचा

होता. पण बोट सायंकाळपर्यंत सुटणार नव्हती. म्हणून आम्ही धक्क्यावर येऊन लगेज ऑफिसांत आमचें सामानसुमान ठेवलें आणि गांवांत फेरफटका करण्यासाठीं निघालों.

आम्ही एका चढणीच्या रस्त्यानें वळणें घेत घेत वोल्गाच्या कांठीं येऊन दाखल झालों. गॉर्की शहराचा कांहीं भाग तेथें वसलेला आहे. हा भाग जितका जुना तितकाच नवाहि आहे. त्यामुळें क्रान्तिपूर्व व क्रान्त्युत्तर अशा दोन्ही अवस्थांचें संपूर्ण चित्र तेथें पहावयास मिळालें. आम्ही प्रवाश्यासाठीं असलेल्या उपाहारगृहांत गेलों आणि व्यवस्थापकांस भेटण्याची इच्छा व्यक्त केली. अगदीं थोडया वेळांत गॉर्की शहर चांगलें कसें पाहून घ्यावें या बाबतींत आम्हांस सल्ला पाहिजे होता. त्यानें अत्यंत आदरानें आमचें स्वागत केलें. थंड पाण्याचे पेले आमच्या हातीं देऊन आमचें बोलणें स्वस्थपणें ऐकून घेतलें. लगेंच एका दुभाष्याला बोलावून प्रेक्षणीय स्थळांची यादी तयार केली. आणि विशेष आश्चर्याची व तितकीच आनंदाची गोष्ट म्हणजे आमच्या बरोबर स्वतःच येण्याचा आग्रह धरला.

दुभाष्यासह त्यांच्या गाडींत बसून आम्ही निघालों. गॉर्कीतील नवीं-जुनीं सर्व प्रेक्षणीय स्थळें आम्हीं बघितलीं. तेथें नवीन बांधिलेलें रमणीय नाट्यगृह आम्हीं पाहिलें. बऱ्याचशा दुकानांतून व निरनिराळ्या रस्त्यांतून भटकलों आणि शेवटीं नदीकांठानें एक चक्कर मारली. वोल्गाचा ओकाशीं ज्या ठिकाणीं संगम होतो तेथला देखावा तर अतिशयच भव्य दिसतो.

उपाहारगृहाच्या व्यवस्थापकानें दाखविलेली स्नेहपूर्ण आस्था, स्वतःचें नगर दाखविण्याबद्दलची त्यांची उत्सुकता (आणि या श्रमाबद्दल यत्किंचित्‌हि मोबदला न स्वीकारण्याची वृत्ति) या गोष्टी सुटींत हिंडतांना इतरत्रहि अनुभवास आल्या. आम्हांस हवें तेथें जाण्याची व पाहण्याची भरपूर संधि मिळत गेली.

आम्हीं सहा वाजतां बोटीवर पाऊल टाकलें. दोघांच्या सोयीची एक लहानशी डेकच्या बाजूची खोली आम्हांस मिळाली होती. आमची बोट जशी नदीच्या प्रवाहावर घसरूं लागली तसा खिडकींतून आम्हांला दोन्ही तीरांवरचा सुंदर देखावा दिसूं लागला. नदीचा दक्षिण तीर उंचवटयाचा असल्यानें

आकाशाच्या पार्श्वभूमीवर तो उठून दिसे. पश्चिम तीराचा भाग इतका खोलगट होता कीं तेथलीं झाडेंहि जणूं पाण्यांतूनच वर आलीं आहेत असें भासे !

इतक्या विशाल नदींतून जाण्याची ही माझी पहिलीच खेप होती. तसें पाहिलें तर अद्याप आम्ही मुखापासून तीन हजार किलोमीटर ( २२०० मैल ) मागें होतों. तेव्हां पुढें पुढें नदीचें पात्र किती दूर असेल या विचारानें मी विस्मित झालें.

सायंकाळच्या सुमारास आम्हीं डेकवर फेरी टाकून सह-प्रवाशांचें निरीक्षण केलें. आम्हीं चार संगीत वादकांशीं परिचय करून घेतला. लेनिनग्राडमधील संगीतविषयक एका प्रमुख संस्थेचे ते सभासद असून बाकू येथें असलेल्या वृन्द-वादकांत सामील होण्यासाठीं ते जात असल्याचें त्यांजकडून समजलें. उन्हाळ्यांत तेथें त्यांचे विविध कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. ते चौघेहि व्होल्गांतून अस्ट्राखानपर्यंत जाणार होते. तेथून पुढें कास्पियनसमुद्रांतून बोटीनें ते प्रवास करणार होते. नदीवरच्या या चार दिवसांच्या पर्यटनांत रशियन व इतर संगीताविषयीं आम्हीं त्यांच्याशीं पुष्कळ गप्पा मारल्या. लेनिनग्राडला येऊन आपल्या संस्थेस भेट देण्याचें व सुश्राव्य संगीत ऐकण्याचें निमंत्रणहि त्यांजकडून आम्हांस मिळालें.

आमची बोटीवर दुसरी गंमतीदार ओळख झाली ती एका जुन्या कप्तानाशीं. त्याला व्होल्गाची खडानूखडा माहिती होती. त्याचे अनुभव फार मजेमजेचे होते. तो सॅराटोव्ह येथील राहणारा. आपलें गांव आलें कीं तें दाखविण्याचें त्यानें आम्हांस आश्वासन दिलें होतें. पण दुर्दैवानें आमची बोट त्या गांवीं पहांटेच्या वेळींच थांबली त्यामुळें तो बेत आम्हांस पुढें ढकलावा लागला.

बोटीवर एक बाहुली, नाटयगृह व नटांचा संच होता. ते खलाशांची करमणूक करीत. त्या नाटयगृहांत जेवढे मावतील तेवढ्या उतारूनाहि येण्यास मुभा असे. ते लोकहि उन्हाळ्यानिमित्त दक्षिणेकडे निघाले होते. मुलांसाठीं बरींचशी विश्रांतिगृहें असलेल्या एका गांवांतील व्यवस्थापक-मंडळानें त्यांना निमंत्रण केलें होतें. असे अनेक प्रकारचे लोक भेटत गेल्यानें आमचा प्रवास मोठा आल्हाददारक झाला. आमची बोट ठिकठिकाणीं टपाल घेण्यादेण्यासाठीं दहापंधरें मिनिटें थांबे. काझान, कोइबिशेव्ह, स्टालिनग्राड अशा शहरीं मात्र ती बराच वेळ उभी राही. लहानशा ठिकाणीं आम्ही धक्क्यावर उतरून ताजीं

फळें खरेदी करीत असूं. मोठ्या गांवीं मात्र गांवांत व दुकानांत जात असूं व मोठाल्या इमारती पाहात असूं.

दोन गोष्टी ठळकपणें आमच्या नजरेंत भरल्या होत्या. एक–रस्ते, दुकानें व सामान्य लोक यांची स्वच्छता आणि दुसरी–स्त्री-पुरुषांच्या पोशाखांतील नीटनेटकेपणा व टापटीप. स्त्रियांचे व पुरुषांचे पोशाख म्हणजे पांढऱ्या शुभ्र लोंकरीचे शर्ट व तुमानी. त्यांच्या कांठाला वेलबुट्टी वा वीणकाम केलेलें असावयाचें. पण त्यांत स्वच्छता मात्र कमालीची असे. लहान लहान टप्प्यांच्या ठिकाणीं शेतकरी आमच्या बोटीवर चढून शहराची मजल करीत. कित्येक शहरांतून निघून लहान गांवाकडे जात. लहान गांवाकडे जाणाऱ्यांच्या सामानांत शिवण्याचीं यंत्रें, ग्रामोफोन अशा वस्तु पाहून आम्हांस किती अचंबा वाटे याची कल्पनाच केलेली बरी. एकाजवळ तर कोरी करकरीत बुंचाकीहि होती.

आम्ही जेव्हां या गोष्टी त्या वृद्ध कप्तानांशीं बोललों, तेव्हां तो म्हणाला, "शेतकरी चांगला पोशाख घालून प्रवास करूं शकतील हें तुम्हांस शक्य वाटत नाहीं ना? आमच्या खेड्यांत अद्याप सर्व वस्तु मिळत नाहींत, म्हणून आमच्या शेतकऱ्यांना शहराचा रस्ता पाहावा लागतो. पण एक दिवस असा येईल कीं सामुदायिक शेतावर राबणारा शेतकरी, रेशमी वा मखमली कपडे घालून काम करतांना तुम्हांस दिसेल. फक्त थोड्या दिवसांचा हा प्रश्न आहे. खेडीं आणि शहरें यांतील अंतर नाहींसें झालेंच म्हणून समजा. आतां कुठें आमची शेती भक्कम पायावर उभी राहूं लागली आहे. थोड्याच दिवसांत प्रत्येक शेतकरी सुखवस्तु होईल."

अशा तऱ्हेनें आमचे दिवस जात होते. आम्ही बोटीवरचा वेळ ऊन खाण्यांत, तर कधीं सांवलींत वाचण्यांत किंवा नव्या ओळखींच्यापैकीं कोणाशीं तरी बोलण्यांत घालवीत असूं. सृष्टिशोभेला तर तोटाच नव्हता. बोटीवरचें जेवणहि रुचकर असे. तेथला आचारी तरबेज होता. वोल्गांतील विविध मासळीचीं सुग्रास पक्वान्नें तो बनवी. त्याच्या इतके खुमासदार पदार्थ फक्त मला लेनिनग्राडहून लंडनला जातांना 'सिबिर' मध्येंच चाखायला मिळाले.

आम्ही स्तालिनग्रादला सकाळीं पांचाला जाऊन पोहोंचणार होतों. गॉर्की सोडल्यापासूनचा तो सहावा दिवस. आम्हीं चारालाच उठून सामानाची

आवराआवर केली आणि डेकवर येऊन खड्या झालों. आमच्या इष्टस्थलाशीं आम्ही जसजसे येऊन पोहोंचलों तसतसे वोल्गाच्या पृष्ठभागावरील मंद जललहरी आमचें लक्ष वेधूं लागल्या. दक्षिण किनाऱ्याला अजून उंच पठारच होतें. मधून मधून पाईनवृक्षांनीं आच्छादलेल्या टेकड्या दृष्टिपथांत येत. पश्चिमेला मात्र उथळ विस्तीर्ण सखल मैदान होतें. तो भाग इतका दूरवर पसरलेला असे कीं, आपण नदीपृष्ठावर आहों कीं एखाद्या विशाल जलाशयावर आहोंत याचा निश्चय करणें कठिण होई.

आमची बोट जसजशी पश्चिमेस झुकली तसतसा किनारा व शहर दृग्गोचर होऊं लागलों. आम्ही गॉर्कीपासून दोन हजार किलोमीटर दूर आलों होतों आणि प्रवासांतील पहिली मजल गांठली होती. आम्हीं सहप्रवाशांचा निरोप घेतला, धक्का ओलांडला आणि आणि स्टेशनची चढण चढून गेलों. तेथें सामान-सुमान टाकलें, आणि ट्रॅक्टर बनविणाऱ्या कारखान्याकडे जाणारी समोर एक गाडी उभी होती तिचा आश्रय घेतला.

सुमारें वीस मिनिटांच्या प्रवासानंतर आम्ही कारखान्यापाशीं येऊन पोहोंचलों. आसपास खूप रस्तेच रस्ते दिसत होते. मधून मधून पांढऱ्या-शुभ्र घरांच्या रांगा. प्रत्येक घराभोंवतीं एक लहानसा फळाफुलांचा बगिचा, कारखान्याभोंवतींहि बगिचा होता. फुलांचे वाफे, ताटवे आणि हिरवळीचे चौक त्यांत इतस्ततः विखुरले होते. सर्वत्र स्वच्छता व टापटीप मनावर ठसा उमटवीत. आम्ही नदीकांठानें थोडें हिंडलों, यंत्रविशारदांसाठीं व तज्ज्ञांसाठीं असलेली खास इमारत पाहिली आणि न्याहारीचा समाचार घेण्यासाठीं शहराच्या मध्यभागाकडे वळलों. आम्ही एका उपाहारगृहाकडे वळलों. दिवस अद्याप फार वर आला नव्हता, तरी पण भाजलेली अंडीं, लोणी, मध व कॉफी यांचें भरगच्च भोजन आम्हांस मिळालें.

न्याहारी आटोपतांच आमचीं तिकिटें आम्हीं खरेदी केलीं. आणि साडे-अकरापर्यंत शहरभर हिंडलों. साडेअकराला आम्हांला पुढें निघावयाचें होतें. येथील लोकांची, दुकानांतील व रस्त्यांतील स्वच्छता पाहून आम्हांस पुनः एकवार नवल वाटलें. स्टॅलिनग्रॅड मोठें सुरेख शहर आहे. इतक्या लवकर आम्हांस येथून निघावें लागलें याबद्दल खेद वाटल्यावांचून राहिला नाहीं.

आमची सोचीला जाणारी गाडी साडेअकराला निघाली. हा प्रवासहि वैशिष्ट्यपूर्ण असाच झाला. आमच्या डब्यांत लाल सेनेंतील कांहीं सैनिक होते. एक म्हातारी शेतकऱ्याची बाई होती. दुसरी एक सुमारें अठ्ठावीस वर्षांची तरुण स्त्री होती. ती तर एकसारख्या सिगरेट्स फुंकीत होती. लवकरच आमच्यांत संभाषण सुरू झालें आणि नेहमींप्रमाणें इंग्लंडविषयींच्या प्रश्नांची आमच्यावर सरबत्ती सुरू झाली. ती म्हातारी शेतकऱ्याची बाई आमचें बोलणें लक्ष देऊन ऐकत होती. ती मध्येंच म्हणाली,

"तुमच्या देशांत कांहीं क्रान्ति झाली नाहीं, नाहीं ना ? पण क्रान्तीमुळें माझ्या आयुष्यांत काय काय फेरफार झाले पहा. मी एका सामुदायिक शेतावर शेती करतें. माझा थोरला मुलगा ट्रॅक्टर चालवतो. माझी एक मुलगी गुरें राखणाऱ्या पलटणींची मोहोरकी आहे. माझा एक मुलगा मॉस्कोला राहून ग्रामीण अर्थशास्त्राचा अभ्यास करतो. आमच्या शेतानेंच त्याला पाठविलें. माझ्या नातवंडांनाहि चांगलें शिक्षण मिळतेंच, मला मात्र लिहितां-वाचतां येत नाहीं. आतां शिकायचं माझं वय नाहीं राहिलं. मीं सुद्धां प्रयत्न करून पाहिला. पण स्मरणांत राहत नाहीं आतां. पण मला एवढं नक्की माहीत आहे कीं, जर कोणी आमच्या देशावर स्वारी केली (आणि येथें तिनें मुठी आंवळल्या) तर कसा काय त्याचा समाचार घ्यावयाचा हें आम्हांला चांगलं माहीत आहे."

"शाबास, आजीबाई," लाल सैनिक ओरडले, "याला म्हणतात भाषण."

त्या तरुणीनें आणखी एक सिगरेट शिलगावली. मजकडे जरा क्षमेच्या अपेक्षेनें दृष्टि वळवली, आणि म्हणाली, "माफ करा अं, मला धूम्रपान थांबवतां येत नाहीं. मी तेरा वर्षांची असतांना हें व्यसन लागलं. कितीहि यत्न केला तरी आतां तें सुटत नाहीं. त्या वेळीं मी एक अनाथ अर्भक होत्यें. ना घर ना दार, जागा मिळेल तिथं झोंपायचं. मी एका लहान मुलांच्या टोळक्यांत होत्यें. आम्ही स्टेशनवर उचलेगिरी करीत असूं. एक दिवस पोलिसांनीं आम्हांला पकडलें आणि अशा मुलांसाठीं असलेल्या एका गृहांत आमची रवानगी केली. त्यामुळेंच मी माणसांत आल्यें. सध्यां मी कम्युनिस्ट पार्टीची सभासद आहें आणि समाजशास्त्राची अध्यापिका आहें. माझी खेडो-पाड्यांत काम करण्यासाठीं नेमणूक झाली आहे. तेथें मी पार्टीचा इतिहास

शिकवतें. सोव्हिएट संघाच्या नेतृत्वामुळें झपाट्यानें कशी प्रगति झाली आहे हें लोकांना समजावून देत्यें. बोल्गावरील एका आरोग्यस्थानीं विश्रांतीसाठीं मी महिनाभर गेल्यें होत्यें. आतां परत कामावर रुजूं होणार."

त्या दोघी स्त्रिया आपापलीं इष्ट स्थळें येतांच निघून गेल्या. त्यांना निरोप देतांना आम्हांला थोडेसें वाईट वाटलें. दोघींत कितीतरी तफावत होती. पण क्रान्तीनें घडून आलेल्या बदलांची प्रत्येकींत पुरेपूर साक्ष होती.

लाल सैनिकहि काळ्या समुद्रावरच्या ठिकठिकाणच्या हवा खाण्याच्या ठिकाणीं वा विश्रांतिकेंद्रावरच जात होते. एकजण सैबेरियांतून सात दिवसांचा प्रवास करून आला होता. एकजण अतिपूर्वेकडून आला होता, तर तिसरा लेनिनग्राडच्या उत्तरेकडून निघाला होता. त्या सर्वांना रेल्वेचे फुकट परवाने होते. प्रवासाचे दिवस सुट्टीच्या दिवसांत धरले जाणार नव्हते. प्रत्येकाजवळ आपल्या तरुणपणच्या कांहींना कांहीं सांगण्यासारख्या आठवणी होत्या. सोव्हिएटसरकारनें आपणांसाठीं काय काय केलें यालाच त्यांत प्राधान्य होतें. क्रान्ति झाली नसती तर त्यांच्यापैकीं दोघे शेतकरीच राहिले असते. गुलामींत व अज्ञानांतच त्यांचे दिवस गेले असते. त्यांच्या श्रमाचें कधीं चीजहि झालें नसतें. तिसरा झाडूवाल्याचा मुलगा होता. त्यालाहि अर्धपोटीं जीवन कंठावें लागलें असतें. आतां त्यांना मनांत येईल तें होतां येणार होतें. सैन्यांत असतांहि त्यांचा अभ्यास पुढें चालू होता. त्यांची मुदत संपतांच त्यांना पुढें अभ्यास करावयास अथवा सैन्यांत असतांना ज्याची पात्रता संपादिली असेल तें काम करावयाला ते मोकळे होते.

अशा आनंदी मित्रांच्या संगतींत आमचा प्रवास सुखमय चालू होता. दुसऱ्या दिवशीं गाडीच्या मुख्य संरक्षकानें (गार्ड) आमची भेट घेतली. आपल्या गाडींत परदेशस्थ उतारू असल्याचें त्यास समजलें होतें, आणि म्हणून आमच्याशीं गप्पा मारण्यासाठीं तो आला होता. त्यानें मोठ्या अभिमानानें खिशांतून एक टिपण-वही काढून दाखविली. तिच्यांत 'युदर्निक' (धडाडीचा कामगार) हीं अक्षरें कोरलेलीं होतीं. त्याची गाडी अगदीं वक्तशीर चाले, आणि प्रवाशांच्या सुखाची काळजी तींत वाहिली जाई. गाडीला जोडून लेकुरवाळ्या स्त्रियांसाठीं असलेला डबा त्यानें आम्हांस दाखविला.

तेथें खिडक्यांवर रंगीत पडदे सोडलेले होते. लहान लहान मेजांवर रंगीत खेळणीं टांगलीं होतीं. लहानसें शिशुमंदिरच होतें तें!

त्या गवताळ प्रदेशांतून मैलामागून मैल जसजसा जाऊं लागला, तसतसा हा प्रवास कधीं संपावयाचाच नाहीं कीं काय, असें आम्हांस वाटूं लागलें. जिकडे पाहावें तिकडे दृष्टि पोंचेल तेथपर्यंत पिंगट रंगाचीं सपाट मैदानेंच दिसत. कोठें टेकाड नाहीं कीं उंचवटा नाहीं. मधून मधून एखादें खेडें दिसावयाचें, तर कोठें कोठें बैल अथवा उंट रखडत चाललेले नजरेस यावयाचे. सोव्हिएट राष्ट्र किती विस्तीर्ण आहे याची आतां आम्हांला कल्पना येऊं लागली.

दुसऱ्या दिवशीं सायंकाळच्या सुमारास देखावा पालटूं लागला. थोडीं थोडीं झाडें आतां दिसूं लागलीं आणि जमिनीचा कंटाळवाणा सखलपणाहि संपला. दुसऱ्या दिवशीं आम्ही जागृत झालों तेव्हां नवीन सृष्टिशोभा आमचें स्वागत करीत होती. आमची गाडी पाईनवृक्षराजींनीं अवगुंठित अशा पर्वत-श्रेणींतून आपला मार्ग काढीत होती. एका अरुंद दरींतून गाडीनें वळण घेतलें, आणि समुद्राचें पहिलें दर्शन आम्हांस घडलें. तुप्सेच्या तेलांच्या टांक्या व मोठाले नळ यांची काळ्या समुद्रावर गर्दी झाली होते. तो काळा समुद्र काळा मुळींच नसून इतरांप्रमाणें निळाभोर होता.

तुप्सेपासून गाडी समुद्राच्या कांठाकांठानें जाते. दुसऱ्या बाजूला झाडींनीं आच्छादलेले कडे होते. आमची गाडी लहान लहान स्टेशनावर थांबे. तेथें आरोग्यगृहांच्या व विश्रांतिस्थानांच्या पांढऱ्या इमारती दिसत. सोव्हिएट कामगारांच्या क्रीडाभूमीवर येऊन ठेपलों होतों.

आम्ही सोचीस दुपारीं येऊन पोहोंचलों. आम्ही तडक उपाहारगृहाचा रस्ता धरला. एका निरुंद पण चढणीच्या गल्लीनें जातांच एका दुमजली लांकडी इमारतीपुढें आम्ही येऊन ठेपलों. घराच्या मागच्या बाजूस टेकडीच्या उतरणीवर रुंदरुंद टप्प्यावर बगिचा होता. त्यांत तंबू उभारले होते. ऊन तर अगदीं प्रखर होतें. घरामागील पडवीच्या थंडगार सावलींत शिरल्यानें आम्हांला बरें वाटलें.

आम्हीं परवाने दाखविले, नांवें नोंदविलीं. आम्ही 'घरांत झोंपणार, कीं तंबूंत' म्हणून विचारणा झाली. आम्हीं तंबूच पसंत केला. आम्हांला एका

बागेत प्रशस्त तंबूंत दोन बिछाने देण्यांत आले. त्यांत अगोदरच आठांची सोय लावली होती.

आम्हीं सामानसुमान लावलें, स्नानें उरकलीं, आणि गल्लीच्या टोंकाशीं असलेल्या जेवणगृहांत गेलों. एका शाळेच्या पडवींत जेवणाची सोय केली होती. जेवण घेतां घेतां आम्हांला समुद्राचा व टेकटीच्या खालीं पसरलेल्या सोची गांवची शोभा अवलोकितां येत होती. आम्ही गांवाच्या एका अत्युच्च शिखरावर होतों. पण समुद्रावरचा तो देखावा बघण्याचा जो आनंद होता त्याच्यापुढें ते चढण्याचे श्रम कांहींच नव्हते.

जेवण झाल्यावर आम्हीं समुद्रावर हिंडावयास गेलों. सोचीला 'सोव्हिएट रिव्हेरा' असें नांव आहे. फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्याप्रमाणेंच येथील हवा व पीकपाणी आहे. पण भूमध्यसागराच्या किनाऱ्यावरील इमारतींपेक्षां येथल्या इमारती अधिक सुंदर व भव्य वाटतात. काळ्या समुद्राचा किनारा आरोग्यगृहें, विश्रांतिगृहें, उपवनें आणि बगिचे यांनीं गजबजला आहे. प्रत्येक आरोग्यगृह वा विश्रांतिगृहें सार्वजनिक बागा वा क्रीडांगणें यांनीं इतरांपासून अलग आहे, आणि या साऱ्या गोष्टी कामकऱ्यांसाठीं आहेत. सोव्हिएट राष्ट्रांत जो कोणी काम करील त्याला येथें येऊन विश्रांति घेण्याचा अधिकार पोहोंचतो. दर वर्षी सोव्हिएट सरकार आणि कामगार-संघ आरोग्यमंदिरें बांधण्यासाठीं लक्षावधि रुबल्स खर्च करीत असतात. एकाहून एक सुंदर अशा इमारतींनीं काळ्या समुद्राचा किनारा सुशोभित झाला आहे.

आमच्या सोयीप्रमाणें आम्हीं सोचा येथील वेळापत्रक तयार केलें. आमच्या इच्छेला येईल त्या वेळीं आम्हांस जेवण घेतां येई. सकाळची न्याहारी सात ते नऊचे दरम्यान, दुपारचें जेवण एक ते तीनच्यामध्यें व रात्रीचें जेवण पुनः सात ते नऊच्या दरम्यान, असा कार्यक्रम असे. आम्ही सकाळीं लवकर उठत असूं आणि सातालाच न्याहारी संपवीत असूं. त्यानंतर फळबाजाराच्या मार्गानें आम्ही समुद्रतीरावर जात असूं. फळबाजारांत, बेरी, पीच इत्यादि फळांपैकीं कसली तरी खरेदी आमची व्हावयाचीच. समुद्रतीरावर सूर्यस्नान व पोहणें-ऊन अगदीं असह्य होईपर्यंत हा कार्यक्रम चालावयाचा. त्यानंतर एका सार्वजनिक उद्यानांतून घराचा रस्ता आम्हीं पकडीत असूं. पर्वताच्या कडेकडेनें या उद्यानाची मांडणी होती. वाटेंत दुग्धमंदिरांत सायसाखर

खावयास मिळे. घरीं येऊन भोजनाची वेळ होईपर्यंत तास दोन तास बिछान्यावर लोळत पडण्याचा कार्यक्रम. सोची येथें खराखुरा सुटीचा आनंद उपभोगावयास मिळत होता.

सायंकाळीं सहाच्या सुमारास गांवांत फेरफटका, तर कधीं आमच्या वसतिगृहाच्या मागें टेकड्यांवर सहल, तर कधीं गवताळ जमिनीवर पडून निरामय वाचन, तर केव्हां हिमाच्छादित गिरिशिखरांच्या शोभेचा आनंद-असा आमचा वेळ जाई.

सायंकाळीं बहुधा घरींच नवीन नवीन पाहुण्यांच्या संगतींत नृत्यगीतांच्या कार्यक्रमांत वेळ जाई. कधीं त्यांच्याबरोबर सार्वजनिक बागेंत बँडवादन वा संगीत ऐकण्यास आम्हीं जात असूं.

एके दिवशीं लालसेनेचें एक पथकच्या पथक आमच्या निवासस्थानीं येऊन उतरलें होतें. त्यामुळें संध्याकाळ फारच मजेंत गेली. राष्ट्रीय नृत्यें व गीतें यांनीं त्यांनीं आमची करमणूक केली. अखेरी-अखेरीस तर आम्हीहि त्यांत सामील झालों.

सोची येथें असतांना आम्हीं सहलीहि खूप काढल्या. जवळ जवळ प्रत्येक दिवशीं सहलीचा कार्यक्रम ठेवण्यांत येई व इच्छा असेल त्याला त्यांत भाग घेतां येई. आम्ही नावेनें गाग्री येथें एक दिवस गेलों. काळ्या समुद्रावरील तें एक असेंच सुंदर ठिकाण आहे. वाटेंत देखावाहि मोठा रमणीय होता. पाण्यांत डॉल्फिन्स नाचत होते आणि लोक जसे इकडून तिकडे विविध देखावे पाहण्यासाठीं धांवत तसतशी आमची आगबोट सारखे हेलकावे खाई. आम्ही परतलों ते खूप थकून, पण अत्यंत सुखित चित्तानें. त्या वेळीं चांदणेंहि मोठें सुरेख होतें. निरनिराळ्या राष्ट्रीय गाण्यांनीं आकाश दुमदुमत होतें. दुसऱ्या एका दिवशीं सोचीजवळच्याच एका घनदाट अरण्यानें आच्छादलेल्या पर्वतावर गेलों. शंभर शंभर वर्षांचे पुराण रक्त वृक्ष बघून आम्हांस मौज वाटली. इतरहि मौल्यवान् वृक्ष तेथें खूप होते.

सगळ्या सहलींच्याबरोबर वाटाडे असत. त्यांना सहलीच्या ठिकाणच्या प्रेक्षणीय स्थळांची बारीक-सारीक माहिती असे. तिकिटें काढणें, जेवण मागविणें व इतर पैसे चुकते करणें हीं सर्व कामें त्यांजकडेच असत. आम्हीं विकत

घेतलेल्या परवान्यांच्या किंमतींत या सर्वांचा अंतर्भाव केलेला असे. आम्हीं फक्त आनंद लुटावयाचा.

आम्हीं आमच्या सुटींत वसतिगृहांत व इतरत्र खूप ओळखी केल्या. अनेक मित्र जमविले. आमच्या तंबूंत इतर आठ मुली व स्त्रिया होत्या. बहुतेक सर्वांना २० दिवसांची सुटी असून कामाचें बक्षिस म्हणून फुकट परवाने मिळाले होते. एक लेनिनग्राडमधील शिक्षिका होती. तिजबरोबर मीं आमच्या अध्यापनविषयक अनुभवाची चर्चा केली. दुसऱ्या दोन मॉस्कोमधील एका वस्त्रभांडारांत नोकरीस होत्या. त्यांच्याजवळ पोषाखाच्या इतक्या तऱ्हा होत्या कीं, त्या दिवसांतून अनेकवार वेषपरिवर्तन करीत. एक अतिशय देखणी आंखूड काळ्या केसाची स्त्री होती. तिचें वय होतें पंचेचाळीस, पण दहा वर्षांनीं ती लहान दिसे. आम्ही एका सायंकाळीं सागरतीरावरच्या वाळवंटांत पहुडलों असतां तिनें आपला पूर्वेतिहास मला सांगितला. दहा वर्षांची असतांपासून ती एका कापडाच्या गिरणींत काम करीत होती. क्रान्ति झाली तेव्हां ती साध्या मजुराप्रमाणें राबत होती. लिहितां-वाचतां तर तिला मुळींच येत नव्हतें.

"आणि आतां पाहा," ती बोलतांना अभिमानानें फुलून उठली होती, "मला नुसतें लिहितां-वाचतांच येतें असें नव्हे. मीं कामगारांच्या शाळेंतला सर्व शिक्षणक्रम पार पाडला आहे. मी आतां गिरणीसाठीं लागणाऱ्या मालाच्या खरेदीसाठीं निघालें आहें. मी चहूंकडे प्रवास करत्यें. मोठमोठ्या रकमा माझ्या स्वाधीन करण्यांत येतात. मला राहायला मोठी जागा आहे. तेथें आई व दोन मुली यांच्यासह मी राहातें. बरेच वर्षांपूर्वी माझे पति वारले. तिशीच्या सुमारास मला सहा मुलें होतीं. पण आमच्या त्या वेळच्या घाणेरड्या परिस्थितींत बहुतेक सारीं तीं दगावलीं. मातांची कुणी काळजी तेव्हां घेत नसत आणि मुलें माशांसारखीं पटापट मरत. जाऊं द्या; सरले एकदांचे ते दिवस. कशाला त्यांची आठवण तरी काढावयाची." तिनें आम्हांला केव्हांतरी इव्हॅनोव्ह येथें येऊन कांहीं दिवस राहण्याचें आग्रहाचें निमंत्रणहि केलें.

आमचे बाकीचे मित्र एंजिनिअरिंग संस्थेतील विद्यार्थी होते. त्यांचा बहुतेक काळ त्यांच्या समवेत आलेल्या इतर विद्यार्थ्यांबरोबर जाई. हे

विद्यार्थी शरीरबलसंपन्न होते. पोहण्यांचा आणि डोंगर-कपारींतून फिरण्याचा त्यांना भारी शोक होता. त्यांना नृत्याचीहि आवड होती आणि इंग्लिश-पद्धतीचें कांहीं नृत्यप्रकार आपल्याला शिकविण्याबद्दल त्यांनीं आम्हांस विनंति केली.

सुटीच्या कार्यक्रमाची रेखीव मांडणी करण्याचें या लोकांचें कौशल्य पाहून आम्हांस नवल वाटलें. आपला दिवस कसा घालवावयाचा याची चिन्ता करण्याचें कोणाला कारण पडत नसे. सर्व आरोग्यगृहांत आणि विश्रांति-धामांत केशभूषा, कपडे धुणें, किरकोळ दुरुस्ती, सफाई या सर्वांची तरतूद असे. उत्कृष्ट देखावा जेथून दिसेल अशा ठिकाणीं आरामशीर रीतीनें घेतां येईल अशा पद्धतीनें भोजनाची सोय केलेली असे. डॉक्टरांची तेथें उपस्थिति असे आणि आरोग्यगृहांत सर्व प्रकारच्या व्याधींची चिकित्सा होऊन उपचार केले जात.

सुटीनंतर लोक घरीं येत तेव्हां साहजिकच त्यांची कान्ति पालटलेली असे. उन्हाचा परिणाम होऊन किंचित् काळसर-तांबूस छटा चेहऱ्यावर येई. पण ते ताजेतवाने होऊन परत आलेले असत. विश्रांतिधामांत मनावरचें दडपण बाजूला सारून चैनचमन करावयाची, नियमितपणा राखावयाचा कीं संपलें. इतर गोष्टींची काळजी करायलाच नको.

आम्ही मॉस्कोला परतलों तेव्हां आम्हीहि लालबुंद झालों होतों. आम्हांला भरपूर विश्रांति मिळाली होती. यानंतरहि मीं पुष्कळ सुट्यांचा अनुभव घेतला, पण ही पहिली सुटी मी कधींच विसरणार नाहीं. त्या वेळीं झालेल्या माझ्या ओळखीहि चिरंतनच्या ठरल्या. ह्याचबरोबर या अनुभवांनीं मला दुसरी एक गोष्ट पटविली. ती म्हणजे फक्त सोव्हिएट संघराज्यांतच अशा सुट्या उपभोगावयास मिळतात आणि सोव्हिएट सरकारच असा प्रचंड खर्च त्यावर करूं शकतें.

REFBK-0006838

# आमचीं प्रकाशित पुस्तकें

**श्री. वि. स. खांडेकर**

| | |
|---|---|
| नवा प्रातःकाल (दु. आ.) | २॥ |
| पूजन (दु. आ.) | ३ |
| पहिल्या वहिल्या | २। |
| गोफ आणि गोफण | ३ |

**श्री. वि. वि. बोकील**
('वसंताच्या लीला')

| | |
|---|---|
| बेबीचा भाऊ (दु. आ.) | ३ |
| चिमखडे | २॥ |
| साडेतीन शहाणे | ३ |
| वसंत | ३ |
| भाऊ-भाऊ | २॥ |

**श्री. दत्त र. कवठेकर**

| | |
|---|---|
| नादनिनाद | १॥ |
| चांदण्यांतील सांवल्या | ३ |
| शालन | ३ |
| मंदा | २ |

**श्री. ना. धों. ताम्हनकर**

| | |
|---|---|
| आमचे हे | ३ |
| मामा (दु. आ.) | २ |
| विद्यामंदिरांत | ०॥॰ |
| सावटांतलं रोप | १॥ |

**श्री. अनंत काणेकर**

| | |
|---|---|
| घरकुल | १। |
| काळी मेहुणी | १॥। |

**श्री. ना. ह. आपटे**

| | |
|---|---|
| मी वाट पाहीन | २। |
| एकटी | ५ |

**श्री. चिं. वि. जोशी**

| | |
|---|---|
| संचार | २॥ |
| आसाडवाडीचे देव | २ |
| सोळा आणे | २॥ |

**श्री. गोपीनाथ तळवलकर**

| | |
|---|---|
| अनुराधा | २ |
| आशियाचे धर्मदीप | २ |

**श्री. र. गो. सरदेसाई**

| | |
|---|---|
| स्वाति | १॥ |

**श्री. 'धनंजय'**

| | |
|---|---|
| कलावंतांच्या सहवासांत | ३ |

**श्री. सौ. शांता नाशिककर**

| | |
|---|---|
| नीलेचा दिलरुबा | २ |

**श्री. चिरडे**

| | |
|---|---|
| भंगलेली मूर्ति | २ |

**श्री. दत्त उद्धव वैद्य**

| | |
|---|---|
| मोगरीचा गजरा | १॥ |

**श्री. प्रभाकर पाध्ये**

| | |
|---|---|
| प्रकाशांतील व्यक्ति | १॥। |

**श्री. गं. त्र्यं. माडखोलकर**

| | |
|---|---|
| जीवन-साहित्य | २॥ |

**काकासाहेब कालेलकर**

| | |
|---|---|
| जीवन आणि समाज | १॥। |

**रमातनय**

| | |
|---|---|
| ज्ञान आणि विज्ञान | १ |

**श्री. साने गुरुजी**
- अमोल गोष्टी (दु. आ.) १॥

**श्री. शामराव ओक**
- धोत्र्याचे कळे २।

**श्री. जे. एल्. रानडे**
- गोड ललकाऱ्या १॥

**श्री. जी. एस. पाटणकर**
- मधुर चिजें १।

**श्री. त्र्यं. र. देवगिरीकर**
- घटना-परिषद २

**श्री. भा. कृ. केळकर**
- सुभाष ३॥

**श्री. रा. त्रि. पाटणकर**
- आपलें राष्ट्रीय सरकार १।

**'मनमोहन'**
- युगायुगांचे सहप्रवासी १

**श्री. रा. वि. फडतरे**
- तिसरी झेप ३

**'रामतनय'**
- प्रमिला बेन ४

**श्री. रमाकांत वेलदे**
- भूक (दु. आ.) ४

**प्रो. नांदापूरकर**
- मायबोलीची कहाणी १॥

**सौ. शांता शेळके**
- वर्षा २॥

**श्री. य. गो. जोशी**
- साहित्यिकांची सफर १॥

**श्री. प्र. के. अत्रे**
- अत्रे उवाच २

**डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे**
- डोळ्यांचें आरोग्य ०।=

**सौ. मालतीबाई दांडेकर**
- आकर्षक संसार ४

**श्री. अरविंद गोखले**
- जन्मखुणा २॥

**श्री. का. न. केळकर**
- शमीपूजन ५

**श्री. ग. वि. अकोलकर**
- रशियांतील विद्यामंदिर ३॥

## एजन्सीचीं पुस्तकें

**प्रो. ना. सी. फडके**
- उन्माद ( दु. आ. )
- माझा धर्म ३।
- प्रवासी (ति. आ.) ६
- आजचे तरुण स्त्री-पुरुष व त्यांजपुढील प्रश्न ३

**सौ. कमला फडके**
- गुलमोहोर २॥

**श्री. भा. रा. भागवत**
- वैताग-वनांतील वाफोरे १।

**काँग्रेस प्रकाशनें**
- काँग्रेस व राष्ट्रभाषा ०।=
- ग्रामसफाई ०।=
- अन्नधान्य प्रश्न ०।=
- हिंदी स्त्रियांचें जीवन ०।=

**सं. मा. का. दामले**
- जगाला आव्हान १

**कॉन्टिनेंटल् प्रकाशन, पुणें २**